'' सोलापूर जिल्हयातील सहकारी संस्थांच्या राजकीयकरणाचा अभ्यास''

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ पुणेच्या तात्वीक व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेंतर्गत राज्यशास्त्रविषयातील विद्यावाचस्पती (पीएच. डी.) पदवी साठी सादर केलेला संशोधनप्रबंध

संशोधक:

श्री. नाळे शिवाजी एकनाथ

एम. ए, एम. फिल.

मार्गदर्शक:

डॉ. सोनवणे एम.डी.

विभागप्रमुख, राज्यशास्त्र विभाग,

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ,पुणे

जून २०१६

प्रमाणपत्र

मी असे प्रमाणित करतो की, **श्री. शिवाजी एकनाथ नाळे** यांनी'' **सोलापूर जिल्हयातील सहकारी संस्थांच्या राजकीयकरणाचा अभ्यास**''हा प्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणेच्या पीएच.डी. पदवीसाठी सादर केलेला आहे.

प्रस्तुत प्रबंध हा **श्री. शिवाजी एकनाथ नाळे** यांचा स्वतःचा आहे. त्यासाठी त्यांनी अनेक अस्सल व विश्वसनीय साधनांचा वापर करुन माझ्या मार्गदर्शनाखाली स्वतंत्ररित्या लिहिला आहे. टिळक महाराष्ट विद्यापीठ, पुणेच्या पी.एच.डी. (राज्यशास्त्र) पदवीच्या पूर्ततेसाठी तो सादर करण्यात येत आहे.

स्थळ : पुणे

दिनांक :

मार्गदर्शक

(प्रा.डॉ. माणिक सोनवणे)

प्रतिज्ञापत्र

मी असे प्रतिज्ञापूर्वक जाहीर करतो की, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणेच्या पीएच.डी. (राज्यशास्त्र) पदवीसाठी सादर केलेला'' **सोलापूर जिल्हयातील सहकारी संस्थांच्या राजकीयकरणाचा अभ्यास**''हा प्रबंध मी स्वतः लिहिला असून तो पूर्णपणे स्वतंत्र आहे. या प्रबंधात आवश्यक तेथे पूर्वसुरींच्या मतांची ऋणनिर्देशक नोंद केलेली आहे. हा प्रबंध अथवा यामधील कोणताही भाग कोणत्याही विद्यापीठाच्या अन्य कोणत्याही परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

स्थळ : पुणे

दिनांक : १६/०६/२०१६

संशोधक

(श्री. शिवाजी एकनाथ नाळे)

ऋणनिर्देश

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाच्या पी.एच.डी. (राज्यशास्त्र) पदवी परीक्षेसाठी ''**सोलापूर जिल्हयातील सहकारी संस्थांच्या राजकीयकरणाचा अभ्यास**'' या विषयावरील सदर प्रबंधासाठी संशोधन करण्यासाठी माझे गुरुवर्य व ऋशीतुल्य व्यक्तिमत्व असणारे **डॉ. माणिक सोनवणे** यांनी मला मार्गदर्शक म्हणून वेळोवेळी केलेल्या बढदल मी त्यांचा कायम ऋणी आहे व राहीन. अगढी अवघड वाटणारा मुढढा सहजतेने व सोप्या पध्ढतीने त्यांनी समजावून दिला. त्यांनी वेळोवेळी केलेलया शिस्तबध्ढ व योग्य मार्गदर्शनामुळे हा प्रबंध मी वेळेतपूर्ण करु शकलो.

संशोधनाच्या कामी माझ्या अभ्यासाला दिशा देण्याचे अभिमानास्पद काम **''टिळक महाराष्ट्र विद्यापीठाने''** केल्यामुळे त्यांचा मी कायम ऋणी आहे. तसेच हा प्रबंध लिहित असताना सतत माझ्यापाठीशी भक्कमपणे उभे राहून संशोधना विषयीचे बारकावे समजावून सांगून पाठबळ देणारे माझ्या महाविद्यालयाचे प्राचार्य **डॉ. महेंद्र कढम** यांचाही मी ऋणी आहे. संशोधनाच्या वाटेवरुन वाटचाल करत असताना सातत्याने मला अनमोल मार्गदर्शन व सहकार्य करणारे माझे सहकारी मित्र प्रा.डॉ. बाळासाहेब दास, प्रा. संजय साठे, प्रा. रविंद्र कुनाळे, प्रा. झाकीर हुसेन मुलाणी, प्रा. सौ. खंदारे मॅडम, प्रा. नेताजी कोकाटे, प्रा. वैशाली साळुंखे, प्रा. अनिल जाधव, प्रा. डॉ. विजय काळे, प्रा. डॉ. राजेंद गायकवाड, प्रा. दिगंबर वाघमारे, प्रा. विवेकानंद माने, प्रा. सौ. आशा फढे, प्रा. सचिन मुळे, श्री. विजय उपासे, श्री. मिलिंद भोसले, सौ. कुटे मंडम, श्री. सोमनाथ नलावडे, श्री.विलास कोठावळे, श्री. संजय वीर, श्री. रमेश ढावरे, श्री. संतोश कांबळे यांचाही मी कायम ऋणात राहीन. या सहकाऱ्यांनी वेळोवेळी विविध ग्रंथ, मासिके, इंटरनेटवरील माहिती पुरवणे यासारखे साहित्य पुरवून मला सहकार्य करून माझ्या संशोधन कार्याला पुर्ण करण्यामध्ये हातभार लावला. वेळोवेळी सहकाराच्या अनुशंगाने मार्गदर्शन करुन माझा हूरुप ढ्विगुणित करणारे जनता विद्यालय, टेंभुर्णीचे उपप्राचार्य प्रा. डॉ. अजिनाथ कापरे यांचाही मी ऋणी आहे. अशिक्षित कुटुंबात जन्मास येवून देखील वैचारीक श्रीमंतीने मला संशोधन कार्यास पाठवणारे माझी आई व वडील आप्पा, संसाराचा गाडा एकटीने खेचून मला संशोधनासाठी वेळ देणारी व प्रसंगी

माझ्या संशोधनासाठी सहकार्य करणारी माझी सुविद्य पत्नी सौ. वनिता, माझी मुले कु. प्रांजली व चि. आर्यन, माझा भाऊ या सर्वांच्या नैतिक पाठिंब्यामुळेच मी पी.एच. डी. सारख्या पदवीचा प्रबंध पूर्ण करु शकलो.

संशोधन कार्यासाठी जयकर ग्रंथालय, सा.फ. वि. पुणे, खर्डेकर ग्रंथालय, शि. वि. कोल्हापूर, पंढरपूर महाविद्यालय, ग्रंथालय, शिवाजी कॉलेज बार्शी, ग्रंथालय येथील सर्व ग्रंथपालांचे ही मी आभार व्यक्त करतो. माझ्या संशाधन कार्यासाठी सातत्याने पाठबळ देणारे प्रा. डॉ.सुशीलकुमार शिंदे, प्रा. लावंड यांचेही मी ऋण व्यक्त करतो. संशोधनाचे लेखन केल्यानंतर संगणकावरती सुबक टायपिंग करुन देणारे श्री. निलेश गवळी यांचेही मी आभार मानतो. ज्यांनी मला प्रत्यक्ष, अप्रत्यक्षपणे संशोधन कार्यासाठी सहकार्य केले त्यांचे मी आभार व्यक्त करतो.

(श्री. शिवाजी एकनाथ नाळे)

अनुक्रमणिका

अ. क्र.	प्रकरण	पृष्ठ क्र.
१.	प्रकरण पहिले **प्रस्तावना व संशोधन पध्दती** १.१ प्रस्तावना १.१.२ सहकार विषयक कायदे १.२ सहकारी संस्थांचे राजकीयीकरण १.२.१ स्वातंत्र्य पूर्व काळातील राजकारण १.३ सहकारी चळवळीवरील साहित्याचा आढावा १.४ राजकारणावरील साहित्याचा परामश १.४.१ चळवळीवरील सरकारी धोरणाचा परामर्श १.५ संशोधन पध्दती १.५.१ संशोधनाची समस्या सूत्रण आणि संशोधन प्रश्न १.५.२ संशोधनाची उद्दिष्टे १.५.३ संशोधनाची गृहितके १.५.४ अभ्यास क्षेत्राची ओळख आणि व्याप्ती १.५.५ संशोधनाचे महत्त्व १.५.६ माहिती संकलनाची साधने १.५.७ संशोधनाच्या मर्यादा १.५.८ प्रकरण नियोजन १.५.८.१ प्रस्तावना व संशोधन पध्दती १.५.८.२ सहकारी चळवळीचा इतिहास वाढ आणि विकास १.५.८.३ जिल्हयातील सहकारी साखर कारखाने आणि राजकारण १.५.८.४ जिल्हयातील सहकारी दुध संघ आणि राजकारण १.५.८.५ जिल्हयातील सहकारी बँका आणि राजकारण १.५.८.६ समारोप, निष्कर्श आणि उपाययोजना	१ ते ५२
२.	प्रकरण दुसरे **सहकारी चळवळीची वाढ आणि विकास** २.१ प्रस्तावना	५३ते९२

	२.२ सहकार संकल्पनेचा अर्थ / व्याख्या **२.३ सहकारी चळवळीची वाटचाल** **२.४ सहकारी चळवळीचा वाढ व विकासाचे टप्पे** २.४.१ कालखंड (१९०४ ते १९११) २.४.२ कालखंड (१९१२ ते १९१८) २.४.३ कालखंड (१९१९ ते १९२९) २.४.४ कालखंड : (१९३० ते १९३९) २.४.५ कालखंड (१९३९ ते १९४६): २.४.६ सहकार नियोजन समिती (सरैया समिती) **२.५ आधुनिक काळातील सहकारी चळवळ** २.५.१ पहिली पंचवार्षिक योजना (१९५१-१९५६) २.५.२ पाहणी समिती (गोरवाला समिती १९५१-१९५४) २.५.३ दुसरी पंचवार्षिक योजना (१९५६-१९६१) २.५.४ तिसरी पंचवार्षिक योजना (१९६१ ते १९६६) २.५.५ ग्रामीण व शहरी भागात जीवनावश्यक वस्तुंचे वितरण २.५.६ चौथी पंचवार्षिक योजना (१९६६ ते १९७४) २.५.७ अखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा समिक्षा समिती २.५.८ पाचवी पंचवार्षिक योजना (१९७४ ते १९७९) २.५.९ सहकारी धोरणाचा सन १९७८ चा ठराव २.५.१० सहावी पंचवार्षिक योजना (१९८० ते १९८५) २.५.११ सातवी पंचवार्षिक योजना (१९८५ ते १९९०) २.५.१२ आठवी पंचवार्षिक योजना (१९९२ ते १९९७) २.५.१३ नववी पंचवार्षिक योजना (१९९७ पासून) २.५.१४ दहावी पंचवार्षिक योजना आणि सदयस्थिती **२.६ समारोप**	
३.	**प्रकरण तिसरे** **सोलापूर जिल्हयातील सहकारी साखर कारखाने आणि राजकारण** **३ .१ प्रस्तावना** **३ .२ भारतातील साखर कारखान्याची सद्यस्थिती** **३ .३ महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्याची सद्यस्थिती** **३ .४ जिल्ह्याातील साखर कारखान्याची सद्यस्थिती**	९३ते १३३

	३.४.१ बंद पडलेला भोगावती सहकारी साखर कारखाना ३. ५ आकडेवारीचे विश्लेषण ३.५.१ सभासदांची साक्षरता ३.५.२ शेतकऱ्यांची जमीन स्त्रोत ३.५.३ ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या ३.५.४ ऊस उपादनाचा खर्च ३.५.५ अभ्यास क्षेत्रातील शेतकरी आणि राजकीय स्थिती ३.५.६ अभ्यास क्षेत्रात सहकाराच्या तत्तवाचे पालन ३.५.७ तालुकानिहाय आकडेवारीचे विश्लेषण ३.५.७.१ सत्ताधारी राजकीय पक्ष ३.५.७.२ सभासद शेतकऱ्यांची राजकीय स्थिती ३.५.७.३ संचालक मंडळांना सहकाराच्झा तत्त्वांची माहिती ३.६ समारोप	
४.	प्रकरण चौथे सोलापूर जिल्हयातील सहकारी दुधसंघ आणि राजकारण ४.१ प्रस्तावना ४ .२ भारतातील दुग्ध सहकारी चळवळ ४.२.१ भारतातील दुग्धउत्पादन ४ .२.२ भारतातील सहकारी दुग्ध संस्थाचा विकास ४.२.३ भारतातील सहकारी व खाजगी दुध संस्था ४ .३ महाराष्ट्रातील दुग्ध सहकारी चळवळ ४.३.१ महाराष्ट राज्यातील एकूण प्राथमिक दूग्ध सहकारी संस्था ४.३.२ महाराष्ट्र राज्यातील सहाकारी दुग्ध संघाचा विकास ४ ४ जिल्ह्याातील दुग्ध सहकारी चळवळीची सद्यस्थिती ४ ५ आकडेवारीचे विश्लेषण ४.५.१ सहकारी संस्थेतील दुध उत्पादने ४.५.२ सोलापूर जिल्हयातील दुध संघातील निवडणूक ४.५.३ सहकारी दुध संघातील राजकीय प्रभाव ४ .६ समारोप	१३४ ते १८३

५.	प्रकरण पाचवे **सोलापूर जिल्हयातील सहकारी बँका आणि राजकारण** ५ .१ प्रस्ताविक ५ .२ भारतातील सहकारी बँका ५ .३ महाराष्ट्रातील सहकारी बँका ५ .४ सोलापूर जिल्ह्याातील सहकारी बँका ५.४.१ सोलापूर जिल्हयातीलमध्यवर्ती बँकेचे राजकारण ५.४.२ राजकीय दडपणामुळे आर्थिक नुकसान ५ .५ आकडेवारीचे विश्लेषण ५ .६ समारोप	१८४ ते २३६
६	प्रकरण सहावे **समारोप, निष्कर्श आणि उपाययोजना** ६.१ प्रस्ताविक ६.२ सर्वसाधारण निष्कर्श ६.३ गृहितकांची पडताळणी ६.४ शिफारशी/उपाययोजना ६.५ पुढील संशोधनाची दिशा	२३७ ते २५५
	संदर्भसूची	२५६ते२६१
	अनुसूची	
	परिशिष्ठ१	

तक्ते

तक्ता क.	तपशील	पृष्ठ क्र.
१.१	नमुना निवड	४९
३.१	महाराष्ट्रातील सहकार, खाजगी साखर कारखाने	९९
३.२	महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखाने	१०१
३.३	सोलापूर जिल्हयातील साखर कारखाने	१०४

तक्ता क.	तपशील	पृष्ठ क्र.
३.४	भोगावती साखर कारखान्यातील गळीपाचा आढावा २००० ते २०१०	१०६
३.५	सोलापूर जिल्ह्याातील सहकारी साखर कारखान्याचे राजकीय पक्ष	१०८
३.६	सभासदांची साक्षरता	११०
३.७	शेतकऱ्यांची जमीन	१११
३.८	ऊसाचे क्षेत्र आणि स्वरूप	११२
३.९	ऊस उत्पादनाच्या पध्दती	११३
३.१०	ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रमुख समस्या	११४
३.११	शेतकऱ्यांचा ऊस उत्पादनासाठी येणारा खर्च	११६
३.१२	राजकीय दबाव	११८
३.१३	चेअरमनकडून मिळणारा न्याय	११९
३.१४	सहकारी तत्त्वे	१२०
३.१५	सरकारी उपाययोजना	१२१
३.१६	सहकारी साखर कारखान्याची वाटचाल	१२३
३.१७	सभासदांना/शेतकऱ्यांना मदत	१२४
३.१८	राजकीय पक्ष	१२५
३.१९	सहकारी साखर कारखान्यातील गट/पक्ष	१२६
३.२०	सोलापूर जिल्ह्याातील राजकारणाचे विष्लेशण	१२८
३.२१	सहकारी साखर कारखान्यांच्या अध्यक्षाची भूमिका	१२९
३.२२	अभ्यास क्षेत्रातील सहकारी तत्त्वे	१३०
३.२३	संचालक मंडळाची माहिती आणि तत्त्वाची घसरण	१३१
४.१	जागतिक विकासाचा अहवाल	१४४
४.२	सहकारी संस्थांची भारतातील दुधाची उपलब्धता	१४५
४.३	महत्वाची दुध उत्पादक राज्य आणि दुध उत्पादन	१४६
४.४	दरडोई दुध उपलब्धता आणि दुध उत्पादन	१४७
४.५	भारतातील दुग्ध प्रक्रिया उदयोग २०११-१२	१४९
४.६	भारतातील दुध प्रक्रिया उदयोगांची संख्या	१५०
४.७	सहकारी संस्थांचा विकास	१५२
४.८	महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची संस्थानिहाय प्रगती	१५२
४.९	महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची प्रगती	१५६

तक्ता क.	तपशील	पृष्ठ क्र.
४.१०	महाराष्ट्रातील प्राथमिक दुग्ध सहकारी, तालुका आणि जिल्हासंघ संस्था	१५६
४.११	महाराष्ट्रातील सहकारी सहकारी दुध संघातील दुध विभागणी	१५८
४.१२	महाराष्ट्रातील सहकारी दुध संस्थाचा विकास	१५९
४.१३	महाराष्ट्रातील दुध संघ	१६१
४.१४	महाराष्ट्रातील सहकारी व खाजगी दुध पदार्थचे उत्पादन	१६४
४.१५	सोलापूर जिल्हयातील दुग्ध विकास सहकारी संस्था २००९ ते २०१३	१६५
४.१६	सोलापूर जिल्हयातील सहकारी दुग्ध संस्थामधील उत्पादने	१६६
४.१७	दुध संघाची नावे	१६७
४.१८	सहकारी दुध संघाचे क्षेत्र	१६८
४.१९	सरकार चा वाटा (शासनाचा)	१६९
४.२०	संचालक निवडणूक प्रक्रिया	१७०
४.२१	सहकारी दुध संघाचे किमंत धोरण	१७१
४.२२	दुध विक्रीचे ठिकाण	१७२
४.२३	सहाकारी दुध संघातील दुध पदार्थाची उत्पादने	१७३
४.२४	बाजराची उपलब्धता	१७४
४.२५	शीतगृहाची संख्या	१७६
४.२६	सहकारी संस्थची निवडूणूक प्रक्रिया	१७७
४.२७	गाई व म्हशीच्या खरेदीसाठी संघाकडून मदत	१७८
४.२८	चेअरमनकडून मदत	१७९
४.२९	राजकीय परिस्थीती	१८०
४.३०	राजकीय पक्ष/गट	१८१
४.३१	दुध संघातील राजकीय प्रभाव	१८२
५.१	बँकाचा विकास	२०७
५.२	सहकारी बँका (आकडे रु कोटीत)	२०८
५.३	सहकारी बँकेचा वर्गीकरण	२०९
५.४	भारतातील प्राथमिक स. संस्था	२०९
५.५	शेतकरी खातेदारांची संख्या	२१२
५.६	भारतातील जिल्हा सहकारी बँकांची आकडेवारी (२००७)	२१३

तक्ता क्र.	तपशील	पृष्ठ क्र.
५.७	महाराष्ट्रातील जिल्हा सहकारी बँकांची आर्थिक स्थिती (२००९)	२१४
५.८	सोलापुर जिल्हातील प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्थाची स्थिती इ. २०११-१२	२२५
५.९	सभासदांचे शिक्षण	२२९
५.१०	सहकारी बँकातील सभासदत्त्व	२३०
५.११	कर्जाची वेळवर उपलब्धता	२३१
५.१२	राजकीय हस्तक्षेप	२३२
५.१३	राजकीय पक्ष आणि धोरण	२३३
५.१४	राजकीय दडपणामुळे आर्थिक नुकसान	२३४
५.१५	मतदानाची माहिती वार्षीक आणि निर्णय	२३६

प्रकरण पहिले

प्रस्तावना व संशोधन पध्दती

प्रकरण पहिले

प्रस्तावना व संशोधन पध्दती

१.१ प्रस्तावना

१.१.२ सहकार विषयक कायदे

१.२ सहकारी संस्थांचे राजकीयीकरण

१.२.१ स्वातंत्र्य पूर्व काळातील राजकारण

१.३ सहकारी चळवळीवरील साहित्याचा आढावा

१.४ राजकारणावरील साहित्याचा परामश

१.४.१ सहकारी चळवळीवरील सरकारी धोरणाचा परामश

१.५ संशोधन पध्दती

१.५.१ संशोधनाची समस्या सूत्रण आणि संशोधन प्रश्न

१.५.२ संशोधनाची उद्दिष्टे

१.५.३ संशोधनाची गृहितके

१.५.४ अभ्यास क्षेत्राची ओळख आणि व्याप्ती

१.५.५ संशोधनाचे महत्त्व

१.५.६ माहिती संकलनाची साधने

१.५.७ संशोधनाच्या मर्यादा

१.५.८ प्रकरण नियोजन

१.५.८.१ प्रस्तावना व संशोधन पध्दती

१.५.८.२ सहकारी चळवळीचा इतिहास वाढ आणि विकास

१.५.८.३ जिल्हयातील सहकारी साखर कारखाने आणि राजकारण

१.५.८.४ जिल्हयातील सहकारी दुध संघ आणि राजकारण

१.५.८.५ सोलापूर जिल्हयातील सहकारी बँका आणि राजकारण

१.५.८.६ समारोप, निष्कर्श आणि उपाययोजना

प्रकरण पहिले

प्रस्तावना व संशोधन पध्दती

१.१ प्रस्तावना:

शेतकरी, कामगार व गरीब वर्गाची सावकारी पाशातून मुक्तता करण्याच्या उद्देशाने ब्रिटिशांनी भारतात सहकारी चळवळीची स्थापना करण्यात आली आहे. जगातील पाश्चात्य देशातील इंग्लंड, फान्स, जर्मनी या राष्ट्राप्रमाणे भारतातील सहकारी चळवळींचा उगम जनतेतून उत्स्फ्ंतपणे झालेला नाही तथापि शासना कडून या चळवळीच्या वाढ आणि विकासाला चालना देण्यात येत आहे. विशेषत: सहकारी साखर कारखाणे, सहकारी गृह निर्माण संस्था, औद्योगीक सहकारी संस्था, सहकारी दूध उत्पादक संघ, सहकारी सूत गिरण्या, सहकारी बँका, ग्रामिण विकास सोसायट्या आणि सहकारी भांडारे या सारख्या संस्था निर्माण केल्या गेल्या आहेत. आगदी सहकारी तत्त्वावर चालणारे महिला व पुरूषांचे बचत गट या सारख्या संस्थांच्या उभारणीस आणि त्याय माध्यमातून सर्व सामाण्य लोकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रामाणिक प्रयत्न केले जात आहेत. त्यातून ग्रामिण भागात रोजगार निर्माण झाले असून आणि सर्व-सामान्य लोक सहकारी आणि त्यानुशंगीक लोकशाही प्रक्रियेशी जोडले गेले आहेत. सहकाराच्या तत्त्वानुसार एकमेका साह्य करू अवघे धरू सुपंथ या उक्तीप्रमाणे विविध सामुहीक कृती कार्यक्रमातून विकास साधण्याचा प्रयत्न केला जात आहे. आणि त्यांना आर्थिक सहाय्य दिले जात असून मोठ्या प्रमाणात अनुदान दिले जात आहे. अर्थात वेगवेगळ्या सहकारी संस्था ग्रामीण भारताच्या वाढ व विकासात महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. सहकाराच्या माध्यमातून ग्रामिण भारताचा चेहरामोहरा बदलण्यासाठी सहकारी संस्थांना केला जाणारा पतपुरवठा वरचेवर वाढवला जात आहे.

तथापि राजकारणामुळे या संस्थांचे कार्य आत्मकेंद्री व संकुचीत होत चालले आहे आणि सहकाराचा हेतू पायदळी तुडवला जाऊ लगला आहे. अशा

प्रकारे सहकाराच्या अपयशाचा व या संदर्भातील कारणांचा शोध अनेक समित्यांनी घेतला असून अनेक उपयोक्त सुचना केल्या आहेत तथापि त्यांनी केलेल्या सूचना प्रत्यक्ष अंमलात आणल्या गेल्या नाहीत. या संदर्भात ''भारत सरकारने सहकारी पतपुरठयाचा आढावा आणि राजकीय संबंध शोधण्यासाठी ७ ॲगष्ट २००४ च्या अधिसूचनेद्धारे प्रयत्न केला असून मद्रास विकास अभ्यास संस्था चेन्नईचे सेवानिवृत्त प्राध्यापक वैद्यनाथन यांचे अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली आहे.[१] या समितीने अनेक महत्वाच्या सुचल्या केल्या आहेत तथापि त्यांची उचीत दखल घेतली गेलेली नाही.

१९६० पूर्वीच महाराष्ट्रात ग्रामपंचायती विषयक नवा कायदा लागू झाला. लोकशाही अंतर्गत गावपातळीवर थेट लोकांनी निवडून दिलेल्या ग्रामपंचायती निर्माण करण्यात आलया. त्यानंतर १९६२ पासून जिल्हा परिशदा, पंचायत समित्या यांची निर्मिती करून ही विकेंद्रीकरणाची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली व त्यातील बहूसंख्य ग्रामीण भागातील माणूस हा काँग्रेसशी जोडला गेला व त्यांच्या माफंत स्थानिक सत्ताकेंद्रे ताब्यात ठेवणे शक्य झाले. ग्रामीण भागातील सत्तेतील अढळ स्थानामुळे काँग्रेसचे राजकारण भक्कम होत गेले. त्याचवेळी सहकारी संस्था ताब्यात ठेवून आपली राजकीय अधिसत्ता कायमस्वरूपी व एकछत्री ठेवण्यात सत्ताधारी पक्षाने यश मिळवले. ''तत्पूर्वी १९७६-७७ पासून महाराष्ट्रात सहकारी यंत्रणांचा विकास होऊ लागला होता. सहकारी तत्वावर शेतकऱ्यांनी साखर निमिर्ती करण्याचा प्रयोग सुरू केला व १९७७ नंतर महाराष्ट्र सरकारने ग्रामीण विकास व शेतकऱ्यांचे हितसंबंध जपण्याच्या हेतूने विविध प्रकारच्या सहकारी संस्थांसाठी प्रोत्साहनपर धोरण स्वीकारले आणि सहकारी साखर कारखान्याखेरीज ईतर विविध सहकारी संस्थाचे जाळे अल्पावधित उभा केले. एवढेच नव्हे तर ग्रामीण भागाला एकत्रित करण्यासाठी सहकारी सोसायटया,

१. जाधव श्री., 'एक रकमी कर्ज परतफड योजना आणि कर्जदारांचे अधिकार', चौधरी लॉ पब्लिषर्स, जळगाव २०१२, पृष्ठ क्र. १-२

सहकारी दूध संस्था निर्माण करून त्यांना पतपुरवठा करण्यासाठी सहकारी पतसंस्था निर्माण करण्यावरून राजकीय नेतत्वाला आपले नेतत्व भक्कम करण्यासाठो जास्त वाव मिळालामम[२]. त्याच बरोबर जिल्हा पातळीवर सहकारी बँका अस्तित्वात आल्या. सहकाराच्या व्याख्येप्रमाणे लोकांनी लोकांच्यासाठी एकत्र येवून त्यांचे प्रश्न सोडवण्याचे प्रयत्न या सहकारी संस्थाच्या माध्यमाने करण्यात आले. तरी सुध्दा विना सहकार नही उध्दार हे तत्व फक्त नावापुरतेच राहिले गेले. राजकीय पक्ष कार्यकर्त्यांनी अस्तित्वात असलेल्याा सर्व संस्था एक गठ्ठा करून आपला राजकीय अंमल चालू ठेवला. अर्थात याचा उपयोग सर्वसामान्य जनतेला होण्याऐवजी एका विशिष्ट मूठभर सत्ताधारी लोकांचा झालेला दिसून येतो.

सुरूवातीच्या काळापासून विकसित झालेले सहकारी क्षेत्र हे विकासाच्या मार्गावर असले तरी सुध्दा काही मूठभर लोकांच्या राजकीय प्रभावामुळे ही व्यवस्था डबघाईला आलेली दिसून येते. संचालकाच्या राजकीय प्रभावामुळे अलीकडच्या काळात सभासदांना कर्ज देताना राजकीय पार्श्वभूमी हा महत्वाचा निकष लावलला आढळतो. राजकीय लोकांच्या हस्तक्षेपामुळे सहकार क्षेत्र खाजगीकरणाच्या दिशेने मार्गक्रमण करीत आहे. सध्या सहकारी संस्थाची निवडणूक ही प्रतिष्ठेची मानली जात आहे. त्यातून सहकारी संस्था सत्तेचा अड्डा झाल्या आहेत. सत्ता मिळवण्यासाठी साम, दाम, दंड आणि भेद या गोष्टींचा वापर करतात. यासर्वांमुळे ग्रामिण भागातील राजकारण गतीमान झाले आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ग्रामिण भागाच्या विकासात महत्वपूर्ण योगदान देत आहे. परंतू राजकीय लोकांची मनमानी, हितसंबध जोपासण्यासाठी अपात्र व अयोग्य लोकांना केले गेलेले कर्जवाटप, नातेवाईकांना कर्ज देणे ईत्यादीमुळे कर्जाची परतफड न होणे आणि शेवठी या संस्था डबघाईला येणे या सारख्या प्रश्न सहकार क्षेत्राला भेडसावत आहेत. त्यामुंळे लोकांचा सहकारावरचा विश्वास कमी होत आहे.

2. किल्लोळ, बोंदरे व भावसागर, 'भारतातील सहकारी चळवळ तत्त्वे व व्यवहार', नचिकेत प्रकाषन, नागपूर, २०१३ पृष्ठ क्र. १, ३०, ८०

त्यातच १९९१ नंतर आलेल्या जागतीकीकरणाच्या लाटेत या संस्था खाजगी लोकांच्या हातात जाताना दिसत आहेत. त्यातूनच खाजगी मालकीचे साखर कारखाने, वाईनरी आस्तित्वात येत आहेत. अशा प्रकारे सहकारी संस्थांचे होत चाललेले खाजगीकरण सहकाराच्या अधोगतीचे लक्षण मानले जात आहे. वास्तविक पाहता खुल्या आर्थिक धोरणामुळे सहकरी क्षेत्रासमोरही अनेक आव्हाने उभी राहिली आहेत.

भांडवलशाही व समाजवादी अर्थव्यवस्थेचा सुवर्णमध्य असणारी सहकारी चळवळ भारतात सुरू झाली. शेतीला पूरक व्यवसाय ठरतील अशा विविध सहकारी संस्था, दुग्धव्यवसाय सहकारी संस्था, कुक्कुटपालन सहकारी संस्था, मत्स्यपालन सोसायट्या, वराहपालन संस्था, आणि शेतकी सहकारी पतपेढयाना अशा अनेक सहकारी संस्था निर्माण झाल्या. सहकारी चळवळीने औदयोगिक क्षेत्रातही प्रवेश करून प्रक्रिया उदयोग निर्माण करण्याच्या उद्देशाने सहकारी साखर कारखाने, सहकारी सुतगिरण्या, सहकारी प्रक्रिया संस्था निर्माण करून ग्रामीण भागातील बेराजगारांना रोजगार प्राप्त करून दिला व शेतकऱ्यांना स्वाभीमानाने जीवन जगायला शिकवले आणि खेडयांचा विकास केला. भारतीय अर्थव्यवस्थेतही सहकारी चळवळीने आपले वैशिटयेपूर्ण स्थान निर्माण केले. नागरी सहकारी बँका व नागरी सहकारी पतसंस्थांनी ग्रामीण व शहरी भागातील गरीब व मध्यमवर्गीयांना अर्थसहाय्य करून त्यांचा जीवनस्तर उंचावण्यास मोलाची मदत केली आहे व करीत आहे.

आज या चळवळीने वटवृक्षाचे रूप धारण केले आहे. राज्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सहकारी चळवळीचा मोठा वाटा आहे. सहकारी चळवळीमुळेच महाराष्ट्र देशात अग्रक्रमाने झळकतो आहे. आज महाराष्ट्रात जवळजवळ ५८ प्रकारच्या संस्था असून त्यांची संख्या २००७४० अशी असून त्या अविरतपणे कार्य करीत आहेत. सहकारी चळवळीने महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण भारत देशात हरितक्रांती, धवलक्रांती, औदयोगिक क्रांती (प्रक्रिया उदयोग) घडवून आणली. सहकारो चळवळीचे हे यश निष्चितच सहकारातील

निष्ठावान नेतत्व, जाणकार सभासद, तज्ञ अधिकारी व सहाकरी चळवळीस नेहमीच सहकार्य करणारे महाराष्ट्र सरकार यांच्यामुळेच शक्य झाले आहे.

सहकारी चळवळ भारतात असमान वाढीस लागलेली आह. महाराष्ट्र, गुजरात, मध्यप्रदेश, तामिळनाडू कर्नाटक व उत्तर प्रदेशात काही प्रमाणात ही चळवळ जोमात आहे. पूर्वेकडील राज्यात लागणारा माल मध्यवर्ती ग्राहक भांडारातून घ्यावा, मध्यवर्ती राष्ट्रीय ग्राहक भांडारातून माल घ्यावा हे मार्गदर्शक तत्व कोणी पाळत नाही तर सगळे खाजगी व्यापाऱ्याकडून माल घेतात. आकडेवारी असे सांगते की राष्ट्रीय व्यापारी उलाढालीत सहकाराचा वाटा जेमतेम १० टक्के आहे. सहकारी संस्थेतील सभासदांना सहकाराची तत्वे शिक्षण देण्याची नियमात तरतूद आहे. किती संस्था आपल्या सभासदांना हे शिक्षण देतात याचे प्रमाण फारच नगण्य आहे. बहुतेक संस्था या हितसंबंधी गटाकडे आहेत. या स्वार्थी पध्दतीने चालवल्या जातात. सदोश कर्जवाटप व वाटप झालेली कर्जे वसुल न करणे ही सहकारी संस्थांना लागलेली कीड आहे. अकुशल राजकीय नेतृत्व, भ्रष्टाचार सहकारी संस्था म्हणजे खाजगी मालमत्ता अशी प्रवृत्ती बळावते.

भारतीय सहकारी चळवळीच्या वाटचालीला ११० वर्षे पूर्ण होवून गेली असून शासनाने सहकारी चळवळीची शताब्दी साजरी करण्याच्या दष्टीने सन २००७ मध्ये संपूर्ण भारतात मोठया प्रमाणावर संयुक्त प्रयत्न केले. भारतात साधारणपणे ०.७० लाख सहकारी संस्था असून साधारणपणे त्याची सभासद संख्या २७ कोटीच्या वर असल्याचे दिसते. सहकारी चळवळ ही ग्रामीण भागाशी निगडीत असल्याने भारतीय लोकसंख्येच्या साधारणपणे २०%(१/५) लोकसंख्या सहकारी संस्थांच्या माध्यमातून कार्यरत आहेत. ही बाब राष्ट्रीय ऐक्याच्या व प्रगतीच्या सगळयांच्याच दृष्टीने भूषणावह आहे. भारतातील सहकारी संस्थांचे कार्यक्षेत्र अतिशय व्यापक असल्याने जवळजवळ १४० प्रकारच्या सहकारी संस्था कार्यरत आहेत. महाराष्ट्रातील सहकारी चळवळ ही

त्यापैकीच एक असून ती महाराष्ट्राचे बलस्थान आहे[3]. वैकुंठभाई मेहता, धनंजयराव गाडगीळ, विठ्ठलराव विखे पाटील, प्रा. डी. जी. कर्वे, यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील यांच्यासारख्या अनेक थोर निश्णात विभुतींनी खेडया पाडयामध्ये सर्वसामान्य जनतेची आर्थिक उन्नती करण्यासाठी सहकारी चळवळ राज्यात जाणीवपूर्वक रूजविली. वास्तविक पाहता ही चळवळ रूजवून ती वाढविण्यात अनेक थोर व्यक्तींचे योगदान आहे. सगळयांचे नामोल्लेख करणे अशक्य आहे. परंतू अलीकडील बदललेल्या राजकीय परिस्थितीमुळे सहकारी क्षेत्राचा विकास काहीसा मंदावल्याचे दिसून येते.

१.१.२ सहकार विषयक कायदे:

स्वातंत्र्योत्तर काळात मात्र सहकारी चळवळींच्या माध्यमातून समाजाची आर्थिक उन्नती साधण्यासाठी पोषक शासकीय धोरणे ठरवली जाता आहेत आणि या धोरणांची प्रभावी अवलंबजावणी करण्यात येत आहे आणि सहकाराच्या तत्त्वाला उपयुक्त ठरतील असे बदल सहकारी कायदयात वेळोवेळी करण्यात आले आहेत ते पुढील प्रमाणे.

१.१.२.१; १९०४ चा सहकारी कायदाः–

१९०४ च्या कायदयानुसार सहकारी तत्वे कोणती व त्याच तत्वानुसार कायदा कानून करताना पतपेढयाचा कारभार कसा चालवावा याचा हिशोब पुस्तके कशी अचूक लिहावयाची व पतपेढयाची दप्तरे व्यवस्थित व अद्ययावत कसे ठेवावयाचे या सर्व गोष्टीचे मार्गदर्शन या कायदयात दिसून येते. २७ मार्च १९०४ ला पहिला सहकारी कायदा पारित झाला व सावकारांच्या पाशातून शेतकऱ्यांना मुक्त करण्यासाठी सहकारी संस्था निर्माण होवून भारतामध्ये सहकारी चळवळीचा उगम झाला.

[3] Kakade, V. B, Profit & Loss of Dairy Industry A Case Study of Malshiras Taluka, The Maharshtra Cooperative Quarterly, Pune, 2001.

१.१.२.२ १९१२ चा सहकार सुधारणा कायदा :-

१९१२ या साली सहकारी सुधारणा कायदा अंमलात आणला गेला. पुढे १९१९ साली माँटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणा कायदयान्वये सहकार हा विषय त्यावेळच्या राज्यशासनाकडे सोपविण्यात आला आणि प्रत्येक राज्याला आपापले स्वातंत्र्य कायदे अस्तित्वात तयार करण्यास मुभा मिळाली. 'सहकार चळवळीत मुंबई इलाखा या चळवळीत आघाडीवर होता. त्याच्या प्रांतीक सरकारने ४ डिसेंबर १९२५ रोजी मुंबई सहकारी सोसायटी कायदा १९२५ अंमलात आणलामम[४]. पुढे १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत देश स्वतंत्र झाल्यावर काही वर्षांनी पुर्वीच्या प्रांताची भाषावार प्रांतरचना झाली. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्य स्थापन झाल्यानंतर महाराष्ट्र राज्यात पुर्वीचा मुंबई सहकारी कायदा १९२५ हा रद्द ठरवून २६ जानेवारी १९६२ रोजी नवीन महाराष्ट्र सहकारी कायदा १९६० हा कायदा म्हणजे लागू करण्यात आला.

१.२ सहकारी संस्थांचे राजकीयीकरणः-

राजकीयीकरण ही संकल्पना विविधि विचारवंतांनी स्पष्ट केली आहे. ''समाजकारणातील घटकांचे रूपांतर राजकारणात करण्याच्या प्रक्रियला राजकीयीकरण असे म्हणतातमम[५]. ज्या गोष्टी राजकीय स्वरूपाच्या नसतात; त्यांना राजकीय स्वरूप असा प्राप्त करून देउन राजकीय चर्चेचा भाग बनविणे तसेच राजकारणात लोकांचा समावेश वाढवुन त्यांना राजकीय कृती करण्यास उद्दिपीत करणे म्हणजे राजकीयकरण होय. ''समाजातील काही व्यक्ती अथवा गटांना विशिष्ट अवहान करून तात्पुरते अथवा कायमचे राजकारणात ओढुन राजकीय कृती करण्यास भाग पाडणे होय [६].''ज्या गोश्टी अन्यथा राजकीय मानल्या जात नाहीत त्यांना राजकीय चर्चेचा विशय बनविने हा देखील

---

[4] Bedi, M. S., Dairy Development, Marketing & Economic Growth, Deep & Deep Publication, New Delhi, 1986.

[५] सामाजिक शास्त्रातील संज्ञा, सिध्दांताचा कोश, डायमंड प्रकाशन पुणे.

[६] राज्यशास्त्र कोश.

राजकीयकरणाचा अर्थ होतो[७].''श्रीनिवासन यांच्या मते, कोणत्याही घटकांचा राजकीय स्वरूपात बदल होणे यास राजकीय करण असे म्हणतात[८]. ''रॉबर्ट डाल यांच्या मते, राजकीय समाजशास्त्र लोकहितासाठी निर्माण केली गेलेली कोणतीही योजना अथवा संस्था मध्ये राजकीस हस्तक्षेप होणे म्हणजे राजकीय करण होय[९].

१.२.१ स्वातंत्र्य पूर्व काळातील राजकारणः

ब्रिटिशांनी १८ जुलै १९४७ मध्ये भारतीय स्वातंत्र्यविषयक कायदा मंजूर केला. त्यांनी १७० वष भारतावर राज्य केले. स्वातंत्र्यानंतर भारतीय राज्यघटनेनुसार भारतात लोकशाही आस्तित्वत आली. भारतीय राज्यघटना तिच्या विविधांगी वैशिष्टयामुळे जगातील इतर देशांच्या राज्य घटनाहून वेगळी आहे. राज्यघटनेने विकासाचे प्रारूप म्हणून मिश्र अर्थव्यवस्था स्विकारली आणि भारतामध्ये रशियाच्या धर्तीवर पंचवार्षिक योजनाचा अवलंब केला गेला.

१.३ सहकारी चळवळीवरील साहित्याचा आढावा:

सामाजिक शास्त्रात मानवी वर्तवणुकीचा अभ्यास केला जातो. त्यामध्ये राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास, भुगोल आणि सामाजिक शास्त्रे यांचा समावेश होतो. त्यातील संशोधन हे महत्त्वपूर्ण घटकातील एक महत्त्वाचा घटक आहे. संशोधनातील टप्प्यामध्ये साधनसामग्रीचा परामर्श हा घटक आहे. त्यामध्ये पूर्वी केलेल्या अभ्यास उपयुक्त ठरतो. पुर्वी झालेल्या अभ्यासावरुन अभ्यास विषयाची सर्वांगीण माहिती मिर्खींतासते आणि नविन संशोधकांना दिशा मिळत असते[१०]. प्रस्तुत अभ्यासासाठी साधनसामुग्रीच्या परामर्शामध्ये सर्वप्रथम सहकारी चळवळीवरील परामर्श घेतला आहे. दुस-या भागात

---

[७] राज्यशास्त्र कोश.

[८] घांगरेकर चि.ग., राजकीय समाजशास्त्र, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, २००१

[९] देगावकर ष.गो., राजकीय समाजषास्त्र, श्री मंगेष प्रकाषन, नागपूर, २००१.

[१०] कदम य.ना., 'समग्र भारताचा इतिहास', फडके प्रकाषन, कोल्हापूर, २०१२ पृष्ठ क्र. ७४३-४४

सहकारी चळवळीशी निगडीत राजकारणाचा परामर्श घेतला आहे आणि भारत सरकारने सहकारी चळवळ सुरु ठेवण्यासाठी वेगवेगळ्या समित्यांच्या माध्यमाने प्रयत्न केला. त्याचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे आणि सहकारी चळवळीवर होत गेलेल्या राजकियकरणाचा परिणाम अर्थात सहकारी चळवळीच्या वस्तुस्थितीवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. हे संशोधन करताना पूर्वीचे संशोधन साहित्य निश्चितच मार्गदर्शक ठरणारे आहे. या संशोधनाचा त्यांच्या निष्कर्षांचा आणि त्यात मांडलेल्या सुचनांचाही संशोधकाने प्रस्तुत संशोधनात उपयोग करून घेतला आहे. सामान्य लोकांनी एकत्र येऊन स्वतःच्या फायद्यासाठी स्थापन केलेल्या संस्थांना सहकार असे म्हटले जाते. या अनुशंगाने सहकारी संस्थां व सहकारी चळवळीवरील या पूर्वी झालेल्या अभ्यासाचा परामर्श घेणे प्रस्तुत अभ्यासाचा महत्वाचा भाग आहे. या पार्श्वभूमीवर सहकारी संस्थां व सहकारी चळवळीच्या उपलब्ध साहित्याचा घेतलेला परामर्श पुढीलप्रमाणे आहे.

जाधव श्री.;२०१२[११११] 'एकरकमी कर्ज परतफड योजना आणि कर्जदारांचे अधिकार' या अभ्यासामधून एकरकमी कर्ज परतफड तडजोड योजनेसंदर्भात सहकारी कायद्यात कोणतीही तरतुदी नाही किंवा या योजनेसंदर्भात मार्गदर्शक तत्त्वे दिलेली नाहीत. छत्र चे प्रमाण कमी करणेसाठी आखलेली ही एक योजना आहे. या योजनेचे नियम व अटी हे सहकार खात्याने किंवा त्ठप् ने दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वाचा आधार घेवून संचालक मंडळ यांनी योजना तयार करावयाची आहे. योजना आपल्या थकीत कर्जदाराला लागू करावयाची किंवा नाही हे सर्वस्वी बँकेच्या निर्णयावर अवलंबून आहे. या अभ्यासातून एकरकमी कर्ज परतफड व तडजोड योजनेसंदर्भात सहकार खात्याने वेळोवेळी मार्गदर्शक सूचना केलेल्या आहेत. विशिष्ट सवलत किंवा सूट दिल्यानंतर कर्जदार जर थकीत एकरकमी किंवा विशिष्ट मुदतीत,

[11] जाधव श्री., 'एक रकमी कर्ज परतफड योजना आणि कर्जदारांचे अधिकार', चौधरी लॉ पब्लिषर्स, जळगाव २०१२, पृष्ठ क. १-२

सरळव्याज पद्धतीने व्याज भरणा करुन १२ महिन्यांचे आत कर्जखाते बंद करणार असेल तरच ही योजना लागू करण्यात येते. ही योजना पात्र खातेदारांनाच लागू करण्यात येते. एकरकमी कर्ज परतफड तडजोड योजनेत सहभाग घेवून ठरविलेली रक्कम ठरविलेल्या नियमाप्रमाणे व भरणा केली नसल्यास या योजनेअंतर्गत मिळणारे फायदे घेता येत नाहीत. या अभ्यासावरुन राजकीय स्वरुपावरुन वाढणारा खर्च त्यांचा सहकारी चळवळीवर होणारा परिणाम ईत्यादीचे विवेचन केलेले आहे.

किल्लोळ ज., बोंदरे अ. व भावसार अ २०१३.[१२] यांनी केलेल्या अभ्यासातून 'भारतातील सहकारी चळवळ तत्त्वे व व्यवहार याची सविस्तर चर्चा केली आहे. या पुस्तकामध्ये सहकारी संकल्पनेचा आढावा घेतला आहे. त्याचबरोबर सहकारी तत्त्वाचा विचार केलेला आहे. सहकार चळवळ यशस्वी होण्यासाठी सहकारी संस्थांच्या सभासदांना, सहकारी कार्यकर्त्यांना सहकारी संस्थेतील सेवक वर्गाला, अधिकारी व पदाधिका–यांना सहकारी शिक्षण प्रशिक्षणाची नित्तांत गरज आहे. म्हणून रॉशडेल सहकारी संस्थेने सहकारी शिक्षण, प्रशिक्षणाचा सहकाराचे तत्त्वे म्हणून पुरस्कार केला. आंतरराष्ट्रीय सहकारी संघटनेने सहकारी शिक्षणाचा सहकाराचे तत्त्वात समावेश केला आहे. या अभ्यासातून सहकारी चळवळीच्या विकासात वैकुंठभाई मेहता, धनंजयराव गाडगीळ, विठ्ठलराव विखे पाटील, यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, शंकरराव मोहिते, यशवंतराव मोहिते, डॉ.पंजाबराव देशमुख, भाऊसाहेब हिरे इत्यादी मातब्बर व्यक्तींचा समावेश आहे. सहकाराच्या माध्यमातून देशाला एक नवी दिशा प्राप्त झाली. अशा सहकारी चळवळीतील काही नेत्यांच्या योगदानाविषयी चर्चा केलेली आहे.

[१२] किल्लोळ, बोंदरे व भावसागर, 'भारतातील सहकारी चळवळ तत्त्वे व व्यवहार', नचिकेत प्रकाषन, नागपूर, २०१३ पृष्ठ क्र. १, ३०, ८०.

संबरे अ.;२०१४[१३] यांच्या 'पतसंस्था मार्गदर्शकम या सहकारी पतसंस्था संदर्भग्रंथातून सहकारी पतसंस्था विषयी विष्लेशण केलेले दिसते. सहकारी चळवळ ही लोकांनी लोकांसाठी चालविलेली चळवळ अशी व असली तरी विविध राज्य सरकारांची विविध नियंत्रणे, सहकारी हस्तक्षेप यामुळे या चळवळीचे 'लोकांची चळवळ हे स्वरुप कमी होत चालले होते. हे स्वरुप पुन्हा प्राप्त व्हावे, ती नियंत्रणमुक्त व्हावी, विविध राज्यातील सहकारी कायद्यामध्ये समानता यावी या उद्देशाने विचारमंथन सुरु झाले. यातूनच याच्या अभ्यासासाठी आणि शिफारशी करण्यासाठी वेगवेगळ्या समित्याही नेमल्या गेल्या. यापैकी १९९० मधील श्री ब्रम्हप्रकाश चौधरी समितीने केलेल्या शिफारशीवर आधारित कायदा तयार झाला व तो सर्व राज्यांकडे अंमलबजावणीसाठी पाठवला. सहकार हा विषय राज्याचा असल्याने केंद्र सरकारही काही करु शकत नव्हते. ही कोंडी फोडण्यासाठी म्हणून केंद्र सरकारने घटना दुरुस्तीचा विचार केला. यानुसार केंद्राचे कृशीमंत्री मा.ना.श्री. शरद पवार यांनी लोकसभेत व राज्यसभेत घटना दुरुस्तीचे बील मांडले. हे बील पास झाल्यामुळे दि. १३ जानेवारी २०११ रोजी देशामध्ये ९७ वी घटना दुरुस्ती अस्तीत्वात आली. प्रस्तुत अभ्यासातून सहकारी कायद्यात राज्यकर्त्यांना पोषक ठरतील अशा तरतूदी करण्यासाठी भारतीय राज्यघटनेत दुरुस्ती करण्यात आल्याचे दिसून येते.

सांबरे अ २०११[१४]. 'नागरी बँक संदर्भ, या पुस्ताकातून नागरी बँकेच्या संदर्भात विचार मांडले आहेत. भारतातील सहकारी संस्थांची चळवळ या प्रकारच्या संस्थांच्या नोंदणीसाठी सरकारने पास केलेल्या पहिल्या सहकारी पतपूरवठा सोसायट्यांच्या १९०४ च्या कायद्याने सुरुवात झाली. 'खाजगी सावकारीला संस्थात्मक पर्याय निर्माण करणे हा या कायद्याचा हेतू होता. ही कल्पना इंग्लंडमधल्या १८४४ साली स्थापन झालेल्या जगातील पहिल्या

[१३] सांबरे अ., 'पतसंस्था मार्गदर्षक', नचिकेत प्रकाषन, नागपूर २०१४, पृष्ठ क्र. २६-२७.
[१४] सांबरे अ., 'नागरी बँक संदर्भ', नचिकेत प्रकाषन, नागपूर २०११, पृष्ठ क्र. ७१, ७५, ७७

सहकारी ग्राहक भांडारापासून 'रॉजडेल इक्विटेबल पायोनिअर सोसायटीम व जर्मनीतल्या १८७६ साली रायफन्स नावाच्या सामाजिक कार्यकर्त्याने सुरु केलेल्या 'जगातल्या पहिल्या शेतकरी सहकारी बॅकेपासूनम घेतली होती. भारतातोल ग्रामीण भागातल्या शेतकरी व शहरी भागातल्या आर्थिक व सामाजिक दृष्ट्या मागासलेल्या समाजाच्या कर्जाच्या गरजा भागविण्यासाठी सहकारी तत्त्वावर सोसायट्यांची नोंदणी करण्यासाठी हा कायदा पास केला गेला आहे. या अभ्यासावरुन महाराष्ट्र सहकारी संस्थाचा कायदा १९६० मध्ये सुधारणा व दुरुस्त्या सुचविण्यासाठी महाराष्ट्र सरकारने मा. सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली दहा तज्ज्ञ व्यक्तींची एक समिती मार्च २०१० मध्ये नेमली असून त्या समितीचे सध्या काम सुरू असल्याचे दिसते. यातील निष्कर्शावरून असे स्पष्ट होते की, आपल्या देशात १८ व्या शतकाच्या उत्तर्धात विविध सहकारी सोसायटयांच्या रूपाने सहकार चळवळ सुरू झाली व त्यानंतर देशात अनेक सहकारी कायदे अस्तीत्वात आले आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने १९०४ चा कायदा, १९२५ चा बॉम्बे को-ऑप ॲक्ट आणि महाराष्ट्र राज्य निर्माण झाल्यानंतर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० हा कायदा अस्तित्वात आला आहे.

जाधव टी;२०११[१५] यांनी लिहलेल्या 'सहकारी संस्था रचना व कार्यपध्दती या पुस्तकातून मांडलेल्या विचारांचा उहापोह घेतला आहे. त्यांच्या मते, भारतातील सहकारी चळवळ १९०४ साली सुरू झाली. जवळपास एक शतक तिने गाठले आहे. या प्रदीर्घ काळात आपल्या देशात आणि जगात अनेक घटना व घडामोडी झाल्या. राजकीय, आर्थिक आणि सामाजिक क्षेत्रात अनेक स्थित्यतरे झाली. आपल्या देशात सहकारी चळवळ सुरू झाली. तेव्हा ब्रिटीश राजवटीखाली आपण होतो. सहकारी चळवळ सुरू झाल्यापासून पढे स्वातंत्र्य

[१५] जाधव टी., 'सहकारी संस्था रचना व कार्यपध्दती',

मिळविण्यासाठी त्रेचाळीस वर्शाचा काळ लोटला. स्वातंत्र्य प्राप्त होवून आता ६९ वर्षे झालेली आहेत. या चळवळीची स्थिती समजल्यानंतर तिने स्वातंत्र्योत्तर काळात फार मोठा पल्ला गाठला आहे.

जाधव यांनी केलेल्या अभ्यासातून आपल्याला असे दिसते की, सहकारी पद्धतीने शती करण्याच्या बाबतीत मात्र सहकारी चळवळीला आपल्या देशात फारसे यश आलेले नाही. जागतिकीकरण व खाजगीकरणाच्या लाटेत सहकारी चळवळ टिकेल का? यापुढे तिला काहीच भवितव्य असू शकणार नाही का? तिला भवितव्य जरूर आहे पण तिच्या कार्यपद्धतीत बदल करावा लागेल. ही चळवळ धर्म, जात, पंथ, लिंग व राजकारणापासून दूरू ठेवायला हवी. इंग्लंडमध्ये या चळवळीचा जन्म झाला तेव्हा धर्म व राजकारणापासून ती अलिप्त राहील असा नियम केला गेला होता. हे लक्षात ठेवण्याची आवश्यकता आहे. उत्पादक सहकारी संस्था नफ्यातच चालल्या पाहिजेत, उत्पादन व नफा कसा वाढेल यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. मिळालेल्या नफ्यात सर्व सभासदांचा वाटा असला पाहिजे. त्यांना लाभांश मिळाला पाहिजे. सहकारी संस्थेच्या दैनंदिन कामकाजात राजकीय हस्तक्षेप नको, नेतृत्व निकोप, लोकाभिमुख आणि दृष्टे असायला हवे. असे विवेचन जाधव यांच्या लिखानातून दिसते.

काशीद शि;२०११[१६] यांनी लिहलेल्या'भोगावती साखर कारखान्यातील भ्रष्टाचाराचा इतिहास या पुस्तकातून राजकारणातील एखास्या व्यक्ती मुळे सहकारी साखर कारखाने कसे बंद पाडले आहेत याचे विश्लेषण केले आहे. खुली साखर विक्री टेंडरमध्ये निर्यात साखर विक्री करणेबाबतचा उल्लेख जाणून बुजून केलेला नाही. कारण तसा उल्लेख केला असता तर अनेक पाटर्यांनी टेंडर भरले असते व उपरोक्त पार्टीला साखर विक्री करता आली नसतो त्यांचा संगनमताने केलेला उद्देश साध्य झाला नसता म्हणून त्यांनी

[१६] सांबरे अ., 'नागरी बँक संदर्भ', नचिकेत प्रकाषन, नागपूर २०११, पृष्ठ क्र. ७१, ७५, ७७

जाहिरातीमध्ये निर्यातीसाठी साखर विक्री हा उल्लेख नमूद केला नाही. शिवाय टेंडर नोटीसमध्ये जाहिरात प्रसिद्धीची तारीख व खुली साखर विक्रीची तारीख यामध्ये किमान ७ दिवसांचे अंतर असणे आवष्यक होते, ते ठेवले नाही. कारखान्याचे टेंडर नोटीसमध्ये निर्यातीसाठी विक्री करावयाची पोती संख्या, साखरेची ग्रेड, निर्यातदाराची पात्रता, टेंडर फॉर्म किंमत, ॲडजेस्ट मनी स्वीकारण्याचा प्रकार, टेंडर स्वीकारण्याची मुदत वगैरे बाबी नमूद केल्या नाहीत. यावरून सहकारी संस्थामध्ये भ्रष्टाचार होत असल्याचे दिसून येते.

थोड्क्यात काशीद यांनी समोर केलेल्या विवेचनातून एक गोष्ट समोर आली, सन २००८ मध्ये जागतिक मंदीची लाट भारतामध्ये पोहचली. पण याच्या अगोदर १० ते १५ वर्षा पासूनच मंदीची आलेली लाट देशांतर्गत ग्रामीण भागात पोहचली होती. सुरवातीला कापड गिरण्या बंद पडल्या नंतर ५० साखर कारखाने बंद पडले. दरम्यान तत्कालीन मुख्यमंत्री महाराष्ट्रात निरनिराळे उद्योगधंदे उभा रहावेत म्हणून विदेश वाऱ्या करीत होते. पण महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील एकमेव असलेला साखर उद्दोग कारखाने गैरव्यवस्थापनामुळे एका मागून एक आजारी पडत होते. त्यामुळे पाहिजे तेवढे लक्ष दिले नाही म्हणूनच तुमचा आजारी पडलेला कारखाना पुन्हा उभारला नाहो. प्रस्तुत विष्लेशणावरून राजकीय हस्तक्षेपामुळे भोगावती सहकारी साखर कारखाना बंद पडलेला दिसतो.

ग्रामीण विकास केंद्र संस्था २००५[१७] या केंद्रातून "A Historical overview and Relevence to Northern and Aboriginal Communities" या विषयावर संशोधन पेपर लिहला. या विषयात ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या विकासातील सहकार क्षेत्राच्या भूमिकेविषयी लिखान केले आहे. गेल्या काही दशकापासून सहकारी चळवळ संकुचित होत चालली आहे. परंतु या चळवळीचे योगदान

१६. काशीद., 'भोगावती साखर कारखान्यामधील भ्रष्टाचाराचा इतिहास', काषिका प्रकाषन, १५, पवनानगर, पुणे २०११, पृष्ठ क्र. १३

विकासातील मोठे आहे. सहकार चळवळ जगातील सर्वच क्षेत्राच्या विकासासाठी काम करते. या संशोधनात सहकारी चळवळीचे आधुनिक युगातील भूमिकेविषयी विश्लेषण केले आहे. प्रामुख्याने या चळवळीने आधूनिक विचार आणि तत्त्वांची अंमलबजावणीकडे लक्ष ढिलेले आहे.

कॅनडामध्ये सहा वेगवेगळ्या सहकाराच्या रचनेतील तत्त्वांचा विचार केला आहे.

१- सहकारी तत्त्वामध्ये कुठल्याही एका व्यक्तीच्या हातात सत्ता असते.

२- वैयक्तीक आणि संस्थात्मक रचना नसते.

३- एकत्रीत काम केले जाते.

४- व्यावसायीक समाजामध्ये नियंत्रण आणि नफा हे उद्दिष्टे असते.

सद्यस्थितीला सहकाराच्या विकासासाठी रॉश्चडेल तत्त्वाचा विचार केला आहे. सहकाराची विचारप्रणाली आणि तत्त्वाचा या संशोधन पद्धतीत चर्चा केली आहे. ग्रामिण भागाची सामाजिक रचना आणि त्यांच्या विकासात्मक गरजा विचारात घेऊन सहकाराच्या माद्यमातून त्यांचे सामाजिक आणि आर्थिक प्रश्न सोडविण्याचा व त्यांचा, आधुनिक पध्दतीने विकास साधन्याचा प्रयत्न केला जातो. सहकारातील पुढील सात तत्त्वांचा या संशोधनामद्ये उल्लेख केला आहे तो पुढीलप्रमाणे:-

१- ऐच्छिक आणि खुले सभासदत्व

२- लोकशाही पद्धतीने नियंत्रण

३- आर्थिक सहभाग

४- स्वातंत्र्य आणि स्वायत्त

५- शिक्षण, प्रशिक्षण आणि माहिती

६- सहकारातून सहकाराकडे

७- लोकांसाठी काम

२००३ मध्ये कॅनडातील सहकारी संघटनेने मान्य केलेल्या वरील तत्त्वांच्या अंमलबजावणी विषयीचे मागदर्शन या संशोधनातून केले आहे.

गोडसे अशोक २०१०[१८] या लेखकाने ''सोलापूर जिल्ह्यातील सहकाराची बदलती राजकीय समीकरणेमम या पुस्तकामध्ये सोलापूर जिल्ह्यातील राजकारणाचा आढावा घेतला असून जिल्ह्यातील राजकारणाला कशामुळे कलाटणी मिळाली हे स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. या जिल्ह्याातील प्रत्येक नेत्याने आपली सत्तास्थाने भक्कम करण्यासाठी सहकार क्षेत्राचा सर्वात मोठा आधार घेतला असे स्पष्ट केले आहे. १९९९ मध्ये शरद पवारांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष स्थापन केल्यानंतर या जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे वर्चस्व स्थापन झालेले दिसून येते. परंतु जिल्हयातील ११ तालुक्यापैकी ज्या आमदाराकडे सहकार क्षेत्राची सूत्रे होती तेच आमदार जास्त दिवस टिकून राहिलेले दिसतात. सहकार क्षेत्राच्या माध्यमातून प्रत्येक व्यक्तीशी लागेबांधे करून आपल्या सत्तेची पकड अधिक मजबून केली आहे. प्रत्येक व्यक्ती कोणत्या ना कोणत्या सहकार क्षेत्राशी संबंधीत असल्यामुळे सत्ता स्थानी असणा-या व्यक्तीला मतदान करावे लागते. अर्थात ही राजकीय नेते मंडळी आपल्याला पाहिजे असे सहकार क्षेत्राची निवड करुन पाहिजे असे कायदे करतात. त्याचा परिणाम सहकार क्षेत्राचे मूळ कायदे व तत्वे बाजूला पडलेली दिसतात. अर्थात सहकार क्षेत्राचे राजकीयीकरण झाल्याचे स्पष्टपणे दिसून येते.

हिवे बी; १९८३[१९] भारतातील सहकारी चळवळ यांच्या या अभ्यासातून सुरवातीच्या काळातील इतिहासाविषयीचा परामर्श घेतला आहे. मानवी जीवनाला सामाजिक कल्याण आणि लोकशाही या जुन्या सहकाराच्या

[१७.] गोडसे अशोक, सोलापूर जिल्ह्याातील सहकाराची बदलती राजकीय समीकरणे, कंपन प्रकाशन, सोलापूर, पृष्ठ क्र. ३४.३५.

[१९] हिवे बी. 'भारतातील सहकारी चळवळ', पी.एच.डी. प्रबंध, महात्मा गांधी विद्यापीठ, पृष्ठ क्र. ७-२५.

तत्त्वामुळे एक वेगळी दिशा मिळाली आहे. आधुनिक जीवनात सर्व समाज घटकाशिवाय माणूस राहू शकत नाही. ग्रामिण भागाचा विकास करायचा असल्यास सहकाराशिवाय पर्याय नाही. प्रिन्स पिटर क्रोपोटकीन यांनी असे म्हटल्या प्रमाणे सामाजिकते शिवाय निसर्ग व्यवस्थाही पुढे जात नाही. इतर काही तज्ज्ञाच्या मते प्राणी आणि माणूस यांच्यामध्ये सहकार ही महत्त्वाची भूमिका बजावत आहे. औद्योगीक क्रांतीनंतर खर्या अर्थाने सहकारी चळवळ आणि तिची अंमलबजावणी पुढे आली. आर्थिक व सामाजिक सुधारणेमध्ये सहकारी चळवळीची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. कारण समाजाची सुरूवातच मुळात सहकारातून; व मदतीतून झालेली आहे. अठराव्या शतकाच्या उत्तरार्धात आणि १९ व्या शतकाच्या पूर्वार्धात सहकारी चळवळ भारतामध्ये खऱ्या अर्थाने रुजली. सहकार ही भांडवलशाही अन्यायाच्या विरोधात उभा राहिलेली चळवळ आहे. संख्यात्मक महत्त्वपूर्ण अशा स्वरुपाचे काम सहकाराने केले आहे. जागतिक अर्थव्यवस्थेतील विकासामध्ये सर्व राश्ट्रामध्ये सहकाराची चळवळ कार्यरत झालेली दिसून येते. ग्राहक, दुग्ध, नागरी, पतसंस्था, शेतकऱ्यांना कर्जपूरवठा या सर्व क्षेत्रात या चळवळीचे योगदान मोठे आहे. सहकारी चळवळीचे योगदानाअंतर्गत असलेली सहकाराची तत्त्वे प्रामुख्याने खुले आणि ऐच्छीक सभासद, लोकशाही व्यवस्थापन, भांडवलावर कमी व्याज, लाभाचे समान वाटप, सहकारी शिक्षणाचा विकास, सहकार्यातून सहकारातून सहकाराकडे अशी आहेत. भारतातील सहकारी चळवळ ही प्रामुख्याने शेतीव्यवस्थेशी संबंधीत आह. वाढत्या औद्योगिकीकरणामुळे, विभक्त कुटुंब पद्धतीमुळे शेतीवरील अवलंबित्व वाढले आहे. त्यामुळे या परिस्थितीत सहकारी चळवळ ही मुख्यतः विकासात हातभार लावते. इजिप्तमधील शेतकरी बॅकेच्या सहकारी धोरणानुसार भारतातील सहकार चालू लागले. आज सहकारामुळे आपल्या देशाचा विकास झालेला असला तरी वाढते राजकारण, घटती उत्पादकता, सरकारी हस्तक्षेप यामुळे सहकारी तत्त्वावर मर्यादा येताना दिसतात. १९०६

पासून १९१०-११ पर्यंत भारतातील सहकारी संस्थामध्ये ८४३ पासून ७३२१ पर्यत वाढ आहे. तर ती १९१७-१८ मध्ये २७११९७ एवढी झाली.

केंम्बर्ली आणि रांबट्र क्रॉप; १९८०[२०] '२१ व्या शतकातील सहकाराची तत्त्वेम या संशोधनात अलीकडे विकसीत झालेल्या सहकारी तत्त्वांची चर्चा केलेली आहे. विभाजन ही सामाजिक अर्थशास्त्राच्या दृष्टिकोनातून वेगळी आणि महत्त्वपूर्ण संकल्पना आहे. सामाजिक, आर्थिक आणि राजकीय हस्तक्षेपामुळे सहकारी क्षेत्रातील संस्थामध्ये विविधता निर्माण झालेली आहे. विल्यमकिंग हा इंग्लंड मधील समाजसुधारक होता. १७८६-१८६७ या त्यांच्या जीवनामध्ये सहकारी चळवळीविशयी मत व्यक्त केले. रॉर्बट ओवेन यांनी सहकारी चळवळीचा उद्गाता आहे. त्यांनी ग्राहक चळवळीवरुन सहकाराचा विकास केला. २८ विणकरांनी एकत्र येवून सामाजिक जाणीवेतून सहकारी चळवळीची सुरवात केली. त्या चळवळीला काही तत्त्वे होती. त्याला रॉश्चडेल प्रवाहात आणले. सहकाराचा १८७२ मध्ये पहिला कायदा अस्तित्वात आला. रॉष्चडेल तत्त्वानुसार मांडलेली १२ तत्त्वे होती. सहकारी चळवळ पूर्ण जगात १९ व्या शतकात वाढली. १७४६ पासून १८७१ या कालावधीत संपूर्ण जगात सहकारी चळवळ अस्तित्वात आली. आंतरराष्ट्रीय विभागात आफिकेत १९ संस्था, अमेरिका ६१ संस्था, आशिया ६४ संस्था आणि युरोपमध्ये ८८ संस्था या सहकारी तत्त्वावर सुरु होत्या. त्या एकूण सर्व विभागात २३२ एवढ्या होत्या. तर त्यातील सहकारी शाखा या ७४९१०० एवढया आहेत. त्यामध्ये सहकारी प्राथमिक कृषी सोसायट्या प्रामुख्याने अस्तित्वात होते. कृषी सोसायट्या १९१५ मध्ये ५४२४ तर २००२ मध्ये ३१४० एवढ्या कृषी सहकारी शाखा झाल्या. याचा अर्थ असा आहे की, अलीकडच्या काळात सहकारी संस्थाच्या जाळयात घट झालेली आहे. १९३० ते १९५० पर्यत या संस्थांच्या संख्येत वाढ झाली होती. या दोन

१९. केम्बर्ली आणि रॉबट्र क्रॉप, '२१ व्या षतकातील सहकाराची तत्त्वे', सहकारी संस्था, डख्रथ, एुींशपीळेप अमेरिका, पृष्ठ क्र. ३१-३२.

कालावधीतून असे लक्षात येते की, सहकारी कृशी संस्थातील घट ही संचालक मंडळाच्या राजकीय हस्तक्षेपामुळे या सहकारी चळवळीचा –हास होताना दिसून येतो. सहकारी गृहनिर्माण संस्था आणि ईतर राज्य आणि राष्ट्रीय पातळीवरील सहकारी संस्था वेगवेगळ्या कारणांनी घटत किंवा कमी होत आहेत.

देहर जे.बी;२०१३[२१] यांनी केलेल्या संशोधनामध्ये ब्राझील आणि दक्षिण आफीका मधील सहकारी चळवळ या विशयातून त्यांनी या दोन देशातील सहकारी चळवळीच्या विकासाचे विष्लेशण केले आहे. शाश्वत विकास साध्य होण्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर सहकारी क्षेत्राची मोलाची साथ हवी आहे असे मत त्यांनी व्यक्त केले आहे. भांडवली कंपन्या २००८–०९ जागतिक वित्तीय समस्या आणि आर्थिक समस्या वाढल्यामुळे सहकारी संस्थांना पर्यायी स्वरुपाचो संस्था किंवा कायदे अस्तित्वात आणणे गरजेचे आहे. जगातील बरेच देश हे सहकाराला प्रेरणा व चालना देण्याचे काम करतात. त्यामधील एक ब्राझील, रशिया, भारत, चीन संघटना आहे की ज्यामध्ये वेगवेगळ्या मुद्यांवर चर्चा करुन प्रश्नांची सोडवणूक करता येते. २०११ मधील बिजींग येथे झालेल्या परिषदेतून याविषयावर चर्चा झाली. हे संशोधन दक्षिण आफीका आणि ब्राझील देशांतील सहकाराच्या संदर्भात झालेला तुलनात्मक अभ्यास आहे. ब्राझील या देशात १८४७ मध्ये सहकारी चळवळीला सुरुवात झाली. पहिली ग्राहक चळवळ १८८९ मध्ये सुरुवात झाली. सहकारी चळवळीचा कायदा १८९० मध्ये झाला. १९०२ सहकारी पतसंस्था, विभागीय संस्था १९२७ मध्ये स्थापन झाले. १९४७ च्या दरम्यान ब्राझील मध्ये पहिल्या महामंदीत सुध्दा या पतसंस्थांनी सहकारी चळवळीने स्थिरता दाखवली. २०११ मध्ये ब्राझील देशात अधिकृत नोंदणी केलेल्या संस्था ६७८६ एवढ्या आहेत. परंतु २०११ पर्यंत या सहकारी संस्थामध्ये

२०. देहर जे.बी., 'ब्राझील आणि दक्षिण आफीका मधील सहकारी चळवळ', रुसा लक्ष्मीबर्ग फौंडेषन, षाष्वत विकास, दक्षिण आफिका २०१३ पृष्ठ क. १७–१८.

अस्थिरता निर्माण झालेली दिसून येते. सभासदांची संख्या ५ मिलीयनवरुन १० मिलीयन पेक्षा वाढली हे दरम्यानच्या कालावधीत दिसते.

दक्षिण आफिकेत १८९२ मध्ये सहकारी चळवळीला सुरुवात झाली. परंतु १९०७ ला पहिली सहकारी संस्था स्थापन झाली. १९१२ मध्ये ।हतपबनसजनतस ठंदा वि िवनजी ।तिपबं ची स्थापना केली. १९०८ च्या नंतर आणखी ५३ सहकारी संस्थांची स्थापना केली गेली. मंदीच्या कालावधीत दक्षिण आफिकेतील शेतीच्या उत्पादनाच्या किंमती ढासळल्या. त्यामुळे १९२९ ते १९४१ मध्ये कृषी सहकारी संस्थांची संख्या ४२९ वरुन २०२ पर्यत घटली.

सहकार क्षेत्रामध्ये १९३७ मध्ये बाजार कायदा झाला. त्या कायद्याअंतर्गत कृशीविपणनामध्ये सहकाराचे स्थान महत्त्वाचे असल्याचे दिसून येते.

यलोपडोव्हा जे.;२००२[२२] यांनी केलेल्या युरोपीयन सहकारी चळवळीची पार्श्वभूमी या अभ्यासात अलीकडील काळातील सहकारी कृषी संस्थाचे मध्य आणि पूर्व युरोपमधील योगदानाचे महत्तव सांगितले आहे. कम्युनिस्ट आणि कम्युनिस्ट पूर्व कालावधीत लोकशाही व्यवस्था कशी रुजवले गेले याचा परामर्श घेतला आहे. सामान्यपणे सहकार हा नैसर्गिकरित्या लोकांच्या आर्थिक आणि सामाजिक घटकांशी ग्रामीण भागाला जोडणारा घटक आहे. शेती क्षेत्रातील अनिश्चितता दूर करण्याचे काम सहकार करते. शेतकरी अल्पभूधारक असतो. त्यामुळे त्याला शेतीतून प्राप्त झालेले उत्पादन बाजारापर्यत पोहचविणे महागात पडते. ते क्षेत्र हे सहकाराने व्याप्त होते. ऐतिहासिक दृष्ट्या विचार केला तर काही देशामध्ये सहकार विकासाची सर्वात महत्त्वाची भूमिका बजावते. वेबस्टार कॉलेज शब्दकोशातून सहकार म्हणजे

२१. यलोपडोव्हा जे., 'युरोपियन सहकारी चळवळीची पार्श्वभूमी', अर्थषास्त्र विभाग, रॉयल व्हेटरनीटी ॲन्ड ॲग्रीकल्चर युनिव्हर्सिटी, २००२ पृष्ठ क्र. ३-७.

सभासदामध्ये सहकार, शिक्षण, ऐच्छीक सभासदत्व अशी तत्त्वे होय. १९९८ मध्ये वेबस्टारने सहकाराची तत्त्वे पुढीलप्रमाणे दिली आहेत.

१- खुले आणि ऐच्छीक सभासदत्व

२- लोकशाही पद्धतीने नियंत्रण

३- भांडवलात मर्यादित व्याज

४- लाभाचे समान वाटप

७- सहकारी शिक्षण

६- सहकारातून सहकार

शेतक-यांचे गट एकत्र येऊन सहकारी तत्त्वावर शेतीचा व्यापार घडवून येत असेल तर त्याला सहकारी शेती असे म्हणतात. सहकारी शेतीची दिशा व रचना वेगवेगळी असेल तर त्याचा परिणाम अर्थव्यवस्थेवर होतो. सामान्यपणे संधी आणि मर्यादा हे सहकाराच्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. पारंपारीक कर्जपूरवठा केल्यामुळे सहकारी शेतीवर मर्यादा येतात. सहकारी चळवळ ही लोकशाही पद्धतीने चालत असल्यामुळे प्रत्येक सभासदांना एक मत असते. त्या एक मतातून संचालक मंडळ ठरविण्याचा त्याला अधिकार असतो. निवडलेले संचालक मंडळ हे सहकाराच्या विकासासाठी काम करते.

हग जे.ए; १९८०[२२] यांनी अभ्यासलेल्या घाऊक सहकार या विषयावर त्यांनी लिखान केले. त्यामध्ये त्यांनी घाऊक सहकारी क्षेत्रातील सभासदांच्या संख्येविषयी विवेचन केले आहे. कोणतीही सहकारी संस्था चालण्यासाठी त्यांनी भागभांडवलाची आवश्यकता असते असे भांडवल उभे केल्यानंतर त्यांना अपेक्षीत विकास साध्य करता येतो. सहकारी चळवळीचे स्वरुप हे त्यांच्या सभासदांवर अवलंबून आहे. १९४९ मधील १००० पेक्षा कमी भागभांडवलावर असणा-या सहकारी संस्थांची सभासद संख्या १.७४ टक्के

२२. हग जे.ए., 'ब्रिटनमधील सहकारी चळवळ आणि जनता', १९१४-६० लंडन, १९८०, पृष्ठ क्र. १४-१६.

होती. तर १००००० भागभांडवल असणा-या संस्थांची सभासद संख्या २१.७२ टक्के होती. अशा प्रकारची सभासदाची संख्या कमी जास्त स्वरुपात भागभांडवलाच्या वाटयावर अवलंबून होती. हग यांनी केलेल्या अभ्यासात १९१४ पासून १९६० पर्यंत अभ्यास केला होता. या सहकारी चळवळीचा केला जाणारा अभ्यास हा संशोधनीय स्वरुपाचा होता. पहिल्या जागतिक महायुध्दानंतर सहकारी चळवळीकडे थोडेसे दुर्लक्ष झाले. परंतु ही चळवळ मागे हटली नाही. ब्रिटन मधील या समकालीन सुधारणाच्या दरम्यान सहकारी घाऊक क्षेत्रातील स्वयंचलित खरेदी विचारात घेण्याचा प्रयत्न केला गेला. या अभ्यासातून सहकारी चळवळीच्या स्थितीची श्रमीक चळवळीशी जोडला गेला आहे. श्रम संघटना, सहकारी चळवळ आणि वैयक्तीक पातळीवर यांचा संबंध असल्याचे समजते. त्यामुळे सहकार चळवळ पुढे जाताना दिसून येते. १९८० च्या दशकात या चळवळीला नवीन रुप प्राप्त झाले आहे. सहकारी संघटन हे राजकीय चळवळीशी संलग्न आहे. इडिनबर्ग यांच्या मते, सहकार हे राजकीय हस्तक्षेपाचा प्रमुख विषय बनला आहे.

पोलेट आय. आणि देवलते रे. २००८[२४] 'आंतरराष्ट्रीय श्रम संघटनाम मधील सहकारातून दारिद्रयाचे निर्मूलन या विशयावरील विवेचन समोर आले. त्यामध्ये त्यांनी आफिकेतील सहकारी चळवळीचा परामर्श घेतला. कोणत्याही अर्थव्यवस्थेमध्ये दारिद्रय हा सर्वात मोठा प्रष्न निर्माण झालेला आहे. हे दारिद्रय कमी करायचे असेल तर सहकाराची नितांत गरज असल्याचे मत प्रवाह त्या कालावधीमध्ये आफिकेत पुढे आले. स्वतःच्या घरातील प्रष्न असतील, सामाजिक असतील, बाजारपेठेतील प्रश्न असतील अशा आवश्यक बाबींची सोडवणूक या माध्यमाने केली जाते. आफिकेमध्ये सहकारी चळवळीची दोन इतिहास असले तरी निष्कर्श हा एकच घटक आहे. आफिकेतील सहकारी चळवळ ही विभाजीत किंवा विकसीत झालेली चळवळ

२३. पोलेट आय. व देवलतेरे, 'आंतरराष्ट्रीय श्रम संघटना', Co- operating out of poverty, खडज अहवाल, आफिका २००८, पृष्ठ क्र. २४-२८.

आहे. सहकारी चळवळीतून एक वेगळा आदर्श दारिद्रय कमी करण्यामध्ये असल्याचे आढळून आलेले आहे. १९९० नंतर खऱ्या अर्थाने जागतीकीकरणला सुरुवात झाली. त्याचबरोबर खाजगीकरणाला सुध्दा सुरुवात झाली. आर्थिक, सामाजिक विकासामध्ये या सर्व स्थितीमध्ये एकमेव सहकारी चळवळ उभा राहू शकते असे मत त्यांनी व्यक्त केले. खाजगीकरणाचा परिणाम आफिकेतील सहकारी क्षेत्रावर झालेला दिसून येतो. आर्थिक विकासात महत्वाची भूमिका सहकार क्षेत्राची आहे. तर १९९० च्या नंतर ही भूमिका कमी होत चालली आहे. बचतही व पतसंस्था यांच्या सभासदांच्या बाबतीत आफिकेमध्ये संख्या जास्त आहेत. केनियामध्य ८४९२० सभासद सहकारी क्षेत्रात आहेत. सहकारी स्वातंत्र्य हे आफिकेमध्ये सहकाराचा विकास ही सर्व लोकांनी एकत्र आल्याची देणगी आहे. परंतु या सर्व घटनामध्ये ग्रामीण भागात तळागाळापर्यत पोहचण्यासाठी सरकार, जनता, खाजगी ग़ट यांनीसुध्दा प्रयत्न केल्याची नोंद आहे. विकासानंतर यामध्ये सामील असण्यापाठीमागे सर्व राजकीय प्रणाली कारणीभूत आहे. आफिकेमध्ये सहकार क्षेत्र पारंपारीक दृश्टीकोनात राहण्याची सहकाराचा वेगळा दृटीकोन आणि सहकारीक्षेत्राचा वेगळा मार्ग ही दोन कारणे महत्त्वाची आहेत. आफिकेमधील सहकारी क्षेत्र व्यापारी क्षेत्रावर काम करते. शेतकरी या माध्यमाने कॉफो, कोका, केळी, कापड आणि परकीय व्यापार यासाठी वाहतूक, प्रक्रिया उद्योग हे सहकारी तत्त्वावर चालते. पर्यायाने या व्यवस्थेमुळे त्याठिकाणी असणारे दारिद्रय कमी होण्यासाठी मदत होते. सहकारी क्षेत्राची रचना आणि जाळे हे जुन्या पद्धतीचे असल्यामुळे जुन्या विचारशैलीच्या लोकांचा विश्वास आहे. त्यामध्ये प्राथमिक संस्था, ढुय्यम सस्था, संघटना, उच्च मंडळ; सहकारी संघटना, सहकारी प्रशिक्षण संस्था याचा समावेश होतो. या सर्व क्षेत्रातील संस्थामुळे ग्रामीण भागाचा तळागाळापर्यत विकास होतो. १९७९ मध्ये नायजेरिया ३११५ सहकारी संस्था, जाम्बीया ५५ संस्था, केनिया ५७६ संस्था, युगांडा १५९८ संस्था, टांझानिया ६१७ संस्था अशा सहकारी संस्था आफिकेत कार्यरत होत्या.

इमाना बी;२०१२[२४] यांनी 'इथोपिया देशातील सहकारी चळवळम या विशयावर पूर्व आफिकेमध्ये दोन दिवसीय कार्यशाळेमध्ये केलेल्या अभ्यासात सहकाराचे विश्लेंषण केले आहे. याविषयावर त्यांनी सहकाराची ऐतिहासिक पार्श्वभूमी, सहकारीच सध्याची स्थिती, आर्थिक व सामाजिक क्षेत्रातील सहकाराची भूमिका, सरकारचा सहकारी विकासातील भूमिका, सहकारी चळवळीची आव्हाने आणि सहकारातून विकासाकडे वाटचाल केली आहे की नाही याचा परामर्श घेतला आहे. १९७४ मध्ये या देशात फक्त १४९ सहकारी संस्था होत्या. १९७४-१९९१ मध्ये १०७२४ एवढया वाढल्या. १९९१ मध्ये ७३६६ सहकारी संस्था झाल्या आणि २०११ मध्ये ३७२४७ प्राथमिक सहकारी संस्था आहेत. सहकारी संस्था उभी राहत असताना देशात अडीअडचणींना सामोरे जावे लागते. सभासदत्व जर १८ वर्षाखालील व्यक्तींना दिले तर ते वेगळया मार्गावर जाऊन निर्णय चांगले होणार नाहीत, बचती मोठ्या प्रमाणात झाल्या नाहीत तर रोखतेचा प्रष्न निर्माण होतो. त्यामुळे निधीचा वापर योग्य होत नाही. त्याचबरोबर रोजगार निर्मितीचा प्रश्न समोर येतो याचे विवेचन त्यांनी केले. इथोपिया या देशातील सहकाराची रचना केंद्र फडरल - विभागीय, 'वदंस सहकारी संस्था - जिल्हा सहकारी ऑफिस याप्रमाणे आहे. २००६ मध्ये २०४३७ प्राथमिक सहकारी संस्था होत्या. २००८ मध्ये २४९३५ एवढया झाल्या तर २०११ मध्ये ३७२४७ एवढया आहेत. त्यावरुन एक गोष्ट लक्षात येते की, आपल्या देशातील सहकारी संस्थांच्या वाढीपेक्षा इथोपिया या देशाची सहकारी संस्थांची वाढ चांगली आहे. प्राथमिक सहकारी संस्थांची सभासद संख्या ५८८२२६० एवढी आहे तर प्रत्येक सहकारी संस्थेला सरासरी १५८ एवढे सभासद आहेत. त्यापैकी २३ टक्के महिला सभासद तर ७३ टक्के पुरुश सभासद आहेत. भागभांडवलात १२५ मिलीयन डॉलर रक्कम प्राथमिक सहकारी संस्थाची

२४. इमाना बी., 'इथोपिया राष्ट्रातील सहकारी चळवळ', दोन दिवसीय पूर्व आफिकेतील कार्यषाळा, २-३ ऑक्टोबर, युगांडा, २०१२.

आहे. प्रती प्राथमिक संस्था भांडवल ३४०० डॉलर एवढी आहे. या भांडवलापैकी स्वतःचे भांडवल हे ३४ टक्के एवढे आहे. सहकारी संघटनाच्या बाबतीत २००६ पासून आतापर्यत संख्या वाढताना दिसून येते. २००६ मध्ये ११२ संघटना कार्यरत होत्या तर २०११ मध्ये २४७ संघटना कार्यरत आहेत. कृशी सहकारी संस्था या कॉफोचे विपणन, हरित बाजार, दुग्ध सहकारी संस्था आणि सिंचनासाठी कार्यरत आहेत. त्याचबरोबर बचती आणि पतधोरण त्याचबरोबर खाणीसाठी सहकारी संस्था कार्यरत आहेत. आर्थिक विकासात सहकारी संस्थांची भूमिका महत्त्वाची आहे. उत्पन्नातील वाढ, गरीबीची घट, आर्थिक वाढ, ग्राहकोपयोगी वस्तु, साठवणुकीच्या सुविधा, रोजगार निर्मिती, सामाजिक सुरक्षितता यासारख्या महत्त्वपूर्ण बाबी सहकारी संस्थांनी इथोपिया या राष्ट्रात प्राप्त केलेल्या आहेत.

ओकेलो एल; २०१३[२६] 'आर्थिक विकासातील आव्हाने आणि सहकार चळवळ या संशोधनपर विषयात आर्थिक विकासातील सहकाराच्या भूमीकेविषयी पाठीमागे विचार विनीमय केला आहे. या अभ्यासात युगांडातील सहकारी चळवळ विकसीत झालेली दिसून येते. ऐतिहासीक भूमिका, सद्यस्थिती, रचनात्मक बदलात आणि सुरक्षिततेत सहकाराची मूल्य इत्यादीची भूमिका महत्त्वपूर्ण असल्याचे मत मांडले. आर्थिक विकासातील धोरणामध्ये नव-उदारीकरण हे गतीमान होताना दिसते. त्याचबरोबर टप्प विकसीत होताना शेवटच्या तीन दशकात बदल झालेला आढळून येतो. युगांडा देशात ऐच्छीक आणि खुले सभासदत्व, लोकशाही नियंत्रण, सभासदांचा आर्थिक सहभाग, स्वातंत्र आणि स्वायत्ता, शिक्षण प्रशिक्षण आणि माहिती, सहकारातून सहकाराकडे आणि लोकांच्यासाठी या सहकारी तत्त्वावर चालणा-या सहकारी संस्था कार्यरत आहेत.

---

[२६] आकलो एलत्र, 'विकासातील आव्हाने आणि सहकारी चळवळ',*A Search for Alternative Wealth Creation and Citizen Vitality Approaches in Uganda,* 2013, पृष्ठ क्र. ७-१०.

सहकारी संस्थात लोकांचा सहभाग महत्त्वपूर्ण आहे. राजकीय हस्तक्षेपामुळे सभासदांवर मर्यादा येतात. त्यामुळे हे सभासद आर्थिक समावेशकता कमी स्वरुपाची आहे. कृशीक्षेत्राशी संबंधीत सहकारी संस्थामध्ये २९.९: सभासद, विक्री सहकारी संस्थाची १७.९: सभासद, बचतीला प्रोत्साहनात १६.९: सभासद, शेतक-यांना प्रशिक्षण देण्यासाठी १२.४:, उत्पन्न वाढीच्या स्पर्धा ८.७:, प्राथमिक सहकारी संस्थामध्ये ६: सभासद, रोजगारीमध्ये ०.७: आणि प्रक्रिया उद्योगामध्ये ०.७: सभासद हे सहकारी उद्योगात गुंतलेले आहेत. केनिया या देशातील वित्तीय साक्षरता आणि राश्ट्रीय संपत्तीविशयीचे संसाधनामध्ये सहकारी चळवळीची भूमिका खुप महत्त्वाची आहे. प्राथमिक कृशी सहकारी संस्थाचे भागभांडवल २.७ बिलीयन डॉलर २०१० मध्ये केनियात होते तर त्याचे जीडीपीतील योगदान हे १०: एवढे होते, त्याचबरोबर अधिकृत सोसायट्या या ७७४४ एवढया होत्या. तर ३०००० पेक्षा जास्त रोजगार सहकारी क्षेत्राच्या माध्यमाने निर्माण झाला होता.

लावंड बी.टी.; २०१७[२७] यांनी लिहिलेल्या संचार या वृत्तपत्रात सहकार हे खासगीकरणाकडे या विषयावर सध्याच्या समस्येविषयी लिखाणाचा परामर्श घेतला आहे. त्यांच्या मते सोलापूर जिल्हयाला सहकार चळवळीचे मोठे योगदान लाभले आहे. 'विना सहकारी नाही उद्धारम या भावनेने अनेकांनी ही चळवळ रुजवण्यासाठी परिश्रम घेतले. मात्र सहकारात घुसलेली अपप्रवृत्ती, बोकाळलेला भ्रष्टाचार आणि गैरव्यवस्थापन यामुळे अपवादात्मक काही संस्था वगळता ब-याच संस्था डबघाईला आल्या. राजकारणाच्या बदलत्या सारीपाटामुळे भविश्यात ती संस्था आपणाकडेच राहिला का याची शाष्वती नसल्याने सहकारात एकमेकांचा हात धरुन वाटचाल करणा-या नेतेमंडळींनीच खासगीकरणाची वाट धरली आहे.

[२७] लावंड बी.टी., 'सहकाराची वाटचाल खासगीकरणाकडे', संचार वर्तमानपत्र, दि. २३ ऑगस्ट २०१७, पृष्ठ क्र. ४.

सोलापूर जिल्हयात सहकार क्षेत्र सक्षम आहे. साखर कारखाने आणि दूध संस्था यामध्ये ब-यापैकी खासगीकरण होत असले तरी इतर सर्व क्षेत्रात सहकाराचेच वर्चस्व आहे. सर्वसामान्य लोकांना, शेतक-यांना केवळ सहकारी संस्था मधूनच पतपुरवठा होऊ शकतो. सामान्य शेतक-यांना खासगी बँका पतपूरवठयाचे धाडस करु शकत नाहीत. मात्र सहकारी बँका त्यांना कर्ज देतात. सामान्य लोकांना लघू उद्योगापासून शेतीपर्यत आणि पूरक व्यवसायासाठी सहाकारी संस्था फायदेशीर ठरणा-या आहेत. शहरामध्ये हौसिंग सोसायट्यांमधील लोकांना जी सवलत मिळते ती खासगी बिल्डरकडून घर घेणा-या लोकांना अशी सवलत मिळत नाही. आर्थिक लाभ घेण्यासाठी कागदोपत्री चालू असणा-या संस्था शोधून काढण्याचे सर्वेक्षणाचे काम सहकार विभागाने हाती घेतले असून ३० सप्टेंबर २०१५ पर्यत अशा संस्थांचा शोध घेतला घेण्याचा व ज्या संस्था कार्यरत नाहीत त्यांना विसर्जित करण्याचा निर्णय घेतला आहे. जिल्ह्यात सुमारे ८७९ पतसंस्था असून यामध्ये सभासदांच्या १२६७ कोटी ९७ लाख ११ हजार रुपयांच्या ठेवी आहेत. या पतसंस्थांनी ९९८ कोटी १२ लाख ३४ हजार रुपयांचे कर्ज वितरण केले आहे. या पतसंस्थांचे एकूण भागभांडवल ९७८ कोटी ९ लाख ९९ हजार रुपयांचे आहे. या पतसंस्थापैकी ६० पतसंस्था बंद पडल्या आहेत. मागील १० वर्षापूर्वी या पतसंस्थानी मोठी विश्वासार्हता प्राप्त केली होती. परंतु त्यानंतर ठेवीदारांच्या ठेवी परत न मिळणे आणि कर्ज वसुली थकित राहिल्याने बहुतांशी पतसंस्थाबाबत सभासदांमध्ये साशंकता निर्माण झाली आहे. मात्र काही पतसंस्थांनी अशा काळातही आपली विश्वासार्हता जपली आहे. मात्र पतसंस्थाची चाललेली घोडदौड थांबल हे मात्र खरे असे मत त्यांनी व्यक्त केले.

सोलापूर जिल्हयात खासगी व सहकारी दूध संस्थांकडे दररोज १३ लाख ६० हजार ७०० लिटर दूध संकलन केले जाते. पूणे, अहमदनगर, कोल्हापूर नंतर सोलापूर जिल्हयाचा दूध उत्पादनात नंबर लागतो. जिल्हा

दूध संघाने शेतक-यांना दूध व्यवसायाची गोडी लावली असून आर्थिक मदतीबरोबरच दूधाला योग्य भाव दिल्याने जिल्हा दूध संघाचा विस्तार वाढत गेला.

कुर्ल जे. ;२०१०[२८] यांनी लिहिलेल्या २१ व्या शतकातील 'सहकाराची चळवळ या विषयावर संशोधन केल. त्यांनी अलीकडील कालावधीत होणा-या बदलावर चर्चा केली आहे. अलीकडील कालावधीत श्रम चळवळ ही औद्योगीक क्रांतीच्या अगोदर ख-या अर्थाने सुरु झाली होती. सहकारी चळवळ ही सर्वात अगोदर निर्माण झालेली सामाजिक चळवळ आहे. आधुनिक काळात याचा विचार मोठ्या प्रमाणात झाला. जगात आज कामगार सहकारी संस्था, लोकशाही व्यवस्थेने चालणा-या आहेत हे महत्त्वपूर्ण अशी बाब आहे. या चळवळीने सामाजिक सुधारणेतून, आर्थिक सुधारणाही प्राप्त होते. जागतिकीकरणामुळे जागतिक पातळीवर निर्माण होणारे सामाजिक व्यवहार, मंदी तेजी यासारख्या समस्याची सोडवणूक केली जाते. सहकारी चळवळीमुळे संपूर्ण जगामध्ये सामाजिक संयोजकत्व, संपूर्ण जगाचा विकास साध्य करता येतो. २००२ मध्ये युनो या देशाने म्हटले आहे की, सहकारी चळवळीमुळे सामाजिक आणि आर्थिक सुधारणा झालेल्या आहेत. आजही सहकारी चळवळ २१ व्या शतकामध्ये ऐतिहासिक बनली आहे. याच काळात नवीन एक चळवळ सुरु होते. त्याला सामाजिक एकता चळवळ, सहकारी चळवळ की ज्या लाभांश, विकासाची उद्दिष्टे याच्या निगडीत असतात. ही सर्व उद्दिष्टे साध्य केली जात नाही. कारण समाज सातत्याने बदलणारा असतो. कारण चालणारी ही व्यवस्था लोकशाही असते. सामाजिक रचनेत विविधता असते. या चळवळी आंतरराष्ट्रीय घटकाशी जोडल्या आहेत.

[२८] कुर्ल जे., २१ व्या षतकातील सहकारी चळवळ, A Journal of Redical Theory, Culture & Actim, Vol-४, नोव्हें १, २०१० पृष्ठ क्र. १२-२९.

दास बी. ;२००६[२९] यांनी अभ्यासलेल्या 'जागतिकीकरणात भारतीय सहकारी चळवळीच्या समस्या आणि स्थितीम या विशयात भारतीय सहकाराविशयी विवेचन केले आहे. खुल्या अर्थव्यवस्थेच्या काळात भारतातील सहकाराचा विकास काही अंशी राजकीय समीकरणावर अवलंबून आहे. भारतामध्ये सहकारी चळवळ जास्त गतीने वाढत आहे. ती प्रेरणा व समतेशी निगडीत असल्याचे लक्षात येते. उदारीकरणाच्या व्यवस्थेत नवीन आर्थिक वातावरण तयार केली आहेत त्यामध्ये सहकार क्षेत्र बाजारातील मागणीनसार कार्य करते. खाजगीकरणापासून सार्वजनिक क्षेत्राचा प्रभाव कमी होताना दिसून आला त्याच कालावधीत सहकार क्षेत्राचा विकास प्रामुख्याने झाला. सहकारी क्षेत्राचे चळवळीने भारतीय अर्थव्यवस्थेत खुप फायदे झाले आहेत. त्यामध्ये दारिद्र्य कमी करणे, अन्नसुरक्षा आणि रोजगार निर्मिती या महत्त्वपूर्ण बाबी आहेत.

प्रस्तूत शोध प्रबंधामध्ये सहकारी क्षेत्रातील समस्यावर भर दिलेला आहे. गरीब वातावरण, कुशल नेतृत्वाचा अभाव, सरकारी नियंत्रणाचा जास्त प्रभाव, सभासदत्व, मतदान न घेणे, मानवी संसाधन धोरणाचा अभाव, व्यवसायीक शिक्षणाचा अभाव इत्यादी अभावामुळे सहकारी चळवळोवर मर्यादा भारतात आलेल्या आहेत. भारतातील सहकाराची रचना ही फडरल प्रकारची आहे. केंद्रीय सहकारी संस्था – राज्य स्तरीय सहकारी संस्था – स्थानीक ;प्राथमीक कृशी सहकारी पतसंस्थाद्ध ग्रामीण व नागरी पतसंस्था अशा स्वरुपाची रचना भारतात आढळून येतात. सहकारी क्षेत्राची भारतोय अर्थव्यवस्थेला खूप महत्त्वपूर्ण अशी साथ आहे. कारण आपल्या देशातील बरीचशी लोकसंख्या अशिक्षीत आहे. भागभांडवल आणि लाभांशाची वाटणी कशी करावी, विविधता, राजकीय घटक, शेतीविकासातील मर्यादा इत्यादी

[२९] दास बी., जागतिकीकरणातील भारतीय सहकारी चळवळ समस्या आणि स्थिती, *XIV International Economic History Congress, Helsinki 2006.*

कारणामुळे सहकारी चळवळ मागे पडली असल्याचे दिसते. देशात ग्रामीण भागाला जोडण्याचे काम सहकारी चळवळीने केलेले आहे. कृशीला पतपूरवठा ४६.१५ टक्के एवढा केला आहे. खतांचा खर्च ३६.२२ टक्के, खतांचे उत्पादन २७.६५ टक्के, साखर उत्पादन ५९ टक्के, साखर क्षमतेचा वापर १११.५ टक्के, गहू उत्पादन ३१.८ टक्के, ग्रामीण आणि शहरी भागातोल किंमत यंत्रणेद्धारे सहकारी चळवळीचा वाटा भारतामध्ये दिसून येते.

वैद्यनाथन ए. ;२०१३[३०] यांनी लिहीलेल्या भारतातील सहकाराचे भविष्य या विषयावर भारतातील सहकारी चळवळीच्या भविष्यावर विश्लेषण केले आहे. भारतामध्ये १९०४ मध्ये सहकारी कायदा झाल्यापासून सहकाराची खरी सुरवात झाली. परंतु या चळवळीला खरी स्वातंत्रोत्तर काळात गती मिळाली. भारतीय अर्थव्यवस्थेत ग्राहक सहकारी संस्था, गृहनिर्माण संस्था, प्राथमिक कृषी सहकारी संस्था, नागरी पतसंस्था, सहकारी सोसायटया, दूग्ध सहकारी संस्था या देशाच्या विकासात महत्त्वपूर्ण भूमीका बजावतात. १९५१ मध्ये आपल्या देशात १८१००० सर्व प्रकारच्या सहकारी संस्था होत्या. एकूण संस्थातील सभासदत्व १५.५ मिलीयन सभासद होते. २००७-०८ पर्यत प्राथमिक कृषी सहकारी संस्था १५०००० आहेत. १८० मिलीयन सभासद आहेत. जेवढ्या प्राथमिक पत सहकारी संस्था आहेत. तेवढयाच जवळजवळ २६०००० बिगर पतपूरवठा सहकारी संस्था आहेत. या सहकारी चळवळीने भारतीय कृशी क्षेत्रात गतीमानता आणली. शेतीचे राष्ट्रीय उत्पन्न १९९०-९१ मध्ये १५०८ बिलीयन होते, २०००-०१ मध्ये तेच उत्पन्न ४४९६ बिलीयन झाले. २००४-०५ मध्ये ते ५५२४ बिलीयन पर्यत वाढले आणि २००९-१० मध्ये १०८९० बिलीयन इथपर्यत वाढले. यांनी एकूण प्रत्यक्ष

[३०] वैद्यनाथन ए., 'भारतातील सहाकाराचे भविष्य', पृष्ठ क्र. ३०-३२. Economic and Political Weekly May 4,
2013 Vol-XLVIIT 18,

कर्जे १९९०-९१ मध्ये १०२ बिलीयनची दिली तर २००९-१० मध्ये २२३७ बिलीयन इथपर्यत वाढझाली. सहकारी क्षेत्राचा प्रत्यक्ष जीडीपी मधील योगदान वाढताना दिसून येते. १९९०-९१ मध्ये राश्ट्रीय उत्पन्नातील सहकारी चळवळीचा वाटा ३.२ टक्के होता, २०००-०१ मध्ये ६.१ टक्के झाला. २००४-०५ मध्ये तो ८.१ टकके एवढा झाला. तर २००९-१० मध्ये ६.९ टक्के झाला. सहकारी पतसंस्था आणि नागरी पतसंस्था यांचा २००९-१० मधील वाटा २७.३ टक्के होता. प्राथमिक कृशी सहकारी पतसंस्थांची संख्या भारतामध्ये जास्त प्रमाणात झालेली आहे. २००१ मध्ये ९८.२ हजार, २००४ मध्ये १०८ हजार आणि २०११ मध्ये ९३००० सहकारी पतसंस्था भारतामध्ये आहेत. या सर्व घटना सहकारी तत्त्वावर चालत असते. त्यासाठी राजकीय स्थिरता खूप महत्त्वाची असल्याचे सांगितले जाते. भारत हा जास्त लोकसंख्या असलेला देश आहे. त्यामुळे सर्व बाबी सहकारी चळवळीवर परिणाम करतात.

भारत सरकार कृशी मंत्रालय;२००९[३१] या अहवालातून त्यांनी सहकारी क्षेत्रातील सद्यस्थिती, सहकाराची आव्हाने आणि त्यांच्या समस्येविशयी चर्चा केली आहे. ग्राहक आणि बाजार या दोन घटकावर गेल्या दोन शतकात सहकारी क्षेत्रात जे बदल झाले त्याचा अंतर्भाव उच्च क्षमता समिती केला आहे. आज आपले ज्ञान, तंत्रज्ञान, जागतिक पातळीवरील रचना, साधनांची उपलब्धता, जागतिक उत्पन्न या माध्यमाने विविधता आहे. त्यामुळे त्याचा प्रभाव सहकारी चळवळीवर पडतो. भारतातील ६७ टक्के लोकसंख्या ही शेतीवर अवलंबून आहे आणि शेती ही भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. सद्यस्थिती ही सहकाराची विकास व्यवस्थेशी निगडीत आहे. पात्र सभासदाची कमतरता सहकारी चळवळीला आहे. सभासदांच्या जाणीवांचा अभाव, भांडवलाची कमतरता, राजकीय हस्तक्षेप, वाढता भ्रष्टाचार, व्यावसायीक

[३१] भारत सरकार, कृशी मंत्रालय, सहकारावरील अहवाल, २००९.

शिक्षणाची कमतरता इत्यादी बाबींमुळे सहकारी क्षेत्र हे मागासलेले दिसून येते. तसेच वाढता स्पर्धात्मक खर्च, सरकारची सहकारी चळवळीतील भूमिका याचा प्रभाव महत्त्वपूर्ण आहे.

सहकारी तत्त्वानुसार मंजूर केलेले निवडणूकीच्या निकषाप्रमाणे निवडणूक झाली पाहिजे. त्यातुन सर्वसाधारण संचालकाची निवड करण्यात येते. संचालकापैकी एका व्यक्तीची चेअरमन म्हणून निवड करतात. या सर्वांकडून सहकाराचे कामकाज पार पाडले जाते. परंतु अलीकडील कालावधीत सत्ताहस्तांतरणासाठी सभासद वाटेल ते करतात. यामध्ये राजकीय दबाव, नातेवाईकांनाच मदत, गरीबांची पिळवणूक इत्यादी गोष्टींचा समावेश होतो. २००४ मध्ये सहकारी चळवळचे भारतातील शतक पूर्ण झाले. त्यातून वेगवेगळया क्षेत्रातून आपली उद्दिष्टे सहकारी चळवळीने साध्य केली. बँकेतून निर्माण होणा-या समस्या आणि जागतिक पहिले महायुद्ध यामुळे ढासळलेली आर्थिक परिस्थीतीत सुधारणा करण्यासाठी मॅकलेमन समिती सहकारी क्षेत्रात १९१४ मध्ये स्थापन केली गेली. शेती क्षेत्रातील नगदी पिके त्यांच्यात झालेल्या बदलाचे स्वरुप बदलण्यासाठी या समितीने काम केले. त्यामध्ये कृशी क्षेत्राला कर्जपुरवठा या माध्यमाने केला.

जोशा बी.;२००७[३२] मार्क्स व मार्क्सवादी आणि सहकारी चळवळ या विशयावरील लिखानात कार्ल मार्क्सचे सहकारी चळवळीच्या विचारांचा परामर्श घेतला आहे. मार्क्सने सहकारी चळवळीच्या मर्यादा ओळखून त्या चळवळीला नाकारले. परंतु उत्पादनाच्या सिध्दांतानुसार सहकारी चळवळीचे योगदान मोठे असल्याचे मार्क्सनी साम्यवादी विचारांचा पुरस्कार केला. त्यानुसार मार्क्सने श्रम संघटना या देशाची अर्थव्यवस्था; भांडवलशाही उलथवून टाकतील असे मत मांडले. भांडवलशाही ही नफयाच्या अधिक्यातून

[३२] जोशी बी., मार्क्स, 'मार्क्सवादी आणि सहकारी चळवळ', Cambridge Journal of Economics, २००७, पृष्ठ क्र. ३-१८.

पुढे आली. त्याचबरोबर नफा उभारणीमध्ये श्रमिकांना दिले जाणारे वेतन हे निर्वाह पातळीपर्यत दिले जाते. त्यामुळे श्रमीकांची पिळवणूक होते आणि भांडवलशाही विकसीत होत जाते. अगदी त्याप्रमाणे सहकारी चळवळ ही राजकारण्यांच्या हातात आहे. त्यामुळे सहकारामध्ये सामील असलेल्या सभासदामध्ये त्या क्षमतेने विकास केला जात नाही. भांडवलदारांच्या हातात सहकारी संस्थांच्या भांडवल उभारणीच्या चाव्या आहेत. सामाजिक अथवा साम्यवादी अर्थव्यवस्थेचा सहकारी क्षेत्रात विकास झालेला दिसून येत नाही.

एकसाई आर.;२०१२[३३] यांनी लिहिलेल्या सार्वजनिक क्षेत्रातील सहकार या विषयात राजकीय वातावरणातून सहकार क्षेत्रावर येणा–या मर्यादावर लेखन व संशोधन केले आहे. नायजेरिया विभागात ७० मिलीयन पेक्षा जास्त सभासद शेती व्यवस्थेशी संबंधीत आहेत. ग्रामीण भागाच्या विकासासाठी आणि शाश्वत विकासासाठी सहकारी चळवळ महत्त्वपूर्ण आहे. त्यामुळे राजकीय वातावरण खूप महत्त्वाचे आहे. सहाकारी चळवळीच्या राजकीय स्थितीमुळे स्थानिक स्वराज्य संस्था या जास्त प्रभावी ठरतात. सहकारी चळवळीला गटा तटाच्या राजकारणामुळे सार्वजनिक क्षेत्रात पिछेहाट झाली असल्याचे दिसून आले. नायजेरियात वरचेवर खाजगीकरण वाढत आहे. वाढत्या खाजगीकरणामुळे व्यापारी उत्पादन, सहकारी क्षेत्रावर मर्यादा आल्या. १९७० ते ७० या कालावधीत सहकारी श्रम संघटना कार्यरत होत्या. तेलाबियाच्या परकीय व्यापारामध्ये सहकारी चळवळीला सरकारने पूर्ण मदत केली. माहीती आणि तंत्रज्ञानाच्या युगात जागतिकीकरणाच्या कालावधीत अन्नधान्याची आणि खाजगी क्षेत्र हे सुध्दा सहकारी चळवळीवर परिणाम झाल्याचे दिसते. कृषीक्षेत्राला सहाय्य करत असल्याने ई–कृषी, ई–

[३३] एक्साई आर., 'सार्वजनिक शहरातील सहकार', Trans Sahara Global Foods Investment Ltd., नायजेरिया,
पृष्ठ क्र. १–२.

व्यवस्थापन, ई-शेती असे अजून अनेक काही सहकारी शेतीव्यवस्था कार्यरत होती.

मॅकडोनोल डी. ;२०१२[३४] यांनी सहकारातील क्षेत्रावरील लिखानाचा परामर्श घेतला आहे. कोणतेही संशोधन हे वित्तीय, आर्थिक, शिक्षण, सामाजिक आणि व्यवस्थापकीय क्षेत्रामध्ये महत्त्वपूर्ण ठरते. त्यातून सहकारी क्षेत्राची स्थिती याचा परामर्श हा प्रामुख्याने येथे घेतला आहे. सहकारी क्षेत्रातील स्कॉटीश देशातील आपल्या आर्थिक विकासात भूमिका समोर येते. स्कॉटीश या देशात १८८६ मध्ये ३११ सहकारी संस्था होत्या तर १९०९ मध्ये २९४ एवढया सहकारी संस्था झाल्या. सभासदांच्या संख्येमध्ये याच कालावधीत १८८६ पासून १९०९ पर्यंत १३७०४७ सभासदावरुन ४०५१२९ एवढी संख्या वाढली आहे. कोर्क या देशात सहकारी क्षेत्रात २५०० सभासद अगदी सुरुवातीच्या काळात होते. सहकारी अन्नधान्य विकास मंडळ त्या ठिकाणी कार्यरत होते. त्यांनी सहकारी क्षेत्राला प्रेरणा देऊन आर्थिक विकासाला चालना देण्याचे काम केले आहे.

वॅनथामा ;२०१०[३५] यांनी अभ्यासलेल्या आफिकेसाठी सहकारी चळवळ या विषयाचा परामर्थ घेतला. आफिकेच्या विकासात सहकारी चळवळीचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. ऐतिहासीक दृष्टीकोनातून पाहिले तर पूर्वी आफिकेत सहकारी चळवळ फारशी विकसीत झाली नव्हती. आजच्या काळात त्याचा विकास झाला आहे. परतु चांगल्या सुज्ञ सभासद, भांडवलाची समस्या आणि राजकीय हस्तक्षेपामुळे सहकार क्षेत्र आज मागे सरले आहे. आफिकेतील शेती व्यवसायाबरोबरच व्यापार, दळणवळण, स्थानिक बाजार, व्यापारी, ग्रामीण विकास या माध्यमाने विकास या क्षेत्राने केला आहे.

---

31. मॅकडोनोल डी., *The Co-operative Model in Practice, International Perspective, Economic & Social Research Council,* 2012, ISBN 97809555342.32

[३५]. वैनयामा, आफिकेसाठी सहकारी चळवळ, मेसोनो विद्यापीठ, केनिया-२०१०, पृष्ठ क्र. १७-१९.

युगांडातील शेतीपेक्षा आफिकेतील शेतीची सहकारामुळे चांगली सुधारणा झाली. २००५ मध्ये सभासदांची संख्या ८००० एवढी ६०० सहकारी संस्थाशी संबंधीत आहे. खाजगीकरण, आधुनिकीकरण, आर्थिक विकास, रोजगार निर्मिती व दळणवळण योजनेची ही मुख्य उद्दिष्टे ठरविण्यात आली. या योजनेअंतर्गत ग्रामीण भागात दळणवळणाचे जाळे पसरविण्याचे नियोजन करण्यात आले. यामध्ये इंटरनेट, दूरध्वनी, दूरदर्शन, रस्ता, समुद्रातील दळणवळण यावर भर देण्यात आलेला आहे. हे सर्व सहकारी चळवळीमुळे लवकर साध्य होण्यास मदत झाली. म्हणूनआफिकेत विकास मोठया प्रमाणावर झालेले दिसून येते.

दक्षिणकार ना.पु.;२००६[३६] यांनी लिहिलेल्या दुग्ध व्यवसाय विस्तार या पुस्तकामध्ये त्यांनी सहकारी चळवळीच्या माध्यमाने केलेल्या विकासाचा परामर्श घेतला आहे. ग्रामीण भागात पूरक व्यवसाय मिळवून देणे आणि दूधाच्या मागणीची पूर्तता करण्यासाठी महाराश्ट्र राज्याने दुग्ध व्यवसाय विकास कार्यक्रम १९४८ साली हाती घेतला. आपल्या येथे शेतीवर आधारभूत असलेला दुग्धोत्पादन हा एक महत्त्वाचा पूरक व्यवसाय आहे. त्यातच शहरांच्या विस्तारामुळे आणि लोकसंख्येच्या वाढीमुळे उत्पादित दुधास हमखास अशी बाजारपेठ उपलब्ध झाली आहे. राष्ट्रीय दुग्धविकास मंडळाने राबविलेल्या दूधाच्या महापूर योजनेमुळे देशात धवलक्रांती घडून आली. सन २००३-२००४ साली देशाचे वार्षीक दूध उत्पादन १६ दश लक्ष टनावरुन ९०.८८ कोटी टन एवढी प्रचंड वाढ नोंदण्यात आली. भारताचे दूध उत्पादन वाढल्यामुळे आज भारतवासियांची दरडोई दूधाची उपलब्धता १५३ ग्रॅम प्रति दिनावरुन २३७ ग्रॅमवर आली आहे. मात्र भारतीय वैद्यकीय मंडळाच्या सल्ल्यानुसार दूधाची उपलब्धता २८० ग्रॅम प्रतिदिन होणे आवष्यक आहे.

[३६]. दक्षिणकार ना.पु., 'दुग्ध व्यवसाय विस्तार', मंगेश प्रकाशन, नागपूर पृष्ठ क्र. १२०-१२१.

दूध उत्पादनाच्या बाबतीत एकत्रितपणे विचार केला तर महाराष्ट्र आघाडीवर आहे. कारण आज प्रतिदिन दूधाचे उत्पादन हे १७ दश लक्ष लिटर्स एवढे आहे. १९९६-९७ साली हेच उत्पादन ४.९ दश लक्ष होते. परंतु या उत्पादनाचे प्रमाण प्रत्येक विभागातून सारखेच नाही. शासकीय पातळीवर दूधाचे उत्पादन सहा विभागातून मोजले जाते. नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर आणि पुणे सर्वाधिक दूधाचे उत्पादन पूणे विभागात केले जाते. तर सर्वात कमी अमरावती विभागात एकंदर दूग्धोत्पादनापैकी ४५% दूध हे घरगुती कारणासाठी वापरले जाते. तर उर्वरित २८% दूधापासून तुप तयार केले जाते. ६.५% दुधा पासून दही आणि खवा तयार केला जातो. तर २.६% दुधाची दूध पावडर तयार केली जाते. २% दुधाचे पनीर व चीज आणि ०.५% दधाचे क्रिम आणि आईसक्रिम तयार केले जाते आणि ९.७% दूधापासून इतर दुग्धजन्य पदार्थ तयार केले जातात.

राष्ट्रीय दुग्धविकास मंडळाच्या माध्यमातुन हाती घेतलेल्या 'दूधाचा महापूर योजनेच्या गेल्या तीन दशकातील यशस्वी प्रयत्नामुळे देशात ''धवलक्रांती घडून आली. देशातील वार्षिक दूध उत्पादनात २२ दशलक्ष टनांवरुन ८८ कोटी २००४ एवढी प्रचंड वाढ झाली. दूधाचे खेड्यापाड्यातून संकलन करणे, त्यावर प्रक्रिया करुन वाहतूक करणे आणि मोठ्या महानगरात त्याची विक्री करणे या बाबींना चालना मिळाली आहे. देशातील दूध उत्पादनात भरीव वाढ झाली असली तरी आजमितीस एकुण दूध उत्पादनाच्या केवळ १२% दूध संकलन केंद्रात शीत प्रक्रिया करुन विकण्यात येते. तर उरलेले सर्व दूध ईतर दुग्धजन्य पदार्थ तयार करण्यासाठी किरकोळ विक्रीद्धारे विकले जाते.

मगीम्बी एस. २०१०[३७] यांनी आंतरराष्ट्रीय श्रम आयोग यामध्ये लिहीलेल्या संशोधन पेपर टांझानियातील सहकार वृध्दी आणि विरोध याचा परामर्श होतो. १९२७ मध्ये या दशात सहकार चळवळ सुरु झाली. मजबूत अशी असणारी भांडवलाची रचना ही सर्वात मोठी समस्या सहकाराची आहे. त्यामुळे त्याचे मुख्य मोजमाप ही या सहकारी चळवळीचा पाया आहे. वैयक्तीक आवडो निवडी सहकारी क्षेत्रावर परिणाम करणारा घटक आहे. नगदी पिकापासून मिळणारे उत्पादन टांझानिया या देशाची सहकारी व्यवस्था सुधरण्यासाठी होती. प्रत्येक २४ व्यक्तीच्या पाठीमागे एक प्राथमिक सहकारी संस्था आहेत. यातून आपल्या देशात रोजगार निर्माण होऊन दारिद्रय कमी होण्यासाठी मदत होते. २००४ च्या कालावधीत ३०००० नवीन नोकरीच्या संधी सहाकाराच्या माध्यमाने प्राप्त झालेल्या होत्या. त्यामुळे प्रामुख्याने सहकारी क्षेत्रात खाणी, मासेमारी यांचा समावेश होतो.

१.४ राजकारणावरील साहित्याचा परामर्श:

सहकारी चळवळ ही देशाच्या आर्थिक विकासात, दुष्काळ कमी करणे, दारिद्रय कमी करणे, रोजगारीचे संधी निर्माण करणे, शेतीला सहाय करणे यासाठी अनेक प्रश्न सोडवले जाते. सोलापूर जिल्ह्यातील 'सहकारी क्षेत्र खासगीकरणाकडेम या वर्तमान पत्रातील लेखातुन असे लक्षात येते की, वाढणा–या वेगवेगळ्या समस्यांचा अंतर्भाव केला तर सहकारी क्षेत्रावर प्रभाव पडतो. या सर्वामुळे राजकारणामुळे सहकारी क्षेत्राचा विकास खुंटला आहे. प्रस्तुत अभ्यासासाठी राजकारणावरील साहित्याचा परामर्श घेणे आवष्यक आहे.

३४. मगीम्बी एस., 'टांझानियातील सहकार', आंतरराष्ट्रीय श्रम संघटना, आफिका, २०१०, पृष्ठ क्र. ७–९.

कदम य.ना; २०१२[३८] यांनी लिहिलेल्या 'समग्र भारताचा इतिहासम या पुस्तकात त्यांनी राजकारणामुळ सहकारी चळवळीची पिछेहाट होत गेली याचा परामर्श घेतला. सहकार संकल्पना जुनी आहे. १९०४ साली को-ऑप क्रेडिट सोयासटीज ॲक्ट पहिला सहकी कायदा ग्रामीण भागातील उपाय मंजूर झाला होता. त्यानंतर १९१२ साली हाच कायदा इतर सहकारी संस्था स्थापन करण्यासाठी उपयोगात आणला गेला. परंतु सहकाराला खरी चालना स्वातंत्र्योत्तर काळातच मिळाली. शेतक-याला सावकारीच्या कचाट्यातून मुक्त करुन त्याला परस्पर सहकार्यावर आपली शेती करण्याच्या उद्देशाने छोटे मोठे कर्ज उपलब्ध करुन देऊन आपल्या पायावर उभे करण्यासाठी सरकारने सहकारी पतसंस्था स्थापन करण्यात पुढाकार घेतला. त्यानंतर देशभरात सहकारी पतसंस्थांचे जाळेच उभारले. १९८४ पर्यत देशात २.६२ लाख सहकारी पतसंस्था कार्यरत होत्या. त्यापैकी ६७ टक्के पतसंस्था केवळ ग्रामीण भागातील शेतक-यांसाठी होत्या. १९६०-६१ साली असलेल्या पतसंस्थांची संख्या १८८३-८४ साली कमी झाली आहे. परंतु सभासद संख्या, भागभांडवल व खेळते भांडवल यात लक्षणीय वाढझाल्याचे दिसुन येईल.

केवळ शेती विकासासाठी स्थापन झालेल्या प्राथमिक कृषी पतसंस्थांची जून १९८४ अखेरची संख्या ९२४९६ होती. यापैकी ९७ टक्के पतसंस्था ग्रामीण भागात होत्या. या संस्थांनी कृषी विकासात मोलाची भर घातली आहे. कृषी उत्पादनाला योग्य भाव मिळण्यासाठी 'कृषी उत्पन्न बाजार समित्या स्थापन करण्यात आल्या होत्या. त्यांची संख्या १९८४ पर्यत ४१३० होती व राज्यपातळीवरील समित्यांची संख्या ३३ होती. शेतमालाची साठवण करण्यासाठी शीतगृहे वा अन्य प्रकारची साठवण केंद्रे, गोडाऊन यासाठी आर्थिक मदत देण्यासाठी नॅशनल को-ऑपरेटिव्ह डेव्हलपमेंट

३७. कदम य.ना., 'समग्र भारताचा इतिहास', फडके प्रकाषन, कोल्हापूर, २०१२.

कॉर्पोरेशन स्थापन करण्यात आली. या संस्थेने १० राज्यात ३८ लाख टन कृशिमाल साठविण्यासाठी २१ हजार गोडाऊन व 'युरोपियन इकॉनॉमिक कम्युनिटीम व 'इंटरनॅशनल डेव्हलपमेंट असोसिएशन या आंतरराष्ट्रीय संस्थाच्या सहकार्याने बटाट्याचे उत्पादन करणा-या ७ राज्यात १३० शीतगृहे उभारण्यात आली आहेत. शेतक-यांना दर्जेदार व आवश्यक घटक असलेल्या खतांचा खात्रीशीर पूरवठा व्हावा म्हणून 'इंडियन फार्मस् फट्रिलायझर को-ऑप लि. या सहकारी संस्थेने १९८१ पासुन उत्पादनास प्रारंभ केला आहे. याशिवाय शेतकरी सोसायट्या, मच्छीमारी संस्था अशा कृषीक्षेत्राशी संबंधित असलेल्या सहकारी संस्था देशभरात स्थापन झाल्या आहेत. सहकारी संस्थांनी कृषीविकासात फार मोठी भर घातली आहे.

१.४.१ सहकारी चळवळीवरील सरकारी धोरणाचा परामर्शः

सरकारी हस्तक्षेपाशिवाय साम्यवादी अर्थव्यवस्थेतील सहकारी चळवळीचा विकास शक्य नाही. त्यामुळे या व्यवस्थेतील सहकारी धोरणाचा अभ्यास करणे गरजेचे ठरते.

महाराष्ट्र सहकार सोसायटी ॲक्ट;१९६०[३९] या कायद्यानुसार महाराष्ट्रातील सहकारी चळवळ सुरु राहिली. राज्य सरकारच्या धोरणानुसार सहकारी क्षेत्राचा विकास, वृध्दी झाली पाहिजे. शेतीक्षेत्राचे उत्पादन वाढविणे, सहकाराचे कार्यक्षेत्र वाढवून घेणे उच्चस्तरीय सहकारी संस्थाची नोंदणी करणे इत्यादी बाबी या कायद्यांतर्गत सहकारी चळवळीच्या विकासासाठी केला गेला.

भारतीय सहभाग कायदा; १९३२ या काद्याने नोंदणी करण्याचे निकष बदलल्याचे दिसून येते. हा कायदा भागीदारीच्या संदर्भात आहे. लोकांचा

[39] G. S, H, Management Appraisal of District Central Cooperative Bank, 2007.

सहभाग, सहकारी चळवळीची सर्वसाधारण स्थिती या गोष्टी या कायद्याने प्रभावीत झालेल्या दिसून येतात.

सहकारी कायदा; १९०४ या कायद्याने भारतात ख-या अर्थाने सहकारी क्षेत्राला लाभ मिळाला. कारण देशात सहकाराची सुरवात या कायद्याने झाली. आज शंभर वर्षापेक्षा जास्त सहकारांचा कालावधी झालेला आहे.

सहकारी कायदा; १९१२ ख-या अर्थाने सहकारी चळवळीची सुरवात १९०४ च्या कायद्यानुसार झाली असली तर त्याची अंमलबजावणी १९१२ च्या कायद्यानुसार सुरु झाली. २४६ च्या कलमानुसार सहकारी चळवळ सुरु असावी. सरकारी हस्तक्षेपामुळे लाभता आणि सहकाराचा विस्तार ही महत्त्वाची वैशिष्टे आहेत.

मल्टी-युनिट सहकारी कायदा; १९४२ सर्व राज्य समावेशकता या कायद्यानुसार प्राप्त सुरु झाली. लोकशाहीची कमतरता आणि स्वयंचलित सरकार यामुळे या क्षेत्राचा विकास कमी झाला. परंतु त्यामध्ये या कायद्याने वाढ झाली.

भारतीय ग्रामीण पत पाहणी समिती; १९६९ या समितीच्या सल्ल्यानुसार राज्य सहकारी बँकाची भूमिका महत्त्वाची असल्याचे सांगितले आहे. प्राथमिक कृषी सहकारी पतसंस्था, मध्यवर्ती सहकारी बँक यांच्या माध्यमाने शेतीक्षेत्राचा विकास करण्याचा प्रयत्न केला. राज्य सरकारने सहकारी क्षेत्रात रोजगार निर्मीतीसाठी विशेष आर्थिक सहाय्य दिले गेले. त्यामुळे चांगले व्यवस्थापन शक्य झाले.

नाबार्ड; १९८२ या शेतीसाठी दिर्घकालीन कर्जपूरवठा संस्थेची स्थापना शिवरामन समितीने १२ जुलै १९८२ मध्ये केली. १०० कोटी रुपयांच्या

भांडवलावरुन २००० कोटी रुपये वाढवावे असे सुचीत करण्यात आले. या बँकेच्या स्थापनेपासून शेती क्षेत्राला कर्जपूरवठा करणारी एक सर्वोच्च शिखर बँक पुढे आली. नाबार्डच्या माध्यमाने शेतीला पूर्नवित्त पूरवठा केला जातो.

शेती पत पाहणी समिती; १९८९ या माध्यमाने शेतीक्षेत्राला सहकार्या मुळे विकास झाला आहे की नाही याचा परामर्श घेतला आहे. या समितीने मतदानासाठी सभासदामध्ये जागृती निर्माण केली. व्यवस्थापनाचे कायदे बढलण्यात आले, राष्ट्रीय सहकारी बँक या निमित्ताने स्थापन झाली.

या सर्व सहकारी संस्थाच्या साहाय्याने गाडगीळ, वैद्यनाथन, तारापोर, नरसिंहम समिती महाराष्ट्रातील वसंतदादा पाटील, यशवंतराव चव्हाण यांनी शेतीसाठी उपलब्ध असणा-या सहकारी चळवळीचा विकास साध्य केला. मुख्यमंत्री या नात्याने त्यांनी प्रगतशील महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकास गती व वेग प्राप्त करुन देण्यामध्ये सहकारी चळवळीचा मोठा वाटा आहे.

१.७ संशोधन पध्दती :

प्रस्तुत अभ्यासामध्ये सोलापूर जिल्हयातील सहकारी चळवळीमधील राजकारण आणि त्याचा सकारात्मक आणि नकारात्मक स्वरूपाचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे. सेल्टीझ यांच्या मते, संशोधनाच्या उद्दिष्टाच्या दृष्टीने निश्कर्षाशी संबंधित व संशोधन कार्यातील मितव्यय याची सांगड घालण्यासाठी तथ्यांचे संकलन आणि विष्लेशण करण्यासाठी आवश्यक त्या अटींची नियोजित व्यवस्था म्हणजे संशोधन होय[४०]

प्रस्तुत संशोधनासाठी निदानात्मक संशोधन आराखडा वापरला आहे. या पद्धतीचा प्रमुख व मूलभूत उद्देश म्हणजे ज्ञानविकास होय, एखादया समस्येचे वास्तविक ज्ञान करुन घेऊन, त्याची परंपरा समजवून घेवून ती

[40] Kothari,C. R., Research Methods & Techniques, 2007.

सोडवण्यासाठी उपाययोजना सुचविणे अस्तू, अशा प्रकारच्या संशोधनाला निदानात्मक संशोधन म्हणतात[४१]. निदानात्मक संशोधन आराखडयानुसार संशोधक उपाययोजना सुचवण्याचे काम करतो, तो स्वतः ती समस्या सोडवण्याचा प्रयत्न करीत नाही किंवा असल्या प्रकारच्या प्रयत्नात सहभागी होत नाही कारण समस्या सोडवणे हे त्याचे कार्य नसून ते समाजसुधारक, शासकिय प्रशासक किंवा नेत्यांचे काम असते.

१.५.१ समस्या सूत्रण आणि संशोधन प्रश्नः

सुरूवातीच्या काळापासून विकसित झालेले सहकारी क्षेत्र हे प्रामख्याने विकासाच्या मार्गावर असले तरी सुध्दा काही मूठभर लोकांच्या राजकीय प्रभावामुळे ही व्यवस्था डबघाईला आलेली दिसून येते. संचालकाच्या राजकीय प्रभावामुळे सभासदांना कर्ज देताना राजकीय पार्श्वभूमी हा महत्वाचा निकष लावलेला आढळतो. सुरुवातीच्या काळापासूनच सोलापूर जिल्हा सहकारी संस्थामुळे विकासाच्या मार्गावर असला तरी ठराविक लोकांच्या राजकिय हस्तक्षेपामुळे सोलापूर जिल्ह्यातील सहकार क्षेत्र खाजगीकरणाच्या दिशेने मार्गक्रमण करीत आहे. त्यातच सहकारी संस्थाची निवडणूक प्रतिष्ठेची मानली जात आहे. त्यातून सत्तेसाठी साम, दाम, दंड आणि भेद या सर्व गोष्टींचा वापर केला जात आहे. यासर्वांमुळे जिल्हयातील राजकारण गतीमान झाले आहे. बऱ्याच अंशी सहकारी संस्थांचा विकास झालेला असला तरी जिल्हयाची आर्थिक नाडी समजली जाणारी जिल्हया मध्यवर्ती सहकारी बँक जिल्ह्याच्या विकासात महत्वाची भूमिका पार पाडीत आहे. परंतू राजकीय लोकांची मनमानी, हितसंबध जोपासण्यासाठी अपात्र व अयोग्य लोकांना केले गेलेले कर्जवाटप, नातेवाईकांना कर्ज देणे ईत्यादीमुळे कर्जाची परतफड न होणे आणि शवटो या संस्था डबघाईला येणे या सारखे प्रश्न सहकार क्षेत्राला भेडसावत आहेत. त्यामुंळे लोकांचा सहकारावरचा विश्वास कमी होत आहे.

[४१] कोठारी., रा. ना., समाजशास्त्रीय संशोधन-तत्त्वे व पद्धती, श्रीमंगेश प्रकाशन, नागपूर २००३.

सोलापूर जिल्हा हा कर्नाटक आणि महाराष्ट्र राज्यांना जोडणारा दुवा आहे .सोलापूर जिल्हा महाराष्ट्राच्या अग्नेय कोपऱ्यात वसलेला असून त्याचे भौगोलिक स्थान १७ .१० अंश ते १८ .३२ अंश उत्तर अंशास व ७४ .४२ अंश ते ७६ .१७ अंश पर्व रेखांश यांच्या दरम्यान आहे . जिल्हयाचे एकूण भौगोलिक क्षेत्रफळ १४८९४ चौकिमी असून ते महाराष्ट्र राज्याच्या एकूण क्षेत्रफळाच्या ४.८४ टक्के आहे. सोलापूर जिल्हयात करमाळा, बार्शी, माढा, उत्तर सोलापूर, मोहळ, पंढरपूर, करमाळा, माळशिरस, द सोलापूर, सांगोला, मंगळवेढा, अक्कलकोट हे ११ तालुके आहेत तीन प्रांतात विभागणारा जिल्हा आहे त्यामुळे त्यामुळे माढा, बार्शी आणि पंढरपूर असे तीन प्रांत सोलापूर जिल्हयाचे प्रतिनिधित्व करतात. १९७७ म्हणजेच जिल्हा स्थापन होण्यापूर्वीच सोलापूर हा अवर्शण प्रवण जिल्हा असल्याचे स्पष्ट होते म्हणूनच या जिल्ह्याच्या विकास करण्यासाठी सहकार चळवळ उभी करण्याशिवाय पर्याय नव्हता. अर्थातच सोलापूर जिल्हयाला अधिक महत्त्व प्राप्त होते सोलापूर जिल्हयातील सहकारी क्षेत्राला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे जिल्हयातील सर्व ७० पणन संस्थेस २०१४-१५ या वर्षात एकूण १९२२.०२ लाख रूपये किमतीच्या मालाची खरेदी झाली आणि रूपये २००९.६३ लाख किंमतीच्या मालाची एकूण विक्री झाली उत्पादणाच्या साठवणीसाठी सहकारी संस्थाच्या मालकिची व भाडयाने घेतलेली गोदामे ही आहत सोलापूर जिल्हा दूध उत्पादक संघ,सोलापूर आणि शिवामृत दूध उत्पादन सहकारी संघ यांना संलग्न असणाऱ्या एकूण ३७६१ दुग्ध सहकारी संस्था माफंत दूध संकलण सोलापूर जिल्हयातील होते.

सोलापूर जिल्हयातील सहकारी साखर कारखान्याचा विकास २०१० अखेर फंक्टरी अंक्ट खाली नोंदणी झाालेले एकूण ७७३८ कारखाने होते त्यापैकी २८ सहकारी साखर कारखाने होते .२०१४-१५ मध्ये यामध्ये ३६ पर्यंत वाढ झाली पैकी १४ सहकारी साखर कारखाने सोलापूर जिल्हयात

कार्यरत आहेत. सोलापूर जिल्हयात २००७ साली एकूण सहकारी पतसंस्था १९९७ होत्या तर २०१४-१५ मध्ये ही संख्या २१,४७१ एवढी झाली एकूण पशूधनात २२४७ पासून २१८३ अशी घट २००७ पासून २०१४-१५ पर्यत झाली. देशातील एकूण साखर कारखान्यापैकी ३२ टक्के कारखाने राज्यात असून त्यापैकी ३८ कारखाने सोलापूर जिल्हयात आहे

प्रस्तुत अभ्यास विषयामध्ये सहकारी संस्थेच्या राजकीयीकरण का होत आहे. जसे सहकारामध्ये राजकारण का केले जात आहे. ही मूळ समस्या अभ्यासण्यात येणार आहे. आणि सहकारी संस्थांच्या राजकीयकरणाची समस्या अभ्यासण्याचा प्रयत्न केला आहे. या पाश्वभूमीवर प्रस्तुत अभ्यास विषयाचा संशोधनात्म अभ्यासातून सहकाराचे राजकियकरण होत आहे काय हे शोधत असताना संशोधकाने संशोधनासाठी पुढिल काही प्रश्न उपस्थित केले आहेत. या श्नांच्या उत्तराचा शोध प्रस्तूत अभ्यासातून घेतला जाणार आहे.

१. सोलापूर जिल्ह्यातील सहकारी संस्थांमुळे जिल्ह्याच्या विकासाला हातभार लागत आहे का?
२. सोलापूर जिल्ह्यातोल सहकारी संस्थांचे राजकीयीकरण का होत आहे का?
३. सहकारातील वाढत्या राजकीय प्रभावामुळे सहकारी संस्था डबघाईला आल्या आहेत का?
४. आधुनिक काळात सहकार चळवळ तिच्या उद्दिष्टापासून व तत्वप्रणालीपासून दूर जात आहे का?
५. अती महत्वाकांक्षी राजकारणामुळे सहकार चळवळीच नुकसान झाले आहे का?

वरील प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी समाजशास्त्रीय संशोधन पध्दतीच्या सर्व पायर्यांची मदत घेऊन संशोधनाची उद्दिष्टे व गृहितके निश्चित केली आहेत.

१.५.२ संशोधनाची उद्दिष्टे :

कोणत्याही संशोधनाची सुरूवात ही त्याच्या हेतूशिवाय अशक्य असतात. सोलापूर जिल्ह्याातील सहकारी संस्थांच्या राजकीयकरणाचा अभ्यास या प्रस्तुत अभ्यासातून **वरील** समस्याची उत्तरे शोधण्याच्या पार्श्वभूमीवर प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे समोर ठेवलेली आहेत.

१. सहकारी चळवळीचा वाढ व विकासाचा आढावा अभ्यासणे.

२. राजकारणाचा सहकारी चळवळोवर झालेल्या परिणामाचा अभ्यास करणे.

३. सहकार चळवळीचा सोलापूर जिल्हयाच्या राजकारणावर झालेला परिणाम अभ्यासणे.

४. सोलापूर जिल्हयातील सहकारी चळवळीमुळे जिल्हयाचे राजकारण किती गतीमान झाले, याची चिकित्सा करणे.

५. सहकार चळवळ आणि राजकारण यांच्यातील संबंध स्पष्ट करून ते अधोरेखित करणे.

६. सहकार आणि राजकारण यांच्या परस्पर प्रभावाचा सोलापूर जिल्हयावर काय प्रभाव पडला याचा शोध घेणे.

७. राजकीय प्रक्रियेमध्ये सहकार चळवळीच्या योगदानाचा आढावा घेणे.

१.५.३ संशोधनाची गृहितकेः

सोलापूर जिल्ह्याातील सहकारी संस्थांच्या राजकीयकरणाचा अभ्यास या प्रबंधाची समाजशास्त्रीय अभ्यासाच्या चौकटीत मांडणी करीत असताना संशोधन समस्येची उत्तरे शोधणे अपेक्षीत आहे. या पार्श्वभूमीवर प्रस्तुत संशोधनासाठी पुढील गृहितके निश्चित केली आहेत.

१. राजकीय व्यवस्था ही सहकारी चळवळीचा मुख्य घटक आहे.

२. सहकार चळवळीने सोलापूर जिल्हयाच्या सर्वांगीण विकासात महत्त्वाचा वाटा उचलला आहे.

३. सहकार चळवळ ही ग्रामीण परिसरातील वरदायिनी आणि शासन सत्तेची केंद्रबिंदू आहे.

४. सहकाराची मुख्य उद्दिष्टे बाजूला पडली असून सहकारावर राजकारणाचा प्रभाव वाढला आहे.

७. आधुनिक काळात शकाराची तत्त्वप्रणाली व सहकाराचा मुख्य विचार मागे पडत

चालला आहे.

६. सहकार चळवळीचे महत्वाकांक्षी राजकारणामुळे नुकसान झाले आहे.

१.५.४ अभ्यास क्षेत्राची ओळख आणि व्याप्तीः

सोलापूर जिल्ह्यातील सहकारी संस्थांच्या राजकीयकरणाचा अभ्यास एवढी मर्यादा हया संशोधनासाठी निश्चित करण्यात आलेले आहे. सोलापूर जिल्हयात ११ तालुके आहेत. या प्रत्येक तालुक्यात अनेक सहकारी संस्था काम करीत आहेत. अभ्यासाच्या दृष्टिने नमुना पध्दतीनुसार प्रत्येक तालुक्यातून उदयोग, व्यापार, आणि अर्थकारण या घटकावर आधारित काही संस्थांचो निवड करून जिल्हयातून सहकाराचा राजकारणाबद्दलचा सर्वकश निष्कर्श काढण्यात आलेले आहेत.

पश्चिम महाराष्ट्रात सोलापूर, सांगली, कोल्हापूर, सातारा आणि पुणे असे एकूण पाच जिल्हे आहेत. या सर्व जिल्ह्याच्या मानाने सोलापूर अप्रगत व दुष्काळग्रस्त जिल्हा म्हणून ओळखला जातो. परंतु इतर जिल्ह्याच्या मानाने या जिल्हयाने सहकार क्षेत्रात मोठी प्रगती करून सामाजिक, राजकीय व आर्थिक क्षेत्रात विकास साधलेला दिसतो. या चळवळीने मोठया प्रमाणात विकासाभिमुख कार्य केलेले आहे. हा जिल्हा पश्चिम महाराष्ट्रातील सर्व जिल्हयाच्या विकासात मागे पडलेला नाही. या सहकार चळवळीने चोहोबाजूंनी विकास केल्यामुळे या जिल्हयात सहकार चळवळ कार्यरत दिसते. सोलापूर जिल्हयातील माढा येथे आशिया खंडातील प्रथम क्रमांकाची

जगदंबा अनुसुचित जातीजमाती सहकारी सुतगिरणीची स्थापना मा.खा. संदिपान थोरात यांनी केली होती. काही कालावधीपर्यंत ही गिरणी व्यवस्थित चालू राहिली त्यानंतर नेतृत्वात बदलामुळे हस्तक्षेप झाला. तेंव्हापासून ही गिरणी बंद अवस्थेत आहे. याशिवाय सोलापूर जिल्हयातील पहिला सहकारी साखर कारखाना म्हणून नावाजलेला बार्शी तालुक्यातील भोगावती सहकारी साखर कारखाना मा. खा. तुळशीदास जाधव यांनी सुरू केला होता. त्यानंतर नेतृत्वात बदलामुळे तोही बंद पडला. सोलापूर जिल्हा सहकारी दुध संघ हा सहकार महर्षी शंकरराव मोहिते-पाटील यांनी स्थापन केला. त्यामध्येही आजच्या अवस्थेत मोठे राजकीय हस्तक्षेप घडत असून त्यालाही उतरती कळा लागलेली दिसते. सोलापूर जिल्हयातील सततच्या बदलत्या राजकीय समीकरणाने सहकारी चळवळीत सतत चढउतार घडून आल्याचे दिसते. सोलापूर जिल्हयाच्या विकासासाठी निःस्वार्थी भावनेने उभ्या केलेल्या अनेक सहकारी संस्था स्वार्थांध राजकीय प्रवृत्तीमुळे आजघडीला मोडकळीस आल्या आहेत.

१.५.५ संशोधनाचे महत्त्वः महाराष्ट्रात राजकीय नेतृत्त्वाने सहकार चळवळीचा वापर आपली सत्तास्थाने भक्कम करण्यासाठी केला आहे. परिणामी सहकार चळवळ विकासाभिमुख होण्याऐवजी राजकीय चळवळ म्हणून उदयाला आली आहे. त्यातूनच जवळपास सर्वच राजकीय नेत्यांनी सहकारी साखर कारखाने, सहकारी बँका, सहकारी पतपेढया, सहकारी सोसायटया स्थापन करून त्यांच्यामाध्यमातून लोकांशी संबंध निर्माण केले आहेत. ज्यांनी या चळवळीचा आधार घेतला, ते नेते राजकरणात यशस्वी झाले. सहकार चळवळ ही लोकविकासासाठी आहे की राजकीय नेत्यांची सत्ता भक्कम करण्यासाठी आहे? हा प्रश्न पडतो. तेंव्हा या चळवळीने नेमकेपणाने कोणते काम केले या व अशा अनेक पैलूंचा अभ्यास करण्यासाठी प्रस्तुतचा विषय उपयुक्त व महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

१.७.६ माहिती संकलनाची साधनेः

सोलापूर जिल्हयातील सहकार चळवळीच्या राजकीयकरणाचा चिकित्सात्मक विश्लेषन करण्यासाठी प्राथमिक आणि दुय्यम साधनसामुग्रीचा वापर केला आहे.

१.७.६.१ प्राथमिक माहितीः

सोलापूर जिल्हा हा प्रामुख्याने तीन प्रांत विभागात विभाजित केला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने माढा, बार्शी आणि पंढरपूरचा समावेश होतो. या प्रत्येक विभागातून एक सहकारी बँका, एक सहकारी साखर कारखाना आणि एक सहकारी दुध संघ अशा तीन सहकारी संस्थाची अभ्यासासाठी निवड केली आहे. या निवडलेल्या सहकारी संस्थांमधून प्रत्येकी ३० सभासद अशी २७० सदस्यांची साईस्कर नमुना पध्दतीने निवड केली आहे. हे तक्त्याच्या अधारे स्पष्ट केले आहे.

तक्ता क्र. १.१

संकलीत प्राथमिक माहिती दर्शवणारा तक्ता

अ.क्र	विभाग	संस्था	नमुना (प्रत्येकी ३० प्रमाणे) संख्या	
१	माढा	साखर कारखाना	३०	९०
		पतसंस्था	३०	
		दूध संस्था	३०	
२	बार्शी	साखर कारखाना	३०	९०
		पतसंस्था	३०	
		दूध संस्था	३०	
३	पंढरपूर	साखर कारखाना	३०	९०
		पतसंस्था	३०	
		दूध संस्था	३०	
एकूण				**२७०**

वरील माढा, बार्शी आणि पंढरपूर या प्रांतत्तून प्रत्यकी ३ सहकारी संस्था आणि त्यांचे प्रत्यकी ३० सभासद अभ्यासासाठी निवडले आहेत. अशा प्रकारे तीन प्रांतातील ९ सहकारी संस्थां आणि त्यांचे प्रत्येको ३० सभासद (३० X ९=२७०) अशा एकूण २७० सभासदांकडून प्रश्नावली भरून घेतली आहे. त्याच बरोबर अधिक माहिती संकलनासाठी नमुना म्हणून निवडलेल्या सदस्यांच्या मुलाखती घेतल्या आहेत. त्याच बरोबर वरील सहकारी संस्थाच्या सभासद आणि संचालकांकडून प्रश्नावली भरून घेतली आहे आणि त्यांच्या मुलाखतीही घेतल्या आहेत. तसेच सहकारी चळवळीशी निगडीत कार्यकर्ते, अभ्यासक आणि तज्ज्ञ लोकांशी विचार विनिमय आणि चर्चा केल्या आहेत.

१.५.६.२ द्वितीय साधणेः

प्राथमिक साधन सामुग्रीबरोबरच दुय्यम साधनसामुग्रीचा वापर प्रस्तुत संशोधनासाठी केलेला आहे. त्यासाठी वेगवेगळी मासिके, साप्ताहिके, दैनिक वृत्तपत्रे यामध्ये सहकार चळवळीवर येणारे वेगवेगळे संदर्भ लेखाचा वापर केला आहे. महाराष्ट्र सरकार व भारत सरकारद्धारा आयोजित केलेल्या वेगवेगळया राष्ट्रीय स्तरावरील चर्चासत्रातील विशय हाताळले आहेत. दुय्यम साधनसामुग्रीसाठी जिल्हा, तालुका पातळीवरील, राज्यपतळीवरील सहकार क्षेत्राशी निगडीत उपलब्ध असलेले अहवाल यांचा अभ्यास केला आहे.

अशा प्रकारे प्राथमिक आणि दुय्यम साधन सामुग्रीच्याद्धारे गोळा केलेल्या माहितीवर निष्कर्श काढण्यासठी काही सांख्यिकीय पध्दतीचा वापर करणे आवश्यक असते. प्रस्तुत संशोधनामध्ये, संगणकाच्या साहाय्याने एक्सेल, वर्ड, एस. पी. एस. एस. सारखी संगणक प्रणालींचा वापर करून आकडेवारीचे विश्लषण केले आहे व त्यातून निष्कर्ष काढले आहेत.

१.५.७ संशोधनाच्या मर्यादाः

संशोधनाअंती निष्कर्श काढण्यासाठी सोलापूर जिल्ह्यातील विशिष्ट सहकारो संस्थांचा अभ्यास केला आहे. त्यामुळे काही मर्यादा येतात त्या पुढीलप्रमाणे.

१- प्रस्तुत संशोधनातून निघालेले निष्कर्ष हे केवळ सोलापूर जिल्ह्याला लागू

होतात.

२- प्रस्तुत संशोधन हे २००० ते २०१५ या कालावधीसाठी विचारात घेतले आहे.

३. प्रस्तुत संशोधनातून केलळ सोलापूर जिल्ह्यातील काही सहकारी संस्थांचाच

अभ्यास केलेला आहे.

४. प्रस्तुत संशोधन हे सामाजिक, राजकीय आणि आर्थिक घटकांशी

निगडीत असल्याने येथे निश्चित म्हणता येणे शक्य होणार नाही.

१.५.८ प्रकरण नियोजनः

प्रस्तुत संशोधनात्मक अभ्यास विषयाची मांडणी एकूण सहा प्रकरणांच्या माध्यमातून केली आहे पुढीलप्रमाणे केलेली आहे.

१.५.८.१ प्रस्तावना व संशोधन पध्दती या पहिल्या प्रकरणामध्ये प्रस्तुत संशोधन अभ्यासासाठी प्रस्तूत विषय निवडीचे प्रयोजन स्पष्ट केले असून, संशोधनाची उद्दिष्टे व गृहितकांची मांडणी केली आहे. त्याच बरोबर या प्रकरणामध्ये प्रस्तुत संशोधन अभ्यास विषयाशी निगडीत उपलब्ध संदर्भ साहित्य सामग्रीचा सविस्तर आढावा घेतला आहे. यातून सहकाराशी संबधीत राजकारणाचे स्वरुप आणि दिशा लक्षात घेऊन प्रस्तूत अभ्यास विषयाचे महत्व आणि पूर्व अभ्यासापासून करा वेगळा आहे हे स्पष्ट केले आहे.

१.५.८.२ प्रकरण दुसरेः सहकारी चळवळीचा इतिहास वाढ आणि विकास

प्रस्तुत प्रकरणामध्ये संपूर्ण सहकारी चळवळीच्या इतिहास त्याचबरोबर सहकारी चळवळीची वाटचाल याविषयीची मांडणी केली आहे. स्वातंत्र्यपूर्व सहकारी चळवळ व स्वातंत्र्योत्तर सहकारी चळवळ यामध्ये प्रामुख्याने सद्य स्थितीचा आढावा घेतला आहे.

१.५.८.३ सोलापूर जिल्हयातील सहकारी साखर कारखाने आणि राजकारण नामक दुसर्या प्रकरणामध्ये अभ्यासक्षेत्रातील सहकारी साखर कारखान्याचे स्थान याचा परामर्श घेतला आहे. तसेच उपलब्ध माहितीचे विश्लेषन करून राजकारणाचा सहकारी साखर कारखान्यावर झालेला परिणाम यांचा अंतर्भाव केला आहे.

१.५.८.४ सोलापूर जिल्हयातील सहकारी दुध संघ आणि राजकारण या चौथ्या प्रकरणात सहकारी दुध संघावर सोलापूर जिल्हयाचे राजकारण प्रभावित होते. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणामध्ये सहकारी दुध संघाचे सोलापूर जिल्हयातील स्थान व त्यावर होणारा राजकारणाचा परिणाम याचा परामर्श घेतला आहे.

१.५.८.५ सोलापूर जिल्हयातील सहकारी बँका आणि राजकारण नामक पाचव्या प्रकरणामध्ये सहकारी बँकाच्या विकासामध्ये भारत देश आणि राज्य अर्थव्यवस्था ही प्रामुख्याने पुढारलेली आहे. त्यामुळे आपल्या देशातील विकासामध्ये सहकारी बँकाचा वाटा खूप मोठा आहे. या प्रकरणामध्ये सहकारी बँकावर राजकारणाचा झालेला परिणामाच्या विषयी विश्लेषण केलेले आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये सहकार चळवळीवर राजकारणाचा झालेल्या परिणामाची मांडणी केली आहे.

१.५.८.६ सहावे प्रकरण अर्थात समारोप, निष्कर्श आणि उपाययोजना, या प्रकरणामध्ये अभ्यास विषयाचा सारांश दिला असून निश्कर्ष मांडले आहेत व शेवटी उपाययोजना सुचवून समारोप केला आहे.

प्रकरण दुसरे

सहकारी चळवळीची वाढ आणि विकास

प्रकरण दुसरे

सहकारी चळवळीची वाढ आणि विकास

२.१ प्रस्तावना

२.२ सहकार संकल्पनेचा अर्थ / व्याख्या

२.३ सहकारी चळवळीची वाटचाल

२.४ सहकारी चळवळीचा वाढ व विकासाचे टप्पे

२.४.१ कालखंड (१९०४ ते १९११)
२.४.२ कालखंड (१९१२ ते १९१८)
२.४.३ कालखंड (१९१९ ते १९२९)
२.४.४ कालखंड : (१९३० ते १९३९)
२.४.५ कालखंड (१९३९ ते १९४६):
२.४.६ सहकार नियोजन समिती (सरैया समिती)

२.५ आधुनिक काळातील सहकारी चळवळ

२.५.१ पहिली पंचवार्षिक योजना (१९५१-१९५६)
२.५.२ पाहणी समिती (गोरवाला समिती १९५१-१९५४)
२.५.३ दुसरी पंचवार्षिक योजना (१९५६-१९६१)
२.५.४ तिसरी पंचवार्षिक योजना (१९६१ ते १९६६)
२.५.५ ग्रामीण व शहरी भागात जीवनावश्यक वस्तुंचे वितरण
२.५.६ चौथी पंचवार्षिक योजना (१९६६ ते १९७४)
२.५.७ अखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा समिक्षा समिती
२.५.८ पाचवी पंचवार्षिक योजना (१९७४ ते १९७९)
२.५.९ सहकारी धोरणाचा सन १९७८ चा ठराव
२.५.१० सहावी पंचवार्षिक योजना (१९८० ते १९८५)
२.५.११ सातवी पंचवार्षिक योजना (१९८५ ते १९९०)
२.५.१२ आठवी पंचवार्षिक योजना (१९९२ ते १९९७)
२.५.१३ नववी पंचवार्षिक योजना (१९९७ पासून)
२.५.१४ दहावी पंचवार्षिक योजना आणि सदयस्थिती

२.६ समारोप

सहकारी चळवळीची वाढ आणि विकास

२.१ प्रस्तावना

स्वातंत्र्यापूर्वी सहकार चळवळीचा फारसा प्रचार आणि प्रसार झाला नसला तरी स्वातंत्र्योत्तर काळात मात्र सहकाराने भारावलेलया उत्तुंग व्यक्तीमत्व असणाऱ्या नेतत्वाचा उदय झाला. यामध्ये वैकुंठभाई मेहता यांचे नाव मोठया सन्मानाने घेतले जाते. त्यांनी १९१२ पासून सहकाराचा सप्तध्वज खांदयावर घेऊन देशात सहकारी दिंडी गावो-गावी नेली. यावेळी त्यांना डॉ.धनंजयराव गाडगीळ यांच्या सारख्या अभ्यासू नेतत्वाची साथ लाभली.

विकासाचा ध्यास घेतलेले विठ्ठलराव विखे पाटील यांनी सहकाराची शिदोरी घेऊन विकासाचा मार्ग स्वीकारला. सन १९५० मध्ये त्यांनी आशिया खंडातील पहिला सहकारी साखर कारखाना प्रवरानगर ता. श्रीरामपूर जि. अहमदनगर येथे सुरू केला. यावेळे धनंजयराव गाडगीळ व विठ्ठलराव विखे पाटील या मातब्बर सहकार कार्यकत्यांचा जवळीक सबंध निर्माण झाल्यामुळे सहकार चळवळीचा प्रचार आणि प्रसार सुरू झाला. त्यानंतर महाराष्ट्रात सहकारी साखर कारखान्याचे जाळे निर्माण झाले. पश्चिम महाराष्ट्रात तर सहकारी साखर कारखान्यामुळेच लाखो शेतकऱ्यांचे जीवनमान सुधारण्यास मोठया प्रमाणावर मदत झाली. कृषी उत्पन्न, उत्पादनावर पक्रिया करणारे विविध प्रकल्प सहकारी तत्वावर महाराष्ट्रात माठया प्रमाणवर उभे राहिले.[४२]

सहकार चळवळीतील दुग्ध व्यवसायाने प्रगतीच्या दिशेने यशस्वी भरारी घेवून अमूलची प्रॉडक्टची निर्मिती केली. अमूल निर्मिती ही

---

[42] शितोळे डी.टी., प्रा. वैदयनाथ समिती अहवाल थोडक्यात परामर्श, सहकारी महाराष्ट्र परिषद विशेषांक, २००८,
पृ.क्र. १.

दुग्धव्यवसायातील सहकाराचा उच्च अशी कामगिरी असल्याचे दिसून येते. आज जगात दुग्ध उत्पादन करण्यामध्ये भारत देशाचा नंबर अव्वल आहे. या व्यवसायाने जागतिक बाजारपेठ अधिक आक्रमकपणे काबीज केली. सहकाराच्या माध्यमातून गृह निर्माण संस्थांचे जाळे अत्यंत वेगात शहरा-शहरांमध्ये मोठया प्रमाणात पसरत गेले. त्यामुळे ही चळवळ विविध क्षेत्रातून देशाच्या कानाकोपऱ्यात जावून पोहोचली.

महाराष्ट्रात सहकार चळवळ वाढविण्यासाठी वैकुंठ मेहता, धनंजयराव गाडगीळ, यशवंतराव चव्हाण, वसंतदादा पाटील, शंकरराव मोहिते, यशवंतराव मोहिते, रामभाऊ म्हाळगी, वसंतराव नाईक, पद्मश्री विखे पाटील व शरद पवार अशी अनेक मातब्बर सहकार कार्यकर्त्यांनी ही चळवळ वाढविली आणि ती सामान्यापर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न केल्याचे आढळून येते.

सन १९०४ मध्ये सहकार पतसंस्था कायदा लागू झाला. १९६६ मध्ये सहकार क्षेत्रातील नागरी सहकारी बँकासाठी बँकिंग रेग्यूलेशन कायदा लागू करण्यात आला. रिझर्व बँक ऑफ इंडियाचा १९८४ मध्ये नागरी बँक विभाग सुरू केला. खरे तर सहकारी बँकांची सुरूवात पत पुरवठयाच्या माध्यमातून सुरू झाली असली तरी स्थानिक पातळीवरचा लोकसंपर्क, छोटया प्रमाणावरील व्यवहारामुळे जलद होणारी निर्णय प्रक्रिया यामुळे नागरी सहकारी बँकांपैकी जवळपास १/३ बँका महाराष्ट्रात असून खेळते भांडवल, स्थानिक ठेवी व कर्ज याबाबतीत महाराष्ट्रातील नागरी सहकारी बँकांचा वाटा जवळपास ७० टक्के असल्याचे दिसून येते.[४३] ही महाराष्ट्राच्या दृष्टीने गौरवास्पद बाब असल्याचे स्पष्ट होते.

[४३] सोळंके शे., शतक महोत्सवी सहकारी चळवळीची वाटचाल, सहकारी महाराष्ट्र परिषद विशेषांक, २००८, पृ.क्र. १८३.

सन १९९४ नंतर वेगाने स्थापन झालेल्या सर्वच नवीन नागरी सहकारी बँकांना आज मोठया प्रमाणावर संकटाना तोंड दयावे लागत आहे. सन १९९४ च्या मराठे समितीच्या अहवालानंतर रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने मुक्त धोरण स्वीकारून कमीत कमी अटी व शर्तींच्या अधीन राहून भारतभर अनेक सहकारी संस्थांना बँकींग व्यवसाय करण्यासाठी परवाने दिले. यामुळे बँकिंग क्षेत्रात स्पर्धा वाढून गेली. या स्पर्धेत आपले स्थान टिकविण्यासाठी सर्वच नागरी सहकारी बँकांनी स्पर्धेला तोंड देत असताना रिझर्व्ह बँकेने मात्र नागरी बँकाबाबत अत्यंत कडक धोरण स्वीकारत असल्याचे अलीकडे आढळून आले आहे.

आज महाष्ट्रातील सुमारे ४५ बँकां अशक्त झाल्या आहेत. याचा एकंदर परिणाम सामान्य जनतेवर मोठा होईल. यासाठी संचालक मंडळाने चालविताना व्यावसायिक दृष्टीकोन ठेवला पाहिजे. कर्ज वितरण सक्षमतेच्या निकशावर केले व बँकेच्या अंतर्गत व्यवहारात पारदर्शकता आणली तर उर्वरीत ५५० बँका या अधिक सुदृढ होतील व ठेवीदार आणि सभासदांना त्याचा फायदा होण्यास मदत होईल.

आज भारतात २१०४ नागरी सहकारी बॅका आहेत. त्यांच्या ११०००० कोटी रूपयांच्या ठेवी आहेत. ७०००० कोटी रूपयांचे कर्ज आहेत. ४००० कोटी स्वनिधी आहेत. भारताच्या शेती पुरवठयाचा मुख्य भार महाराष्ट्रातील बँका वाहत आहेत. नागरी सहकारी बँकाकडे व्यापारी बँकाच्या एकूण ठेवीच्या ११ टक्के ठेवी आहेत. त्याचा ठेव वाढीचा वेग व्यापारी व राष्ट्रीकृत बँकापेक्षा अधिक आहे आणि कर्जवसुलीचे प्रमाण व्यापारी बँकापेक्षा कितीतरी पटीने श्रेष्ठ आहे. व्यवस्थापनाचा दर्जा ग्राहक सेवेचा दर्जा व्यापारी बँकांच्या तोडीचा आहे.[४४]

[४४] सोळंके शे, शतक महोत्सवी सहकारी चळवळीची वाटचाल, सहकारी महाराष्ट्र परिषद विशेषांक, २००८, पृ.क्र. १८३.

सहकार चळवळीची सुरूवात ब्रिटिशांच्या काळात झाली. सन १९०४ मध्ये पहिला कायदा भारतात लागू करण्यात आला. पहिला सहकारी कायदा सुमारे १०० वर्षापूर्वी झाल्यानंतर सहकार चळवळीला कायदेशीर स्वरूप प्राप्त झाले. सुमारे शंभर वर्षापूर्वीपेक्षा जास्त कालावधी उलटल्याने विविध क्षेत्रात सहकारी संस्था आज भारतात यशस्वीपणे आपले कार्य करीत आहेत. या संस्था प्रामुख्याने साखर कारखाने, सूतगिरण्या, जिल्हा व नागरी सहकारी बँका, पतसंस्था, दुग्ध सहकारी संस्था, विकास संस्था, कापूस संस्था, पणन व ग्राहक संस्था, मजूर संस्था, पशू व मत्स्य संस्था, वाहतूक संस्था इत्यादी विविध सहकारी तत्त्वावर चालणाऱ्या संस्थामध्ये समावेश होतो. सर्वसामान्य नागरीक, शेतकरी, कामगार, पगारदार हे एकत्र येवून नफ्याच्या प्राधान्याने विचार न करता सामाजिक विकासासाठी त्यांनी स्वतःचे भागभांडवल गुंतवून स्वःनेतत्वावर चालविलेली संस्था ही सहकारी चळवळ आहे. सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, प्रादेशिक विकासात व राजकीय जडणघडणीत सहकारी चळवळीला महत्त्व प्राप्त झाल्याचे दिसून येते. काही विशिष्ट चुकीच्या विचार प्रणालीच्या लोकांमुळे सहकार क्षेत्र हे डबघाईला आल्याचे दिसते.

२.२ सहकार संकल्पनेचा अर्थ / व्याख्याः

सहकाराचा अर्थ परस्पर सहाय्य करणे अथवा सर्वांच्या हितासाठी एकत्रित कार्य करणे होय. व्यापक अर्थाने सहकार म्हणजे मानवातील समूह जीवन जगण्याच्या उपजत असणारी प्रवृत्ती असल्याचे स्पष्ट होते. सहकार ही संकल्पना मानवाच्या इतिहासाइतकी जुनी आहे. मानवाच्या शिकारी अवस्थेपासून ते आधुनिक काळापर्यंतचा विचार केल्यास एकत्रित राहणे, एकत्रित विचार करणे, एकत्रित काम करणे, अडचणीच्या वेळी एकमेकांना सहाय्य करणे ही माानवाची नैसर्गिक सहज व उपजत प्रवृत्ती आहे. त्यामधूनच मानवाला सुखी आणि समृध्द जीवन जगण्याची प्रेरणा मिळालेली आहे. थोडक्यात मानवी समाजाच्या संस्कृती व त्यांच्या प्रगतीची इतिहास हा

एक प्रकारे सहकाराचा इतिहास आहे. ब्रिटनमध्ये जी औद्योगिक क्रांती झाली तिच्या अनिष्ट परिणामामधून सहकाराचा आधुनिक अर्थाने जन्म झाला. औद्यौगिक क्रांती पूर्व काळामध्ये इंग्लंडची एकूण अर्थव्यवस्था ही शेती व गृहउद्योगावर अवलंबून होती. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीला शेती किंवा गिरणीमध्ये काम करणे या शिवाय पर्याय नसल्याचे आढळून आले. त्याचाच फायदा भांडवलदार व कारखानदार यांना झाला. हे लोक अल्प मोबदला देवून ज्यादा काम करून घेत अशा पध्दती निर्माण झाल्यामळे कामगारांची मोठी पिळवणूक होत होती. त्यांना कोणत्याही प्रकारचे सरकारने संरक्षण दिले नव्हते. अशा परिस्थितीत रॉबर्ट ओवेन, डॉ. विल्यम सारख्या दुरदृष्टी असणाऱ्या विचारवंतांनी कामगारांना भांडवलशाहीच्या कचाटयातून सोडविण्यासाठी सहकार्य चळवळ किंवा सहकारी संस्था ही कल्पना पुढे आणली. स्वतःकडे असणाऱ्या गिरणीतील कामगारांना वेतन वाढ देवून व त्यांचे कामाचे काही तास कमी करुन त्यांचे जीवनमान उंचावण्याचा प्रयत्न रॉबर्ट ओवेन या विचारवंतांने केला.[४७]

इंग्लंडमधील कामगाराच्या परिस्थितीत सुधारणा घडूवन आणण्यासाठी रॉबर्ट ओवेन आणि डॉ. विल्यम किंग या सारख्या व्यक्तींनी इंग्लंडमध्ये रॉसडेल येथील २८ गरीब विणकर कामगारांनी १८४४ साली सहकारी तत्वाआधारे ग्राहक सहकारी भांडारांची स्थापना केली. त्यातून त्यांना चांगले उत्पादन मिळविण्यासाठी त्यांनी पायोनियर्स सोसायटीची स्थापना करून तिच्या माध्यमातून कामगारांना चांगले वेतन मिळाले. कामगारांची २८ वरून ७४ पर्यंत संख्या वाढली. आज ही संस्था सहकाराच्या ऐतिहासिक प्रारंभातील मैलाचा दगड म्हणून ओळखले जाते. कारण तिच्यामुळे त्या काळात अशा प्रकारच्या सहकारी संस्था जगातील अनेक देशातून स्थापना केलेल्या आहेत.

[४७] कित्ता, पृ.क्र. २३

डार्विनच्या मते [४६], आक्रमक स्पर्धेतून मानवी समाजाची उत्क्रांती झाली नसून ती सहकारात्मक स्पर्धेतून मानवी समाजाची उत्क्रांती झाली नसून प्रिन्स पीटर क्रापोस्कीन यांच्या मते, मसामाजिकता हा सहअस्तित्वा एवढाच महत्त्वाचा नियम आहे. हे ज्यांना सामाजिक जोवनाचे फायदे समजतात. ज्यांच्यातून अतिधुर्त व उध्दट नेहमी वगळले जातात. माँटेग्यू यांच्या मते, विज्ञानाने सिध्द केलेले आहे की मानवी जातीचे अस्तित्व व सौदर्य हे प्रेम आणि सहकार्य यामधूनच आहे.म[४७] सी. आर. फ यांच्या मते, मसंयुक्त व्यापार करण्याच्या उद्देशाने दुर्बलांची निर्माण केलेली ही एक संघटना असून तिचा कारभार निःस्वार्थीपणे अशा अटीवर चालतो की सभासदत्वाची कर्तव्ये स्वीकारण्यास तयार असणाऱ्यांना संस्थेशी केलेल्या व्यवहाराच्या प्रमाणात लाभात सहभाग व्हावा.

म.एम. डार्लींग यांच्या मते, म सहकार ही एक पध्दती यापेक्षा त्यात अधिक काहीतरी आहे, हृदय व मनाला आवाहन करणारे ते चैतन्य आहे. तो धंदयात अनुसरलेला धर्मच आहे आणि स्वयंपूर्णता व सेवा यांचे ते आचरण तत्व आहे.[४८] एच. कलव्हर्टच्या मते, मसहकार अशा प्रकारचे संघटन आहे की ज्यात व्यक्ती मानव म्हणून स्वेच्छेने, समानतेच्या आधारावर आपल्या आर्थिक हिताच्या संवर्धनासाठी एकत्र येतात.म लॅम्बर्ट पॉलच्या मते, मसहकारी संस्था म्हणजे स्वतःच्या उपयोगासाठी व्यक्ती समुहाने निर्माण व निर्देशित केलेली, लोकशाही, नियमानुसार चालविलेली व सभासदांच्या आणि सामान्याच्या सेवेसाठी कार्यकारणी एक व्यावसायिक संस्था आहे.म सर होरेस प्लॅकेट यांनी, मसंघटनेने परिणामकारक केलेले स्वावलंबन म्हणजे सहकार होय.[४९] हे सांगून उत्तम शेती, उत्तम व्यवसाय व उत्तम राहणीमान ही सहकाराची तीन तत्वे आहे असे प्रतिपादन दिले. व्ही. एल. मेहता, यांच्या मते,

[४६] कित्ता, प.क्र. २४
[४७] कित्ता, पृ.क्र. २५
[४८] कित्ता, पृ.क्र. २६
[४९] कित्ता, पृ.क्र. २८

म सहकार म्हणजे समान आर्थिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी समान गरजा असणाऱ्या व्यक्तीनी स्वेच्छेने स्थापन केलेली संघटना होयम[७०]. डब्लू. पी. वटकीन यांच्या मते, म सहकार म्हणजे एकता, लोकशाही, समता व स्वातंत्र्य या तत्वावर आधारित सामाजिक संघटना होय. मॅकलेगन समितीच्या मते, सहकाराचा सिध्दांत असे स्पष्ट करतो की, आर्थिकदृष्टया दुर्बल व एकाकी मनुष्य, दुसऱ्यांच्या सोबतीने आणि नैतिक विकास व परस्पर सहकार्य यांच्या सहाय्याने श्रीमंत व समर्थ लोकांना मिळणारे भौतिक फायदे मिळवू शकतो आणि त्यायोगे तो त्यांच्यातील नैसर्गिक व स्वाभाविक गुणांची पुर्णवाढ घडवून आणून त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास करू शकतो. पी.ई. विरामन यांच्या मते, सहकारी संस्था ही व्यक्तीसमूहांची किंवा समाजाची एक अशी संघटना आहे की, ज्या संघटनेच्या सभासदाचे आर्थिक व सामाजिक कल्याण साधण्यासाठी परस्पर सहाय्य आणि नफ्याचे उच्चाटन यावर आधारलेला उद्योग अगर व्यवसाय स्थापन केला जातो व याद्धारे समाजाच्या व सामन्यांच्या आर्थिक गरजांची पूर्तता होते[७१].

भारतीय सहकारी कायदा १९१२ च्या सहकारी तत्त्वानुसार आपल्या सभासदाचे आर्थिक हितांचे संवर्धन करणारी संस्था म्हणजे सहकारी संस्था होय. इयान मॅकफर्सन च्या अभ्यासगटांच्या शिफारशीनूसार सप्टेंबर १९९७ मधील मँचेस्टर काँग्रेसने १९६६ साली मान्य केलेल्या सहा मूलतत्वांपैकी तिसरे आणि चौथे तत्त्व एक करून मस्वायत्तताम आणि मस्वातंत्र्यम असे नव मूलतत्त्व मान्य केले आहे. त्याशिवाय मसमुदायाप्रती निष्ठाम हे एक नवे असे तत्व मान्य केले आहे. एकंदरित मँचेस्टर येथील 'आयसीए सेन्टनरी काँग्रेसम ने वर्तमान तसेच २१ व्या शतकातील सहकारी चळवळीचे सहकारी मूल्ये सहकाराची मुलतत्वे निर्धारित करून आणि सहकारी चळवळीच्या मव्यक्तीमत्वाचाम सुयोग्य परिचय करून देवून अतिशय महत्त्वाची

[७०] कित्ता, पृ.क्र. २९
[७१] कित्ता, पृ.क्र. ३०

ऐतिहासिक कामगिरी पार पाडली आहे. तसेच आयसीए माफंत भविष्यात चिरंजोवी मानव विकास घडूवून आणणे शक्य आहे. यांची जाणीव ठेवून आयसीए ट्रस्ट फड स्थापन करण्याचे ठरवून एक दूरगामी परिणाम करणारे अतिशय पुरोगामी स्वरूपाचे वेगळे पाऊल उचलल्याचे दिसून येते.

२.३ सहकारी चळवळीची वाटचाल

सहकारी बँकाचा शंभर वर्षाच्या इतिहासात बरीच संकटे आली. पण अजूनही ही चळवळ जिवंत आहेत. जागतिकीकरण खाजगीकरण, मुक्त अर्थव्यवस्था, मुक्त आयात इत्यादी धोरण सहकारी बँकांनी स्वीकारले आहे ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे ही चळवळ जिवंत, सशक्त ठेवणे आणि रिझर्व्ह बँकेने जे आर्थिक निकष पाळावयास सांगितले आहेत. ते पाळणे आवश्यक आहे. सन १९९४ नंतर मराठे समितीच्या अहवालानंतर भारतीय रिझर्व्ह बँकेने मुक्त धोरण स्वीकारून कमीत कमी अटी व शर्तींच्या अधिन राहून देशभर अनेक सहकारी संस्थांना बँकींग व्यवसायाचे परवानगी दिली गेली.

GATS- General Agreement of Trade & Services हा करार जानेवारी २००५ पासून अंमलात आला. त्यामुळे बँकाचे जागतिकीकरण झाले. त्यामुळे अनेक विदेशी बॅका भारतामध्ये आल्या. परिणामी या वाढत्या राजकीय हस्तक्षेपाला स्वीकारून आपल्या देशातील सहकारी क्षेत्राला टिकाव धरुन राहणे महत्त्वाचे आहे. बॅक प्रशासन चालविताना सभासद, ग्राहक, कर्मचारी व शासकीय यंत्रणा या सर्वांचा समन्वय साधणे आवश्यक असते. गेल्या ५ वर्षापासून रिझर्व्ह बॅकेच्या अनेक चांगल्या वाईट नियमांचा फटका अनेक छोटया मोठया बँकांना बसलेला आहे.[५२] यातून मार्ग काढण्याचा किंवा या परिस्थितीशी जुळवून घेण्याचा प्रयत्न सर्वच बँका करीत आहेत. या सर्व बँक संचालकांचा आपण अभ्यास केल्यास असे लक्षात येते की, हे संचालक शहरातील नामांकित डॉक्टर्स, इंजिनियर्स, बिल्डर्स, उद्योगपती,

[५२] कदम य. ना., समग्र भारताचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, पृ.क्र. ४०.

ॲडव्होकेट, व्यापारी, आर्किटेक्ट, चार्टर्ड अकाउटंट आहे. या सर्वांची प्रतिष्ठा या अफवामुळे आजमितीस पणाला लागल्याचे स्पष्ट होते. संचालकाच्याही काही प्रमाणात चुका आढळून येतात. जे काही चुकीची कर्जे देतात त्याची वसूली होत नाही.[७३]

सन २००७ या वर्षात महाराष्ट्रातील काही मोठया बँका अडचणीत आल्या. त्यामुळे रिझर्व्ह बँकेने काही प्रमाणात कारवाई केली. त्याचा परिणाम ही सहकार क्षेत्रातील बँकाना सध्या व्यापारी बँकांशी स्पर्धा करावी लागत असल्याने वरवचेवर अडचणी वाढत चालल्या आहेत.[७४] सहकार चळवळीचा देशाच्या आर्थिक विकासांमध्ये महत्त्वपूर्ण सहभाग आहे. सहकाराच्या माध्यमातून देशाला एक नवी दिशा प्राप्त केली आहे. अशा या सहकार चळवळीत सहकारी बँका, नागरी बँका, शेतीला कर्जपुरवठा करणाऱ्या बँका, दुग्ध सहकारी संस्था, सुतगिरण्या, प्रक्रिया, ग्राहक सहकारी संस्था, यासारख्या अनेक चळवळीचा समावेश होतो. सहकार क्षेत्रातील बँकाचे महत्त्व अलीकडील काही वर्षामध्ये सातत्याने वाढत आहे.

एकेकाळी स्थानिक गरजा भागविण्यासाठी स्थापन झालेल्या सहकारी बँका आज शहराचाच काय जिल्हा व राज्याची सीमा ओलांडून दुसऱ्या राज्यामध्ये सहकाराचा संदेश घेवून पोहचल्या आहेत. जनमाणसात आपल्या वाटणाऱ्या या बँका अत्याधुनिक सोयीद्धारे ग्राहकांना सेवा प्रदान करत आहेत. तसेच समाजाचे ए ण बँकेवर आहे. ही जाणीव ठेवून निस्वार्थी वृत्तीने कार्य करणाऱ्या अनेक सामाजिक संस्थांना नेहमीच भरभरून मदत करीत असल्याचे दिसून येते.

---

[७३] कित्ता, पृ.क्र. ४८.
[७४] कित्ता, पृ.क्र. ७७४.

२.४ सहकारी चळवळीचा वाढिचे टप्पे:-

भारतातील सहकारी चळवळीची सुरूवात शेतकऱ्यांच्या विकासासाठी झाली. ब्रिटिशांच्या राजवटीत जनता, संस्थानिक, जहागिरदार, सावकार इत्यादिंच्या तावडीत सापडली. 'ग्रामीण जनता अधिक त्रस्त झाली. दुष्काळ, रोगराई, अवर्शणे यामुळे ग्रामीण जनतेचे जीवन उध्वस्त व्हायला लागले. ते कर्जबाजारी झाले. काही भागात बंडाळी झाली. तातडीचा उपाय म्हणून ग्रामीण जनतेच्या कर्जबाजारीपणाची पाहणी करण्यासाठी काही ठिकाणी समित्या व मंडळे स्थापन करण्यात आली. त्यापैकी 'दख्खन बंडाळी मंडळम हे एक होते. या मंडळाच्या शिफारशीनुसार दख्खन शेतकऱ्यांना आर्थिक सवलती देण्यात आल्या. परंतु या कायदयाचा फारसा उपयोग झाला नाही.

१८८२ साली न्या. महादेव गोविंद रानडे यांनी पुणे जिल्ह्यात पुरंदर तालुक्यात एक शेतकरी बँक स्थापन करून शेतकऱ्यांना कर्ज देण्याची सोय निर्माण केली. जुनी कर्जे फडणे व जमीन सुधारणा करणे हा या बँकेचा उद्देश होता. त्यावेळी मंत्री लॉर्ड किंबर्ले यांनी ही योजना अमान्य केली. १८८३ साली शेतकरी कर्ज कायदा मंजूर करण्यात आला. यावेळी दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांना सवलतीच्या दराने कर्ज देण्याची सोय झाली. परंतु त्याचा फारसा फायदा झााला नाही. १९ व्या शतकाच्या सुरूवातीला भयंकर दुष्काळ पडला. शेतकऱ्यांची परिस्थिती अधिक बिकट झाली.

१८८२ साली मद्रास सरकारने आपले वरिष्ठ अधिकारी सर फड्रीक निकोलसन यांना युरोप खंडातील सहकारी चळवळीचा अभ्यास करण्यासाठी पाठविले. त्यांनी तेथील परिस्थितीचा अभ्यास करून आपला अहवाल सादर केला. त्यांनी आपल्या अहवालात म्हटले आहे की, ''शेतकऱ्यांला स्वावलंबंन व काटकसरीचे धडे देवून आणि त्यांच्या जीवनात नियंमितपणा निर्माण करून त्याला मार्गदर्शन करील अशा संस्थेची आवश्यकता आहे.

केवळ स्वस्त दराने कर्ज पुरवठा करणे हा एकच प्रष्न नसून तो ज्या पध्दतीने द्याावयाचा ती पध्दती देखील महत्वाची आहे. यासाठी परस्पर मदतीच्या तत्वावर आधारलेल्या पतपुरवठा संघटना स्थापन करण्यात सरकारने किंवा भांडवली बँकांनी हे काम हाती घेवू नये.म त्यांनी 'रायफसन शोधाम या दोन शब्दात आपल्या अहवालाचा समारोप केला आहे[७७]. याच सुमारास आय सी एस अधिकारी मि. डयुपरनेक्स यांनी उत्तर भारतात ग्रामीण बँकेचा प्रयोग केला. त्यांनी पिपल्स बँक ऑफ नॉर्दन इंडिया हे पुस्तक लिहिले. यामुळे सरकारचे लक्ष ग्रामीण पतपुरवठयाकडे गेले.१९०० साली सर एडवर्ड लॉ यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने रायफसेन पध्दतीच्या सोसायटया स्थापन करण्याची शिफारस केली.

२.४.१ कालखंड (१९०४ ते १९११) :

१९०४ साली भारतात पहिला सहकारी कायदा मंजूर करण्यात आला. या कायदयाने शेतकरी व कारागीर यांना कर्ज मिळण्याची सोय झाली. संस्थेचे ग्रामीण व नागरी असे वर्गीकरण करण्यात आले. या संस्थेचे कार्यक्षेत्र मर्यादित होते. सहकारी हिशोब व तपासणीची सक्ती करण्यात आली. रजिस्ट्रारची नेमणूक करण्यात आली. १९११ साली बॉम्बे सेंट्रल को-ऑफ बँकेची स्थापना करण्यात आली. त्यामुळे ग्रामीण सहकारी सोसायटयांना कर्जपुरवठा करण्याची सोय झाली.

२.४.२ कालखंड (१९१२ ते १९१८) :

१९१२ साली दुसरा सहकारी कायदा मंजूर करण्यात आला. पहिल्या सहकारी कायदयातील उणिवा नवीन कायदयाने दूर करण्यात आलया. सहकारी संस्थेचे वर्गीकरण मर्यादित व अमर्यादित असे करण्यात आले. बिगर शेतकी संस्था व संयुक्त संस्था फायदयाने नोंदवण्याची सोय झाली. अधिक सुधारणा करण्याचे प्रांताना अधिकार देण्यास मनाई करण्यात आली.

---

[७७] कित्ता, प.क्र. ७७८.

शेअर्स धारण करण्यावर मर्यादा घालण्यात आली. कर्ज वसुलीचा सहकारी संस्थांना अग्रहक्क देण्यात आला. वादांची तडजोड करण्यासाठी नियंत्रकांची तरतूद करण्यात आली. तर १९१७ साली तर विठ्ठलदास ठाकरसी यांनी एक निबंध लिहून सहकारी शिक्षणाची आवष्यकता प्रतिपादन केली.[५६].

१९१७ साली सर इ डी मॅकलेगन यांचे अध्यक्षतेखाली सहकार समितीची नेमणूक केली. संस्थेने उत्पादक कामासाठी कर्ज दयावे, कर्जाचा उपयोग योग्य कारणासाठी होतो किंवा नाही याकडे लक्ष दयावे. अशी महत्त्वाची शिफारस समितीने केली. हिशेब तपासणी व देखरेख यावर विशेश भर दिला.१९१८ साली सेंट्रल को-ऑप इन्स्टिटयूटची स्थापना करण्यात येवून सहकारी शिक्षणाची स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली.

२.४.३ कालखंड (१९१९ ते १९२९)

१९१९ साली सहकार हा विशय प्रांतांच्या कक्षेत आला. मुंबई प्रांताने पुढाकार घेवून १९२५ साली आपल्या प्रांतांचा स्वतंत्र सहकारी कायदा केला. याच पध्दतीने इतर प्रांतांनी वेगवेगळे कायदे करण्यास सुरुवात केली[५७]. १९२७ साली रॉयल कमिशन ऑन ॲग्रिकल्चर या कमिशनची नेमणूक झाली. शेतीविशयक प्रष्नांचा विचार करण्यासाठी या कमिशनची नेमणूक झाली असली तरी सहकारी चळवळीविशयी कमिशनने अनुकुल शिफारशी केल्या होत्या. शेती सुधारण्यासाठी आर्थिक विकासासाठी सहकारी संस्था हे उत्तम माध्यम असल्याचा निर्वाळा कमिशनने दिला. या काळात उत्तर प्रदेशात आकडेन समिती, मध्य प्रांतासाठी किंग समिती, टॉनसेंड समिती, मद्रास कॅनव्हर्ट समिती, वर्मा समिती अशा विविध समित्या त्या त्या प्रांतातील सहकारी चळवळीच्या अभ्यासासाठी नियुक्त केल्या गेल्या. १९२९ साली सेंट्रल बँकिंग इन्कॉयरी समिती स्थापन करण्यात आली. बँकींग व्यवसायाचा

[56] Mathur, B.S. , Coopereation in India, Agra:Sahitya Bhawan,1986.
[57] Mathur, B.S. , Coopereation in India, Agra:Sahitya Bhawan,1986.

विकास करणे, नियंत्रण व मार्गदर्शन करणे यासाठी या समितीने शिफारशी केल्या. १९२९ साली जागतिक मंदीची लाट आली. त्यामुळे सहकारी चळवळीवर विपरित परिणाम झाला. सहकारी संस्थांचे व्यवहार बंद पडले. थकबाकी वाढली. शेतमालाच्या किंमती उतरल्या.

२.४.४ कालखंड : (१९३० ते १९३९)

१९३५ साली रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाची स्थापना करण्यात आली. त्यात शेतकी पतपुरवठा विभाग स्थापन करण्यात आला. दिनांक ७ डिसेंबर १९३५ रोजी भूविकास बँकेची स्थापना करण्यात आली. शेती या बँकेच्या माध्यमातून विकासासाठी दीर्घकालीन कर्जपुरवठयाची सोय करण्यात आली[५८]. १९३७ साली मेहता भन्साली या समितीची स्थापना झाली. शेतकी पतपुरवठयाचे कायं अधिक उपयुक्त व कार्यक्षमतेने होण्यासाठी तिचे रुपांतर विविध कार्यकारी सोसायटीमध्ये करण्यात यावे अशी महत्त्वाची शिफारस या समितीने केली.

२.४.५ कालखंड (१९३९ ते १९४६):

दुसऱ्या महायुध्दाच्या काळात शेतमालाचे भाव वाढले. शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारली. माठया प्रमाणावर थकबाकी वसूल झाली. सोसायटीतील ठेवीचे प्रमाण वाढले. या काळात सहकारी चळवळीचा विकास वेगाने झाला. ग्राहक सहकारी भांडारे मोठया संख्येने वाढली. १९४४ साली गाडगीळ समिती स्थापन झाली. शेती, जंगल, मच्छिमार सहकारी संस्थांना कर्ज पुरवठा करण्यासाठी स्वतंत्र पतपुरवठा कॉर्पोरेशन स्थापन करण्यात यावे अशी शिफारस या समितीने केली. १९४५ साली सरैया समिती स्थापन झाली. आर जी सरैया हे या समितीचे अध्यक्ष होते. शेतकी सोसायटया व पाणी पुरवठा संस्था स्थापन करण्यात व त्यांना आर्थिक मदत करावी अशी शिफारस या समितीने केली.१९४६ साली मदन समिती स्थापन झाली. सर

[58] Mathur, B.S. ,Coopereation in India, Agra:Sahitya Bhawan,1986.

जनार्दन मदन हे या समितीचे अध्यक्ष होते. सहकारी शिक्षण देण्याची प्रभावी योजना आखावी अशी शिफारस या समितीने कली.

१९४७ साली फब्रुंवारीमध्ये नानावटी समिती प्रमाणे स्थापन झाली. गाडगीळ समितीने[५९] शेतकी पतपुरवठयासाठी स्वतंत्र कॉर्पोरेशन स्थापन करण्याचे सुचविले होते. स्वतंत्र कॉर्पोरेशन न काढता सहकारी बँकांना आर्थिक मदत देवून त्यांच्या माफंत पतपुरवठा करण्याबाबत विचार करण्यासाठी नानावटी समितीची स्थापना झाली. स्वतंत्र कॉर्पोरेशन काढू नये असे मत या समितीने ढिले. प्राथमिक सोसायटयांचा कारभार अधिक परिणामकारक होण्यासाठी विविध कार्यकारी सोसायटया स्थापन करण्याची शिफारस या समितीने केली. समितीच्या शिफारसीनुसार प्रांतिक सहकारी बँकेची पुर्नस्थापना करण्यात आली.

२.४.६ सहकार नियोजन समिती (सरैया समिती)

सन १९४४ मध्ये भरलेल्या रजिस्ट्रॉर यांच्या १४ व्या परिशदेने केलेल्या शिफारसीनुसार हिंदूस्थान सरकारने जानेवारी १९४५ मध्ये श्री आर जी सरैया यांचे अध्यक्षतेखाली सहकार नियोजन समितीची नियोजन समिती नेमणूक केली[६०]. या समितीकडे सहकारी चळवळीच्या भावी विकासाच्या दृष्टीने योजना सादर करण्याची जबाबदारी सोपविली होती. या समितीने सादर केलेल्या प्रमुख शिफारसी पुढीलप्रमाणे आहेत.

१- सहकारी चळवळीच्या योग्य विकासासाठी लोकशाही तत्वावर स्थापन झालेले सरकार अधिकारावर असणे आवष्यक आहे. असे या समितीचे मत आहे. तसेच या समितीने सादर केलेल्या योजनेनुसार सहकारी चळवळीचा विकास होण्यासाठी सरकारच्या प्रचार खात्याचे संपूर्ण सहकार्य मिळाले पाहिजे

[59] Mathur, B.S. ,Coopereation in India, Agra:Sahitya Bhawan,1986.
[60] Mathur, B.S. ,Coopereation in India, Agra:Sahitya Bhawan,1986.

याशिवाय बिगरसरकारी कार्यकर्त्यांचा या योजनेस पाठिंबा असणे आवष्यक आहे.

२-शेती उत्पादनात वाढ करण्यासाठी सुधारलेल्या पध्दतीने शेती करण्यास प्रोत्साहन दिले पाहिजे. सुधारलेल्या पध्दतीने शेती करण्यासाठी सहकारी शेती सोसायटया काढाव्यात. सुधारलेले बियाणे व चांगली खते यांचे वाटपाचे कार्य या सोयायटयांनी हाती घ्यावे. शेतकी खात्याने बियांची प्रत वाढविण्याचे व खतांची उपयुक्तता वाढविण्याचे कार्य हाती घ्यावे.

३-शेती उत्पादन वाढण्यासाठी योग्य पाणी पुरवठा होणे फार जरुरी आहे. यासाठी लहानमोठया पाटबंधारे योजना हाती घ्याव्यात. तसेच शेतीमालाची योग्य पध्दतीने विक्री होण्यासाठी सर्वत्र दळणवळणाची सोय उपलब्ध करुन देण्याबाबतचे प्रयत्न झाले पाहिजे. शेतकऱ्यांची सर्वांगीण उन्नति सहकारी चळवळीच्या मदतीने होवू शकेल. सतत त्या दृष्टीने धोरण आखावे.

४-जनावरांची पैदास व जोपासना आणि मच्छिमार यासाठी स्वतंत्र सोसायटया स्थापन करण्यात या सोसायटयांना संबंधित खात्यांकडून मार्गदर्शन व्हावे. प्रत्येक विभागातील सोसायटीस सरकारने चांगल्या प्रतीचे बळ पुरविण्याची व्यवस्था करावो. मच्छिमारी सोसायटयांना सरकारने जरुर ती साधनसामग्री पुरवावी. जनावरांना वैदयकीय मदत सरकारने मोफत पुरवावी. जनावरांना भरपूर चारा मिळविण्यासाठी कुरणांची पध्दतशीर लागवड करावी.

५-सहकरी पध्दतीतीवर दूध वाढवण्याचे काम हाती घ्यावे. शहर विभागातील दूध पुरवठा संघ स्थापन करावे व त्यांच माफंत शहरात दुधाचे वाटप व्हावे. माजी सैनिकांनी अशा प्रकारच्या संघटनांमध्ये विशेश भाग घ्यावा.

६-सहकारी कर्जपुरवठा परिणामकारक होण्यासाठी शेती मालाच्या विक्रीची सहकारी सोसायटयांमाफंत व्यवस्था झाली पहिजे. यामुळे शेतीमालाची योग्य किंमत मिळेल. तसेच सहकारी पध्दतीवर कच्च्या मालाचे पक्क्या मालात रुपांतर करण्याची व्यवस्था सर्वत्र झाली पाहिजे. सहकारी कर्जपुरवठा आणि खरेदी विक्री यांची सांगड घालण्याची व्यवस्था झाली पाहिजे. पुढील दहा वर्षात कमीत कमी २५ टक्के शेती मालाची विक्री करण्याची जबाबदारी

सहकारी खरेदी-विक्री संस्थांनी स्वीकारावी. याशिवाय शेती मालाचा साठा करण्यासाठी गोदाम बांधण्याचे काम हाती घ्यावे.

७-ग्रामीण पुरवठयातील कर्ज पुरवठयांचा प्रश्न सहकारी चळवळीमार्फतच सोडविणे शक्य होईल. सबब सहकारी पतपुरवठा सोसायटयांची योग्य वाढ करण्यासाठी नियोजित प्रयत्न होणे आवश्यक आहे. गाडगीळ समितीने कर्जपुरवठा करण्याची पध्दत सुचविली आहे. ती योग्य असून त्या पध्दतीने कर्जपुरवठा करण्यास हरकत नाही. मात्र त्या समितीने सुचविल्याप्रमाणे हा कर्जपुरवठा करण्यासाठी स्वतंत्र ॲग्रीकल्चरल क्रेडिट कॉर्पोरेशन स्थापन करण्याची आवश्यकता नाही. कॉर्पोरेशनऐवजी सहकारी बँकांना अधिक भांडवल आणि आर्थिक मदत देवून त्यांच्या मार्फत सोसायटयांना कर्जपुरवठा करण्याची व्यवस्था करावी. प्रांतिक बँका व मध्यवर्ती बँकांचे भांडवल वाढल्यानंतर शेतकऱ्यांना सव्वासहा टक्के व्याजाच्या दराने कर्जपरवठा करणे सहकारी सोसायटयांना शक्य होईल. कर्जपुरवठा करणाऱ्या सोसायटयांनी कर्ज पुरवठयांशिवाय शेतकऱ्यांच्या इतर शेतीविषयक गरजा भागविण्याचा प्रयत्न करावा.

८-देशातील लोकसंख्येचा शेतीवरील भार दिवसेंदिवस वाढत असून त्यामुळे सर्वांना आपले राहणीमान वाढवता येत नाही. शेतीवरील हा भार कमी करणे जरुरी आहे. यासाठी ग्रामीण विभागात लहान व दुय्यम दर्जाचे उदयोगधंदे हाती घेण्याच्या दृष्टीने शेतकऱ्यांना उत्तेजन देण्यात यावे. प्रत्येक विभागातील ग्रामोद्योगांची पाहणी करुन त्यांची सहकरी पध्दतीवर उभारणी करण्याच्या दृष्टीने उत्तेजन देणाऱ्या विभागीय संस्था स्थापन कराव्यात.

९-निरनिराळया व्यवसायात काम करणाऱ्या कामगारांच्या मजूर सोसायटया स्थापन करण्याच्या दृष्टीने उत्तेजन दयावे. या सोसायटयांमुळे मजूरांना योग्य वेतन मिळेल आणि त्यांचे परावलंबित्व नाहीसे होईल. सरकारच्या निरनिराळया खात्यांनी आणि स्थानिक स्वराज्य संस्थांनी आपल्या बांधकामाचे मक्ते या सोसायटयांना दयावे. या सोसायटयांच्या स्थापनेसाठी देखील उत्तेजन देणाऱ्या विभागीय संस्था स्थापन करण्यात याव्यात.

१०–जनतेला चांगल्या प्रतीचा नित्योपयोगी माल येाग्य दराने पुरविण्यासाठी स्वतंत्र ग्राहक सहकारी सोसायटया स्थापन करण्यात ग्रामीण विभागात ज्या ठिकाणी स्वतंत्र ग्राहक सोसायटया स्थापन करणे शक्य नसेल तेथे प्राथमिक सोसायटीने नित्योपयोगी वस्तुंच्या वाटपाचे कार्य हाती घ्यावे. यासाठी लागणारी आर्थिक मदत सुरुवातीस सरकारने दयावी. आवश्यकता असेल तेथे प्रांतिक बँकेने आपल्या शाखांमाफंत वाटप कार्य हाती घ्यावे.

११–हल्ली नागरी विभागात काम करणाऱ्या काही अर्बन बँका, स्वतःचे रुपांतर भांडवली बँकात करण्याची परवानगी दयावी अशी मागणी करीत आहेत. सहकारी चळवळीच्या हिताच्या दृष्टीने ही मागणी मान्य करणे अयोग्य होईल. परंतु या बँकाच्या अडचणी दूर करण्यासाठी उपाय योजने मात्र जरुर आहे. म्हणून वरील मागण्या मान्य न करता अर्बन बँकांचे स्वतंत्र फडरेशन किंवा प्रांतिक संघ स्थापन करावा. या संघाला अर्बन बँकावर देखरेख करण्याचा अधिकार असावा.

१२–शहर विभागाला निरनिराळे कारखाने व उदयोगधंदे मोठया प्रमाणावर असून त्यांत काम करणाऱ्या कामगारांची संख्या मोठी आहे. या कामगारांना वेळोवेळी लागणाऱ्या कर्जासाठी स्वतंत्र सहकारी संघटना स्थापन होणे आवश्यक आहे. या सोसायटयांना कारखानदारांनी कारभाराच्या दृष्टीने आवष्यक आहेत. अशा सर्व सवलती पुरवाव्या.

१३–हौसिंग सोसायटयांची संख्या हल्ली वाढत असली तरी कमी उत्पन्नाच्या लोकांना या सोसायटयांचा फायदा घेता येत नाही. यासाठी कमी उत्पन्नाच्या लोकांना स्वतंत्र हौसिंग सोसायटया स्थापन होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावे. सर्व हौसिंग सोसायटयांच्या अडीअडचणी दूर करण्यासाठी मध्यवर्ती सहकारी हौसिंग सोसायटी स्थापन करावी या सोसायटयांनी आपले बांधकाम शक्यतोवर मजूर सोसायटयांकडून करुन घ्यावे. ग्रामीण विभागात हौसिंग सोसायटया स्थापन करण्याच्या दृष्टीने एक योजना आखावी.

१४–सरकारामाफंत वैदयकीय मदत देण्याची सोय सर्वत्र होण्यास बराच अवधी लागेल. तोपर्यंत वैद्यकीय मदतीची सोय होणे आवष्यक आहे. यासाठी

ठिकठिकाणी सहकारी आरोग्य सोसायटया स्थापन होणे अत्यावष्यक आहे. या सोसायटयांनी ग्रामीण विभागात माफक दराने वैदयकिय मदत देण्याची व्यवस्था करावी. माजी सैनिकांनी या प्रकारच्या सोसायटयामध्ये भाग घ्यावा.

१७–स्त्रियांनी सहकारी चळवळीत भाग घेण्याच्या दृष्टीने त्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे. स्त्रियांनी ग्राहक सहकारी सोयायटयां व सुखसंवर्धक (बेटर लिव्हिंग) सोसायटया या संस्थात विशेश भाग घ्यावा. गृहोद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी स्त्रियांच्या स्वतंत्र सहकारी संस्था स्थापन कराव्या. प्रांतातील स्त्रियांच्या सहकारी सोसायटयांच्या हितसंबंधाकडे लक्ष देवून त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी एक स्वतंत्र महिला असिस्टंट रजिस्ट्रार यांची नेमणूक करावी.

१६–आपल्या देशात ढळवळणाच्या व वाहतूकीच्या सोयी फारशा उपलब्ध नसल्यामुळे मालाची वाहतूक योग्य प्रकारे व योग्य वेळी होत नाही. शेतीमाल बाजारपेठामध्ये योग्य वेळी जावून त्यांची योग्य विक्री होण्याच्या दृष्टीने सहकारी वाहतूक सोसायटया स्थापन होणे आवष्यक आहे.

१७–हल्ली ग्रामीण विभागातील जनतेत विमा उतरविण्यासाठी प्रवृत्ति फारशी दिसून येत नाही. यासाठी कमी किंमतीच्या विमा पॉलिसी काढण्यात येवून (रु ५०० पेक्षा कमी) त्यांच्या ग्रामीण विभागात प्रचार व्हावा. प्रत्येक प्रांतासाठी एक विमा सोसायटी स्थापन होणे आवश्यक आहे. या विमा सोसायटयांनी जनावरांचे व पिकांचे विमे उतरविण्याचे काम हाती घ्यावे.

१८–प्रत्येक प्रातांतील सहकारी सोसायटयांवर देखरेख करण्याची अंतिम जबाबदारी एका प्रांतिक फडरेशनवर असावी. या फडरेशनचे विकेंद्रीकरण (उदाहरण– जिल्हा देखरेख मंडळे, तालुका देखरेख मंडळे) तालुका देखरेख मंडळाकडे त्या विभागातील सोसायटयावर देखरेख करण्याची जबाबदारी सोपवावी. भांडवल पुरविणाऱ्या संस्थेकडे देखरेखीचे काम सोपवू नये. इन्स्टीटयूट किंवा युनियन यांच्यासारख्या संस्थांना अधिक पाठिंबा देवून त्यांच्या माफंत शिक्षण व प्रचार कार्य चालू ठेवावे.

१९–सहकारी सोसायटयांची कार्यक्षमता वाढविण्याच्या दृष्टीने सहकारी खात्याच्या नोकरवर्गाने या सोसाटयांना अधिक जबाबदारीचे मार्गदर्शन करणे

आवश्यक आहे. सर्व प्रांतात ठराविक समान दर्जाचे अधिकारी नेमण्याची व्यवस्था व्हावी. रजिस्ट्रारच्या जागी नेमणूक करावयाच्या अधिकाऱ्याने सहकारी खात्यांत पूर्वी काम केलेले असले पाहिजे. ऑडीट व देखरेखीचे काम एकाच अधिकाऱ्याकडे सोपवू नये.

२०–सहकारी चळवळीबाबत सामान्य जनतेला शिक्षण देण्याची सोय होणे जरुर आहे. त्यासाठी शाळा, कॉलेज व इतर शैक्षणिक संस्था यांमध्ये 'सहकारम या विषयाबाबतचे शिक्षण देण्याची सोय करावी. प्रत्येक प्रांतात एक सहकारी महाविद्यालय स्थापन करावे. उच्च शिक्षण देण्यासाठी एक अखिल भारतीय सहकारी इन्स्टिटयूट स्थापन करावे.

२१–सहकार विशयक प्रष्नांवर प्रांतिक सरकारांना सल्ला देण्यासाठी प्रत्येक प्रांतात 'कोऑपरेटिव्ह कौन्सिलम स्थापन करावे. या कौन्सिलचे अध्यक्ष म्हणून प्रांतिक सरकारचे सहकार मंत्री व सेक्रेटरी म्हणून प्रांतातील सोसायटयांचे एक असिस्टंट रजिस्ट्रार यांनी काम पाहावे. या कौन्सिलमध्ये प्रांतातील तज्ञ व अनुभवी सहकारी कार्यकत्यांचा समावेश करावा. मध्यवर्ती सरकारला सल्ला देण्यासाठी असेच एक स्वतंत्र मंडळ स्थापन करावे.

२२–पुढील १० वर्षात हिंदूस्थानातील ५० टक्के खेडी आणि ३० टक्के जनता सहकारी चळवळीच्या कार्यक्षेत्राखाली आणण्याचे ध्येय निश्चित करुन त्या दृष्टीने प्रयत्न करावा या समितीने सादर केलेल्या शिफारशीच्या अनुरोधाने प्रांतिक सहकारी कायदयांत दुरुस्ती करण्यात यावी. ज्या प्रांतांनी अद्याप स्वतंत्र सहकारी कायदे केले नसतील त्यांनी ते करण्याची व्यवस्था करावी.

२.५ आधुनिक काळातील सहकारी चळवळः

१९४७ साली भारताला स्वातंत्र्य मिळाले. देशाचा नियोजित विकास करण्यासाठी सहकारी चळवळीला प्राधान्य देण्यात आले. श्री वैकुंठभाई मेहता[६१] यांच्या कडे सहकार खाते सोपवण्यात आले.१९४८ साली मुंबई सहकारी कायदयात दुरुस्ती करण्यात आली. कर्ज वसूलीसाठी रितसर

[61] Mathur, B.S. ,Coopereation in India, Agra:Sahitya Bhawan,1986.

कारवाई करणे, शिक्षण निधीची तरतूद करणे, लवाद दाव्यासाठी ट्रॅब्युनलची सोय करणे इत्यादी दुरुस्त्या करण्यात आल्या. १९४९ साली बँकींग इन्क्वायरी कमेटीची नियुक्ती करण्यात आली. श्री पुरुशोत्तदास ठाकूरदास हे या कमिटीचे अध्यक्ष होते. ग्रामीण विभागात बँकींगच्या सोयी उपलब्ध करुन बँकींग व्यवहारात सुधारणा घडवून आणणे याबाबत समितीने शिफारशी केल्यात. दि. १ जानेवारी १९४९ रोजी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे राष्ट्रीयीकरण झाले. दि. २६ जानेवारी १९५० रोजी भारत सार्वभौम व प्रजासत्ताक राष्ट्र झाले. दि. १ एप्रिल १९५१ मध्ये भारतातील पहिली पंचवार्शिक योंजना सुरु झाली.

२.५.१ पहिली पंचवाषिंक योजना (१९५१-१९५६)

''भारतात १९५२ पासून नियोजनाद्धारे विकासाच्या कार्यक्रमाला सुरुवात झाली. सहकाराला नियोजनात महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले. सहकारी चळवळीमाफंत प्रत्यक वर्शी १३० कोटी रुपये पतपुरवठा करण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले. यांपैकी अल्पमुदती कर्ज रु. १०० कोटी, मध्यम मुदतीची रु. २५ कोटी व दीर्घ मुदतीची रु. ५ कोटी पुरविण्याचे ठरविण्यात आले. ५० टक्के खेडी व ३० टक्के ग्रामीण लोकसंख्या सहकारी क्षेत्राखाली आणण्याचे निष्चित करण्यात आले. शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य भाव मिळण्यासाठी सहकारी पणनाच्या विकासावर अधिक भर देण्यात आला. पुरेशा प्रशिक्षित सेवकांची आवष्यकता स्पष्ट करण्यात आली. सहकारी तत्वांवर शेती संस्था स्थापनेला प्रोत्साहन देण्यात आले[६२].

२.५.२ पाहणी समिती (गारवाला समिती १९५१-१९५४)

पहिल्या योजनेच्या काळात श्री ए डी गोरवाला यांच्या अध्यक्षतेखाली सन १९५१ साली एक समिती नेमली गेली. या समितीने ग्रामीण कर्जबाजारीपणाचा सखोल अभ्यास करुन 'सहकारी चळवळम

[62] Shing R., Indian Economy, Himalaya Publishing house, New Delhi, (2014).

पतपुरवठा करण्यात अयशस्वी झाली आहे. परंतु ती यशस्वी झाालीच पाहिजे असा निष्कर्ष काढला. समितीला असे आढळून आले की, ग्रामीण भागातील दोन तृतीयांश कुटुंबे कर्जबाजारी आहेत. ग्रामीण भागात सहकारी संस्थांकडून फक्त ३ टक्के कर्जपुरवठा केला जातो. म्हणून या समितीने ग्रामीण भागात दोन तृतीयांश कुटुंबांना कर्ज पुरवठा करता यावा म्हणून काही शिफारशी केल्या त्या पुढीलप्रमाणे आहेत.

१- राज्य सरकारची भागीदारी - सहकारी संस्थांच्या भाग भांडवलात सर्व पातळीवर राज्य सरकारची ५१ टक्के भागीदारी असावी. राज्य पातळीवर संस्थांच्या भाग भांडवलात सरकारची प्रत्यक्ष भागीदारी असेल. जिल्हा पातळीवरील संस्थेत सरकारीची भागीदारी राज्य पातळीवरील संस्थेमार्फत राहिल. प्राथमिक पातळीवरील संस्थेत ही भागीदारी राज्य व जिल्हा पातळीवरील संस्थेमार्फत राहील. खरेदी-विक्री व प्रक्रिया संस्थेच्या बाबतीत प्रत्येक पातळीवर राज्य सरकारची भागिदारी प्रत्यक्ष असेल.

२- दीर्घ मुदती निधी - राज्य सरकारांना सहकारी संस्थांच्या भागभांडवलात भागीदारी करता यावी . यासाठी रिझर्व्ह बँकेने एक राष्ट्रीय शेती पुरवठा निधी स्थापन करावा. या निधीत सुरुवातीला रु १० कोटी टाकावेत.

३- पिक तारण कर्ज - पिकांचा खर्च लक्षात घेवून पीक तारण कर्जाचा दर ठरविण्यात यावा. कर्ज रोखे व वस्तू स्वरुपात दयावे. पिकावर संस्थेचा कायदेशीर बोजा असावा.

४- पतपुरवठा व खरेदी-विक्री यांची सांगड-पतपुरवठा व खरेदी-विक्री यांची सांगड घालण्यात यावी. त्यासाठी प्राथमिक खरेदी-विक्री संस्था स्थापन करण्यात याव्यात. शेतकी पतपुरवठा सहकारी संस्थेने सभासदास दिलेल्या कर्जाची वसूली खरेदी-विक्री संस्थेमार्फत सभासदांनी विकलेल्या मालाच्या रकमेतून करावी.

५- मोठया सहकारी संस्था- लहान आकाराच्या संस्थांची पुनर्रचना एकत्रीकरण करुन मोठया आकाराच्या अर्थक्षम सहकारी संस्था स्थापन करण्यात याव्यात.

६- सेवकांचे प्रशिक्षण - सहकारी संस्थेचे पुनर्संघटन करण्यासाठी प्रशिक्षित सेवकांची आवश्यकता आहे. त्यासाठी सर्व पातळीवर त्यांच्या प्रशिक्षणाची सोय करावी. त्यांचे प्रशिक्षण केंद्रिय सहकारी प्रशिक्षण समिती यांचे मार्गदर्शनाखाली करावे.

७- खास निधी - दुष्काळ व इतर कारणाने अल्पमुदतीच्या कर्ज परतफडीत अडचण निर्माण झाल्यास राज्य सहकारी बँकांना मध्यम मुदतीचे कर्ज देण्यासाठी राष्ट्रीय शेतीपुरवठा निधी (स्थैर्य निधी) स्थापन करण्यात यावा. सुरुवातीला त्यात रु. १ कोटी टाकण्यात यावे. रिझर्व्ह बँकेने दरवर्शी त्यात रु. १ कोटी टाकावे. त्याचप्रमाणे सहकारी पतपुरवठयाच्या यंत्रणेला मोठया प्रमाणात आघात होणारी परिस्थिती निर्माण झाल्यास त्याला तोंड देण्यासाठी राष्ट्रीय शेतीपुरवठा निधी (मदत व तारण) निर्माण करण्यात यावा. सुरुवातीला या निधीत रु.१ कोटी टाकण्यात यावेत. शेतकी मंत्रालयाने दरवर्षी त्यात रु १ कोटीची भर टाकावी.

८- स्टेट बँक ऑफ इंडियाची स्थापना करण्यात यावी - ग्रामीण भागात शाखा उघडण्यात याव्यात.

२.५.३ दुसरी पंचवार्षिक योजना (१९५६-१९६१)

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत अल्पमुदती कर्ज रु १५० कोटी मध्यम मुदती कर्ज रु ५० कोटी व दीर्घ मुदती कर्ज रु २५ कोटी अशी पतपुरवठयांची उद्दिष्टे ठेवण्यात आली. या योजनेत पुढील गोष्टीवर भर देण्यात आला होता. मोठया आकाराच्या सहकारी संस्था स्थापन करण्यात याव्यात. जिल्हा पातळीवर जिल्हा सहकारी बँका स्थापन करण्यात यावी. केंद्रीय व राज्य वखार गृह स्थापन करण्यात यावीत. प्रक्रियेच्या कार्याला गती दयावी. सहकारी खाते व सहकारी संस्था सेवक प्रशिक्षण, संस्था पदाधिकारी व सभासद शिक्षण याबाबत तरतूद करण्यात आली.

भारत सरकारने 'समाजवादी समाज रचनाम यासाठी सहकार हे माध्यम मान्य केले. १९५८ साली वैकुंठ मेहता यांच्या अध्यक्षतेखाली

'सहकारी पतपुरवठा समितीम नियुक्त करण्यात आली. तारण न पाहता कारण पाहून कर्ज पुरवठा करावा अशी महत्त्वपूर्ण शिफारस या समितीने केली. सेवा सहकारी संस्था अर्थक्षम होण्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या उपाययोजना सुचविल्या. १९६० साली डॉ. पी नरेशन[६३] यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने ग्राहक सहकारी संस्थांचे संदर्भात महत्त्वाच्या शिफारशी केल्या. ग्राहक सहकारी संस्थांची रचना कोणत्या प्रकारची असावी याबाबत निष्चित असे वर्गीकरणाबाबत आपली भूमिका स्पष्ट केली.

२.५.४ तिसरी पंचवार्षिक योजना : (१९६१ ते १९६६)

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत रु ५३० कोटी अल्पमुदती कर्ज आणि रु. १५० कोटी दीर्घ मुदतो कर्ज असे पतपुरवठयाचे उद्दिष्ट ठरविण्यात आले होते. या योजनेत पुढील गोष्टींवर भर देण्यात आला. पंचवार्शिक योजनेच्या शेवटी चळवळीने सर्व खेडी व ग्रामीण लोकसंख्येच्या ६० टक्के लोकसंख्या क्षेत्राखाली आणली पाहिजे सर्व पातळीवर सहकारचा सहभाग असावा, सहकारी संस्था अर्थक्षम करण्यासाठी त्यांना व्यवस्थापकीय अनुदान दयावे.[६४]

२.५.५ ग्रामीण व शहरी भागात जीवनावश्यक वस्तुंचे वितरण :

ग्राहक सहकारी भांडारामार्फत करावे. राज्य पातळीवरील सहकारी संघ व जिल्हा पातळीवरील जिल्हा सहकारी मंडळे, सहकारी शिक्षण व प्रशिक्षणाची जबाबदारी पेलण्यासाठो शक्तीमान करावीत. सहकारी गृहनिर्माण, सहकारी शेती, मत्स व्यवसाय, दुग्ध व्यवसाय इत्यादी शेतीपूरक विषयीच्या कार्यक्रमांचा समावेश या योजनेत करण्यात आला. १९६३ मध्ये श्री व्ही डी एल मेहता यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली

63 Shing R., Indian Economy, Himalaya Publishing house, New Delhi, (2014).
64 Shing R., Indian Economy, Himalaya Publishing house, New Delhi, (2014).

हेाती. विविध पातळीवरील सहकारी खात्याच्या रचनेचा आढावा घेवून या समितीने प्रशासन, हिशेब तपासणी, देखरेख व सेवकांचे प्रशिक्षण याबाबत महत्त्वाच्या शिफारशी केल्यात. १९६४ साली प्रोफसर एम एल दातवाला यांचे अध्यक्षतेखाली एक समिती नेमली. या समितीने सहकारी खरेदी-विक्रीसाठी दोन स्तरीय रचना सुचविली. १९६४ मध्ये श्री आर एन मिर्धा यांचे अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली. शेतकी सहकारी पतपुरवठा संस्थेचे सावकाराला सभासद करु नये, शेतमालाचा व्यवसाय करणाऱ्या व्यापाऱ्याला सहकारी खरेदी-विक्री संस्थेचा परिपूर्ण सभासद करुन घेवू नये. राष्ट्रीय सहकारी बँकेच्या स्थापनेची शक्यता आजमावून पहावी अशा महत्त्वाच्या शिफारशी केल्या. मार्च १९६६ मध्ये बँकींग रेग्युलेशन ॲक्ट सहकारी बँकांना लागू करण्यात आला.

२.७.६ चौथी पंचवार्षिक योजना (१९६६ ते १९७४)

चौथ्या पंचवार्षिक योजनेत[६७] अल्प व मध्यम मुदत कर्ज रु ७५० कोटी व दीर्घ मुदत कर्ज रु ७०० कोटी असे पतपुरवठयाचे उद्दिष्ट ठरविण्यात आले होते. या योजनेची वैशिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.

१. अग्रक्रमाने लहान शेतकऱ्यांच्या गरजा भागविण्यात याव्यात

२. मोठया शेतकऱ्यांना कर्ज घेताना अधिक भाग भांडवल देण्याचे सांगण्यात यावे.

३. सहकारी खरेदी-विक्रीची रचना भक्कम करण्यात यावी.

४. ५५० शेतमाल प्रक्रिया सहकारी युनिट स्थापन करण्यात यावेत.

५. ग्राहक भांडाराचे एकत्रीकरण करुन सध्याची ग्राहक भांडारे भक्कम करावीत.

[65] Shing R., Indian Economy, Himalaya Publishing house, New Delhi, (2014).

२.५.७ अखिल भारतीय ग्रामीण पतपुरवठा / समिक्षा समिती (व्यंकटपैय्या समिती)

१९६१ साली श्री बी व्यंकटपैय्या[६६] यांच्या अध्यक्षतेखाली ही समिती नेमली गेली. त्या समितीने काही महत्त्वाच्या शिफारशी केल्या आहेत त्या पुढीलप्रमाणे.

१- अर्थक्षम सहकारी संस्थांची गरज - पतपुरवठा यंत्रणेतील प्राथमिक संस्था अर्थक्षम असावी यावर समितीने भर दिला. अर्थक्षम सहकारी संस्थांची संख्या वाढते आहे. या संस्थांची स्वतःची स्थिती भक्कम करावी, त्यांना सर्वप्रकारच्या ठेवी गोळा करणे, सर्वप्रकारच्या बँकींगच्या सेवा प्रदान करणे की ज्यात रक्कम पाठविणे व चेकची वूसली करणे यांचा समावेश असेल. दुर्बल मध्यवर्ती सहकारी बँकांची पुर्नरचना करावी.

२- कर्ज पुरवठयाचे धोरण व पध्दती - कजं देण्याची पध्दत सोपी, त्वरीत व लवचिक असावी.कर्ज माल रुपाने देताना आवष्यकतेनुसार सवलत दयावी. विविध प्रकारची पिके घेणाऱ्या शेतकऱ्यांना कॅश क्रेडीटची सोय उपलब्ध करुन द्यावी.

३- दीर्घ मुदतीचा कर्ज पुरवठा - दीर्घ मुदतीचे कर्ज देताना त्या योजनेची अर्थक्षमता व तांत्रिक सुसाहयता याचा विचार करण्यात यावा. कर्जाची परतफडीची कुवत विचारात घेवून कर्जाची मुदत ठरवावी. कर्जाच्या वापरावर काळजीपूर्वक देखरेख ठेवावी. पाणी, वीज, व खते यांच्याशी संबंध असणाऱ्या स्थानिक, शासकीय यंत्रणेशी समन्वय साधूनच कर्ज द्यावे. शेती पुनर्वित महामंडळाने समन्वय, सल्ला व कर्ज पुरवठा करावा.

४- ग्रामीण विदयुतीकरण महामंडळ - ग्रामीण भागात अतिरिक्त पंप सेटस बसवावयाचे असल्याने ग्रामीण विदयुतीकरण योजनांना भांडवल पुरवठा करण्यासाठी ग्रामीण विदयुतीकरण महामंडळ स्थापन करण्यात यावे.

---

[66]Bedi,M. S (1986) Dairy Development ,Marketing and Economic Growth , Deep and Deep Publications, New Delhi.

७- लहान शेतकरी विकास यंत्रणा – ज्या शेतकऱ्यांचे जमीन धारण क्षेत्र लहान आहे. ते आधुनिक शेतकरी आधुनिक शेती पध्दतीचा वापर करु शकत नाही. या वर्गाकडे दुर्लक्ष केल्याने त्याचा परिणाम उत्पादनावरच होणार नाही, तर त्याचे सामाजिक व आर्थिक स्वरूपाचे दूरगामी परिणाम होतील तेंव्हा लहान शेतकऱ्यांसाठी 'लहान शेतकरी विकास यंत्रणाम स्थापन करण्यात यावी.

६- रिझर्व्ह बँकेची भूमिका – ग्रामीण पतपुरवठयाचे प्रमाण व त्याचे विविध स्वरुपात या समितीच्या शिफारशीमुळे वाढ होणार असल्याने समितीने या संदर्भात रिझर्व्ह बँकेच्या भूमिकेचा आढावा घेतला. रिझर्व्ह बँक ग्रामीण पत पुरवठयाच्या क्षेत्रात पार पाडीत असून असलेली भूमिका विचारात घेता स्वतंत्र ढेशपातळीवरील यंत्रणा अनावष्यक वाटत असून अशी स्वतंत्र यंत्रणा अपुरी सिध्द होईल तेंव्हा रिझर्व्ह बँकेतच शेतकी पतपुरवठा मंडळ स्थापन करण्यात यावे.

७- व्यापारी बँकांची भूमिका – व्यापारी बँकांनी शेतकऱ्यांना प्रत्यक्ष कर्जपुरवठा करावा यासाठी बँकेने तज्ञ व योग्य अधिकाऱ्यांची नेमणूक करावी. प्रक्रिया किंवा विशिष्ट व्यापारी वस्तूंचे उत्पादन करणाऱ्या इतर सहकारी संस्थांच्या सहकार्यांने शेतकऱ्यांना उत्पादनासाठी कर्ज, तांत्रिक सल्ला मार्गदर्शन करावे, या प्रकारचे कार्य करणाऱ्या संस्थांना खेळत्या भांडवलासाठी पतपुरवठा करावा.

८- शेती पतपुरवठा महामंडळ – ज्या राज्यात सहकारी चळवळ मागे आहे त्या राज्यात शेती पतपुरवठा महामंडळ स्थापन करण्यात यावे.

९- पशुसंवर्धनासाठी पतपुरवठा सवलत – रिझर्व्ह बँकेच्या कायदयात योग्य ती दुरुस्ती करुन पशुसंवर्धन व मत्स्यपालन यासाठो पतपुरवठा करण्याची तरतूद करण्यात यावी.

१०- नोकर व नोकरभरती – पुरेशा संख्येने कार्यक्षम नोकर वर्ग आकर्शित करण्याची क्षमता सहकारी संस्थामध्ये असली पाहिजे. सहकारी पतपुरवठा संस्थांच्या महत्त्वाच्या सेवकांचे केडर निर्माण करावे. त्यामुळे प्रशासन

कार्यक्षम होईल. कार्यकारी मंडळ कार्यकारी व व्यवस्थापकीय अधिकारी यांच्या जबाबदाऱ्या निष्चित करण्यात याव्यात.

दिनांक १९ जुलै १९६९ रोजी १४ मोठया व्यापारी बँकाचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. शेतीसाठी व समाजातील दुर्बल घटकासाठी कर्जपुरवठा हा या राष्ट्रीयकृत बँकामार्फत[६७] करणे हा प्रमुख उद्देश यामागे होता. १९७० साली शिवरामन यांचे अध्यक्षतेखाली एक समिती नेमली गेली. कर्जपुरवठयाचा निनियोग संपूर्णपणे किंवा अंशतः त्याच कारणासाठी केला जात नसे. त्याचे प्रमुख कारण म्हणून शेतकरी कित्येक वर्षे कर्जात गुंतला असल्याने त्याला दैनंदिन खर्चासाठो लागणारा पैसा मिळू शकत नव्हता. त्यामुळे तो घेतलेले कर्ज अनुत्पादक कार्यावर खर्च करीत असे. या समितीने शेतकऱ्यांना खावटी कर्जे मंजूर करण्याची शिफारस केली.

१९७१ साली श्री आर सी सरैय्या[६८] यांचे अध्यक्षतेखाली बँकिंग व्यवसायाच्या अभ्यास करण्यासाठी बँकींग कमिशन नियक्त करण्यात आले. या कमिशनने 'ग्रामीण सहकारी बँकम स्थापन करण्यासंबंधी महत्त्वाची शिफारस केली. त्यानुसार दि.१ ऑक्टोबर १९७५ रोजी प्रारंभी ५ प्रादेशिक ग्रामीण बँका स्थापन करण्यात आल्या. पुढे सहकारी संस्थांच्या व्यवस्थापनात सेवकांचे प्रतिनिधी घेण्याची तरतूद महाराष्ट्रात सहकारी संस्था अधिनियम १९६० तशी तरतुद करण्यात आली. तसेच संचालक मंडळावर मागासवर्गीय व आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांना सक्तीने प्रतिनिधीत्व देण्याची तरतूदही करण्यात आली.

१९७२ साली श्री के माधवदास यांचे अध्यक्षतेखाली नागरी सहकारी बँकाचे संदर्भात रिझर्व्ह बँकने एक समिती नियुक्त केली. नागरी सहकारी बँका अर्थक्षम होण्यासाठी या समितीने अत्यंत मौल्यवान अशा शिफारशी

26. Bedi, M. S (1986) Dairy Development ,Marketing and Economic Growth, Deep and Deep Publications, New Delhi.

[68] Indian Economy, Himalaya Publishing house, New Delhi, (2014).

केल्यात. डॉ. सी डी दाते डेप्युटी गव्हर्नर, रिझर्व्ह बँक यांचे अध्यक्षेतेखाली देशातील सहकारी क्षेत्रातील थकबाकीच्या प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी एक समिती नियुक्त केली होती. थकबाकी कमी करण्याच्या दृष्टीने या समितीने महत्त्वाच्या शिफारशी करुन आपला अहवाल १९७४ साली रिझर्व्ह बँकेला सादर केला. १९७३ साली नॅशनल कमिशन ऑन ॲग्रीकल्चरने कृषक सेवा सहकारी संस्था स्थापन करण्यासाठी सुचना केली. त्याचप्रमाणे कृशक सेवा सहकारी संस्था स्थापन करण्यात आल्या.

२.५.८ पाचवी पंचवार्षिक योजनाः (१९७४ ते १९७९)

पाचव्या पंचवार्षिक योजनेत[६९] अल्पमुदती पतपुरवठा रु १३०० कोटी, मध्यम मुदती कर्ज रु ३५० व दीर्घ मुदती कर्ज रु १५०० कोटी असे पतपुरवठयाचे उद्दिष्ट ठरविण्यात आले होते. या योजनेची वैशिष्टे पुढील प्रमाणे आहेत.

१) पतपुरवठा, खरेदीविक्री, प्रक्रिया या शेतकी सहकारी संस्था सुदृढ करण्यात याव्यात.

२)अर्थक्षम ग्राहक सहकारी चळवळीची बांधणी करावी जेणेकरुन ग्राहकाधिष्टित वितरण व्यवस्थेतील ती महत्त्वाची घटक होवू शकते.

३)शेतकी पतपुरवठयाच्या बाबतीत निर्माण झालेले प्रादेशिक असंतुलन दूर करण्याचा प्रयत्न करणे, अल्प व अत्यल्प भुधारकाकडे अधिक लक्ष केंद्रित करण्यासाठी सहकारी संस्थांची पुनर्रचना करणे, मध्यवर्ती सहकारी बँकांनी एकूण पतपुरवठयांच्या २० टक्के पतपुरवठा अल्पभूधारक व दुर्बल घटकांना करावा.

१९७५ साली – श्री आर के हजारी यांचे अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली. या समितीने अल्प, मध्यम, व दीर्घ पतपुरवठा एकाच

[६९] सोळंके शे, शतक महोत्सवी सहकारी चळवळीची वाटचाल, सहकारी महाराष्ट्र परिषद विशेषांक, २००८, पृ.क्र. १८३.

यंत्रणेमाफंत करण्यात यावा अशी शिफारस केली. १९७५ साली – महाराष्ट्र सरकारने नेमलेल्या दांडेकर समितीने अल्पभूधारक यंत्रणा राबविण्यासाठी शिफारशी केल्यात. १९७६ साली –शिवरामन यांचे अध्यक्षतेखाली समिती नेमली गेली. या समितीने अनुत्पादक कामासाठी खावटी कर्जे देण्याची शिफारस केली. पाचव्या पंचवाषिंक योजनेनंतर मध्यंतरी जनता शासनाचे राजवटीत पंचवार्शिक योजनेचा कार्यक्रम न राबविता वाषिंक योजना कार्यक्रम राबविला गेला.

१९७९ मध्ये श्री बी व्ही शिवरामन यांचे अध्यक्षतेखाली एक समिती नेमले गेली. या समितीने शेती पुरवठा करण्यासाठी राष्ट्रीय शेती आणि ग्रामीण विकास बँक (नाबार्ड) स्थापन करावी अशी महत्वपूर्ण शिफारस केली.

२.५.९ सहकारी धोरणाचा सन १९७८ चा ठराव :

केंद्र सरकारने डिसेंबर १९७७ मध्ये राज्य सरकारच्या सहकार मंत्र्याची एक परिशद बोलाविली होती. या परिशदेमध्ये राष्ट्रीय क्षेत्राची वाढती क्षितीजे व राष्ट्रीय आर्थिक विकासासाठी त्याचे महत्त्व लक्षात घेता राष्ट्रीय सहकारी धोरणाचा तपशीलवार विचार या परिशदेमध्ये करण्यात आला. फब्रवारी १९७८ मध्ये मुळ ठरावाची १२ कलमे प्रस्तुत करण्यात आली. त्यानंतर एप्रिल १९७८ मध्ये ठरावातील १२ कलमावर आधरित असे ४२ कार्यवाहीचे केंद्र बिंदू निश्चित केले. प्रत्येक राज्याच्या सहकारी चळवळीस या ठरावाच्या दिशेने वाटचाल करावी लागते. या परिशदने निष्चित केलेली ठरावाची १२ कलमे खालीलप्रमाणे आहेत.

१–रोजगारास प्रोत्साहन देणाऱ्या व ग्रामीण सर्वांगीण विकासाच्या विकेंद्रीत कार्यक्रमामध्ये सहकार हे महत्त्वाचे साधन म्हणून निर्माण केलेले जाईल. पंचवार्शिक योजनेमध्ये शेती कर्ज वाटप विषयाबरोबर प्रक्रिया, ग्राहकसंस्था, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, मच्छीमार, वराहपालन, फळबाग लागवड, जंगलनिर्मिती इत्यादी बाबीवर अधिक भर देण्यात आला.

२–आर्थिक विकास व सामाजिक बदलाच्या सर्व स्थरातील नियोजनाच्या प्रक्रियामध्ये सहकारी संस्था सहभागी झाल्या पाहिजेत व त्या दृष्टीने सहाव्या पंचवार्षिक योजनेमध्ये सहकारी चळवळीस योग्य ते स्थान दिले पाहिजे.

३–अशक्त व दुर्बलांना संरक्षण देणारी म्हणून सहकारी चळवळीची वाढ केली जाईल.

४–लहान आणि अल्पभूधारक शेतकरी तसेच शेतमजूर आणि ग्रामीण कारागीर व सर्वसामान्य ग्राहक यासारखे मध्यमवर्गीय आणि कनिष्ठ उत्पन्न गटातील लोकांना सहकारी चळवळीत सहभागी होण्यास जास्तीत जास्त वाव दिला जाईल.

५–राष्ट्रीय पातळीवर सहकारी विकास घडवून आणला पाहिजे आणि सहकारी चळवळीच्या विकासातील जो प्रादेशिक असमतोल आहे तो क्रमाक्रमाने कमी केला पाहिजे.

६–स्वायत्ता व स्वावलंबी तसेच अनावश्यक बाहेरील हस्तक्षेपापासून आणि राजकारणापासून मुक्त अशी सहकारी चळवळ उभारली जाईल.

७–हितसंबंधी लोकांच्या वर्चस्वातून मुक्त असलेली व व्यापक पायावर सभासदत्व असलेल्या सुजाण सभासदांच्या सहभागाच्या आधारे सहकारी लोकशाहीची निर्मिती करावी लागेला.

८–सहकारी चळवळीतील लाचलुचपत व अनिष्ट प्रथा नामशेश केलेल्या पाहिजेत. कारण त्यामुळे सहकारी चळवळ धोक्यात येते, बदनाम होते, सहकारी तत्वांना धोका पोहचतो आणि म्हणून सहकारी खाते व सहकारी संस्था यामध्ये योग्य ते संबंध प्रस्थापित करुन गोष्टींना पायबंद घातला पाहिजे.

९–ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी अर्थक्षम, शक्तोमान आणि एकसुत्री अशी सहकारी पध्दत ग्रामीण भागात उभारण्यात येईल व त्या योगे शेती पतपूरवठा, जोडधदे, उत्पादन व विक्री व्यवस्था यांची सांगड घातली जाईल.

१०–कृषी औद्योगिक व औद्योगिक सहकारी संस्थांचे मोठे जाळे निर्माण करुन त्याद्धारे ग्राहक आणि उत्पादक यांचे अर्थपूर्ण सहकार्य निर्माण करावे लागेल.

११–सार्वजनिक वितरण व्यवस्था बळकट करण्यासाठी ग्राहक सहकारी चळवळ उभारली जाईल व ही चळवळ ग्राहकांना संरक्षण देवून किंमती स्थिर ठेवण्यासाठी काम करील.

१२–साध्या आणि शास्त्रशुध्द पध्दतीत सुत्रबध्द संघटना असलेल्या कार्यक्षम संस्था म्हणून सहकारी संस्था स्थापन झाल्या पाहिजेत.

१३–सहकारी संस्थांनी व्यावसायिक व्यवस्थापनाचा अंगीकार केला पाहिजे व त्यासाठी योग्य व्यक्तिच्या निवडीचा सतत प्रयत्न केला पाहिजे व त्याचबरोबर प्रशिक्षणाची योग्य ती व्यवस्था केली पाहिजे.

२.५.१० सहावी पंचवार्षिक योजना (१९८० ते १९८५)

सहाव्या पंचवार्षिक योंजनेत[७०] अल्पमुदती कर्ज पुरवठा रु २५०० कोटी, मध्यम मुदती कर्ज पुरवठा रु २४० कोटी व दीर्घ मुदती कर्ज पुरवठा रु ५०० कोटी करण्याचे उद्दिष्ट ठरविण्यात आले होते. या योजनेची वैशिष्टये पुढीलप्रमाणे आहेत.

१) सभासदांच्या विविध गरजांची पूर्तता करता येण्याासाठी खेडयातील प्राथमिक संस्था आर्थिकदृष्टया सुदृढ करावी.

२) सहकारी धोरण व पध्दती यांची तपासणी करुन ग्रामीण भागातील गरिब जनतेची आर्थिक परिस्थिती सुधारण्याच्या दृष्टीने पध्दतशीर प्रयत्नांची दिशा ठरवावी.

३) फलोत्पादक, अन्न प्रक्रिया, कुक्कुटपालन, मत्सपालन, पशुसंवर्धन, इत्याढीसाठी पतपुरवठा आवश्यक वस्तूंचा पुरवठा, पवन व इतर सेवा संबंधित प्राथमिक संस्थांमार्फत पुरविण्यासाठी त्यांच्या संघीय संस्थांच्या भूमिकेत आवश्यक ते बढल व एकत्रिकरण करावे, व्यवस्थापकीय जबाबदारीवरील व्यक्तिंच्या व्यावसायिक फडरच्या विकास करावा. दिनांक

---

[७०] सोळंके शे, शतक महोत्सवी सहकारी चळवळीची वाटचाल, सहकारी महाराष्ट्र परिषढ विशेषांक, २००८, पृ.क्र. १८३.

१५ एप्रिल १९८० रोजी आणखी ६ मोठया व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. दि. १२ जुलै १९८२ रोजी शेतीसाठी पतपुरवठा करण्यासाठी राष्ट्रीय शेती आणि ग्रामीण विकास बँकेची (नाबार्ड) स्थापना करण्यात आली. १९८२ मध्ये श्रीमती इंदिरा गांधी यांचे प्रेरणेने २० कलमी कार्यक्रम सहकारी माध्यमातून राबविण्यात सुरुवात झाली.

२.५.११ सातवी पंचवार्षिक योजना (१९८५ ते १९९०)

सातव्या पंचवार्षिक योजनेत[७१] अल्पमुदती कर्ज रु ५५४० कोटी, मध्यम मुदती कर्ज पुरवठा रु ५०० कोटी व दीर्घ मुदती कर्ज पुरवठा रु १०३० कोटी असे पतपुरवठयाचे उद्दिष्ट ठरविण्यात आले. या योजनेची वैशिष्टये पुढीलप्रमाणे आहेत. बहुउद्देशीय अर्थक्षम केंद्र म्हणून कार्य करण्याच्या दृष्टीने प्राथमिक शेतकी पुरवठा सहकारी संस्थांचा सखोल विकास करणे, दुर्बल घटकांना पतपुरवठयाचे क्षेत्र व्यापक करण्यासाठो व शेती साठी आवष्यक वस्तू व सेवा देण्यासाठी सहकारी धोरण व पध्दती त्यानुसार ठरविण्यात यावी, उत्तर व पूर्व भागातील अधिकारीत राज्यात खास सहकारी कार्यक्रम राबविण्यात यावेत. व्यावसायिक व्यवस्थापणाचा विकास करावा व कृतीशील क्षमता विकसित करण्यासाठी परिणामकारक पशिक्षणाची व्यवस्था करावी.

२.५.१२ आठवी पंचवार्षिक योजना (१९९२ ते १९९७)

आठव्या पंचवार्षिक योजनेत अल्पमुदती पतपुरवठा रु ७०५० केाटी, मध्यम मुदती रु ६१५ कोटी तर दीर्घ मुदती रु १६२५ कोटी असे पतपुरवठयाचे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे. सहकारी क्षेत्राच्या विकासाच्या दृष्टीने आठव्या पंचवार्शिक योजनेची वैशिष्टये पुढीलप्रमाणे आहेत.

[७१] कित्ता, पृ.क्र. १८४

१- सहकारी संस्थांना अधिक प्रमाणात स्वायत्तता प्रधान करणे व अधिक लोकशाहीभिमुख करुन स्वयं व्यवस्थापित, स्वयं नियोजित स्वावलंबी अशा यंत्रणेची सहकारी चळवळीची बांधणी करणे.

२- अर्थव्यवस्थेची उत्पादकता वाढविण्याच्या व ग्रामीण भागातील दुर्बल घटक उदाहरण लहान शेतकरी मजूर कामगार, कारागीर, मागासवर्गीय जाती जमाती व महिला यांना रोजगारांची संधी उपलब्ध करण्याच्या कार्यात महत्वाची भूमिका पार पाडता यावी यासाठी सहकारी संस्थांच्या क्षमतेत वाढ करणे.

३- आदर्श अशा कायद्यानुसार पतपुरठयांची संघटित अशी यंत्रणा भक्कम करुन तिला स्पर्धा करण्यायोग्य व अर्थक्षम करणे.

४- देशाच्या अग्रक्रमी व गरिबी निवारणाच्या योजना उदाहरण - भात, अन्नधान्य, उत्पादनाच्या खास कार्यक्रम, राष्ट्रीय तेलबिया विकास कार्यक्रम, तेलबिया उत्पादनाचा धडक कार्यक्रम इत्यादी कायक्रमांना पुरेसा पत आधार देणे, बिगर शेतकी क्षेत्र, अवर्षण प्रवण क्षेत्र, लघु जलसिंचन आणि पडीक जमीन विकास ईत्यादींचा अग्रक्रमाने विचार करणे.

५- सार्वजनिक वितरण पध्दतीचा ग्राहकांना फायदा मिळविण्यासाठी व त्यांच्या हिताचे संरक्षण होण्यासाठी ग्राहक सहकारी संस्थांची योग्य सांगड घालण्यात यावी.

६- सहकारी क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या यंत्रणांचा व्यावसायिक व्यवस्थापनात विकास प्रशिक्षण आणि सुयोग्य सेवक व्यवस्थापन धोरण यामुळे व्यावसायिक व्यवस्थापकीय सेवकांची सहकारी संस्थांतील मागणी पूर्ण करता येईल.

७- सहकारी संस्थांच्या कामकाजात स्वातंत्र्य आणण्यासाठी व त्यांना नोकरशाहीच्या नियंत्रणातून मुक्त करण्याच्या दृष्टीने सहकारी संस्थांचा आढावा घेणे.

२.५.१३ नववी पंचवार्षिक योजना : (१९९७ पासून)

एप्रिल १९९७ पासून नववी पंचवार्षिक योजना[७२] देशात सुरु झाली. या योजनेचा कालावधी सन १९९७ ते २००२ असा आहे. महाराष्ट्राकरिता या योजनेत रु ४७११५ कोटी रुपयाची तरतूद करण्यात आली. असून त्यात कृषी व संलग्न सेवा रु ३१३.१४ कोटी, ग्रामविकास ७१२.४२ कोटी, विषश क्षेत्र विकास कार्यक्रम २३६.०० कोटी, पाटबंधारे व पूरनियंत्रण १३४३७.६९ केाटी, विदयुत विकास ६८८१.७९ कोटी, उदयोग व खाणकाम ११०९.७७ कोटी, वाहतूक व दळणवळण ४१८३.७५ कोटी, सामाजिक व सामूहिक सेवा १०२०८.८९ कोटी, सामान्य सेवा १२९५.८१ कोटी या बाबींचा समावेश आहे.

नवव्या पंचवार्षिक योजनेत ग्रामीण क्षेत्रात सहकारी संस्थांना कृषी उत्पादन निर्यातीला उज्ज्वल भवितव्य आहे. नियोजनात सहकारी चळवळीस महत्त्वपूर्ण स्थान देण्यात आल्यामुळे ग्रामीण व शहरी पतपुरवठयात वाढ झाल्याने उदयोगधंदे स्थिरावले आहेत. सहकारी साखर कारखाने, सूतगिरण्या, एकाधिकार कापूस खरेदी योजना, दग्ध व्यवसाय, कुकुटपालन, निरनिराळया प्रक्रिया सहकारी संस्था यांमुळे शेतकऱ्यांना छोटे मोठे कृषी उद्योगधंदे स्थापन करणे शक्य झाले आहे. हे उदयोगधंदे ग्रामीण भागात स्थिरावलेले आहेत. आधुनिक दळवणळणातील सुविधा, पतपुरवठा, नवीन यंत्र यामुळे ग्रामीण भागात तसेच शहरी भागात सहकारी तत्त्वावर छोटे व मध्यम आकाराचे उद्योग तयार होवून त्यामाफंत ग्रामीण आणि शहरी बेकारी दूर करण्यात मदत झाली आहे. रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. शासनाच्या फलोत्पादन मोहिमेमुळे व इतर मिळणाऱ्या शासकीय सवलती व सोयीमुळे शेतीमाल निर्यात होत आहे. सहकारी चळवळीचा यामुळे उत्तरोत्तर विकास होवून ग्रामीण आर्थिक जीवनाचा पाया सहकारी चळवळीमुळे भक्कम झाला आहे. सहकारी चळवळीशिवाय दुर्बल व गरजू

[७२] कित्ता, पृ.क्र. १८७

लोकांचा विकास होवू शकणार नाही हे आपल्याला आधुनिक काळात देखील मान्य झाले आहे.

२.५.१४; १० वी पंचवार्षिक योजना आणि सदयस्थिती :

सहकारी संस्थांच्या विकासामुळे कमी साधन संपत्ती उपलब्ध असणाऱ्या लोकांमध्ये शक्ती निर्माण झाली आहे. ग्रामीण गरीब, अल्प भूधारक, अत्यल्प भूधारक, शेत मजूर व कारागीर यांना सावकारांच्या पाशातून सोडविण्याचे सहकारी चळवळीचे उद्दिष्ट आहे. भारतात आज प्राथमिक शेतकी पतपुरवठा संस्थांचे (पॅक्स) चे विस्तृत जाळ निर्माण झाले आहे. बहुतेक राज्यात जिल्हा व राज्य पातळीवर सहकारी संस्थांचे संघ निर्माण झाले आहेत. गेल्या काही वर्षात सहकारी संस्थांनी आपल्या कार्याच्या कक्षा विस्तृत केल्या आहेत. त्यात पुरवठा, अधिकोष, साधनसामग्री वितरण, कृषीमाल प्रक्रिया, साठवणूक या कार्याचा समावेश होतो. दूग्ध व्यवसाय व तेलबिया प्रक्रिया कार्यामुळे सहकारी संस्था खाजगी क्षेत्राच्या तोडीचे घटक या नात्याने उत्पादक व ग्राहक यांच्या फायदयासाठी महत्त्वाचे क्षेत्र म्हणून पुढे आल्या आहेत. आज ६० टक्के हातमाग देशातील एकूण कापड उत्पादनाच्या ३० टक्के उत्पादन सहकारी क्षेत्रात करतात. जवळपास ३० हजार कारागिर व औदयोगिक सहकारी संस्था या क्षेत्रात काम करीत आहेत. ग्राहक संरक्षणाच्या क्षेत्रात सुध्दा सहकारी संस्थांनी भरीव कामगिरी केली आहे. त्यांना व्यवस्थापनाच्या कार्यात स्वातंत्र्य दिल्यास त्या मजबूत व कार्यक्षम म्हणून पुढे येतील.

तथापि देशाच्या सर्वच भागात सहकारी चळवळीची वाढ झालेली नाही. याची कारणे प्रामुख्याने पुढील प्रमाणे आहेत. प्रभावशाली हितसंबंधी यांचे गटांचे नियंत्रण कमकुवत व्यवस्थापन, सहकारी संस्थाचे उच्च स्तरीय, संस्था व सरकारवर आर्थिक सहाय्यासाठी निर्भरता आणि मर्यादित स्वरुपाचे व्यावसायिक कार्य ही होत बचतीच्या कार्याला योग्य महत्त्व न दिल्यामुळे

भांडवलाचा तुटवडा व पर्यायाने आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांना सेवा पुरविण्यात त्यांची असमर्थतता यात त्याची परिणती झाली आहे. ग्रामीण पतपुरवठा समिक्षा समिती (एसीआरसी) व या समितीच्या शिफारशीच्या अंमलबजावणी करणाऱ्या समितीने प्रत्येक संस्थेच्या व्यवसाय विकास योजनेच्या कार्यक्रमात कर्ज पुरवठयातील विविधतेसाठी ठेवी मिळवून अंतर्गत भांडवल निर्मिती करुन फायदेशीर बिगर पतपुरवठा सेवा क्षेत्र विस्तृत करणे यावर भर दिला. स्वयंमदतीचे गट (सेल्फ हेल्प ग्रुप) यासंबंधीच्या कार्यगटाने (वर्कींग ग्रुप) प्राथमिक शेतकी संस्थांत कामकाजात सुधारणा धडवून आणणारी ही दुय्यम पध्दती असल्याची महत्त्वाची शिफारस केली आहे. गट सदस्यांना त्यांच्या उत्पादनाची पातळी विस्तृत करुन आवश्यक गुंतवणूक शक्य होण्यासाठी प्राथमिक शेतकी पतपुरवठा संस्थांची आधारभूत साधनसंपत्ती मजबूत करण्याची आवश्यकता आहे. साधनसामग्री मिळवणे, त्यांचे योग्यवेळी वितरण करणे. त्याचप्रमाणे उत्पादनासाठी आवश्यक साधनसामुग्रीची गुंतवणूक करणे, उत्पादनावर प्रक्रिया करणे, साठवणूक व्यवस्था करणे आणि त्यांचे पनन इत्यादीसाठी संघटित प्रयत्न करणे आवश्यक आहे.

सहकारी क्षेत्रांशी संबंधित प्रश्नांपैकी त्यांचे सोयोग्य व्यावसायिक व्यवस्थापन करणे हा एक प्रमुख प्रश्न सहकारी क्षेत्रांपुढे आहे. सहकारी संस्थांना जर अधिक खुल्या आर्थिक काळात स्पर्धा करावयाची आहे, तर सरकारने सहकारी संस्थांचे व विषशतः सहकारी प्रक्रिया संस्थाचे व्यवस्थापन हे व्यावसायिक व्यवस्थापन करावे.[७३] सहकाराच्या सर्वांगीण विकासासाठी हे आवश्यक आहे. यासाठी सहकारी संस्थांना कार्यानुरुप स्वायत्तता देण्याची गरज सरकारना पटवून दिली पाहिजे. नव्या योजनेतील धडक क्षेत्र कार्यक्रमातील कार्यांना संस्थांकडून पतपुरवठा करण्यात यावा. काही धडक क्षेत्रे पुढीलप्रमाणे आहेत.

[७३] कित्ता, पृ.क्र. १८७.

१– पशुविकास, भुजल संधारण उपाय, पाण्याचा निचरा, क्षारयुक्त जमीन इत्यादी.

२– लघु सिंचन, कुप नलीका, विहिरी, तळे यांचा विकास

३– फलोद्यान उत्पादनाची कृषी प्रक्रिया

४– परंपरागत व अपरंपरागत क्षेत्रात जास्त उत्पादन देणाऱ्या जातींची पिके घेण्यास चालना

५– पशुसंवर्धन व दुग्ध विकास, (कुक्कुटपालन, वराहपालन व रेशीम उद्योग)

६– बिगर शेतकी क्षेत्रात आर्थिक व तांत्रिक सहाय्यासाठी ग्रामीण कारागीर व ग्रामीण लघु व्यवसाय यांना प्रोत्साहन

७– शेतकी व ग्रामीण विकास बँकांच्या सहज व कार्यक्रम कार्यासाठी आणि राष्ट्रीय पातळीवरुन प्राथमिक भूविकास बँकांना पुरेसा व वेळेवर पतपुरवठा उपलब्ध होण्यासाठी उपाय योजना करणे.

कृषी क्षेत्रातील मुदती कर्जाची मागणी पूर्ण करण्यासाठी शेतकी व ग्रामीण कामाची सहजता व कार्यक्षमता राखण्यासाठी प्रयत्न करण्यात येईल. राष्ट्रीय शेती व ग्रामोण विकास बँकेने बिगर शेतकी क्षेत्रात कारगीर, शेतमजूर, कुटिरोद्योग व ग्रामीण लघुव्यवसाय यांना पतपुरवठा सुरु केला आहे. नवव्या योजनेत हे कार्य सखोल करावयाचे आहे की, जेणे करुन ग्रामीण लोक विशेशकरुन महिला व युवक यांना परंपरागत शेती व्यतिरिक्त फायदेशीर राजगार मिळू शकेल. शेतकी पतपुरवठा समिक्षा समितीने पतपुरवठयाच्या तीन यंत्रणेचे परिक्षण करुन असे सुचविले की, प्रादेशिक ग्रामीण बँकांची उभारणी अर्थक्षम नसल्याने त्यांना व्यापारी बँकात समाविष्ट करण्यात यावे व सध्या अस्तित्वात असलेल्या नाबार्ड ऐवजी भारताची राष्ट्रीय सहकारी बँक असावी.[७४]

भारताचे अन्नधान्य महामंडळ, केंद्रीय वखार महामंडळ, राज्य वखार महामंडळ व राज्य यंत्रणा यांची एकूण साठवणूक क्षमता, १ जुलै १९९१ रोजी

[७४] कित्ता, पृ.क्र. १९०.

४२.९ दशलक्ष टन होती. नवव्या योजनेत अन्नधान्याच्या साठवणूकीसाठी अतिरिक्त अन्नधान्य क्षमता २०.० लाख टन, खते व साधन सामुग्री, ताग, कापूस इत्यादींच्या साठवणूकीसाठी ७०.०० लाख टन क्षमतेची व्यवस्था केली जाईल. निर्यात करावयाच्या फलोद्यान व इतर शेतकी उत्पादनासाठी खास साठवणूक सोय करण्यात येणार आहे.

शेतमालाच्या पडत्या किंमतीच्या काळातील विक्रिला प्रतिबंध करण्याच्या उद्देशान ग्रामीण विकास खात्याने ग्रामीण गोदाम योजना सुरु केली होती. मार्च २००० पर्यंत ३०.३३ लाख टन क्षमतेची ७५७४ ग्रामीण गोदामे बांधण्यात आली आहेत.[७५] प्रत्येक अर्थक्षम प्राथमिक शेतकी पत पुरवठा संस्थेला व पवन संस्थेला साधनसामुग्री गृहोपयोगी वस्तू वितरणासाठी व शेतमालाची साठवणूक करण्यासाठी पुरेशा गोदामाची सोय करण्याचे प्रयत्न करण्यात येतील. अतिरिक्त साठवणूक क्षमता ३० लाख टन व अतिरिक्त शितगृह साठवणूक क्षमता १०.० लाख टन नवव्या योजनेत उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. सहकारी साखर कारखाने, सुतगिरण्या, भात गिरण्या इत्यादी कृषी उद्योग स्थापन करण्यात राष्ट्रीय सहकारी विकास निगम सहाय्य करीत आहेत. देशातील एकूण साखर उत्पादनाच्या ६० टक्के उत्पादन ऊस उत्पादकांच्या सहकारी संस्था करीत आहेत. कापूस व तेलबिया सहकारी प्रक्रिया संस्थांनी वेगाने प्रगती केली आहे. भांडवलाच्या उत्पादतेनुसार ४९ नवीन सहकारी साखर कारखाने, २८ अतिरिक्त सुतगिरण्या, आणि २१ एकात्मिक तेलबिया प्रक्रिया उद्योग स्थापन करावयाचा प्रस्ताव आहे. फळे व भाजीपाला या संबंधीच्या कृषी-प्रक्रियेत शेतकऱ्यांच्या सहकारी संस्थांच्या विकासास बराच वाव आहे. हे प्रक्रिया युनिट एकात्मिक प्रकल्पांचा भाग असावेत, उत्पादन हे कृषी प्रक्रियेशी जोडण्यात येवून त्याला उपपदार्थ उत्पादनाचा आधार असावा. निर्धारित क्षमतेपेक्षा कमी क्षमतेचा वापर कार्यक्षम तांत्रिक व आर्थिक व्यवस्थापनाचा

[७५] कित्ता, पृ.क्र. १९२

अभाव या सहकारी फळे व भाजीपाला प्रक्रिया संस्थेच्या प्रमुख अडचणी आहेत. नवव्या योजनेत शेतकरी उत्पादकांना अधिक मुल्य प्राप्त होण्यासाठी या सहकारी सस्थांच्या विकासाकरिता प्रयत्न करावयाचे आहेत. शासनाने बरेच बदल सुचविलेल्या क्षेत्रात सहकारी संस्थांना शेतमालाचे पवन, पवनची यंत्रणा निर्मिती, कृषी-प्रक्रिया उद्योगाची स्थापना इत्यादी क्षेत्रात कार्य करण्याची संधी उपलब्ध हेात आहे.

२.६ समारोपः

प्रस्तूत प्रकरणामध्ये सहकारी चळवळीचा झालेली वाढ व विकासाचा अढावा घेण्यात आला आहे. काळाच्या विविध टप्प्यावर सहकारी चळवळीचा कसा विकास होत गेला याचा सविस्तर आढावा या प्रकरणात घेतला आहे. विशेषत: माग्गिइल दहा-आकरा पंचवार्षीक योजना, सहकारातील दोष दूर करून सहकाराला अधिक लोकाभिमूख करण्यासाठी नेमलेल्या समित्या आणि आयोगाच्या शिकारशी व त्यांच्या अंमलबजावणीसंबधिचा सविस्तर आढावा प्रस्तूत प्रकरणात घेण्यात आलेला आहे.

प्रकरण तिसरे

सोलापूर जिल्हयातील सहकारी साखर कारखाने आणि राजकारण

प्रकरण तिसरे

सोलापूर जिल्हयातील सहकारी साखर कारखाने आणि राजकारण

३ .१ प्रस्तावना

३ .२ भारतातील साखर कारखान्याची सद्यस्थिती

३ .३ महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्याची सद्यस्थिती

३ .४ सोलापूर जिल्ह्याातील साखर कारखान्याची सद्यस्थिती

३.४.१ बंद पडलेला भोगावती सहकारी साखर कारखाना

३. ५ आकडेवारीचे विश्लेषण

३.५.१ सभासदांची साक्षरता

३.५.२ शेतकऱ्यांची जमीन स्त्रोत

३.५.३ ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्या

३.५.४ ऊस उपादनाचा खचं

३.५.५ अभ्यास क्षेत्रातील शेतकरी आणि राजकीय स्थिती

३.५.६ अभ्यास क्षेत्रात सहकाराच्या तत्तवाचे पालन

३.५.७ अभ्यास क्षेत्रातील तालुकानिहाय आकडेवारीचे विश्लेषण

३.५.७.१ सत्ताधारी राजकीय पक्ष

३.५.७.२ सभासद शेतकऱ्यांची राजकीय स्थिती

३.५.७.३ अभ्यास क्षेत्रातील संचालक मंडळ आणि तत्त्वांची माहिती

३.६ समारोप

प्रकरण तिसरे

सोलापूर जिल्ह्यातील सहकारी साखर कारखाने आणि राजकारण

३ .१ प्रस्तावनाः

सहकार क्षेत्रातील विकासाच्या बाबतीत महाराष्ट्र भारतात सर्वात अग्रेसर आहे.भारतातील सहकार चळवळीमध्ये गुंतलेल्या खेळत्या भांडवलाचा १/६ भाग महाराष्ट्रातील सहकारी क्षेत्रामध्ये गुंतला आहे ख़ेळते भांडवल ठेवी, स्वमालकीचा पैसा, भांडवल, सभासदत्व व सहकारी संस्थाची संख्या या सर्वच बाबतीत महाराष्टाचा क्रमांक पहिला आहे. १९६० मध्ये महाराष्ट्राचे एक भाषिक राज्य निर्माण झाल्यापासून सहाकारी चळवळ वाढू लागली आणि उत्तरोत्तर सहकारी चळवळीत विविधता आलेली आहे.१९८४ मध्ये महाराष्ट्रात कृषी संबंधित अशा विविध उपक्रमात गुंतलेल्या ७१००० पेक्षा अधिक सहकारी संस्था होत्या त्यांच्या उपक्रमांत कर्ज वितरण, साखर उद्योग, भाताच्या गिरण्या, कृषी उत्पादनावर प्रक्रिया करण्याची केंद्रे, सुतकताईच्या गिरण्या इत्यादींचा समावेश होतो. ग्राहकांना वस्तू पुरवठा आणि घर बांधणी अशा क्षेत्रातील काम करण्यासाठी सहकारी संस्था स्थापन झाल्या आहत प़ण साखरेच्या कारखान्यांचा विकास हे राज्यातल्या सहकारी चळवळीचे सर्वात लक्षणीय वैशिष्टये आहे .

महाराष्ट्रातील चळवळीच्या विस्तारापेक्षा अधिक महत्वाची गोष्ट म्हणजे सहकारी चळवळीचा दर्जा, आणि सहकारी संस्थांची स्वायत्तता हा गुण विशेष प्रमाणात आहे .महाराष्ट्र राज्य सहकारी पतपेढी ही बलवान संस्था असून या चळवळीने प्रक्रियात्मक उद्योगांना विशेषतः साखर उद्योगांना प्रगती करण्यास पोत्साहन व प्रत्यक्ष मदत दिली आहे. १९८२ ते १९८३ मध्ये ६१२ कोटी रूपये साखर कारखान्यांना, १८२ कोटी रूपये तालुका पतपेढयांना आणि ८८ कोटी रूपये विक्रो संस्थांना दिले आहेत. पतपेढीच्या उद्योगांच्या दुर्बल घटकांचा विकास करण्यासाठी ही मदत केली आहे. १९८० नंतरच्या दशकातील संभाव्य

वित्त विकासाबद्दल ज्येष्ठ अर्थतज्ञ श्री.धंनजयराव गाडगीळ यांनी म्हटले आहे की,''जिथे महत्वाची व्यापारी पिके काढली जातात अशा बऱ्याच विभागातील मोठया शेतकऱ्यांच्या गरजा पीक कर्ज योजनेमुळे जवळजवळ पुर्णपणे भागविल्या जातील, 'जमीन किंवा हवामानाची परिस्थीती यामुळे जे लहान शेतकरी कमी खर्चाची पिके घेतात त्यांचा पीक कर्ज योजनेमुळे तितका फायदा होणार नाही''.[७६]

शेतकरी वित्तपूरवठयाच्या संकल्पनेत सहकारी संस्थाचा समाजातील ढुर्बल घटकांचा अंतर्भाव करून या संकल्पनेचा विस्तार करण्यासाठी पतपेढीत प्रयत्न केला आहे प़रंतु या संदर्भात काही मर्यादांची तपासणी करणे आवश्यक आहे.खेडेगाव पातळीवरील प्राथमिक संस्थांमध्ये तग धरण्यास असमर्थ असून नुकसानीस चालणा देणाऱ्या अनेक संस्थांचा समावेश आहे त्यामुळे परतफड विलंब हा मोठाप्रश्न निर्माण झाला आहे .पतपेढयाचे दैनंदिन वित्त व्यवहार व विकासार्थ वित्तव्यवहार यांच्या मिलाफाविशयीचा सुस्पष्ट दृष्टीकोन अजून निर्माण व्हायचा आहे. गेल्या काही वर्षात व्यापारी पतपेढयांच्या मानाने सहकारी पतपेढया मागे पडल्या आहेत .

चळवळीतील दोष दूर करणे, खेडेगाव व जिल्हापातळीवरील नियोजनाचा विकास व सहकारी चळवळ अधिक जोरदार बनवणे यामध्ये यश मिळालेले नाही . कमी मुदतीचे अर्थव्यवहार व भूविकास अर्थव्यवहार यांची सांगड घालण्यात पुष्कळ काम करावयाचे राहून गेले आहे शेती हा भारतीय अर्थव्यवसस्थेचा महत्वाचा कणा आहे .दिवसेंदिवस शेतीवर मोठया प्रमाणावर संकटे कोसळत आहेत. आज शेतीवर ६७ टक्के लोकसंख्या अवलंबून आहे . आपल्या देशात पूर्वी कापड उदयोग मोठया प्रामाणात होता मात्र त्याची वाताहत झाल्याने हा उदयोग पूर्णतः मोडकळीस आला आहे क़ापड उदयोगानंतर भारतात ऊस व त्यावर अवलंबून असणारी साखर कारखानदारी मोठया प्रमाणात विस्तारली आज आपल्या देशात २१८ सहकारी तर २६६

---

[76] ñ_¥Vr J«§W, _hmamîQ´> amÁ` ghH$mar g§K _`m©{XV,nyUo-2005 µ

खाजगी असे एकूण ४८४ साखर कारखाने असून त्यावर ५ ते ६ कोटी कुटुंबे अवलंबून आहेत[७७]. शिवाय १० ते १५ लाख कामगारांना यातून हक्काचा रोजगार उपलब्ध झाला आहे या व्यतिरिक्त साखर उदयोगावर इतरही अन्य लघु उदयोगावर १० हजार ऊस तोडणी मजूरांची गरज भासते एकूणच ४८४ साखर कारखान्यावर ५० लाख ऊस तोडणी कामगार काम करत असतात लक्षावधी लोकांना रोजगार उपलब्ध करून देणारा आणि देशाची आर्थिक सुबत्ता वाढवणारा उदयोग म्हणून साखर उदयोगाकडे पाहिले जाते.

जगामध्ये ब्राझिल देशापाठोपाठ आपला भारत देश दुसऱ्या क्रमांकाचा सर्वाधिक साखर उत्पादक देश आहे आपल्या देशात तयार होणाऱ्या साखरेपैकी सुमारे १७ लाख टन साखर दरवर्षी निर्यात करतो तरीही बदलत्या परिस्थितीमुळे आणि सरकारी धोरणामुळे साखर आयात करण्याची पाळी येते या धोरणातील काही त्रुटी सुधारल्या नाहीत, तर साखर उदयोगाची स्थिती कापड उदयोगाप्रमाणे झाल्याशिवाय राहणार नाही एकूणच हा उदयोग पूर्णतः मोडकळीस येईल परिणामी त्यावर अवलंबून आसणाऱ्या शेतकरी, कामगार, ऊस तोडणी मजूर, लघु उदयोजक इत्यादी सर्वच घटकांचे दैंनदिन जीवनमान धोक्यात येईल तेव्हा शासनाने साखर उद्योग आणि त्यावर अवलंबून आसणाऱ्या घटकांचा विचार केला पाहिजे[७८].

साखर उदयोगातून साखर, अल्कोहोल सह वीज निर्मिती, गॅस आणि मळी यासारखे अनेक उपपदार्थांची निर्मिती होतात. सन २००८-२००९ या हंगामात १८८ लाख टन साखरेचे उत्पादन झााले, २०१० - २०११ या हंगामामध्ये २८० लाख टन साखर उत्पादन झाले होते. जर या साखर उद्योगाला शासनाचे योग्य बळ नियोजन आणि योग्य भाव मिळाला तर आपण ३०० ते ३१० लाख टन साखर उत्पादित करू शकतो आणि या उत्पादनातून आपल्या देशाची गरज भागवून परदेशातही निर्यात करू शकतो गेल्या दोन वर्षापासून देशात निसर्गाची कृपा झाल्याने शेतकरी राजा सुखावला त्यामुळे

---

[77] _hmamîQ´>mVrc ghH$mar Midi…EH$ X¥îQ>rjon,2007 µ

[७८] महाराष्ट्रातील सहकारी चळवळः एक दृष्टीक्षेप,२००७ .

ऊसाबरोबर अन्य कृषी उत्पादनही बऱ्यापैकी झाले आहे प़र्यायाने साखर उदयोगाला बऱ्यापैकी दिवस आले आहेत म़ात्र बदलत्या साखर धोरणामुळे या उदयोगावर सतत अरिष्टे कोसळत आहेत .मग प्रष्न येतो तो येथे कुठेतरी धोरणात्मक निर्णय चुकत आहेत . साखर उदयोगाबाबत नियोजन करून आर्थिक धोरण आखणे गरजचे आहे असे केले नाही तर हा उद्योग रसातळाला जावू शकतो अशी परिस्थिती असतानाही आपल्याला १० ते १५ लाख टन साखर आयात करावी लागते प़रिणामी येथील साखरेचे भाव गडगडतात. आयात साखरेवर आयात कर शुल्क आकारल्याने याचा फटका भारतातील साखर कारखानदार, शेतकऱ्यांना मोठया प्रमाणात बसला य़ाचा लाभ मात्र ब्राझील, थायलंड, इंडोनेशिया मधल्या साखर कारखानदारीला झाला .

भारतात मात्र महागाई दिवसेंदिवस वाढत आहे. स़ाखरेचे भाव गगनाला भिडले आहेत, त्यामुळे साखरेचे भाव खाली आणा, साखरेवर शासनाचे संपूर्ण नियंत्रण आणा, अशा मागण्या करू लागल्याचे चित्र सतत दिसत आह[७९]. दुसरीकडे भारतातील ५ कोटी शेतकऱ्यावर अन्याय झाला तरी चालेल, देशातील ४८४ साखर कारखाने तोटयात गेले तरी चालेल तथापि जनमत सरकारच्या विरोधात जाणार नाही याची पुरेपूर काळजी शासनाकडून घेतली जात आहे. वास्तविक पाहता दशातील ४८४ साखर कारखान्यातून दरवर्षो १ लाख कोटी ३ लाख रूपयांची साखर उत्पादित होते. त्यामळे कोटयावधी शेतकऱ्याची क्रयशक्ती वाढते ल़ाखो कामगारांना रोजगारांचे साधन उपलब्ध होते. असे असताना आपण साखर उदयोगाचा नाश उघडया डोळयांनी पाहत आहोत असेच सध्याचे चित्र आहे श़ासन नहमी शेतकऱ्यांना मदत करण्याची पोकळ अश्वासने देते. छरंतु एक वषं ऊसाला चागला भाव दिला तर पुढील दोन – तीन वर्ष ऊसाला योग्य भाव मिळत नाही परिणामी या सर्व अनिश्चिततेतून सामान्य शेतकरी वर्ग पुर्णपणे खचला जात आहे आणि त्याची कुचंबना होताना दिसत आहे.

३.२ भारतातील साखर कारखान्याची सद्यस्थितीः

[७९] महाराष्ट्रातील सहकारी चळवळः एक दृष्टीक्षेप, २००७ .

सहकारांच्या माध्यमातून महाराष्ट्रातील ग्रामीण भागात नेत्रदिपक प्रगती झाल्याचे दिसून येते. महाराष्ट्रातील एकूण सहकारी चळवळीपैकी सहकारी साखर उदयोगांचे कार्यच संपूर्ण सहकारी चळवळीला पोषक व अश्वासित असल्यामुळे सहकारी साखर उदयोगाशिवाय सहकाराचे कार्य अपूर्ण असल्याचे दिसते. १९९१ च्या खुल्या आर्थिक धोरणामुळे केंद्र व राज्य सरकार सहकारी चळवळीकडे एक विकासाची पमुख प्रक्रिया म्हणून पाहत होते. भारताच्या पहिल्या आठ पंचवार्षिक योजना मध्ये सहकारी चळवळीच्या विकासाबाबत विशेष तरतूद करण्यात येत होती य़ामुळे सहकारी चळवळ विकसित होत गेली भ़ारतातील साखर उद्योगाची स्थिती हे पुढील तक्त्यावरून दिसून येते. य

तक्ता क्रमांक ३ .१

महाराष्ट्रातील सहकार, खाजगी साखर कारखाने २०१३.१४

अ. क्र.	विवरण	संख्या
१	सहकारी कारखाने	२४९
२	खाजगी साखर कारखाने	२७६
३	साखर उद्योगावर अवलंबून कुंटुबे	५ ते ६ कोटी
४	कामगार संख्या	१५लाख

(स्त्रोत –महाराष्ट्रातील सहकारी चळवळ एक दृष्टीक्षेपात २०१३–१४)

वरील तक्त्यावरून भारतातील साखर उदयोगाची स्थिती दिसून येते. या शिवाय देशातील सहकारी साखर उदयोगावर अवलंबून असणाऱ्या लोकांची स्थिती दिसून येते ख़ाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणामुळे केंद्र व राज्य सरकारांनी सहकारी चळवळच्या विकासाकडे १९९१ नंतर दुर्लक्ष केल्याचे दिसते य़ा सर्वांचा परिणाम म्हणून सहकारी चळवळ व पर्यायाने सहकारी साखर उद्योग अडचणीत आल्याचे दिसते व़ास्तविक पाहता भारतात साखर उद्योग हा दुसऱ्या क्रमांकाचा उद्योग आहे भ़ारतातील साखर उद्योगात जवळ जवळ ५ ते ६ कोटी लोकांना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रोजगारांच्या संधी

उपलब्ध होताना दिसून येते विषश करून ग्रामीण भागाला साखर उद्योग हा वरदान ठरलेला असून ग्रामीण भागांचा विकास झालेला दिसतो रोजगार निर्मिती, रस्त्याची बांधणी, पाण्याचे बंधारे, दुग्ध व्यवसाय, पशुपालन, शेळी-मेंढी पालन, कुकुटपालन, वाहतुक सुविधा, शिक्षण, आरोग्य, प्रशिक्षण संस्था, सांस्कृतिक व क्रिडा संस्था अशा अनेक सुविधा साखर कारखान्यामुळे ग्रामीण भागापर्यंत पोहचू शकल्या आहेत. म्हणून साखर उद्योग वरदान ठरला. भारतात पहिला सहकारी साखर कारखाना १९०३ बिहार राज्यात सुरू झाला त्यानंतर १९३० -३१ पर्यंत २९ साखर कारखाने सुरू झाले साखर उद्योग संरक्षण कायदा १९३२ मध्ये मंजूर झाला यामध्ये साखर उद्योगाला पुढील १४ वर्ष सरंक्षण देण्याचे मान्य केले. याचा परिणाम असा झाला की, १९३५-३६ पर्यंत म्हणजे आवघ्या ५ वर्षात १३५ साखर कारखाने निर्माण झाले .१९५०-५१ पर्यंत १३९ साखर कारखाने सुरू झाले आज सन २०१२-१३ पर्यत ५०० च्या पुढे कारखान्याची वृध्दी झाल्याचे दिसून येते

स्वातंत्र्योत्तर काळात पतपुरवठया बरोबरच शेतीवर आधारित प्रक्रिया करण्याचा उद्योग सहकारी क्षेत्रात स्थापना होण्यास सुरूवात झाली याचे मुख्य श्रेय कै वैकुंठभाई मेहता, कै. धनजयराव गाडगीळ आणि कै विठ्ठलराव विखे पाटिल यांना द्यावे लागेल[८०] या धुरीणांनी त्यांच्या क्षेत्रात दिलेल्या पाठिंब्यामुळे १९५१ साली प्रवरानगर सहकारी साखर कारखाना लि. प्रवरानगर हा अस्तित्वात आला आणि सहकारी साखर कारखानदारीचे नवे ढालन सुरू झाले हा कारखाना यशस्वी झाल्यानंतर महाराष्ट्रात स्वांतत्र्य चळवळीत काम केलेले अनेक दिग्गज पुढे आले आणि त्यांच्या कार्यक्षेत्रात साखर कारखाने स्थापन करण्यात मोलाचा पुढाकार घेतला त्यात कै भाऊसाहेब हिरे, वसंतदादा पाटील, कै.वसंतदादा पाटील, कै.शंकरराव मोहिते पाटील, कै.तात्यासाहेब कोरे, रत्नाप्पा कुंभार, यशवंतराव मोहिते, विठ्ठलराव शिंदे या लोकनेत्यांनी महाराष्ट्रात सहकारी कारखानदारी उभी केली आणि आज हीच कारखानदारी महाराष्ट्राचे वैभव ठरले आहे ग्रामीण विकास साध्य

[८०] सहकारी महाराष्ट्र, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्या पुणे २०११

करणे, शेतकऱ्यांना सावकारी पाशातून मुक्त करणे ऐवढेच नव्हे तर हा सर्व समाज सर्व शोषण मुक्त करणे हा त्या विभूतींचा मुख्य उद्देश होता. या चळवळीने पूर्ण महाराष्ट्र सहकारमय करून घेतला. आज जवळजवळ महाराष्ट्रात १९१२-१३ पर्यंत ५०० च्या पुढे कारखान्याची वृध्दी झाल्याचे दिसून येते .

३.३ महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्याची सद्यस्तिथीः

सहकारी क्षेत्रातील साखर उद्योगामुळे कायापालट झालेल्या भागात टी व्ही केबल, बॅकिंग व्यवस्थेची अत्याधुनिक सुविधा, शहरी भागाप्रमाणे भरभरटलेल्या उद्योग, खाजगी दवाखाने व आरोग्य व्यवस्थेच्या सुविधा तसेच विकसित रस्त्याचे जाळे व वाहतुकीच्या सुखसोईमुळे 'शहरातून खेडयाकडे चला' असा महात्मा गांधीचा संदेश वेगळा सांगण्याची गरज उरलेली नसून तो या बदलत्या परिस्थितीच्या रोखामुळे आपोआप अंमलात येण्याची वेळ आलेली आहे राज्यातील सहकारी साखर कारखान्यांच्या केंद्रबिंदूमाफंत त्यांच्या परिसरातील झालेल्या सामाजिक व शैक्षणिक विकासाबाबत विचार केल्यास महाराष्ट्रात आज शहरातून शिक्षणाची उलटी गंगा ग्रामीण भागात वहात आहे असे विपरित दृष्य दिसत असून शहरातील प्रतिष्ठीत कुटुंबातील विदयार्थी सहकारी साखर कारखान्यांच्या माध्यमातून निर्माण झालेल्या शिक्षण संस्थामध्ये प्रवेश मिळवण्यासाठी धडपडत आहेत .

तक्ता क्र ३.२

महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्यांची सद्यस्थिती दर्शवणारा तक्ता.

अ क्र	तपशिल	१९८१	१९९७	२००३	२००६
१	कारखाने (संख्या)	७८	१६५	२०२	१८७
२	चलू (संख्या)	६७	१०२	१४४	१४२
३	सभासद (संख्या)	४३७६	१६३६२	४३५९३	१२६०६
४	नफा (रू लाख)	४१७	२४२०	१८४४	७४५३
५	तोटा (रू लाख)	३०११	१४४६०	७५३२९	११९९१
६	उत्पादन (मे टन)	१८७७		६१७६	५१९ .१
७	किंमत (रू लाख)	६५६८	२८३३८	६९१७१	३१२५६

स्त्रोत –महाराष्ट्रातील सहकारी चळवळ एक दृष्टीक्षेपात २०१३–१४

तक्ता क्र.३.२ मध्ये महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखान्याच्या प्रगतीचा आढावा घेतला आहे त्यातून एक गोष्ट लक्षात येते की १९८१ पासून २००३ पर्यंत साखर कारखान्याच्या विकासात भर पडत होती परंतू २००३ पासून २०१३–२०१४ या वर्षापर्यंत साखर कारखान्याची संख्या कमी झाली आहे तोटयाचे, उत्पादनाचे प्रमाणसुध्दा घटताना अढळून आले. साखरेला मिळणारी किंमत कमी जास्त होताना आढळते महाराष्ट्रात सहकारी कारखान्यांमुळे ग्रामीण भागाचा झालेला आर्थिक, औदयोगिक सांस्कृतिक, शैक्षणिक, सामाजिक कायापालट लक्षात घेता राज्याच्या ग्रामीण आर्थिक घडीचा साखर उद्योग हा कणा आहे परंतु साखर कारखान्याच्या घसरणी पाठीमागे कुठेतरी राजकीय दबाव समोर येताना दिसतो पैसा खर्च करणे, त्याचबरोबर दलालांची संख्या जास्त असणे असे दिसून येते.

राष्ट्रीय सहकारी साखर कारखान्याचे महासंघ या महासंघाचे माजी उपाध्यक्ष श्री.शिवाजीराव पाटील यांच्या मते ''ज्या साखर कारखान्याच्या तोटयात सातत्याने वाढ होत आहे आणि भविष्यात नफा मिळवण्याची क्षमता

कमी आहे''[८१] . साखर कारखान्याची कार्य क्षमता ही परिणामकारक व्यवस्थापणावर अवलंबून असते प़रंतु व्यवस्थापन परिणामकारक नसल्यामुळे कारखान्याची कार्यक्षमता घटते व़्यवस्थापनाच्या निर्णयाचा परिणाम कारखान्याची प्रगती किंवा अजारपणावर होत असतो म़्हणून योग्य निर्णय घेणे व्यवस्थापनाचे कर्तव्य समजले जाते . व्यवस्थापनाने खरेदी व्यवहार, कर्मचारी नियुक्ती इ स़ारख्या बाबतीत शिस्त पाळणे आवष्यक आहे श़ास्त्रीय निकशानुसार व्यवहार असले पाहिजे य़ाचा कारखान्याच्या प्रगतीवर परिणाम होत असतो भ़ारतात अनेक साखर कारखाने आजारी असण्याचे मुख्य कारण चुकिच्या लोकांच्या हातात सत्ता असणे हेच असल्याचे दिसते[८२]. म़हराष्ट्र सरकारने सहकारी कारखान्याच्या अजारपणाची कारणे शाधून उपाय योजना करण्यासाठी द्दोन वेळा समिती नियुक्त केली होती . या समितीने सरकारला आपला अहवाल सादर केला.परंतु अमंलबजावणीच्या बाबतीत योग्य निर्णय न घेल्यामुळे सरकारचे धोरण योग्य प्रकारचे नाही असे दिसते उदा स़ाखर कारखाना सुरू करताना राजकिय दृष्टीकानातून निर्णय घेतले जातात.साखर कारखान्यात कर्मचाऱ्यांची भरती करताना राजकीय दृष्टीने निर्णय घेतले जातात स़ंचालक मंडळ योग्य कर्मचाऱ्यांची भरती न करता नातेसंबंध मताचे गणित या गोष्टीस महत्त्व देतात त्यामुळे गरजेपेक्षा जास्त कामगार संख्या होऊन खर्चात वाढ होते आणि साखर कारखाने आजाराकडे वाटचाल करतात .

---

[८१] सहकारी महाराष्ट्र, सहकार सप्ताह विषेशांक, महाराष्ट्र राज्य, सहकारी संघ मर्यादित पुणे,२०१०-११

[८२] स़हकारी महाराष्ट्र, सहकारी कार्यकर्त्यांचे राजव्यापी ३३ वे अधिवेषन, औरंगाबाद, महाराष्ट्र

राज्य सहकारी संघ मर्या,पुणे, २००८

३.४ सोलापूर जिल्ह्याातील साखर कारखान्याची सद्यस्थितीः

सोलापूर जिल्ह्याात सन २०११ अखेर फक्टरी ॲक्ट अंतर्गत नोंदणी झालेले अनेक कारखाने बंद आहेत. २०१३-२०१४ वर्षाच्या अखेरीस जिल्ह्याामधील २८ साखर कारखान्यातून उत्पादन चालू होते त्यापैकी १४ कारखाने सहकारी तत्वावर चालत होते तर १४ खाजगी क्षेत्रातील होते. सोलापूर जिल्हयातील माढा तालुक्यातील विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याला राष्ट्रीय स्तरावरील अनेक परितोशिके मिळाली आहेत.

२०१३-१४ अखेरीस एकूण ३३३ विणकर सहकारी संस्था कार्यरत होत्या जिल्हयामध्ये औद्योगिक वसाहती असून याशिवाय सोलापूर शहराजवळ चिंचोळी येथे ऑगस्ट १९९० पासून महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाची आणखी एक वसाहत स्थापन झालेली असून तेथे काही उद्योग सुरू झालेले आहेत. या शिवाय १३ सहकारी क्षेत्रातील वसाहती नोंदल्या आहेत जिल्हयातील साखर कारखाने विषयक माहिती २०१२-१३ या वर्षातील आहे.सोलापूर जिल्हयातील २८ साखर कारखाने असताना दूसरीकडे सातत्याने दुष्काळाची स्थिती असते बार्शी तालुक्यातील भोगावती सहकारी साखर कारखाना सध्या बंद असून हा कारखाना बंद पडण्याच्या पाठीमागे त्या कारखान्यातील राजकारण कारणीभूत आहे. या पार्शवभूमीवर सहकारी कारखान्याची सद्यस्थिती आणि विकास प्रगती पुढिल प्रङ्काणे मांडली आहे.

तक्ता क्र. ३.३
खाजगी आणि सहकारी कारखान्याची प्रगती दर्शवणारा तक्ता

(स्त्रोत – आर्थिक व सामाजिक समालोचन सोलापूर जिल्हा २०१३-२०१४)

कारखान्याचे नाव		तालुका	सहकारी खासगी	कामगार		क्षमता मे. टन प्रतिदिन	गाळप मे. टन एकूण
				नियमित	हंगामी		
१	आदिनाथ	करमाळा	सहकारी	४११	२७६	२७००	४३३२७०
२	भोगावती	बार्शी	सहकारी	बंद	००	१२७०	–
३	भिमा	मोहोळ	सहकारी	२१८	७०६	२७००	७८०२००
४	चंद्रभागा	पंढरपूर	सहकारी	१३६	७४०	२७००	३९६०७५
५	स्वामी समर्थ	अक्कलकोट	सहकारी	१६७	१०४	२७००	१४८०००
६	लो बी पाटील.	मोहोळ	खाजगी	७८	७१	२७००	७१०४७०
७	पांडूरंग	पंढरपूर	सहकारी	९६	४४७	३७००	११०८४७४
८	सिध्देश्वर	उ सोलापूर	सहकारी	००	३४७	७०००	७८०११६
९	संगोला	सगोला	सहकारी	२७	३८२	२७००	१२३३६
१०	संत दामाजी	मंगळवेढा	सहकारी	०२	३७७	२७००	४१४२४९
११	श्री शंकर सह.	माळशिरस	सहकारी	९१	२२८	२७००	४४९६८०
१२	सहकार महर्शी	माळशिरस	सहकारी	०२	३९३	७७००	१२०१२७६
१३	विठ्ठल	पंढरपूर	सहकारी	३६०	७०१	७०००	८१७२८८
१४	विठ्ठलराव शिंदे	माढा	सहकारी	१७८	४२०	६०००	११८७९८७
१५	मकाई	करमाळा	सहकारी	२१३	३७९	१२७०	२३२१९०
१६	कुर्मुदास	माढा	खाजगी	०५	२	२७०	३०१०८
१७	सासवड माळीनगर	माळशिरस	खाजगी	३२२	४३२	२७००	४६३८३९
१८	लोकमंगल ऍग्रो	उ सोलापूर	खाजगी	७८	६९	२७००	३१८६३९
१९	लेकमंगल शुगर	द.सोलापूर	खाजगी	२४३	१०५	६०००	८७०५६८
२०	विठ्ठल शुगर्स	माढा	खाजगी	१३०	२७	२७००	४३६१७०
२१	सिध्दनाथ	उ सोलापूर	खाजगी	१६९	२२९	२७००	४२४४१७
२२	जकरिया शुगर	मोहोळ	खाजगी	१४०	१००	२७००	३४२३००
२३	इंद्रेश्वर शुगर	बार्शी	खाजगी	१५१	५६	२७००	४०४१७०
२४	भैरवनाथ	करमाळा	खाजगो	७८	४	५००	४६४४५
२५	मातोश्री लक्ष्मी शुगर	अक्कलकोट	खाजगी	१५१	१६५	३७००	३५६७८३
२६	विजय शुगर	पंढरपूर	खाजगी	१०२	५७	२७००	१७०६३०
२७	सिताराम महाराज	मंगळवेढा	खाजगी	७९	५१	२७००	०१७७
२८	शेतकरी चंदापुरी	माळशिरस	खाजगी	११५	२००	२७००	६४६८०

तक्ता क्र.३३ मध्ये तालुकानिहाय सोलापूर जिल्हयातील खाजगी आणि सहकारी कारखान्याची प्रगती यांचा आढावा घेतला आहे हंगामी स्वरूपाची कामगार भरती गाळपक्षमतेपेक्षा गाळप कमी याच्या पाठीमागे होणारे राजकारण या गोष्टी महत्त्वपर्ण आहेत त्यातून बार्शी तालुक्यातील

भोगावती हा साखर कारखाना बंद पडलेला आहे. सोलापूर जिल्हयात एकूण २८ साखर कारखान्यापैकी १४ सहकारी तत्त्वावर चालणारे साखर कारखाने आहेत . तर तेवढेच सहकाराला तोंड देणारे १४ खाजगी साखर कारखाने आहेत ़यावरून एक गोष्ट लक्षात येते की खाजगी साखर कारखाने सहकारी कारखान्यापेक्षा राजकीय दृष्टीकोनातून चांगले चालणारे अढळतात .

३.४.१ बंद पडलेला भोगावती सहकारी साखर कारखाना:-


१४ सहकारी साखर कारखान्यामधील बार्शी तालुक्यातील भोगावती सहकारी साखर कारखाना बंद पडलेला आहे म़शिनरी व्यवस्थित नसल्याने कारखान्यामध्ये गळीत हंगाम चालू असताना वेळोवेळी मिल टर्बाईन, बॉयलर, सेट्रीमिशन, ग्रास हॉपर, शुगर ग्रेडर वगैरे ठिकाणी घोटाळे होऊन कारखाने शेकडो तास बंद राहिला त़्यामुळे कारखान्याचे वेळोवेळी लाखे रूपयांचे नुकसान झालेले आहे .१९९९-२००० मध्ये वाया गेलेले तास ३६८.७ इतके आहेत. २००१-२००२ मध्ये ही कारखाना हंगामाचे दिवस १३३ एवढे दाखवलेले आहेत .

तक्ता क्र ३. ४

भोगावती साखर कारखान्यातील गळीपाचा आढावा दर्शवणारा तक्ता

अ क्र	वर्ष	गाळप (मे टन)
१	२०००	३४०२८६
२	२००१	३१७५९७
३	२००२	२५९१००
४	२००३	१४९५६६
५	२००४	बंद
६	२००५	बंद
७	२००६	१०१११११
८	२००७	२७००००
९	२००८	१५२,४९०
१०	२००९	बंद
११	२०१०	बंद

(स्त्रोत–शिवाजी काशिद :भोगावती साखर कारखान्यातील इतिहास पृष्ट क्र २९–३१)



तक्ता क्र ३ ४ मध्ये लक्षात येते की सन २००१ मध्ये मशिनरी विस्तारीकरणानंतर सुध्दा गाळप क्षमता कमी होत गेली सन २००६–०७ मध्ये गाळपात वाढ झाली. परंतु गाळपाचे दिवस २०५ एवढे आहेत त्यामुळे सरासरी प्रती दिवसास १३१७ मे टन गळीत झाले नंतर प्रति दिवसास गाळप २५०० ते ३००० मे टन गाळप होणे अवष्यक होते कार्यक्षेत्रात वेळोवेळी गळपाशिवाय ऊस उभा राहिला आहे .त्या क्षेत्राचे महाराष्ट्र शासनाने प्रति हेक्टरी रू २५००० प्रमाणे लाखो रूपयांचे अनुदान दिलेले आहे शिवाय ज्या शेतकऱ्यांनी इतर कारखान्याला ऊस पाठविला त्यांचे नुकसान झाले अशा प्रकारे राजकीय

हस्तक्षेपामुळे भोगावती सहकारी साखर कारखाना २००० पासून २०१० पयर्त. चार वर्श बंद राहिला आणि शेवटी तो २०१० पासून बंदच आहे .सदर २-३ वर्षात कारखान्याचे एम एस सी बॅंकेचे रू ७५८.९९ लाख १४ टक्के व्याजदराने कर्ज घेऊन कारखान्याच्या मशिनरीमध्ये वाढ केली मशिनरीचे आधुनिकीकरण केले . ते सर्व हलक्या कमी प्रतीचे अयोग्य, चुकीचे, तांत्रिकदृष्टया नुकसानीचे काही अनावष्यक युनिटचे केले त्यामुळे हंगामामध्ये वेळोवेळी नवीन युनिटचे तांत्रिक बिघाड होऊन कारखाना बंद राहिला त्यामुळे कारखान्याचे वेळोवेळी लाखो रूपयांचे नुकसान झाले आहे सदरचे काम तांत्रिकदृष्टया योग्य नसल्याने व्ही एस आय या संस्थेचे तपासणी प्रमाणपत्र मिळालेले नाही.

तक्ता क्र. ३.५ मध्ये सोलापूर जिल्ह्याातील सहकारी साखर कारखाने आणि २०१३-१४ मध्ये त्या कारखान्यामध्ये अस्तित्वात असणाऱ्या राजकीय पक्षांची नावे दिलेली आहेत. एकूण सोलापूर जिल्ह्याात १४ सहकारी कारखाने आहेत. त्यापैकी बार्शी तालुक्यातील भोगावती साखर कारखाना बंद पडला आहे. सोलापूर जिल्ह्याातील सहकारी साखर कारखाने हे प्रामुख्याने राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस यांच्या ताब्यात असल्याचे दिसून येते. सांगोला आणि मंगळवेढा या तालुक्यात शेतकरी कामगार पक्षांची सत्ता असल्याचे आढळते. यशवंतराव चव्हाण[८३] यांनी सुरु केलेल्या सहकारी चळवळीला कुठेतरी उतरती कळा सुरु झाल्याचे आढळते.

[८३] सहकारी महाराष्ट्र, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्या, पुणे, सप्टेंबर २०१५, ०९७२-३२१८१२०००.

क्ता क्र. ३.५

सहकारी साखर कारखान्यावर सत्ता असलेला राजकीय पक्ष दर्शवणारा तक्ता.

अ.क्र.	कारखाना	तालुका	राजकीय पक्ष
१	आदिनाथ सहकारी साखर कारखाना	करमाळा	राष्ट्रवादी
२	भोगावती सहकारी साखर कारखाना	बार्शी	राष्ट्रवादी
३	भिमा सहकारी साखर कारखाना	मोहोळ	राष्ट्रवादी
४	चंद्रभागा सहकारी साखर कारखाना	पंढरपूर	काँग्रेस
५	स्वामी समर्थ सहकारी साखर कारखाना	अक्कलकोट	काँग्रेस
६	पांडुरंग सहकारी साखर कारखाना	पंढरपूर	काँग्रेस
७	सिध्देश्वर सहकारी साखर कारखाना	उ. सोलापूर	काँग्रेस
८	सांगोला सहकारी साखर कारखाना	सांगोला	शेकाप
९	संत दामाजी सहकारी साखर कारखाना	मंगळवेढा	शेकाप
१०	श्री शंकर सहकारी साखर कारखाना	माळशिरस	राष्ट्रवादी
११	सहकार महर्शी सहकारी साखर कारखाना	माळशिरस	राष्ट्रवादी
१२	विठ्ठल सहकारी साखर कारखाना	पंढरपूर	काँग्रेस
१३	विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखाना	माढा	राष्ट्रवादी
१४	मकाई सहकारी साखर कारखाना	करमाळा	राष्ट्रवादी

(स्त्रोत सोलापूर जिल्हा एक दृष्टिक्षेप २०१३-१४)

सहकारी चळवळीत साखर उद्योगाचे खूप मोठे योगदान आहे. जिल्ह्याात १६ सहकारी व १९ खासगी साखर कारखाने आहेत. यामध्ये आणखी दोन तीन खासगी कारखान्याची भर पडणार आहे. यंदाच्या गळीत हंगामात १६ सहकारी व १२ खासगी कारखान्यांनी मिळून २ कोटी मेट्रीक टन उसाचे गाळप केले. त्यातील १ कोटी ५० हजार पोती साखरेचे उत्पादन घेतले. तर उस उत्पादकांना ३ हजार ३०० कोटी रुपयांची बिले अदा केली आहेत. जिल्ह्याात्च्या अर्थकारणात या उद्योगाने भर टाकली आहे. खासगी साखर कारखान्यांचे सहकारीकरण व्हावे म्हणून सुरुवातीच्या काळात आंदोलने झाली. भांडवलशाहीत अडकलेला हा उद्योग शेतकऱ्यांचा व्हावा ह्याा उद्देशाने तत्कालीन नेते मंडळींनी सहकाराचे रोपटे लावले. ७० च्या दशकानंतरचा दोन तपांचा काळ सहकारी साखर उद्योगाच्या भरभराटीचा

होता. मात्र त्यानंतर सहकारातील वाढता भ्रष्टाचार आणि गैरव्यवस्थापन यामुळे सहकारी साखर कारखान्यांची वेगाने अधोगती होत गेली. त्यात बरेच साखर कारखाने कर्जबाजारी झाले. असे कर्जबाजारी साखर कारखाने व्यवस्थापनातील मंडळींनी लिलावातून खरेदी केले. १९९० पर्यंत साखर कारखान्यांची संख्या मर्यादित होती. मात्र १९९८ मध्ये परवाना मुक्त धोरण[८४] अंमलात आणले गेले. प्रारंभी दोन कारखान्यातील हवाई अंतर ४० कि.मी. होते. १९८७ ला २५ कि.मी. तर १९९७ ला १५ कि. मी. केले गेले. याच दरम्यान झोन बंदी उठवण्यात आली होती. याचा फायदा घेत अनेक खासगी साखर उद्योगांनी शिरकाव केला. हळूहळू तंबूत शिरलेल्या उंटासारखी अवस्था साखर उद्योगाची झाली आहे. खासगी साखर कारखान्यांची संख्या पाहता खासगी साखर कारखान्यांचा हा उंट सहकाराच्या तंबू घुसल्याने कोसळणार हे स्पष्ट होते.

३.५ आकडेवारीचे विश्लेषण:

महाराष्ट्र राज्याप्रमाणे सोलापूर जिल्ह्यातील एकीकडे अनेक सहकारी कारखाने अडचणीत आहेत, तर दुसरीकडे त्याच कारखान्याचे व्यवस्थापन करणारी नेतेमंडळी आपला दुसरा खासगी कारखाना उत्तम चालवत आहेत. म्हणून सोलापूर जिल्ह्यात सहकारी साखर कारखान्यापेक्षा खासगी साखर कारखान्यांची संख्या जास्त आहे. बदलत्या काळात साखर उद्योगाचे महत्त्व वाढत असताना सहकारी साखर कारखाने तोट्यात व खासगी कारखाने मात्र फायद्यात असेच चित्र निर्माण होऊ लागले आहे. सहकारातून मोठे झालेले राजकीय नेतेदेखील आता खासगी उद्योगांना प्रोत्साहन देत आहेत त्यामुळे त्यातून सहकारी साखर कारखान्याची पिछेहाट होत आहे.

[८४] अर्थिक आणि सामाजिक समालोचन, सोलापूर जिल्हा,२०१३-१४

३.५.१ सभासदांची साक्षरताः


सोलापूर जिल्ह्याात ११ तालुक्यांचा समावेश होतो. हे ११ तालुके प्रामुख्याने तीन मुख्य प्रांतात विभागले आहेत. माढा, बार्शी आणि पंढरपूर असे विभाजन केलेले आहेत. एकूण तीन प्रांतात १४ सहकारी साखर कारखाने आहेत. यापैकी सविस्तर अभ्यासासाठी प्रत्येक प्रांतातून एक कारखाना निवडला आहे. एकूण तीन कारखान्यातील ९० सभासद शेतकरी यांच्या अभ्यासावरुन विष्लेशण करण्याचा प्रयत्न केला आहे.शेतकऱ्यांमध्ये असलेली शैक्षणिक पात्रता हा निकश त्याच्या मागासलेपणाचा एक महत्त्वपर्ण घटक आहे.तक्ता क्र. ३.६ मध्ये शेतकऱ्यांच्या शिक्षणाचे विश्लेषन केलेले आहे.

तक्ता क्र. ३.६

सभासदांची साक्षरता दर्शवणारा तक्ता क्र. ३.६

अ.क्र.	शिक्षण	वारंवारता	टक्केवारी
१.	निरक्षर	३३	३६.७
२.	प्राथमिक	२५	२७.८
३.	पदवी	२९	३२.२
४.	पदव्युत्तर	३	३.३
५.	**एकूण**	**९०**	**१००**

(स्त्रोत – प्राथमिक साधन सामग्री)



सर्वेक्षणामध्ये निवडलेल्या शेतकऱ्यांची साक्षरता कमी आहे. तक्ता क्र. ३.६ मध्ये शेतकऱ्यांची साक्षरता दर्शविलेली आहे. अभ्यास क्षेत्रातील शेतकरी ३६.७ टक्के निरक्षर आहेत. प्राथमिक शिक्षणाचे प्रमाण २७.८ टक्के एवढे आहे. पदवी आणि पदव्युत्तर शिक्षणाची टक्केवारी अनुक्रमे ३२.२ टक्के आणि टक्के आहे.

३.५.२ शेतकऱ्यांची जमीन स्त्रोतः


सहकारी साखर कारखाना चालू करण्यासाठी ऊस उत्पादन आवष्यक आहे. हे ऊसाचे उत्पादन शेती स्त्रोतावर अवलंबून असते.

तक्ता क्र. ३.७

शेतकऱ्यांकडे असलली जमीन / क्षेत्र दर्शवणारा तक्ता

अ. क्र.	जमीन (एकर)	वारंवारिता	टक्केवारी
१.	० ते १ एकर	७	७.८
२.	१ ते ३ एकर	१७	१८.९
३.	३ ते ६ एकर	२५	२७.८
४.	६ एकरापेक्षा जास्त	४१	४५.८
	एकूण	**९०**	**१००**

(स्त्रोत प्राथमिक साधनसामग्री)



तक्ता क्र. ३.७ मध्ये सोलापूर जिल्ह्याातील उस उत्पादक शेतकऱ्यांच्या जमिनीची सरासरी दिलेली आहे. एक एकरपेक्षा कमी जमीन असणारी टक्केवारी (७.८ टक्के) कमी दिसून येते. ६ एकरपेक्षा जास्त जमीन असणारी आणि त्यापेक्षा कमी असणारी संख्या अनुक्रमे ४५.८ टक्के आणि २७.८ टक्के एवढी आहे. याचा अर्थ असा आहे की, जिल्ह्याात दरडोई जमिनीची उपलब्धता चांगली आहे. जमिन हे कारण सहकारी साखर कारखान्याच्या पिछेहाटीस कारणभूत नसावे. या उपलब्ध जमिनीचा वापर ऊस उत्पादनासाठी केला तर त्यातून कारखान्याचा वापर विकास होण्यास मदत होईल. परंतु सहकारी साखर कारखान्यात होणारे राजकारण हा घटक साखर


कारखान्याची पिछेहाट करणारा आहे. उपलब्ध असणाऱ्या जमिनीपैकी ऊसाचे क्षेत्र किती प्रमाणात आहे हे सुध्दा महत्त्वाचे आहे.

तक्ता क्र. ३.८

ऊसाचे क्षेत्र आणि शेतीचा प्रकार दर्शवणारा तक्ता

अ.क्र.	ऊसाचे क्षेत्र (एकर)	वापंवारिता	टक्केवारी
	० ते १	२६	२८.९
	१ ते ३	२७	२७.८
	३ ते ६	७	७.८
	६ पेक्षा जास्त	३२	३७.६
एकूण		**९०**	**१००**
जमिनीचे स्वरूप			
५	जिरायती	४०	४४.४
६	बागायती	५०	५५.६
एकूण		**९०**	**१००**

(स्त्रोत – प्राथमिक साधनसामग्री)

ऊसाचे क्षेत्र	जमिनीचे स्वरूप
	


तक्ता क्र. ३.८ मध्ये उपलब्ध असणाऱ्या शेतकऱ्यांच्या जमिनीचे स्वरूप आणि ऊसाचे क्षेत्र दर्शविले आहे. ६ एकरपेक्षा जास्त की कमी ऊसाचे क्षेत्र असणाऱ्या शेतकऱ्यांचे ३७.६ आहे. एकर १ ते ३ एकर जमीन आणि ० ते १ ऊसाचे क्षेत्र असलेल्या शेतकऱ्यांची टक्केवारी अनुक्रमे २७.६ टक्के आणि २८.९ टक्के आहे. म्हणजे शेतकऱ्यांचे ऊस उत्पादनात दोन गट दिसून येते.एका गटात जास्त ऊसाचे क्षेत्र असे दोन गट आहेत.

जमिनीच्या स्वरूपामध्ये ४४.४ टक्के शेती ही जिरायती आहेत. तर ७७.६ टक्के शेती ही ऊस उत्पादन प्रवण क्षेत्रात बागायती आहे. सहकारी साखर कारखान्याच्या विकासात ऊसाचे क्षेत्र जास्त असणे चांगली बाब आहे. यावरुन सहकार क्षेत्रातील ऊस उत्पादनातील वाढ किंवा घट हे कारण साखर कारखान्याच्या घसरणीला कारणीभूत नाही हे स्पष्ट होते. सोलापूर जिल्ह्याातील बराचसा भाग दुष्काळी पट्ट्याात येतो. त्यामुळे जिरायती शेतीचे प्रमाण तुलनेने जास्त दिसून येते. म्हणून ऊसाचे उत्पादन कमी होते. त्याचबरोबर उत्पादनाच्या पध्दती ही ऊसाच्या उत्पादनात महत्त्वाचा वाटा असल्याचे दिसते. सोलापूर जिल्ह्याात जास्त शेतकरी ऊसाचे उत्पादन पारंपरिक पध्दतीने घेतात.

तक्ता क्र. ३.९

ऊस उत्पादनाच्या पध्दती दर्शवणारा तक्ता

अ. क्र.	ऊस उत्पादनाच्या पध्दती	वारंवारिता	टक्केवारी
१	पारंपरिक	३३	७८.९
२	आधुनिक	३७	४१.१
	एकूण	**९०**	**१००**



(स्त्रोत:- सर्वेक्षण - प्राथमिक साधनसामग्री)

तक्ता क्र. ३.९ मध्ये ऊस उत्पादनांच्या पध्दतीचे विवेचन केले आहे. पारंपरिक ऊस उत्पादन शेती व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांची आकडेवारी ५८.९ टक्के आहे तर आधुनिक ऊस उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांची आकडेवारी ४१.१ टक्के आहे.

३.५.३ ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या समस्याः

कोणत्याही उपादन क्षेत्रात समस्या जाणवत असतात. ऊसाच्या बाबतीत गाळपाची, वाहतुकीची, श्रमिकांच्या समस्या, राजकीय स्वरूपाची समस्या आणि आर्थिक समस्या जाणवतात. राजकीय दबाव गट हे शेतकऱ्यांना ऊसाला कमी दर देतात. ऊस कारखान्याला देण्यासाठी दबाव आणतात. परिणामी त्याचा फटका शेतकऱ्यांना बसतो. दुष्काळी परिस्थिती व वीज भारनियमन, शेतीला पाणी टंचाई, ऊस तोडणीसाठी कामगार, कामगारांचे प्रशिक्षण, शेतकऱ्यांचे मेळावे घेणे यांसारख्या समस्या भेडसावत आहे. जमिनीची उत्पादकता वाढविण्यासाठी सेंद्रीय खताबरोबर रासायनिक खत आणि हिरवळीचे खत या बाबी आवश्यक असतात. त्याची समस्या या क्षेत्राला जाणवत आहे.

तक्ता क्र. ३.१०

ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रमुख समस्या दर्शवणारा तक्ता

अ.क्र.	समस्या	वारंवारिता	टक्केवारी
१	होय	८१	९०
२	नाही	९	१०
आर्थिक समस्या			
३	होय	९०	१००
श्रमिकांची समस्या			
४	होय	८६	९५.६
५	नाही	४	१४.४
राजकीय दबाव (समस्या)			
६	होय	७९	८७.८
७	नही	११	१२.२
	एकूण	**९०**	**१००**

(स्त्रोत : आकडेवारी प्राथमिक साधनसामुग्री)

तक्ता क्र.३.१० मध्ये शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या प्रमुख समस्येचा आढावा घेतला आहे. अभ्यासासाठी निवडलेल्या ९० शेतकऱ्यांपैकी ९० टक्के लोकांना वाहतुकीची समस्या जाणवते. ऊस उत्पादनासाठी आवश्यक वित्त/पैशाची समस्यामध्ये सर्वच शेतकऱ्यांना आहे आणि फक्त ४.४ टक्के शेतकऱ्यांना ही समस्या आह. ८७.८ टक्के शेतकऱ्यांना राजकीय दबावापोटी ऊस त्यांच्या कारखान्यात द्यावा लागतो आणि ऊसाला मिळणारी किंमत कमी असते. केवळ १२.२ टक्के शेतकरी या समस्येमुळे त्रस्त नाहीत. या प्रष्नावरुन असे लक्षात येते की, सोलापूर जिल्ह्यातील सहकारी साखर कारखान्यांच्या मध्ये चालणाऱ्या राजकारणामुळे शेतकऱ्यांच्या अडचणी वाढत आहेत. त्याचबरोबर सहकारी साखर कारखान्याची पिछेहाट होत आहे. ऊस उपादनासाठी इतर सिंचनाच्या सुविधा, पाण्याच्या सुविधा, श्रमीकांची मनमानी, भ्रष्टाचार इत्यादी इतर समस्या जाणवतात.

३.७.४ ऊस उपादनाचा खर्च:


सोलापूर जिल्ह्याातील भौगोलिक रचनेमुळे ऊस उत्पादनासाठी खर्च अधिक येतो.

तक्ता क्र. ३.११

शेतकऱ्यांचा ऊस उत्पादनासाठी येणारा खर्च दर्शवणारा

अ. क्र.	खर्च	वारंवारिता	टक्केवारी
१	१000 ते १0000	११	१२.२
२	१0000 ते २0000	५३	५८.९
३	२0000 ते ३0000	२0	२२.२
४	३0000 ते ४0000	६	६.७
५	४0000 च्या पुढे	–	–
	एकूण	**९0**	**१00**

(स्त्रोत प्राथमिक साधनसामग्री)



तक्ता क्र. ३.११ मध्ये सोलापूर जिल्ह्याामध्ये ऊस उत्पादनाचा खर्च प्रति एकरी त्याचे विवेचन केलेले आहे. सरासरी १0000 ते २0000 दरम्यान उत्पादनाचा खर्च करणारे शेतकरी ५३ आहेत. (५८.९) साधारणपणे शेतकरी प्रति एकरी ऊस उत्पादनासाठी खर्च ४0000 रुपये व त्यापेक्षा कमी खर्च करतो आहे. १000 ते १0000 रुपयांपर्यंत खर्च करणाऱ्यांची संख्या १२.२ टक्के आहे. २0000 ते ३0000 रुपयांपर्यंत खर्च करणारी संख्या २२.२ टक्के

आहे. तर ३०००० ते ४०००० या वर्गात खर्च करणारे शेतकरी ६.७ टक्के एवढे आहेत. काही प्रमाणात अलीकडील कालावधीत वाढणाऱ्या उत्पादनासाठी आवष्यक असणाऱ्या बाबीच्या किंमती वाढातात. त्याचा परिणाम सहकारी क्षेत्रातील कार्यप्रवण शेतकऱ्यांचा उत्पादनाचा खर्च वाढताना दिसून येतो. शेती ही प्रामुख्याने खते, बी-बियाणे, मशागतीसाठी आवष्यक असणारी साधने, यंत्रे, ऊस तोडणी, सिंचनाच्या सोई, वीजेची उपलब्धता, श्रमाची उपलब्धता इत्यादी गोष्टींवर अवलंबून असते. यासर्व गोष्टी कमी अधिक प्रमाणावर उपलब्ध असतात. त्यामुळे ऊसाच्या उत्पादनाचा खर्च वाढत आहे. सोलापूर जिल्ह्याात दुष्काळ, अवकाळी पाऊस या दोन आणि राजकारण या गोष्टीमुळे ऊस व्यवसायाकडे शेतकऱ्यांचा दृष्टिकोण (सहकारी क्षेत्राकडे) बदलताना दिसून येत आहे.

उत्पादित झालेला ऊस सहकारी साखर कारखान्यामध्ये गाळपासाठी दिला जातो किंवा गूळ उत्पादनासाठी गुऱ्हाळात पाठविला जातो. परंतु सोलापूर जिल्ह्याात गळाचे उत्पादन फारच कमी प्रमाणात होते, परिणामी सोलापूर जिल्ह्याातील उत्पादित ऊस ९३.३ टक्के कारखान्यात गाळपासाठी दिला जातो तर फक्त ९.७ टक्के इतर उत्पादनासाठी दिला जातो.

३.५.५ अभ्यास क्षेत्रातील शेतकरी आणि राजकीय स्थिती:

शेतकऱ्यांवर आणि ऊस उत्पादकावर जर राजकीय दबाव असेल तर त्याचा ए णात्मक परिणाम होत असतो. शेतकऱ्यांवर असणारा दबाव हा मतदानासाठी ऊसासाठी असतो.

तक्ता क्र. ३.१२

राजकीय दबाव दर्शवणारा तक्ता

अ. क्र.	राजकीय दबाव	वारंवारिता	टक्केवारी
१	होय	८६	९५.६
२	नाही	४	४.४
	निवडणूकीत मतदानासाठी दबाव		
३	होय	७८	८६.७
४	नाही	१२	१३.३
	कारखान्याला ऊस देण्यासाठी दबाव		
५	होय	६९	७६.७
६	नाही	२१	२३.३
	एकूण	**९०**	**१००**

(स्त्रोत प्राथमिक साधनसामग्री)

मतदानासाठी दबाव	ऊसासाठी दबाव
	

तक्ता क्र. ३.१२ मध्ये शेतकऱ्यांवर असणाऱ्या राजकीय दबाव यावर विवेचन केले आहे. ९५.६ टक्के लोकांवर राजकीय दबाव आहे. त्यातील सरासरी ८६.७ टक्के मतदानासाठी दबाव आहे तर सोलापूर जिल्ह्यातील सहकारी क्षेत्रा मतदानासाठी राजकारणी १३.३ टक्के लोकांवर दबाव आणतात. ऊस आपल्या कारखान्याला द्यावा यासाठो ७६.७७ लोकांवर दबाव

आहे तर २३.३ टक्के लोकांवर दबाव नाही. सामाजिक सहकारी क्षेत्रात प्रामुख्याने आपल्यावर येणारा दबाव हा तुलनेने मतदानासाठी अधिक असल्याचे मत शेतकऱ्यांनी केल्याचे आढळते. यामुळे सहकारी क्षेत्रावर याचा परिणाम होतो. सोलापूर जिल्ह्याातील सहकारी साखर कारखान्यावर प्रामुख्याने काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची राजकीय सत्ता आहे. सातत्याने या पक्षाची सत्ता सोलापूर जिल्ह्याच्या सहकारी क्षेत्रावर असल्याचे आढळून येते. त्यामुळे सोलापूर जिल्ह्याातील सहकारी साखर कारखान्यामध्ये ६६.७ टक्के कारखान्यावर सत्ता राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची आहे तर ३३.३ टक्के सहकारी साखर कारखान्यावर काँग्रेसची सत्ता आहे.

तक्ता क्र. ३.१३

चेअरमनकडून मिळणारा न्याय दर्शवणारा तक्ता

अ. क्र.	न्याय	वारंवारिता	टक्केवारी
१	होय	२८	३१.१
२	नाही	६२	६८.९
	एकूण	**९०**	**१००**
चेअरमनचा राजकीय पक्ष			
३	काग्रेस	६०	६६.७
४	राष्ट्रवादी काँग्रेस	३०	३३.३
चेअरमन बदल			
५	होय	६०	६६.७
६	नाही	३०	३३.३
	एकूण	**९०**	**१००**

(स्त्रोत प्राथमिक साधनसामग्री)

तक्ता क्र. ३.१३ मध्ये सहकारी साखर कारखान्यावर असणारी संचालक मंडळ आणि त्यांचे चेअरमन या दोन बाबीवर प्रकाश टाकला आहे. सत्तेत असणाऱ्या संचालक मंडळाकडून न्याय मिळतो. असे म्हणणारे शेतकरी ३१.१ टक्के आहेत. ६८.९ टक्के लोकांना या मंडळाकडून न्याय मिळालेला नाही. ६६.७ टक्के सहकारी कारखान्याचे चेअरमन बदलतात परंतु ३३.३ टक्के कारखान्यात सातत्याने तेच असल्याचे दिसते. तेच तेच आकडे हे

राजकीय पक्षाचे आहेत. ६६.७ टक्के चेअरमन अभ्यास क्षेत्रातील कॉंग्रेस सरकारचे आहेत. तर ३३.३ टक्के राष्ट्रवादी कॉंग्रेस सरकारचे आहेत.

३.७.६ अभ्यास क्षेत्रातील सहकारी तत्त्वे:


भारतातील सहकारी चळवळींची सुरुवात शेतकऱ्यांच्या विकासासाठी झाली. १९२१ साली डॉ. मॅन यांनी मुंबई राज्यातील अहमदनगर आणि सोलापूर जिल्ह्यात प्रथम सहकारी शेतीचे प्रयोग केले. सहकारी चळवळ प्रामुख्याने ऐच्छिक व खुले सभासदत्व, सभासदांचे लोकशाही नियंत्रण, सभासदांचा सहभाग, स्वयंशासन व स्वातंत्र्य, शिक्षण, प्रशिक्षण व माहिती, सहकारांतर्गत सहकार आणि सामाजिक जाणीव या तत्त्वानुसार चालते. ही तत्त्वे या अभ्यास क्षेत्रातील बाबी पूर्ण करताना दिसून येत नाहीत. तक्ता क्र. ३.१४ मध्ये सहकारी तत्त्वाचा आढावा घेतला आहे.

तक्ता क्र.३.१४

सहकारी तत्त्वे पाळली जातात की नाही हे दर्शवणारा तक्ता

अ. क्र.	तत्त्वे (कामगिरी पार पाडतात)	वारंवारिता	टक्केवारी
१	होय	२६	२८.९
२	नाही	६४	७१.१
	एकूण	**९०**	**१००**

(स्त्रोत प्राथमिक साधनसामग्री)




अभ्यास क्षेत्रातील शेतकऱ्यांचा अभ्यास केला व त्यातून काही निष्कर्ष काढले. यावरुन सहकारी साखर कारखान्याची सहकारी तत्त्वे

व्यवस्थित काम करताना फक्त २८.९ टक्के दिसून येतात. परंतु सहकारी तत्त्वानुसार कारखाने चालवण्याचे प्रमाण ७१.१ टक्के आहे. राजकीय लोकांनी त्यांच्या स्वार्थासाठी आपले सहकाराचे सर्व नियम व तत्त्वे ढाब्यावर बसविली आहेत. याच राजकारणामुळे सोलापूर जिल्ह्याातील सहकारी साखर कारखाने प्रभावित झालेले आहे.

तक्ता क्र. ३.१५
सरकारी उपाययोजना दर्शवणारा तक्ता

अ. क्र.	उपाययोजना	वारंवारिता	टक्केवारी
१	सिंचन	२४	२६.७
२	किंमत वाढ	२७	३०.०
३	अनुदान (साखरेवर)	३५	३८.९
४	भ्रष्टाचार	४	४.४
	एकूण	**९०**	**१००**

(स्त्रोत प्राथमिक साधनसामग्री)



तक्ता क्र. ३.१५ मध्ये अभ्यास क्षेत्रात शेतकऱ्यांनी सरकारने ज्या उपाययोजना राबविताना ज्या बाबी विचारात घ्याव्यात त्याविशयी परामर्श घेतला आहे. २६.७ टक्के द्याव्यात असे मत व्यक्त केले. ३० टक्के शेतकरी ऊसाला भाव वाढवून द्या असे सांगतात. तर साखरेवर अनुदान (उत्पादनावर) देणाऱ्याची संख्या ३५ टक्के आहे. सहकारी क्षेत्रात होणारा भ्रष्टाचार सरकारने कमी करावा असे म्हणनाऱ्यांची संख्या भरते ती केवळ ४.४ एवढी आहे.

यावरुन शेतकऱ्यांमध्ये सरकारी नियोजनाच्या बाबतीत एक स्पष्टता असल्याचे दिसून येते.

सोलापूर जिल्ह्याातील सभासद शेतकऱ्यांनी आपल्या साखर कारखान्याविशयी संचालक मंडळ, अध्यक्ष ऊसाचा दर यासारख्या गोष्टी माहीत असने आवष्यक आहे. त्याबाबी माहीत नसतील तर राजकारणी लोक दबाव निर्माण करतात. त्यांनी घेतलेल्या निर्णयाची माहिती मिळू शकत नाही. परिणामी सहकारी तत्त्वे १५.९ टक्के लोकांना आपल्या कारखान्यातील मंडळाची माहिती आहे. याउलट ८४.४ टक्के सभासदाविशयी आणि संचालकाविशयी माहिती नाही यावरुन सहकार क्षेत्रावर मर्यादा येताना दिसतात.

यासर्व बाबींमुळे आपल्या देशातील सोलापूर जिल्ह्याातील राजकारणामुळे सहकारी क्षेत्र मोडकळीस आल्याचे आढळते. महाराष्ट्रात सहकारी साखर कारखान्यांची ग्रामीण भागात प्रगती व त्यामुळे ग्रामीण भागाचा झालेला आर्थिक, औद्योगिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, सामाजिक कायापालट तर लक्षात घेता राज्याच्या आर्थिक घडीचा साखर उद्योग हा कणा आहे. परंतु साखर कारखान्याच्या वाटचालीत राजकीय दृष्टिकोनातून घेतलेले निर्णय साखर कारखान्याच्या आजारपणास कारणीभूत आहेत. अभ्यास क्षेत्रातील सहकारी साखर कारखान्याची पिछेहाट होताना दिसते आणि खासगी साखर कारखान्याचा प्रभाव वाढत आहे.

तक्ता क्र. ३.१६

सहकारी साखर कारखान्याची वाटचाल दर्शवणारा तक्ता

अ.क्र.	वाटचाल	वारंवारिता	टक्केवारी
१	घटली	४०	४४.४
२	वाढली	११	१२.२
३	माहिती नाही	३९	४३.३
	एकूण	**९०**	**१००**

(स्त्रोत प्राथमिक साधनसामग्री)



तक्ता क्र. ३.१६ मध्ये राजकारणामुळे सहकारी साखर कारखान्याच्या वाटचालीचा आढावा घेतला आहे. सभासद शेतकऱ्यांनासहकारी तत्त्वांची माहिती नाही त्याच बरोबर आपल्या कारखान्याचा विकास झाला की नाही हे सांगता येत नाही अशी संख्या ४३.३ टक्के आहे ४४.४ टक्के सोलापूर जिल्ह्याातील राजकीय प्रभावामुळे सहकारी साखर कारखान्याची वाटचाल घसरली असल्याचे दिसून येते. तर फक्त १२.२ टक्के एवढ्याा कमी प्रमाणात सहकारी साखर कारखान्याचा विकास झाला आहे.

३.५.७ अभ्यास क्षेत्रातील तालुकानिहाय आकडेवारीचे विश्लेषणः

प्रस्तुत अभ्यासासाठी सोलापूर जिल्ह्याातील सहकारी साखर कारखान्यासाठी तीन प्रांत विभागातून प्रत्येकी एक याप्रमाणे तीन सहकारी साखर कारखान्याची निवड केलेली आहे. बार्शी विभागातून भोगावती सहकारी


साखर कारखाना निवडला आहे. परंतु २०१० पासून हा कारखाना बंद पडला आहे. त्यामागे राजकारण हा महत्त्वाचा घटक आहे. माढा विभागातून विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखाना निवडला आहे. तर पंढरपूर विभागातून विठ्ठल सहकारी साखर कारखाना निवडला आहे. या तीन विभागाचा तुलनात्मक अभ्यास करुन निष्कर्ष काढले आहेत. अभ्यास क्षेत्रातील शेतकऱ्यांना सभासदत्व मिळवून देण्यासाठी राजकारणी लोकांनी संचालक मंडळांनी आणि इतर माध्यमानी सभासदत्व मिळवून दिले आहे. तक्ता क्र. ३.१७ मध्ये शेतकऱ्यांना कारखान्याचे सभासदत्व मिळवून देण्यामध्ये कोणाची भूमिका आहे त्याचे विवेचन केले आहे.

तक्ता क्र. ३.१७

सभासदांना/शेतकऱ्यांना होत असलेली मदत दर्शवणारा तक्ता

अ. क्र.	मदत	माढा	बार्शी	पंढरपूर	एकूण
१	राजकीय	–	२	–	२
२	संचालक मंडळ	१५	२०	१७	५२
३	इतर	१५	०८	१३	३६
	एकूण	**३०**	**३०**	**३०**	**९०**

(स्त्रोत प्राथमिक साधनसामग्री)



या तक्त्यावरुन शेतकऱ्यांना कारखान्याचे सभासदत्व मिळवताना या माध्यमाने जावे लागते याची कल्पना येते. इतर लोकांकडून केली जाणारी मदत यामध्ये प्रामुख्याने वशिलेबाजी, दुसऱ्याचे शेअर विकत घेऊन इत्यादीचा समावेश होतो. अशी संख्या माढा आणि पंढरपूर तालुक्यात सर्वसाधारणपणे एकसारखीच येते. बार्शी तालुका तुलनात्मकदृष्ट्याा माढा व

पंढरपूरपेक्षा राजकारणाच्या कक्षेत अधिक आलेला दिसतो. या तालुक्यात माढा पंढरपूरपेक्षा सभासदत्व हे राजकारणी लोकांकडून दिलेले आहे. हे सर्व मदत करणारे घटक हे राजकारणाच्या अंगाचा एक भाग आहे. म्हणून या सहकारी क्षेत्रावर त्यांचा प्रभाव जास्त आहे.

३.७.७.१ सत्ताधारी राजकीय पक्षः

अभ्यास क्षेत्रातील सहकारी साखर कारखान्यावर प्रामुख्याने कॉग्रेस आणि राष्ट्रवादी कांग्रेस या पक्षाची सत्ता आहे.

तक्ता क्र. ३.१८

साखर कारखान्यावर पक्षनिहाय राजकीय सत्ता दर्शवणारा तक्ता

अ. क्र.	राजकीय पक्ष	माढा	बार्शी	पंढरपूर	एकूण
१.	कॉग्रेस	–	–	३०	३०
२.	राष्ट्रवादी कॉग्रेस	३०	३०	–	६०
३.	शिवसेना/भाजप	–	–	–	–
४.	शेकाप	–	–	–	–
	एकूण	**३०**	**३०**	**३०**	**९०**

(स्त्रोत प्राथमिक साधनसामग्री)

तक्ता क्र. ३.१८ मध्ये अभ्यास क्षेत्रातील सहकारी साखर कारखान्यातील राजकीय सत्तेचे विवेचन केले आहे. माढा तालुक्यात सहकारी साखर कारखान्याच्या उभारणीपासून ते आजपर्यंत राष्ट्रवादी कॉग्रेसची सत्ता आहे. आणि आत्तापर्यंत एकच कारखान्याचे चेअरमन आहेत. बार्शी तालुक्यातसुध्दा राष्ट्रवादी कॉग्रेसची सत्ता आहे. पंढरपूर विभागातील सहकारी साखर कारखान्यावर कॉग्रेस पक्षाची सत्ता असल्याचे दिसते. तर सोलापूर जिल्ह्याातील इतर तालुक्यात शिवसेना/भाजप प्रणीत एकही सहकारी साखर कारखाना नाही. चर्चात्मक पातळीचा विचार केला असता असे म्हटले जाते सहकारी जागेवरील एकाच राजकीय पक्षामुळे दबावगट, भ्रष्टाचार वाढणे असे प्रकार घडताना दिसतात. परंतू दुसऱ्या बाजुने सकारात्मक दृष्टिकोन वापरला तर सहकाराचा विकाससुध्दा होतो. या सर्व बाबी

तपासल्यावर लक्षात येते की, सोलापूर जिल्हा सहकारी साखर कारखान्याची घसरण होते आहे. या तीन विभागातील संचालक मंडळाचा विचार केला तर माढा तालुक्यातील भोगावती सहकारी कारखाना बंद पडला आहे, त्या संचालक मंडळाचा राजकीय पक्ष राष्ट्रवादी कॉग्रेस आहे. तर पंढरपूरमध्ये कॉग्रेस पक्षाचे संचालक मंडळ आहे.

तक्ता क्र. ३.१९

सहकारी साखर कारखान्यातील गट/पक्ष दर्शवणारा तक्ता

अ. क्र.	संचालक मंडळाचा पक्ष	युती	माढा	बार्शी	पंढरपूर
१	कॉग्रेस	आहे	–	–	३०
२	राष्ट्रवादी कॉग्रेस	–	३०	३०	–
३	शिवसेना/भाजप	–	–	–	–
४	शेकाप	–	–	–	–
५	ठतर	–	–	–	–
	एकूण	**–**	**३०**	**३०**	**३०**

(स्त्रोत प्राथमिक साधनसामग्री)

तक्ता क्र. ३.१९ मध्ये संचालक मंडळाचे राजकीय पक्ष आणि त्यांच्यात असणारी युती यांचे स्पष्टीकरण दिले आहे. पंढरपूर विभागात कोणत्याही राजकीय पक्षाची युती नाही राजकीय पक्षाच्या दबावामुळे शेतकऱ्यांचे आणि सभासदांचे नुकासान होते. जवळ जवळ सर्वच राजकीय पक्ष शेतकऱ्यांवर दबाव टाकतात असेच चित्र सोलापूर जिल्ह्याच्या सहकारी क्षेत्रात आहे. हा दबाव प्रामुख्याने ऊसासाठी, मतदानासाठी, किंवा इतर काही कारणासाठी असतो. जिल्ह्यामध्ये सततच्या दुष्काळाचे संकट आल्याने त्याठिकाणच्या साखर कारखान्यावर त्याचा अतिशय विपरित परिणाम झाला. आहे . तेथे कारखान्यांना या परिस्थितीमुळे राजकारणाच्या प्रष्नाला सामोरे जावे लागते . मध्यवर्ती सरकारने साखर कारखन्यांना निर्यातीच्या माध्यमाने जमा होणारी अनुदानाची रक्कम दिलेली नाही . अर्थव्यवस्थेतील मुक्ततेच्या वातावरणाचे पडसाद उमटत आहेत .खुल्या अर्थव्यवस्थेच्या व्याख्येत ना नफा ना तोटा तसेच सामाजीक बांधिलकी ही तत्वे कालबाहय होत आहेत . मुक्त

अर्थव्यवस्थेचे गंभीर परिणाम आतापर्यंत संरक्षण असलेल्या साखर उदयोगाला भेडसावत आहेत . या सर्व पार्श्वभूमी निर्माण होणाऱ्या राजकीय बदलामुळे दिसून येत आहे .

सरकारी मदतीमुळे सहकारी संस्थाचा विकास झाला खरा परंतु त्याचे दूरगामी परिणाम झाले . सहकारी संस्थाचे सरकारीकरण व राजकीयीकरण झाले .तसेच ते सहकारी साखर कारखन्यांना लागू होते .साखर कारखाने हे जणू सरकारी यंत्रणेचा भाग आहे .साखर कारखाने राजकारणाची सत्ता केंद्रे झाली . सहकारी संस्था या आर्थिक सेवा देण्यासाठी आहेत त्यामध्ये राजकारण नसते हे तत्व बाजूला राहिल्याचे दिसुन येते .सरकारी व राजकीय ढवळाढवळ सर्वत्र झाल्याने सहकारी स्वायतत्ता व राजकीय अलिप्तता संपुष्टात आली .आर्थिकदृष्टया चुकीचे निर्णय घेतले जाऊ लागले .सहकारी संस्था म्हणजे आर्थिक लोकशाही त्याची जागा घराणेशाहीने घेतली, विशिष्ट घराण्यातील मंडळी स्वतःला सहकारी संस्थाचे मालक समजू लागले . सर्वसामान्य सदस्यांनी सहकारी तत्वावर एकत्र येऊन सदस्यांच्या हितासाठी व त्यांच्या निर्णयानुसार चालविलेली संस्था हे सहकाराचे मूलभूत तत्व लुप्त झाले .सोलापूर जिल्हयातील सहकारी साखर कारखाने हे या बाबींना अपवाद नाहीत .

३.५.७.२ सभासद शेतकऱ्यांची राजकीय स्थितीः

अर्थव्यवस्थेचे चक्र जसजसे गतिमान झाले तसतशी सहकारी संस्थांना झळ पोहचू लागली . स्वतःमध्ये परिस्थितीनुरूप बदल घडवून आणण्याची गतिशीलता सहकारी व्यवस्थेत नाही . कारण या व्यवस्थेतील निर्णय हा सामुहिक असतो . याचा परिणाम सहकारी साखर कारखाने, सहकारी संस्था, सहकारी बँका, सहकारी उद्योग यांच्यावर झालाच, पण त्याचबरोबर जो सामान्य शेतकरी याचा महत्त्वाचा घटक आहे त्याच्यावर अधिक गंभीरपणे झाला .जागतिक अर्थव्यवस्था आणि निसर्ग यावरच संपूर्णतः विसंबून असलेले जीवन शेतकऱ्याला असाह्य होऊ लागले संकटाचे वेळी धीर

देणाऱ्या सहकारी संस्थावर मुक्त अर्थव्यवस्थेचे आघात झाल्यामुळे या शेतकऱ्याला संकटातून सावरण्याकरिता अधिकची मदत देण्याकरिता असमर्थ आहेत. परिणामी दुर्बल मनाच्या शेतकऱ्यावर संकटाचा आघात होताना दिसून येतो य़ा सर्व घटकासाठी आपल्या सोलापूर जिल्ह्यातील घडणाऱ्या घडामोडीचा समावेश होतो .

तक्ता क्र .३ .२०

सोलापूर जिल्ह्यातील राजकारणाचे विष्लेशण दर्शवणारा तक्ता

अ .क्र .	राजकीय दबाव	माढा	बार्शी	पंढरपूर	एकूण
१	होय	२७	२९	२८	८२
२	नाही	७	१	२	८
३	एकूण	३०	३०	३०	९०
	सभासदाची निवडणुकीतील भूमिका				
३	मतदार	१२	७	७	२२
४	संचालक निवड	७	१२	११	२८
५	निवडणुकीत सहभाग	७	१३	१४	३२
६	काहीही नाही	८	.	.	८
	एकूण	३०	३०	३०	९०
	झालेल्या निवडणुका				
७	दान	२	१२	३	१७
८	तीन	६	९	२	१७
९	चार	१२	३	२	१७
१०	पाच	१०	६	७	२३
११	पाचपेक्षा जास्त	..	..	१६	१६
	एकूण	**३०**	**३०**	**३०**	**९०**

(स्त्रोत प्राथमिक साधनसामग्री)

तक्ता क्र. ३.२० मध्ये सोलापूर जिंल्ह्यातील सहकारी क्षेत्रातील राजकारणामुळे सभासद शेतकऱ्यांवर आधारित विवेचन केल आहे . माढा, बार्शी आणि पंढरपूर विभागात जवळजवळ ९७ टक्के शेतकऱ्यावर मतदानासाठी, उसासाठी राजकीय दबाव असतो . तुलनात्मक दृष्टीने या प्रष्नांसाठी बार्शी तालुका पुढे दिसून येतो नंतर पंढरपूरचा नंबर लागतो आणि

शेवटी माढा तालुक्याचा नंबर येतो .परंतु सरासरीचा अभ्यास केला तर सर्वच सहकारी साखर कारखन्यातील सभासद शेतकऱ्यांना मतदानासाठी, ऊसासाठी राजकीय दबावाला बळी पडावे लागते .

निवडणूक सहभाग महत्त्वपूर्ण असला तरी माढा विभागात जास्त लोक हे मतदारांची भूमिका पार पाडतात, तर कमी प्रमाणात संचालक मंडळ किंवा अध्यक्ष निवडीमध्ये भाग घेतात .८ सभासद माढा तालुक्यातील या प्रक्रियेत असतात . बार्शी आणि पंढरपूर मधील सभासद तुलनेने या प्रक्रियेत भाग घेतात .या विभागातील सभासद मतदार किंवा त्यापैकी कोणतीतरी भूमिका पार पाडताना दिसतात .सोलापूर जिल्ह्याचा सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीच्या संदर्भात सभांसदाना किती निवडणुका झाल्या आहेत या प्रष्नांच्या संदर्भात एकवाक्यता नाही . यावरून असे लक्षात येते की, सभासदांमध्ये जागरूकता कमी आहे त्यामुळे या व्यवस्थेतील राजकारण वाढण्यास संधी मिळत आहे .

तक्ता क्र .३ .२०

सहकारी साखर कारखान्यांच्या अध्यक्षाची भूमिका दर्शवणारा तक्ता

अ .क्र .	**न्याय**	**माढा**	**बार्शी**	**पंढरपूर**	**एकूण**
१	होय	१३	८	७	२८
२	नाही	१७	२२	२३	६२
	एकूण	३०	३०	३०	९०
अध्यक्ष बदल					
३	बदल	...	३०	३०	६०
४	नाही	३०	...	...	६०
एकूण		३०	३०	३०	९०

(स्त्रोत प्राथमिक साधनसामग्री)

तक्ता क्र .३ .२१ मध्ये सोलापूर जिल्ह्यातील अभ्यास क्षेत्रातील सहकारी साखर कारखान्याच्या अध्यक्षाची भूमिका याचे विवेचन केले आहे . माढा तालुक्यात तुलनेने या अध्यक्षाकडून न्याय मिळतो असे दिसते .बार्शी

आणि पंढरपूर विभागातील जवळजवळ ८७-९० टक्के लोकांना सभासदांना न्याय मिळाला नाही यावरून आपल्या एक बाब लक्षात येते की, राजकारणामुळे पैसे मिळविणे, सभासदांचा विचार न करणे, यासारख्या सहकारी तत्त्वाचे पालन केले जात नाही .माढा विभागातील सहकारी साखर कारखान्याचे स्थापनेपासून आतापर्यंत अध्यक्ष बदलले नाहीत तर बार्शी आणि पंढरपूर विभागाचे अध्यक्ष बदलेले आहेत य़ावरून दोन निष्कर्ष समोर येतात एक म्हणजे राजकारणामुळे सत्ताकेंद्रीकरण आणि दुसरा म्हणजे त्यामुळेच राजकीय स्थिरीकरण नसणे हे होय .

तक्ता क्र ३ .२२

अभ्यास क्षेत्रातील सहकारी तत्त्वे दर्शवणारा तक्ता

अ .क्र	तत्त्वानुसार कारखाने	माढा	बार्शी	पंढरपूर	एकूण
१	चालतात	७	११	८	२६
२	नाही	२३	१९	२२	६४
३	**एकूण**	**३०**	**३०**	**३०**	**९०**

(स्त्रोत प्राथमिक साधनसामग्री)

तक्ता क्र . ३ .२२ मध्ये अभ्यासक्षेत्रातील सहकारी तत्त्वानुसार कारखाने चालतात की, नाही याचे स्पष्टीकरण केले आहे . जास्त प्रमाणात सभासदांना तत्त्वांविशयी माहिती नाही, त्याचबरोबर सत्ताकेंद्रीत लोक सहकाराचे सर्व नियम पाळत असल्याचे दिसून येते . सारख्याच प्रमाणात माढा, बार्शी आणि पंढरपूर या क्षेत्रातील सहकारी साखर कारखान्यांच्या सहकार तत्त्वाबाबत कामगिरी होताना दिसून येते . सहकारी संस्थेविशयी माहिती व शिक्षण, सभासदांना नफ्याचे वाटप व त्याची माहितीचा सारख्या घटकांची पूर्तता फक्त कागदावरच केली जाते प्रत्यक्षात त्याचा फायदा सभासदांना आणि त्या संस्थेला होत नाही पर्यायाने ही व्यवस्था ढासळलेली आहे . सहकार ही अर्थिक लोकशाही आहे .सहकारी संस्थांना सहकारी तत्त्वानुसार चालविणे आवष्यक आहे .त्यामुळेच सहकारी संस्थाचे व्यवहार /कारभार स्वच्छ राहील . शेतकरी आणि गरीब वर्गाला तळागाळातून आणि ग्रामीण व्यवस्थेतून पुढे आणणे महत्त्वाचे कर्तव्य सहकारी क्षेत्राचे आहे ते

कुठेतरी मागे पडताना या तक्त्यावरून दिसते .सरकारने सहकारी सुधारणा करताना समाजाची बांधिलकी, सभासदभिमूख सेवा, सांघीक भावना, सभासदांना प्रशिक्षण, सातत्याने सुधारणा, सहकारी संस्थाची मोजमाप, अंर्तगत दर्जा तपासणे, ऊस उत्पादक शेतकऱ्यांना योग्य दर, सिंचनाच्या सुविधा आणि पारदर्शक व्यवस्थापन यासारख्या उपाययोजना करण्यात याव्यात असे अभ्यासक्षेत्रातील सभासद शेतकऱ्यांचे मत आहे .

३.५.७.३ अभ्यास क्षेत्रातील संचालक मंडळ आणि तत्त्वाची माहिती:

सहकारी चळवळ सुखवस्तु लोकांचे जीवनमान उंचावण्याचे साधन न राहता ती दीनदुबळयांची चळवळ झाली पाहिजे असे विधान मा य़शवंतराव चव्हान यांनी केले होते त्यापमाणे तळागाळापर्यंत सहकार क्षेत्र ग्रामीण जनतेपर्यंत पोहचले खरे पण त्या सभासद लोकांनाच त्याची माहिती नाही हे तक्ता क्र ३ .२३ मधून दिसते तसेच सहकार तत्त्वाचे पालन यासंस्थाकडून होत नाही .

तक्ता क्र ३ .२३
संचालक मंडळाची माहिती आणि सहकाराच्या तत्त्वाची घसरण दर्शवणारा

अ क्र	संचालक मंडळ	माढा	बार्शी	पंढरपूर	एकूण
१	होय	१०	१	३	१४
२	नाही	२०	२९	२७	७६
	एकूण	३०	३०	३०	९०
	तत्त्वाची घसरण				
३	होय	१४	१४	१२	४०
४	नाही	३	४	४	११
५	माहिती नाही	१३	१२	१४	३९
	एकूण	**३०**	**३०**	**३०**	**९०**

तक्ता क्र ३.२३ मध्ये अभ्यास क्षेत्रातील सभासदांना त्यांच्या भुमिकेविषयी विवेचन केले आहे ज़ास्त प्रमाणात होणाऱ्या सभासदाच्या होणाऱ्या निवडणूका, संचालक मंडळाची माहिती नाही त्यामध्ये बार्शी विभाग आघाडीवर आहे, परंतु पंढरपूर माढयापेक्षा मगाास असल्याचे पण बार्शीपेक्षा चांगले असल्याचे दिसून येते स़हकार क्षेत्रातील जवळ जवळ ४७ टक्के लोकांना सहकारी क्षेत्राची वाढ होते की घट होते याची माहिती नाही ४८ टक्के लोकांच्या म्हणण्यानुसार सहकारी साखर कारखान्याची घट होत आहे क़ेवळ ७ टक्के लोकांच्या म्हणण्यानुसार सहकारी साखर कारखान्याचा विकास होत आहे स़ोलापूर जिल्हयात सध्या १६ सहकारी साखर कारखाने आणि १९ खाजगी साखर कारखाने कार्यरत आहेत य़ावरून सहकारी क्षेत्राचा विकास हा एक राजकीय अड्डा बनल्याचे दिसून येते .

३.६ समारोपः

१९७० पुर्वी जे काही तूरळक खाजगी साखर कारखाने होते त्यांच्याद्वारे राज्यातील ऊसाचे गाळप होऊन साखर उत्पादन घेतले जायचे,मात्र त्यामध्ये शेतकऱ्यांच्या ऊस दराला न्याय मिळत नव्हता तसा हा प्रष्न आज ही आहे ध़नंजयराव गाडगीळ व विठ्ठलराव विखे पाटील यांच्या पुढाकाराने ऊस उत्पादकांना एकत्रित करून त्यांच्या सहकार्याने संस्था निर्माण करण्यात आल्या स़ध्या महाराष्ट्रातील सर्व कारखान्याच्या विकासात या सहकारी तत्त्वांचा समावेश असला तरीसुध्दा सहकारी साखर कारखन्याच्या काही समस्या डोके वर काढताना दिसतात, त्यामध्ये प्रामुख्याने राजकिय परिस्तिथी हा मुख्य घटक आहे भ़ारतीय अर्थव्यवस्थेने स्विकारलेल्या १९९१ च्या नवीन आर्थिक धोरणानुसार सहकारी संस्थाची खरी तारेवरची कसरत सुरू झाली .

शेती हा आपल्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे दिवसेंदिवस शेतीवर मोठया प्रमाणावर संकटे येताना दिसत आहे क़ापड उदयोगानंतर भारतात ऊस व त्यावर अवलंबून असणारी साखर कारखानदारी मोठया प्रमाणात विस्तारली .

आज भारतात २१८ सहकारी तर २६६ पेक्षा जास्त खाजगी साखर कारखाने आहेत त्यावर ५ ते ६ कोटी कुटुंबाचा निर्वाह आहे शिवाय २० लाख लोकांना रोजगार उपलब्ध झालेला आहे द्रेशात उपलब्ध असणाऱ्या एकूण सुमारे ५० लाखापेक्षा जास्त ऊस मोडणीसाठी व इतर कामासाठी मजूरांना रोजगार मिळतो ज़गात ब्राझीलनंतर सर्वांधिक साखर उत्पादक म्हणून भारताचा दुसरा क्रमांक लागतो . साखर उदयोगातून साखर उत्पादनाबरोबरच अल्कोहोल, सहवीजनिर्मिती अशा अनेक उपपदार्थांची निर्मिती केली जाते स़न २००८ – ०९ या हंगामात १४६ लाख टन, सन २००९–१० या हंगामात १८८ लाख टन साखर उत्पादित झाली होती तर २०१०–११ या हंगामात २८० लाख टन साखर उत्पादित झाली होती ख़ाजगीकरण, जागतिकीकरण व उदारिकरणामुळे केंद्र व राज्य सरकारांनी सहकारी चळवळीच्या विकासाकडे १९९१ नंतर दुर्लक्ष केल्याचे दिसते.

महाराष्ट्र सरकारने सहकारी साखर कारखान्याच्या आजारपणाची कारणे शोधून उपाय योजना करण्यासाठी दोन वेळा समिती नेमली होती य़ा समितीने अहवाल सादर केला होता परंतु अमंलबजावणीच्या बाबतींत योग्य निर्णय न घेतल्यामुळे सरकारचे धोरण योग्य प्रकारचे नाही असे दिसते .

सोलापूर जिल्हयातील सहकारी साखर कारखान्याच्या विकासात राजकारण हा मोठा अडथळा आहे. १६ सहकारी आणि १९ खाजगी कारखाने सोलापूर जिल्हयात आहेत स़भासदांचे शिक्षण,जमीनक्षेत्र, शेतकऱ्यांच्या आर्थिक,सामाजिक व राजकीय समस्या,ऊस उत्पादन खर्च, सभासदांवर असणारा राजकीय दबाव, सहकारी तत्त्वांची अमंलबजावणी,राजकारणाचे इतर घटक इत्यादींच्या अभ्यासावरून सहकार क्षेत्राच्या घसरणीसाठी सोलापूर जिल्हयातील असणारे स्वार्थी राजकारण हे आहे. सोलापूर जिल्हयाच्या १६ सहकारी साखर कारखान्यामध्ये प्रामुख्याने विशिष्ट एका राजकीय पक्षाची सत्ता सातत्याने असल्याचे दिसून येते त्यामुळे सत्तेची चावी पूर्णतः एका राजकीय पक्षाच्या हातात राहते त्यातून स्वार्थ साध्य करण्यासाठी सहकाराची तत्त्वे सहकाराचे नियम ढाब्यावर बसवले जातात.

प्रकरण चौथे

सोलापूर जिल्हयातील सहकारी दुधसंघ आणि राजकारण

प्रकरण चाथे

सोलापूर जिल्हयातील सहकारी दुधसंघ आणि राजकारण

४ १ प्रस्तावना

४ .२ भारतातील दुग्ध सहकारी चळवळ

४.२.१ भारतातील दुग्ध उत्पादन

४ .२ २ भारतातील सहकारी दुग्ध संस्थाचा विकास

४.२.३ भारतातील सहकारी व खाजगी दुध संस्था

४ .३ महाराष्ट्रातील दुग्ध सहकारी चळवळ

४.३.१ महाराष्ट्र राज्यातील एकूण प्राथमिक दूग्ध सहकारी संस्था

४.३.२ महाराष्ट्र राज्यातील सहाकारी दुग्ध संघाचा विकास

४ ४ सोलापूर जिल्ह्याातील दुग्ध सहकारी चळवळीची सद्यस्थिती

४ ५ आकडेवारीचे विश्लेषण

४.५.१ सहकारी संस्थेतील दुध उत्पादने

४.५.२ सोलापूर जिल्हयातील दुध संघातील निवडणूक

४.५.३ सहकारी दुध संघातील राजकीय प्रभाव

४ .६ समारोप

प्रकरण चौथे

सोलापूर जिल्हयातील सहकारी दूध संघ आणि राजकारण

४ .१ प्रस्तावनाः

भारत हा कृषीप्रधान देश म्हणून ओळखला जातो. या देशात शेती व्यवसायावर पुर्वी ७०% लोक आपला उदरनिर्वाह करत होते. तर आजच्या काळात ६० टक्के लोक उदरनिर्वाह करताना दिसून येतात .या व्यवसायाबरोबर जोडधंदा म्हणून पशुपालन करणे व दुग्ध उत्पादनाशिवाय इतर उत्पादने मिळविणे व आपला चरितार्थ चालविणे सहज शक्य झाले आहे द्रुधास पूर्णान्न म्हणून संबोधले जाते. मानवाच्या आहारात दुधाचा सहभाग महत्वाचा आहे . त्यामुळे दुधास मोठ्याा प्रमाणावर मागणी आहे . शेतीस पूरक व्यवसाय म्हणून दुग्ध व्यवसाय अधिक फायदेशीर आहे शेतीची उत्पादकता वाढवण्यास शेणखत व गोमूत्र अधिक उपयोगी आहे. शेतीच्या कामासाठी बैलांचा चांगला उपयोग हातो. शेतकऱ्यांनी दुग्धवयवसाय वाढविणे गरजेचे आहे. आजही ग्रामीण भागात दुभत्या जनावरांची सरासरी दुध उत्पादन क्षमता कमी आहे. पाषक आहार, पशुवैद्यकीय सेवा इ. चा अभाव असल्यामूळे व वाहतुकीच्या अपू-या सोयी, दूधावर प्रक्रिया करणा-या संस्थाचा अभाव, दूधाची विक्री करुन त्यास योग्य किंमत देणाऱ्या संस्थांचा अभाव या कारणामुळे दुग्ध व्यवसायाचा विकास होवू शकला नाही.

गुजरात राज्यामधील खेडा जिल्हयात पोलसन नावाच्या एका खाजगी दूध व्यवसायिकास कंटाळून काही मान्यवर नेते मंडळी यांनी एकत्र येवून १९४६ साली खेडा जिल्हयात सहकारी तत्वावरील दूग्धसंस्था स्थापन केली. या जिल्हयातील एकून ४०० खेडयामध्ये प्राथमिक दुग्ध सहकारी संस्थांची स्थापना होवून जिल्हा पातळीवर कैरा मिहक युनियनची आनंद येथे स्थापना केली[८५]. प्राथमिक संस्थेकडुन दुध घेऊन जिल्हा संस्थेकडे पाठवले जात असे शिलकी दुधाचे लोणी तूप बनवले जात असे हीच भारतातील प्रथम सहकारी संस्था असून अमूल या

[85] Kharody, D.N.,(1974) , "Dairying in India",Asia Publishing House, New Delhi.

नावाने संघाचे वेगवेगळे दूग्धजन्य पदार्थ बाजारपेठेत मिळत आहेत. ९४६ साली ही संस्था झाल्यामुळे खाजगी व्यापाऱ्याकडून होणारी दूध उत्पादकाची पिळवणूक थांबली. आनंद येथे स्थापन झालेली ही संस्था देशातील सहकारी दूध व्यवसायाला मार्गदर्शक ठरली आहे.

भारत देश जगामध्ये दूग्ध उत्पादनात प्रथम क्रमांकाचा देश म्हणून गणला जात आहे. सध्या भारतात रोज दीड कोटी टन दुध उत्पादित होत आहे. डंकेल प्रस्ताव गॅट करारामुळे संपूर्ण जगाची बाजारपेठ सर्व देशांना मुक्त खुली झालेली आहे. त्यामुळे कोणताही देश विदेशी बाजारपेठेत आपले उत्पादन विक्रिसाठी उपलब्ध करु शकतो भारतातील प्रचंड लोकसंख्येमुळे आपल्या देशची बाजारपेठ सर्वानाच आकर्षिंत करित आहे. विकसीत देशाची उत्पादने उत्तम दर्जाची असून उत्पादन खर्च ही कमी आहे त्यामूळे स्वस्त दरामध्ये चांगल्या गुणवत्तेची उत्पादने विकसनशील व अविकसीत देशात पुरवून तेथील बाजारपेठ काबीज करणे शक्य झाले आहे. [८६]

आपल्या देशातील दुध व दुग्धजन्य पदार्थाची गुणवत्ता व दर्जा टिकवण्याची क्षमता व ते ग्राहकास कमी किंमतीत कसे उपलब्ध होईल याकडे जातीने लक्ष देणे आवष्यक आहे. आपल्या भारत सरकारने उत्पादक व ग्राहक यांच्या समतोल धोरण ठेवून हा व्यवसाय वाढीस लावण्याचा प्रयत्न केला. परंतु सरकारी दुध योजनेमध्ये प्रचंड तोटा होत असल्याने आणि भविष्यातही त्यामध्ये फायदा दिसत नसल्याने अशा योजना सहकारी संस्थाकडे हस्तांतरीत होत आहेत. अशी परिस्थीती असल्यामुळे यापुढे सहकारी संस्थांना फार मोठी जबाबदारी पेलावी लागणार आहे. त्यासाठी किफायतशीर दुग्धोत्पादनाच्या योजना सर्वसामान्यापर्यत राबवावी लागेल दुधाचा उत्पादनाचा खर्च करणे व दुधाची गुणवत्ता अंतरराष्टीय धोरणानुसार सुधारणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी जनावरांची तंत्रशुध्द पैदास करुन त्यांचे व्यवस्थापन ते आहारापर्यंत आपणास अमुलाग्र बदल आत्मसात करावा लागेल आणि आज हा एक चिंतनाचा विशय आहे. की आपल्या बरोबर स्वातंत्र

[86] Koli P.A.,(2007) "Dairy development in India, Challenges Before Co-operative.", Shruti publication , Jaipur ,PP. 43.

झालेल्या इस्त्राईल या देशामध्ये एका गाईचे एका वेतातील दुग्ध उत्पादन ११,००० लिटरच्या आसपास आहे. तर आपल्या गाईचे एका वेतातील दुध आपण ३०००ते ३५०० लिटर पर्यतच होऊ शकलो आहे.

त्यामुळे जनावरांची वंशावळ सुधरणे एक ठोस धेरण जे प्रभावीपणे राबविले गेले असे झाले नाही. आज महाराष्टात 'बायफ' उरळीकांचन ही एक संस्था उच्च वंशावळीच्या विर्यकांडया पुरवतात. त्यांनाही मर्यादा असल्यामुळे उच्च वशांवळीच्या विर्यकांडया सर्वत्र न उपलब्ध झाल्यामुळे एकत्रित दूध उत्पादनात घट दिसून येत आहे. पशु आहारावर फार मोठा खर्च होतो. परंतु आजही बाजारात आयएसआय मार्क असलेले पशुखाद्य नाही. नरांच्या कमतरतेमुळे कितीतरी अडचणींना दूध उत्पादक सामोरे जात आहेत. भारतासारख्या शेतीप्रधान देशात दुय्यम प्रकारचा चारा आहे पण तो वाया जात आहे. त्यावर जर युरीया मीठ, मोलसीस इ. प्रक्रिया केली तर आपण चा-याचा खर्च कमी करून दूध उत्पादन खर्च कमी करू शकतो.[८७] वर्शभर हिरवा चारा आपल्याकडे उपलब्ध होत नाही परंतु 'मुरघास' च्या तंत्रज्ञानाने आपण वर्शभर सकस चारा जनावरास उपलब्ध करून वर्शभर चांगले दूध उत्पादन घेऊ शकतो. कुट्टी करून चारा वापरल्याने वाया जाणाऱ्या चाऱ्याचा खर्चही कमी करता येईल परंतु वरील सर्व योजना या १०० टक्के परिणामकारक यशस्वी झाल्याचे दिसत नाही.

आज जगातील सर्वाधिक जनावरे व सर्वाधिक दुग्धोत्पादन देशत जगाच्या ७० टक्के म्हैशी तर २० टक्के गाई आहेत आणि एका वेतातील दूध पाहिले तर भारतात ९८७ ली. तर जगात तेच २०३७ लि. एवढे आहे ही चिंतेची बाब आहे. जगाच्या एकुण निर्यातीच्या फक्त १ टक्के दुध आपण निर्यात करत आहोत. एकुण व्यवसायाच्या १७ टक्के व्यवसाय हा व्यवसायिक पध्दतीने तर ८३ टक्के व्यवसाय हा ग्रामीण भागात आहे. एकुण व्यवसायामध्ये ८० टक्के महिलांचा सहभाग आहे.[८८] परंतु किती महिला सहकारी संस्था महिला चालवतात याचाही एक विचार करण्याची गरज आहे.

---

[८७] पषुनधन विभाग महाराष्ट्र सरकार २०१४.
[८८] पषुनधन विभाग महाराष्ट्र सरकार २०१४.

दुध संकलनात खाजगी दूध गवळी मोठया इर्शेने दूध व्यवसाय उतरल्याचे दिसते व त्यास खाजगी दूध व्यवसायिक अधिक प्रोत्साहन देताना आढळतात. त्यांना नियम व अटीमध्ये शिथिलता असल्याने सहकारी संस्थांबरोबर स्पर्धा करणा-या या व्यवसायिकांकडे दूध गेल्याचे दिसते. थोडयाफार कालावधीसाठी हे व्यवसाईक दरामध्ये तफावत निर्माण करत व इतर प्रलोभने दाखवून दूध उत्पादकांना सहकारी संस्थांपासून बाजुला करत आहेत. खाजगी दूध उत्पादकांना सहकारी सस्थांपासून बाजूला करत आहेत. खाजगी दूध व्यवसायिक कोणत्याही प्रकारचे दूध घेत असल्याने त्यामुळे शुध्दतेवर नियंत्रण न राहिल्याने भेसळीचे प्रमाण वाढत असल्याचे आपण पाहतो व याचे प्रमाण हे इतक्या खालच्या पातळीवर आहे की ग्राहकासही दूध वापराबाबत विचार करावा लागतो. माणसाच्या ज्या व्याख्या केल्यात त्यामध्ये म्हणतात की माणूस कायम दूध पितो त्यामागे कारण म्हणजे दूध हे पूर्ण अन्न असून त्यामध्ये अनेक मौल्यवान पौष्टिक घटक आहेत. अशा अमृतरूपी दूधामध्ये वरील घातक स्पर्धेमुळे स्वहीतासाठी भेसळीचे एक विश कालवणाऱ्यांची संख्या ही फार मोठी आहे आणि त्यात वाढच होत आहे ही चिंतेची बाब आहे.

दुधाची गुणवत्ता ही चांगली ठेवायची असेल तर वाहतुकोच्या यंत्रणेत अमुलाग्र बदल अपेक्षित आहे. दुध काढल्यापासून प्रक्रियेपर्यंतच्या वाहतुकीत फार वेळ जात असल्याने दुधाची गुणवत्ता चांगली राहत नाही. त्यामुळे गावोगावी बल्क कूलर्स बसवून लवकरात लवकर दूध थंड करता येईल व टँकरने वाहतूक करून कॅनच्या वापरात बचत करता येईल त्यामुळे स्वच्छ दूध उत्पादन निर्मितीस हातभार लागून चांगले दूध आपण ग्राहकास उपलब्ध करू शकतो. आज मुंबईसाठी २५ ते ३० लाख लिटर्स दूधाच्या गरजेसाठी वाहतुकीवर होणारा खर्च फार मोठा आहे. आपण ८० ते ८५ टक्के पाण्याची वाहतूक करतो[८९].

दूधावर प्रक्रिया करताना दूध संकलन चिलींग व पाश्चरायझेशन दूधापर्यंतच ७० ते ७५ टक्के व्यवसाईकांची मजल आहे. दूधापासून असंख्य उपपदार्थ तयार करता येतात पण अशी उत्पादनांची शृंखला असलेल्या डेअरींचे प्रमाण फार कमी

[89] Mathew K. S. (1984) Co- operative Dairying, NCDFI,New Delhi ., Jan.p.1.

आहे परदेशामध्ये दुधाबरोबरच्या सर्व प्रकारच्या निर्मितीवर त्या दुध व्यवसायिकांचा जोर असतो. आपल्याकडे किती संस्थांची मिठाई आहे हा पण एक प्रश्नच आहे. दुध प्रक्रियेमध्ये नवनवीन बदल आत्मसात करणे आवश्यक आहे. आज आपण दूध होमोजीनाईस करतो परंतू ते चांगले की वाईट यावरही संशोधन होणे महत्वाचे आहे. कारण त्यामुळे त्यावर होणारा प्रचंड खर्च आपणास टाळता येईल.

जागतिक बाजारपेठ खुली झाल्याने आज आपल्या विपणन व्यवस्थेवर फार मोठी जबाबदारी आहे. अंडयाचा जास्त वापर होण्यासाठी 'नॅशनल एग्ज कमिटी'[९०] अंडयाचा वापरासाठी प्रचार करते. तसे सामुहिक दूध वापर वाढीसाठी प्रचार यंत्रणा राबविणे महत्वाचे आहे. आज दुध उत्पादनात देशचा पहिला तर जागतिक पातळीवर ती २८० मि. ली. आहे तेच महाराष्टात प्रती माणसी २२० मिली दुध उपलब्ध आहे. तर या गोष्टींचा विचार करून आपल्या दूग्धव्यवसाय वाढीस किती व्यापक क्षेत्र आहे यांचा अंदाज येतो, आज देशामध्ये जसे नॅशनल इलेक्टीसीटी ग्रीड आहे. त्यामध्ये एके ठिकाणी विद्युत पुरवठा कमी पडल्यास तात्काळ दुसऱ्या राज्यातून तेथे पाठविता येतो. तसे दुध व्यवसायामध्ये मिल्क ग्रीडची आवष्यकता आहे. त्यामूळे एका ठिकाणचे जादा झालेले दुध तत्काळ दुसऱ्या ठिकाणी पाठवून व्यवसाय वाचविता येईल.

दुध हे पूर्ण अन्न आहे. दुधाची किंमत व इतर पदार्थ उदा. कोकोकोला व इतर पेये यांच्या किंमती व पौष्टीकतेत कमालीची तफावत आहे. दुध इतर सर्व पेयापेक्षा जास्त पौष्टीक व स्वस्त आहे. त्यामुळे दुधाचा आहारामध्ये जास्त वापर होणे महत्वाचे आहे. आज कर्नाटकमध्ये नंदीनी, गुजरातमध्ये अमुल या एका नावाने दूधाचे विपणन केले जाते. याउलट महाराष्ट्रात दुधमहासंघच इतर दुधसंघाबरोबर स्पर्धा करत आहे. दुधमहासंघ, जिल्हा दुधसंघ, तालुका दुधसंघ आणि शासन दुधढेऱ्या या आपसातच स्पर्धा करीत आहेत. त्यामुळे सहकारातच सहकायांचा अभाव दिसत आहे आणि खाजगी दुग्ध व्यवसायिक या परिस्थितीचा फायदा उठवत आहेत.

---

[९०] भोसले नितिन (संपा.), बळीराजा मासीक, पुणे, २०१४.

नॅशनल को-ऑपरेटीव्ह ऑफ डेरी फडरेशन[91] यांचेही कार्य मर्यादितच आहे. त्यांची भुमिका फार मोठया प्रमाणात यशस्वी झाली नाही. त्यातुनच जिल्हा दूध संघाच्या विभाजनाची घाट घातला जावू लागला आहे. सरकारने त्यांच्या विभाजनाचा जणू चंगच बांधला आहे. एक गाव एक सोसायटी हा नियम जसा गुंडाळण्यात आला व त्यामुळे सोसायटयांचीझालेली अवस्था पाहता भविष्यात तालुका संघाच्या रूपाने हेच डोळयासमोर येणार आहे. आज दुग्धव्यवसाय जर खऱ्या अर्थाने टिकवायचा असेल तर गुणवत्तायुक्त दुध उत्पादन तसेच वेगवेगळी उपपदार्थ निर्मिती करून याचेही निर्यात होणे गरजेचे आहे. आज शेण खताचा उत्तम सेंद्रीय खत म्हणून वापर वाढीस लागला आहे. त्यातून इंधन बचतीसाठी गोबर गॅस ची संकल्पनाही रूजत आहे. याही पलीकडे आता गोबर गॅसमधून वीजनिर्मिसारख्या व्यवसायातून इंधन निर्मिती आपण करू शकतो. गाईचे मूत्र हे उत्तम खत तसेच आयुर्वेदीक औषध म्हणूनही वापरले जाते. आज वाया जाणारे मूत्र संकलीत करून त्याचा काढा करून वेगवेगळी प्रभावी औषधे तयार करण्यात येत आहे.

इस्त्राईलमध्य दुग्धव्यवसायात खरा सहकार रूजला असून तथे काही कुटुंबे एकत्र येवून त्यांनी बूथची स्थापना केली आहे. वेगवेगळया समित्याची स्थापना करून त्यांच्यामाफंत दूध संकलन, दुध प्रक्रिया, दुधाचे उपपदार्थ आणि त्याचे विपणन प्रभावीपणे राबविले जात आहे. अशा जागतीक परिस्थितीचा विचार करता भारतीय दुग्ध व्यवसायासमोर अर्थात सहकारी दूध संस्थांच्या समोर फार मोठी आव्हाने आहेत.

४ २ भारतातील दुग्ध सहकारी चळवळ

स्वातंत्रप्राप्तीनंतर सहकाराला एक नवी गती मिळाली. विकासाचे एक नवे युग सुरू झाले व विकासाचे प्रक्रियेत सहकाराला अनन्यसाधारण स्थान मिळाले. याचे कारण भारताचे पहिले पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू यांनी सहकाराला मोठा पाठिंबा दिला. 'सर्व भारत सहकारमय करू, उत्तेजीत करू, प्रेरीत करू अशी घोषणा त्यांनी

[91] Jamal,Shagufta. (1994). Women in Dairy development. New Delhi: Concept Publishing Company.

केली.'[९२] भारतातील प्रत्येक खेडयात सहकारी संस्था ही विकासाची केंद्र असली पाहिजे. पंचायत व शाळा यांच्या जोडीने अशी त्यांची धारणा होतील. सोव्हिएट युनियनमध्ये पंचवार्षिक योजनातून जी आर्थिक क्रांती त्यांनी पाहिली, त्याने ते प्रभावित झाले, त्याच पध्दतीच्या पंचवार्षिक योजना परंतु लोकशाही तत्वानुसार भारतात आखून त्यांच्या माध्यमातुन देशाचा विकास घडवून आणण्याचा त्यांनी संकल्प सोडला होता. १९५१ साली सुरू झालेल्या पहिल्या पंचवार्षिक योजनेत म्हटल्याप्रमाणे भारतात मिश्र अर्थव्यवस्था राहिल खाजगी क्षेत्राचे सरसकट राष्ट्रीयीकरण होणार नाही. खाजगी कृषी व उद्योग यांना स्थान राहील परंतु मूलभूत उद्योगांच्या प्रगतीकरिता सार्वजनिक उद्योग मोठया प्रमाणावर स्थापन केले जातील. या दोन्ही क्षेत्राच्या मध्यभागी सहकारी क्षेत्र राहिल. कृषी क्षेत्रास लागणारा पतपुरवठा, कृषी मालाचे विपणन व अन्य सेवा, याचबरोबर प्रक्रिया उपभोक्ता, वितरण, ग्रामउद्योग, गृहनिर्माण इ. वेगवेगळया क्षेत्रात सर्वसामान्याचा सहभाग वाढवण्यासाठी सहकार हेच साधन आहे. या क्षेत्रातील विकास योजना सहकाराच्या माध्यमातून कार्यरत होतील. सहकारी संस्थाच्या विकासासाठी पंचवार्षिक योजनांमधून आर्थिक व अन्य साह्य उपलब्ध होईल. या नवीन धोरणांचा पूरक अशी एक विशाल संकल्पना सहकारी संघराज्यांच्या स्वरूपात अर्थशास्त्रज्ञ डॉ.धनंजयराव गाडगीळ यांनो मांडली.[९३] पंचवार्षिक योजनांतील सहकाराचे मध्यवर्ती स्थान विशद करताना असे म्हटले की, 'सहकारातुन विकासास दिशा व संतुलन प्राप्त होईल व आर्थिक विकास मुल्यधारीत राहिल. अशा प्रकारचे उच्च ध्येय बाळगूण असलेल्या सहकाराची अपेक्षीत आणि शास्वत वाढ झाली नाही जी वाढ झाली ती केवळ संख्यात्मक वाढ होती, गुणात्मक नव्हती. कारण सहकाराच्या माघमातून समाजाची जी प्रगती व्हायला पाहिजे ती झालेली नाही.

सुरवातीला सहकारी तत्वावर निर्माण झालेल्या पतपेढया शेतकरी वर्गाला सावकारी पाशातून बाहेर काढण्यासाठी निर्माण झाल्या. शेतकरी सावकारी कर्जातून पिळून निघत होता. आजही आत्महत्या करत आहेत. ग्राहकाला आजही वाजवी

---

[92] Kulandaisamy, V, Co-operetive Dairying in India, 1st ed.,Coimbatore: Rainbow Publications,1982. 39

[93] C Madam Mohan, (1989) "Dairy Management in India." Mittal publications, Delhi,PP.274-284.

भावात माल मिळवू शकत नाही. नोंदणी झालेल्या सहकारी संस्था जास्त व कामे करणाऱ्या कमी आहेत. सहकारी संस्थेचा प्रत्येक सभासद ही सहकारी तत्वे बनवणारा पाहीजे. अनेकांना ही सहकारी संस्था आहे. हेच मान्य नसते. सहकारी संस्थेतील संचालक, अधिकारी, सेवक मनाला येईल तसे निर्णय घेतात.

अकार्यक्षम संस्था, थकबाकीचे वाढते प्रमाण, भ्रष्टाचार नियम न पाळण्याची वृत्ती आदी बाबी सहकारास मारक आहेत. डॉ. धनंजयराव गाडगीळांनी थकबाकी राहू नये व थकबाकी वसुल करण्याबाबत जे वक्तव्य केले होते त्याची सत्यता आज पटू लागली आहे. आज अनेक सहकारी तत्वावर चालणाऱ्या बॅका केवळ थकबाकी जास्त आहे या कारणामुळे बंद पडत आहेत, सहकार चळवळ ही राजकीय व्यक्ती व स्वार्थी लोकांच्या हातातले बाहुले बनले आहे. सहकारातील बऱ्याच व्यक्तो या राजकीय, व्यापारी असतात. त्यांना सहकाराबद्दल फारशी आस्था नसते. आपल्याच लोकांना कर्जपुरवठा करणे, आपलाच माल विक्रिला ठेवणे, भ्रष्टाचार, आपल्याला अनुकूल नियम बनवणे आदी गोष्टी ते अवलंबतात. त्यातूनच सहकाराच्या मूळ तत्त्वाला हरताळ फासला जातो. सहकारी संस्थांत अनेक संधी साधू, दलाल सावकारांचे वर्चस्व आहे. निष्ठावंत नेते कार्यकर्ते आदी मागे पडत आहेत. आपल्या सरकारचे धोरणही याला काही प्रमाणात कारणीभूत आहे. प्रत्येक राज्य सहकाराकडे वेगवेगळया नजरेने पहाते. कायद्याने वेळकाढूपणा स्वीकारला आहे. धडाडीचे निर्णय घेतले जात नाही. नियमांबाबत चालढकल केली जाते. संस्थेचे आर्थिक परीक्षण काटेकोरपणे केले जात नाही. यामुळे सहकारी संस्थेची वाढ निकोप होत नाही.

सहकारी चळवळ भारतात असमान वाढीस लागलेली आहे. महाराष्ट्र गुजरात, मध्यप्रदेश , तामिळनाडू कर्नाटक व उत्तर प्रदेशात काही प्रमाणात ही चळवळ जोमात आहे. पूर्वेकडील राज्यात लागणारा माल मध्यवर्ती ग्राहक भांडारातून घ्यावा, मध्यवर्ती राष्ट्रीय ग्राहक भांडारातून माल घ्यावा हे मार्गदर्शक तत्व कोणी पाळत नाही तर सगळे खाजगी व्यापाऱ्याकडून माल घेतात. आकडेवारी असे सांगते की

राष्ट्रीय व्यापारी उलाढालीत सहकाराचा वाटा जेमतेम १० टक्के आहे.[१४] सहकारी संस्थेतील सभासदांना सहकाराची तत्वे शिक्षण देण्याची नियमात तरतूद आहे. किती संस्था आपल्या सभासदांना हे शिक्षण देतात याचे प्रमाण फारच नगण्य आहे. बहुतेक संस्था या हितसंबंधी गटाकडे आहेत. या स्वार्थी पध्दतीने चालवल्या जातात. सदोश कर्जवाटप व वाटप झालेली कर्जे वसुल न करणे ही सहकारी संस्थांना लागलेली कीड आहे. अकुशल राजकीय नेतृत्व, भ्रष्टाचार सहकारी संस्था म्हणजे खाजगी मालमत्ता अशी प्रवृत्ती बळावते. जागतिक पातळीवर अर्थव्यवस्थेच्या विकासाच्या सदर्भात तक्ता क्र ४.१ मध्ये परामर्श घेतला आहे.

तक्ता क्र ४.१

जागतिक विकासाचा अहवाल दर्शवणारा तक्ता

अ. क्र	देश	२००७	२००८	२००९
१	युरोप	२.६	0.९	−३.२
२	जपान	२.४	−0.७	−५.८
३	कोरिया	५.0	४.१	३.५
४	यु. के	३.0	0.७	−२.८
५	टमेरिका	२.0	१.१	−२.६
६	अर्जेंटिना	८.७	६.५	३.६
७	ब्राझील	५.७	५.८	१.८
८	चीन	१३.0	९.0	६.७
९	भारत	९.0	७.१	५.३
१0	इंडोनेशिया	६.३	६.१	१−५.५
११	मलेशिया	६.३	५.८	४.८
१२	थायलंड	४.८	४.७	४.५

[१४] डोंगरे के. आर, महाराष्ट्राची सहकारी चळवळीची वाटचाल, सहाकरी महाराष्ट्र, ISSN-0९७२३२१८/२000,२०१३ पृष्ठ क्र. १५-१८.

(स्त्रोतः रिझर्व्ह बॅक ऑफ इंडिया)

डेन्मार्क या देशातून खऱ्या अर्थाने दुग्ध सहकारी संख्याला सुरूवात झाली. त्यानंतर आपल्या देशात १९०४ च्या सहकारी कायदयांतर्गत दुग्ध सहकारी संस्थांना सुरूवात झाली यातून आपल्या देशातील ग्रामीण अर्थव्यवस्थेचा सुधारणेला वाव मिळाल्याचे दिसून येते. तक्ता क्र ४.१ मध्ये जागतिक पातळीवरील आर्थिक वृध्दीदराचा परामर्श घेतला आहे. उदयोन्मुख अर्थव्यवस्थाचा विकासाचा दर जास्त आहे परंतु २००७ पासून २००९ पर्यंत सर्वच देशाचा विकासाचा दर घसरलेला दिसून येता. आपल्या देशांचा विकासाचा दर ९ टक्कयावरून ७ टक्के व ५.३ टक्के २००७ पासून ते २००९ पर्यत घटलेला आहे. त्यामुळे त्याचा सहकारी दुग्ध संस्थावर सुध्दा परिणाम झाल्याचे दिसून येते.

तक्ता ४.२

सहकारी संस्थांची भारतातील दुधाची उपलब्धता दर्शवणारा तक्ता

अ.क्र	वर्ष	दुध उपलब्धता	दुधाचे उत्पादन ली.
१	२००१-०२	२२२	१-८०.९
२	२००२-०३	२३४	१-८५.९
३	२००३-०४	२३७	१-८९.४
४	२००४-०५	२४०	९२.४
५	२००५-०६	२४४	९९.१
६	२००६-०७	२४६	१००.९
७	२००७-०८	२५२	१०४.८
८	२००८-०९	२५८	१०८.५
९	२००९-१०	२६३	११२.५
१०	२०१०-२०११	२८१	१२१.८
११	२०११-२०१२	२९०	१२६.०

(स्त्रोत - आर्थिक सर्वेक्षण, वित्त मंत्रालय भारत सरकार २०११-२०१२)

दरडोई वाढीच्या संदर्भात २२२ ग्रॅम प्रतिदीन बसते, २९० ग्रॅम प्रतिदीन वाढ इतर देशाच्या तुलनेने कमी आहे. ज्या गतीने सहकारी दुग्ध संस्थांची वाढ होणे अपेक्षित होते त्या गतीने वाढझालेली नाही याचे कारण आपल्या देशातील अस्तीत्वात असणारे राजकारण आहे.

तक्ता क्र ४.३

महत्वाची दुध उत्पादक राज्य आणि दुध उत्पादक दर्शवणारा तक्ता (२००७-०६)

अ.क्र	राज्य	गाय	म्हैस	शेळी	म्हैस
१	उत्तरप्रदेश	४४७३	११८८४	१०१९	१७३७६
२	पंजाब	२३६०	६७११	३७	८९०९
३	राजस्थान	२७४४	७१८८	९८१	८७१३
४	आंध्रप्रदेश	१८८९	७७३७	–	७६२४
७	गुजरात	२२७८	४४४७	२७७	६९६०
६	महाराष्ट्र	३४६१	३०२७	२८१	६७६९
७	मध्यप्रदेश	२३७३	३४०२	७०८	६२८३
८	तामिळनाडू	४७०३	७७१	०	७४७४
९	हरियाणा	७६७	४४९१	४३	७२९९
१०	बिहार	२३७७	२४७३	२१२	७०६०
११	कर्नाटक	२६३७	१३४६	३९	४०२२
१२	पश्चिम बंगाल	३४६९	३०२	१२१	३८९१
१३	केरळ	१९४८	३६	७९	२०६३
एकूण		**३७२३७**	**४९६११**	**३७७८**	**८८४२३**

(स्त्रोत - पशुधन विभाग, भारत सरकार २००७-०६)

तक्ता क्र ४.३ मध्ये भारत देशातील सर्वात जास्त उत्पादन असल्याचा ज्या राज्याचा समावेश होतो. उत्तरप्रदेशात सर्वात जास्त दुधाचे उत्पादन होते. त्यानंतर तमिळनाडू, पष्चिम बंगाल या राज्याचा नंबर लागतो.

एकूण दूध उत्पादनात प्रामुख्याने गाई, म्हशी आणि शेळयामेंढयांचा समावेश होतो. ८८४२३००० टन दुध उत्पादक या प्रमुख राज्यातून झाले आहे. सध्या सर्वात जास्त दुध उत्पादनात अग्रेसर उत्तरप्रदेश राज्य आहे. महाराष्ट्र राज्यात गाईचे ३४६१००० दुध उत्पादन होते, ३०२७००० टन दुध म्हशी पासून तर शेळी पासून २८२००० टन दुध २००५-०६ अखेर मिळाल्याचे आढळते. ५० टक्क्यापेक्षा जास्त दूध म्हशीपासून मिळते, या प्रमुख राज्यात सहकारी दुग्ध व्यवसाय विकसीत झालेला आहे.

४ २ .१ भारतातील दुग्धउत्पादन –

भारत देश दुध उत्पादनातील एक अग्रेसर देश आहे. गेल्या सहा दशकात सातत्याने दुध उत्पादन वाढत आहे. तक्ता क्र ४.४ मध्ये दरडोई दुध उपलब्धता आणि दुध उत्पादन दर्शवलेले आहे.

तक्ता क्र ४.४

दरडोई दुध उपलब्धता आणि दुध उत्पादन दर्शवणारा तक्ता

अ.क्र	वर्ष	दुध उत्पादन मि.ली	दरडोई उपब्धता ग्र दर दिवस
१	१९५०-५१	१७.४	१२४
२	१९६०-६१	२०.०	१२४
३	१९७०-७१	२३.२	११२
४	१९८०-८१	३०.४	१२७
५	१९९०-९१	३१.४	१७३

६	२०००-०१	८०.६	२२०
७	२००४-०५	९२.६	२२०
८	२०१०-११	११३.६	२६५
९	२०११-१२	११७.०	२६९

(स्त्रोत -पशुधन विभाग भारत सरकार २०१३-१४)

तक्ता क्र ४.४ मध्ये दुग्ध उत्पादन आणि दरडोई दुधाची उपलब्धता दिसून येते. गेल्या सहा दशकात सातत्याने ३ टक्के दुध उत्पादनात वाढ झाली.

खाजगी दुग्ध प्रक्रिया संस्था ४९३ आहेत, २४६ या सहकारी आहेत तर ५० प्रक्रिया संस्था या सरकारच्या अधिपत्याखाली आहेत. सर्वात जास्त सहकारी प्रक्रिया संस्था ६२ या महाराष्ट्रात आहेत. त्या पाठोपाठ उत्तरप्रदेश ३३, तमिळनाडू २५, राजस्थान १८, गुजरात १६, कर्नाटक याचाही समावेश होतो. खाजगी दुग्ध प्रक्रिया संस्था उत्तरप्रदेशात सर्वात जास्त १९८ आहेत त्यानंतर महाराष्ट्र ९० पंजाब ३७, हरियाणा ३२, आंध्रप्रदेश २४, आणि तामिळनाडू २०, या राज्यांचा समावेश होतो. तर सरकारी संस्थांच्या बाबतीत महाराष्ट्र एक नंबर वर आहे. तर त्यानंतर गुजरात, दिल्ली आणि केरळचा समावेश होतो.

४ २ २ भारतातील सहकारी दुग्ध संस्थाचा विकास -

सहकारी दुग्ध संस्था दुधाच्या उत्पादनात महत्वाची भुमिका बजावतात. देशात सर्वात जास्त ही भुमिका पार पाडण्यात महाराष्ट्राबरोबर गुजरात, राजस्थान, कर्नाटक, उत्तरप्रदेश आणि तमिळनाडू यांचा प्रामुख्याने समावेश होतो. तक्ता क्र. ४.६ मध्य देशातील अलीकडील कालावधीत दुधाची दरडोई आणि उत्पादन क्षमता यांचा परामर्श घेतला आहे.या तक्त्यात दरडोई दुधाची प्रतिदीवशी उपलब्धता २२२ ग्रॅम पासून २९० ग्रॅम प्रतिदिवस अशी वाढझालेली २००१-०२ पासून ते २०११-१२ पर्यत ८०.९ मिलीयन २१ ते १२६ मिलीयन टनापर्यंत वाढझाली. सदस्य संख्या वाढ व जनावरांची संख्या याचा विचार करता वाढीचा दर अलीकडील कालावधीत

घसरत चालल्याचे दिसते. महाराष्ट्र व इतर राज्यात दुग्ध सहकारात राजकीय दडपशाही या धोरणामुळे घट होताना दुधाची दरडोई उपलब्धता साधारणपणे १.५ टक्कयांनी वाढताना दिसते.

१९७०-७१ मध्ये दुध उत्पादन १७ मिलीयन टन २००९-१० मध्ये ११०.३ मिलीयन टनापर्यत वाढली. दरडोई उपलब्धतेमध्ये १९७०-७१ मध्ये १२४ ग्रॅम २००९-१० मध्ये २६० ग्रॅम आणि २०११-१२ मध्ये २६९ ग्रॅम वाढ झालेली दिसून येते. दरडोई दुध उपलब्धतेसंदर्भात भारतात वाढ दिसून येत असली तरो ही वाढ अमेरिकेच्या तुलनेने खूपच कमी आहे. अमेरिकेत २०११-१२ मध्ये प्रतिदिवसी दरडोई ६६१ ग्रॅम दुध उपलब्ध होते तर भारतात २०११-१२ मध्ये २६९ ग्रॅम प्रतिदिवसी दरडोई दुध उपलब्धता आहे. दुध उत्पादनातील वाढ ही प्रामुख्याने सहकारी दुग्ध संस्थामुळे दिसून येते. शेती ही आपल्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. त्याच बरोबर दुध व्यवसाय हा सुध्दा शेतीबरोबरच आपल्या ग्रामीण विकासाचा फायदा मोठया प्रमाणात आहेत. भारतात आजही ६२ टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात राहते. ग्रामीण विकासासाठी ८०,१९४ कोटी रूपयांची तरतुदी केल्या आहेत. गतवर्शीच्या तुलनेत ग्रामीण विकासासाठी ४६ टक्केवाढ केली आहे. पण आज सहकाराचा बाजारीकरण पाहता शिक्षण सम्राट झाले आहेत. हे सर्व असले तरी दुधाचा व्यवसाय ग्रामीण भागाला तारणहार ठरलेला दिसून येतो. राज्यनिहाय दुध उत्पादनात अग्रेसर असलेल्या राज्यापैकी महाराष्ट्र राज्य हे एक महत्वाचे राज्य आहे.

तक्ता क्र ४.७

भारतातील दुग्ध प्रक्रिया उदयोग दर्शवणारा तक्ता (२०११-१२)

अ.क्र	राज्य	सहकारी	खाजगी	सरकारी	एकुण
१	महाराष्ट्र	६२	९०	३३	१८७
२	उत्तरप्रदेश	३३	११८	१	२३२
३	गुजरात	१६	११	६	३३
४	दिल्ली	०	४	३	७
७	तमिळनाडू	२७	२०	०	४७
६	हरियाणा	७	३२	२	३९
७	पंजाब	१३	३७	०	५०
८	आंध्रप्रदेश	१४	२४	१	३९
९	कर्नाटक	१६	२१	१	३८
१०	मध्यप्रदेश	१०	१८	०	२८
११	राजस्थान	१८	९	०	२७
१२	पष्चिम बंगाल	२	१४	१	१७
१३	केरळ	९	८	२	१९
१४	बिहार	७	२	०	९
१७	हिमाचल प्रदेश	३	४	०	७
१६	ओरिसा	८	१	०	९
१७	पॉडेचेरी	१	०	०	१
१८	गोवा	१	०	०	१
१९	जम्मू - काष्मीर	१	०	०	१
२०	सिक्किम	१	०	०	१
२१	त्रिपूरा	१	०	०	१
एकूण		**२४६**	**४९४**	**७०**	**७८९**

(स्त्रोत- पशुधन विभाग भारत सरकार २०११-१२)

तक्ता क्रं ४.७ मध्ये राज्यनिहाय दुध उत्पादन संख्यांची आकडेवारी दिलेली आहे. एकूण आकडेवारीचा विचार करता खाजगी दुध संस्था या सरकारी आणि सहकारी संस्थांपेक्षा जास्त असल्याचे दिसते.तक्ता क्र ४.३ मध्ये राज्यनिहाय गाय, म्हैस आणि शेळी यांचे दुध उत्पादनाचा आढावा घेतला आहे. त्याबरोबर महत्वाच्या

दुध डेअरी उत्पादक राज्य आणि उत्पादन दर्शवलेली आहेत. २००५-०६ मध्ये दुधाची उपलब्धता आपल्या ग्रामीण शहरी भागाचा विकास साध्य होत असताना होणारी घट राजकीय पलटवार ताशेरे ओढणारी दिसून येते. प्रामुख्याने ग्रामीण भागात घेतले जातात. तक्ता ४.५ मध्ये सरकारी आणि खाजगी दुग्धप्रक्रिया उदयोगांची दिसते.

४.२.३ भारतातील सहकारी व खाजगी दुध संस्थाः


भारतामध्ये दुग्ध प्रक्रिया उदयोगामध्ये सहकारी आणि सरकारी संख्यापेक्षा जास्त संख्या खाजगी संस्था वाढण्याच्या पाठीमागे राजकारणचा हस्तक्षेप आहे. खाजगीकरण करून आपण स्वतःच्या हितासाठी सहकाराच मुळ उद्देश बाजूला होत असल्याचे दिसून येते. तक्ता क्र. ४.४ मध्ये प्रक्रिया संस्थांची संख्या दर्शवलेली आहे.

तक्ता क्र. ४.६

भारतातील दुध प्रक्रिया उदयोगांची संख्या दर्शवणारा तक्ता

अ. क्र	तपशील	संख्या
१	सहकारी	२१८
२	खाजगी	३६६
३	सरकारी	३९

(स्त्रोत – पशुधन विभाग भारत सरकार)



तक्ता क्र ४.६ मध्ये दुध प्रक्रिया उद्योगाची संख्या दर्शविलेली आहे. सहकारी क्षेत्रातील दुग्ध प्रक्रिया उद्योगाची संख्या २१८ एवढी आहे, सरकारी क्षेत्रातील ३९ दुग्ध प्रक्रिया उद्योगांची संख्या आहे तर खाजगी क्षेत्रातील सर्वात जास्त आहे. या संख्येने २००७-०६ पासून ते २०११-१२ पर्यत मोठया प्रमाणात वाढझालेली दिसून येते. उत्पादन क्षेत्रातील व्यवसायावर प्रक्रिया करण्यासाठी त्या व्यवस्थेची गरज असते. त्यातील सहकारी संख्या महाराष्ट्र राज्यात जास्त आढळते तर उत्तरप्रदेशात खाजगी क्षेत्रातील जास्त संख्येमुळे राजकारणाचा प्रभाव दिसून येतात. दुग्ध उत्पादनात पनीर, लस्सी, तूप, लोणी, मलाई पेढा इत्यादी महत्वपूर्ण पदार्थ या माध्यमाने बनविले जातात. त्यामूळे हे ग्रामीण आणि शहरी भागाला जोडणारा दुवा म्हटले जाते.

४ ३ महाराष्ट्रातील दुग्ध सहकारी चळवळ

१ मे १९६० मध्ये महाराष्ट्र राज्याची निर्मिती व महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा १९६० मध्ये संमत झाला. या कायदयानुसार सहकारी संस्थांचे नियमन व नियंत्रण केले जाते. सहकारी चळवळीच्या विकासामध्ये भारतात महाराष्ट्र राज्य प्रथम क्रमांकावर आहे. सहकारी साखर कारखानदारीच्या विकासामुळे महाराष्ट्रातील शेती क्षेत्राच्या विकासाला चालना मिळाली परिणामी शेतकऱ्यांच्या उत्पन्नामध्ये वाढ झाली. यामुळे शेतकऱ्यांचे राहणीमान उंचावणे शक्य झाले महाराष्ट्रामध्ये कृषी सहकार पतपूरवठा संस्था बिगर कृषी सहकारी पतपुरवठा संस्था, विपणन सहकारी संस्था अशा विविध सहकारी संस्थांची स्थापना झाली. त्या यशस्वीपणे कार्यरत असल्यामुळे महाराष्ट्रातील सामान्य शेतकरी, नागरिक सहकारी संस्थेच्या संपर्कात आला. परिणामी सहकारी संस्थांचा विकास झाला. त्याचा सभासद व ग्राहकांना लाभ झाला १९६१ मध्ये महाराष्ट्रात विविध प्रकारच्या ३१७६७ सहकारी संस्था होत्या. २००७ मध्ये ही संख्या १,८४,३९० पर्यत पाहोचली तर मार्च २०१० अखेर ही संख्या २, २४,३०६ पर्यत पोहोचली. सहकारी संस्थेच्या संख्येत जशी वाढझाली तरी सहकारी संस्थेच्या सभासद भागभांडवल, कर्जपुरवठा ठेवी व वसुली मध्ये वाढ झाली.

तक्ता क्र ४.७
सहकारी संस्थांचा विकास दर्शवणारा तक्ता

प्रकार	१९६१	१९७१	१९८१	१९९१	२००१	२००५	२०११
प्रा. कृषी पतपूरवठा सह. संस्था	१८,९९८	२०,०१४	१८,३८९	१९,४९१	२०,७२४	२१,०३७	२०,४३०
प्रा. सहकारी बँक		२६७	३४७	३८१	६७४	३३७	७४१
पगारदार सह. संस्था		२,२२०	४,१८७	६,११७	७,०७९	७,१७६	७,३१७
नागरी पतपूरवठा सहकारी संस्था		४९४	९७२	४,७८४	१४,२७७	१८,३४९	१७,७७५

(संदर्भः महाराष्ट्रातील सहकारी चळवळ एका दृष्टीक्षपात २०१५)

तक्ता क्र ४.८
महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची संस्था निहाय प्रगती १९६१–२०१४

प्रकार	१९६१	१९७१	१९८१	१९९१	२००१	२००५	२०११
प्राथमिक विपणन सहकारी संस्था	३२७	३८४	३९१	९०१	१,०८८	९३३	१,४२१
दुग्ध सहकारी संस्था	४३१	२,०२१	७,८१९	१४,२८४	२२,४६६	२६,४९९	२७,११०
प्राथमिक गृहनिर्माण सहकारी संस्था	१,४९७	७,४२७	१७,६४०	३३,९१३	७२,३३०	६३,४७७	८७,३३७
पाणीपुरवठा सहकारी संस्था	११९	३०१	१,१८८	३,२२४	४,७९६	८,३०७	१०,१६२
कमगार सहकारी संस्था	३७१	१,११७	३,३३४	४,४३४	८,१२७	१०,१६३	११,११३
सहकारी साखर कारखाने	–	–	७८	१३८	१९७	२०२	१६४
सहकारी सूत गिरण्या	०३	–	–	१२७	२३३	२०१	१७६
एकूण	२१,७४४	३४,२३९	७२,३२३	८७,७९२	१,३१,७७१	१,७६,९८७	१,७९,३२४

(संदर्भः महाराष्ट्रातील सहकारी चळवळ एका दृष्टीक्षेपात २०१५)

वरील तक्त्यावरून असे निदर्शनास होते की, महाराष्ट्रामध्ये क्षेत्र निहाय सहकारी संस्थांची संख्या अशी वाढत गेली १९६१ पासून २०११ पर्यतच्या सहकारी संस्थांच्या संख्येमध्ये झालेल्या वाढीवरून असे स्पष्ट होते की, महाराष्ट्रामध्ये सहकारी चळवळ विकसीत झालेली आहे. महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यापासून ते आत्तापर्यत सहकारी दूध संख्येत वाढझालेली दिसते. १९६०-६१ मध्ये ४३१ संख्या होत्या त्या २००१-०२ मध्ये २२,४९९ झाल्या तर २०११-१२ मध्ये २७११० सहकारी दूध संख्या झाल्या. यावरून संख्येच्या बाबतीत महाराष्ट्र अग्रेसर असल्याचे दिसून येते. परंतु तुलनात्मक दृष्टया अलीकडील कालावधीत स्थानिक नेत्वृवाचा या संख्यांवर परिणाम झाला आहे.

तक्ता क्र ४.९

महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची प्रगती दर्शवणारा तक्ता

तपशील वर्श	**१९६१**	**१९७१**	**१९८१**	**१९९१**	**२००१**	**२००५**	**२००७**	**२०१०**
सहकारी संस्था	३१,५६५	४२६०३	६०७४७	१०४६२०	१५८०१६	१८४३९०	२००७३०	२१८३२०
सभासद लाखात	४२	८६	१४८	२७०	४३०	४५८	४७६	५४२
भागभांडवल कोटी रू	५३	२३८	६००	१,९५७	७,५६०	११,१८६	१२,५६५	१५,०१५
ठेवी कोटी रू	७६	३९५	१,९३९	११,०४८	७४,४६२	१,१०,९४३	९९,७१२	१२८५७९
खेळते भांडवल	३२६	१,४९०	५,२१०	२४७१३	१३४,४४१	१,७९,५०२	२,०२,२०७	२४६१६२
कर्जपूरवठा कोटी रू	९५	३४८	१,११६	६३,०००	४३,३९२	६२,५९२	८२,४५०	७८,१९०

(संदर्भ : महाराष्ट्रातील सहकारी चळवळ एक दृष्टीक्षेपात मार्च, २०१०)

वरील तक्त्यातील सहकारी संस्थांच्या आकडेवारीचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, सहकारी संस्थांची संख्या, सभासद, भागभांडवल, ठेवी, खेळते

भांडवल व कर्ज पुरवठा या सर्वच बाबतची आकडेवारी १९६१ पासून २०१० पर्यंत वाढत गेलेली आहे. म्हणजे महाराष्ट्रातील सहकारी चळवळ प्रगतीच्या दिशेने जात आहे.

महाराष्ट्र ही साखर कारखानदारीसाठीची प्रसिध्द भूमी १९१२ साली आर. एन. हिरेमठ व जी.ए सहस्त्रबुध्दे या साखर कारखाना काढण्याचा प्रयत्न केला. १९१८ साली दि निरा व्हॅली सहकारी साखर कारखाना हा सहकारतज्ञ लालूभाई शामदास आणि जी. एन. सहस्त्रबुध्दे यांच्या प्रयत्नामुळे उभा राहिला. परंतु उसाच्या कमतरतेमुळे १९२४ साली तो बंद पडला. त्यानंतर वैकुंठभाई मेहता, डॉ. धनंजयराव गाडगीळ, पद्मश्री विठ्ठलराव विखे-पाटील येथे १९५१ मध्ये प्रवरा सहकारी साखर कारखाना स्थापन झाला. प्रवरानगर येथील साखर कारखन्याचा प्रयोग यशस्वी झाल्यामुळे महाराष्ट्राच्या अन्य भागातील शेतकरी नेते सहकारी कारखाना काढण्यासाठी प्रभावित झाले त्यामध्ये वसंतदादा पाटील, शंकररावत मोहिते, भाऊसाहेब हिरे, रत्नाप्पा अण्णा कुंभार, दादासाहेब कौलवरकर व तात्यासाहेब कोरे इत्यादींनी साखर कारखानदारी उभारण्यासाठी प्रयत्न केले.

महाराष्ट्रात १९५१ मध्ये मुंबईतील आरे येथे सहकारी दुग्धव्यवसाय सुरू झाला. त्यानंतर दुग्धव्यवसाय मुंबई बाहेर नेण्याच्या दृष्टीने सरकारने १९३८ मध्ये दुग्ध व्यवसाय विकास विभागाची स्थापना केली. १९६४ मध्ये दुग्धव्यवसाय सहकारी तत्वावर सुरू करण्यात आला. दुध संस्थांची संघटनात्मक रचना मजबूत करण्यावर भर देण्यात आला. त्या दृष्टीने तालुका व जिल्हा तालुका व जिल्हा पातळीवर दुधसंघ निर्माण करण्यात आले. १९६७ मध्ये राज्य पातळीवर सहकारो दुध महासंघ स्थापन करण्यात आले.

महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६० हा कायदा महाराष्ट्र शासनाने संमत केला याचा परिणाम म्हणून सहकारी सुत गिरण्या, सहकारी विपणन संस्था फळे व भाजीपाला प्रक्रिया संस्था इत्यादी सहकारी क्षेत्रामध्ये स्थापन झाल्या व त्यांनी व्यवसायात प्रगती केली. परिणामी महाराष्ट्र हे राज्य सहकारी चळवळीत देशात अग्रेसर राहिले आहे. शेती व्यवसायाशी पूरक उद्योग भारतातील दुग्ध व्यवसाय व महाराष्ट्रातील दुग्ध व्यवसाय यात समन्वयता आढळून येते. दुग्ध उत्पादक

सहकारी संस्था या ग्रामीण भागात स्थापन होतात. दुग्ध व्यवसायाशी निगडीत, गाई, म्हैशी, शेळया, मेंढया इ. मुळे दुग्ध निर्मिती होते. याशिवाय शेण व लेंडयांमुळे खतनिर्मिती होते. दुधापासुन पेढे, चिज, तूप, लोणी, दही, श्रीखंड इ. पदार्थ तयार केले जातात. या व्यवसायामुळे रोजगार निर्मिती फार मोठया प्रमाणावर होते. काही दुध उत्पादक संघ दुधाचे संकलन, दुधाचे शीतकरण व मागणीच्या ठिकाणी दुधाचा पुरवठा या बाबी महत्वाच्या आहेत. ग्रामीण भागातील दुधाचे संकलन करुन उत्पादकांना योग्य भाव देणे तसेच दुधावर प्रक्रिया करुन जनावरांसाठी खादयपुरवठा व प्रक्रिया केलेल्या दुधाची विक्री करण्याचे कार्य दुग्ध विकास सहकारी संस्था सभासदांना त्यांनी दिलेल्या दुधातील स्निग्धांशा वर दुधाची किंमत दिली जाते. सभासदाने पुरवठा केलेल्या दुधाच्या किंमतीच्याप्रमाणात नफ्याची वाटणी हेाते. सभासद संस्थेशी एकनिष्ठ राहुन त्याने आपले विक्री योग्य सर्व दुध संस्थेस पूरविणे अशी अपेक्षा असते.

मार्च २०११ अखेर महाराष्ट्रातील प्राथमिक दुध पूरवठा संस्थंची संख्या २७,११० होती व ७८ मध्यवर्ती दुध पूरवठा संघ अस्तित्वात होते. महाराष्ट्र राज्य पातळीवर मुंबई येथे महाराष्ट्र राज्य दुग्ध सहकारी महासंघ, (महानंद डेअरी) आहे. शासन व दुग्ध सहकारी संस्था यांच्यात समन्वय साधण्याचे कार्य ही संस्था करते.

भारताने खरोखरच शेती क्षेत्रांतील हरीतक्रांती प्रमाणे धवलक्रांती केलेली आहे. राष्ट्रीय दुग्ध विकास माहामंडळाने गुजरात राज्यातील आनंद येथील डॉ. व्ही. कुरीयन यांच्या पुढाकाराने सहकारी तत्वावर पहिला व जग प्रसिध्द अमूल डेअरी सुरु केली. दुधाचे उत्पादन वाढवून प्रक्रिया करण्यासाठी दुध महापूर योजना शासनाने अमलात आणली आहे. महाराष्ट्रात सहाकारी संस्था कडून जवळपास ८५ टक्के दुधाचे संकलन केले जाते. शेतकरी सभासदांसाठी या संस्था दुभती जनावरे खरेदी करण्यासाठी अर्थसाह्य करतात, त्यांना याची अल्पदरात व्यवस्था करतात. महाराष्ट्रात प्रति दिनी दुधाचे संकलन वाढत आहे. महाराष्ट्र शासनाने गो पैदात कार्यक्रम राबविला असून धवल क्रांतीविशयक धोरण जाहीर केले आहे.

४.३.१ महाराष्ट्र राज्यातील एकूण प्राथमिक दूग्ध सहकारी संस्थाः–

महाराष्ट्र राज्यातील इतर राज्यापेक्षा सहकारी क्षेत्र विकासीत झालेले असले तर दुध उत्पादनात या संस्थांना राजकीय हस्तक्षेपाचा फटाका बसला आहे व जास्तीत जास्त प्राथमिक दूग्ध सहकारी संस्था संस्था बंद अवस्थेत आहेत. २०१२–१३ अखेर महाराष्ट्रातील तालुकापातळीवर व जिल्हापातळीवर कार्यरत संख्या खूप मोठी आहेत. तक्ता क्र. ४.९ मध्ये महाराष्ट्र राज्यातील प्राथमिक दुग्ध सहकारी संस्था, तालुका आणि जिल्हा संघ दशविलेली आहेत.

तक्ता क्र. ४.९
महाराष्ट्रातील प्रथमिक दुग्ध सहकारी संघ, तालुका आणि जिल्हा संघ संस्था दर्शवणारा तक्ता

विभाग	प्राथमिक स. संस्था				तालुका संघ कायरंत			जिल्हा संघ कार्यरत		
	कार्यरत	बंद	हंगामी	एकूण	बंद	हंगामी	एकूण	बंद	हंगामी	एकूण
नवी मुंबई	३०४	२६२	२१४	७८०	–	२	२	१	२	३
पुणे	११४७८	१६२३	१६७७	१४७७८	२१	–	२१	४	–	४
नाषिक	२७८३	२७८३	७६३	२७२९	१९	२७	२८	२	–	२
औरंगाबाद	३६२६	२३३१	७०२	६१७९	१३	१०	२३	७	१२	१७
अमरावती	९३	१६८७	७१२	२२०९	२	–	२	३	११	१४
नागपूर	७६२	४२८	३४१	१७३१	१	–	१	७	१	६
एकूण	१८७४६	८९१२	३८०९	३१२६७	७६	३९	९७	२०	७३	४६

(स्त्रोत :– दुग्धसंस्था अहवाल, महाराष्ट्र सरकार २०१३–१४)

तक्ता क्र. ४.९ मधील जास्त सहकारी संस्था बंद आणि हंगामी स्वरुपाच्या असल्याचे दिसते. मबई विभागात प्राथमिक सहकारी संस्था कार्यरत असलेल्या ३०४ आहेत. तर २६२ बंद आणि २१४ हंगामीस्वरुपाच्या आहेत. मुंबई विभागत जिल्हा संघ आणि तालुका संघ यांची संस्था खुपच कमी आहे. पुणे विभागात सर्वात जास्त प्राथमिक दुग्ध सहकारी संस्थापैकी कार्यरत ११४७८, १६२३ बंद आणि

१६७७ हंगामी अशा एकूण १४७७८ आहेत. पुणे विभागात तालुका संघ २१ आहेत तर जिल्हा संघ चार आहेत. या मुंबई आणि पुणे विभागानंतर औरंगाबाद, नाशिक, नागपूर आणि अमरावती असा क्रमांक येतो. एकूण महाराष्ट्रातील प्राथमिक दुग्ध सहकारी संस्थपैकी १८७४६ कार्यरत आहेत, ८९१२ बंद आहेत तर ३८०९ दुग्ध संस्थ या हंगामी अशा आहेत. महाराष्ट्र राज्यात एकूण ३१२६७ प्राथमिक दुग्ध सहकारी संस्था आहेत, ७७ तालुका संघ तर २८ जिल्हा दुग्ध संघ आहेत.

४.३.२ महाराष्ट्र राज्यातील सहाकारी दुग्ध संघाचा विकासः


महाराष्ट्रातील सहकारी चळवळ ही डॉ. धनंजयराव गाडगीळ, विठ्ठलदास ठाकरसी, लालुभाई शामलदास, जी.के. गोखले आर.जी.संस्था, भाऊसाहेब हिरे, विठ्ठलराव विखे पाटील, वसंतदादा पाटील, यशवंतराव मोहिते, भाऊसाहेब थोरात इत्यादी सहकारी चळवळीच्या संस्थापक संस्थांशी निगडीत आहे. महाराष्ट्रातील सहकारी चळवळ हो प्रामुख्याने पुणे विभागात विकसीत झाली. सुरुवातीला ही चळवळ प्राथमिक कृशि पतपुरवठा सहकारी संस्थाशी निगडीत होती. पुढे ही चळवळ शेतमाल विपणन सहकारी संस्था ग्रामीण सहकारी उद्योग संस्थां ग्राहक सहकारी संस्था, नागरी सहकारी संस्थांची संख्या २२४३०६ एवढी विकासीत झाली पुढील तक्त्यामध्ये सहकारी दुध संघातील दुधाची वाढ प्रतिदिवसा आणि विभागावर दर्शवेली आहे. २०१० ते २०१४ या कालावधीत या सहाकरी संस्था मध्ये बदल होत होता तसे आपण महाराष्ट्रातील बदल आणि राजकीय स्थिती याचा अभ्यास महत्वाचा असल्याचे दिसून येते.

तक्ता क. ४.१०

महाराष्ट्राती सहकारी सहकारी दूध संघातील दुध विभागणी दर्शवणारा तक्ता

अ.क्र.	विभाग	दूध उपलब्धता (लाख लिटर/प्रतिदन)	
		२०१०	२०१४
१	औरंगाबाद	०.८६८	१.९९९
२	पुणे	१८.२४१	२३.३२७
३	नशिक	५.६४९	0.000
४	नगपूर	0.८८४	0.९३८
५	मुंबई	–	0.००१
	एकूण	१८.२१४	२६.२६५

(स्त्रोत :- सहकारी दुधसंस्था अहवाल महाराष्ट्र सरकार सांखीकी विभाग २०१४-१५)



तक्ता क्र. ४.१० मध्ये २०१० ते २०१४ पर्यंतच्या कालावधीत दुधाची लाख लिटर प्रतिदिनी उपलब्धता आहे. २०१० पासून २०१४ पर्यंत एकूण दुध उत्पादनात वाढझाली आहे. परंतु वाढीचा विभागवार वृध्दीदर खूपच कमी आहे. त्यापेक्षा महाराष्ट्रातील लोकसंख्या वाढीचा दर जास्त आहे. औरंगाबाद विभागात ०.८६८

लाख प्रतिदिन लीटर दुध सरासरी आहे २०१० मध्ये होते परंतु २०१४ मध्ये १.९९९ लाख लिटर दुध उपलब्ध आहे.

पुणे विभागत सर्वात जास्त २०१० मध्ये १८.२४१ लाख लिटर सहकारी दुध संघाकडून उपलब्ध होते २०१४ मध्ये त्यात वाढझाली ती २३.३२७ लाख लिटर सरासरी होते. सर्वात कमी उपलब्धता मुंबई विभागात आढळून येते. महाराष्ट्रातील सहकारी दुग्ध संस्थांची आकडेवारी १९६१ पासून २००७ पर्यंत फगलेली दिसून येते त्याच बरोबर त्या स्थितीत असणाऱ्या सस्था सुध्दा प्रचंड प्रमाणात वाढल्या आहेत. संस्थाचा स्व निधी, भागभांडवल, देयकर्जे, खेळते भांडवल या सर्व बाबीचा विकास राजकारणामुळे कुठेतरी कमी होताना दिसून येत आहे. सहकार क्षेत्रात आघडीवर असणारे महाराष्ट्र राज्य आपल्या विकासातील ग्रामीण व्यवस्थेचा महत्त्वपूर्ण अंश आहे. १९६०-६१ मध्ये शुन्य टक्के दुध संस्थातून दिसून आला तो १९९१ मध्ये २७००००० इतका वाढला आणि २००७ मध्ये तो १११९ लाख रुपये एवढा वाढला त्यामध्ये प्रमुख्याने राजकारणाचा हस्तक्षेप असल्याचे आढळून आलेले आहे. तक्ता क्र. ४.११ मध्ये महाराष्ट्र राज्यातील दुध संस्थाचा इतिहास दर्शवलेला आहे.

तक्ता क्र. ४.११

महाराष्ट्रातील सहकारी दुध संस्थाचा विकास

क्र.	तपशील	१९६१	१९७१	१९८१	१९९१	२००१	२००७
१	संस्था	४३१	२०२१	७८१९	१४२८४	२२४६६	३०९१३
२	सभासद संख्या	१७७	१२६३	७०३०	१३१०१	१७१८२	२११८३४३
३	दुध संकलन किमंत	६७	८१०	८७३१	३७०७२	३२९४१	१२८८२६०
४	खेळते भांडवल	२६	३१४	१९९२	१२९७०	१२४१३२१	२७७८२
५	विक्री किमंत (लाख)	६९	८४१	९१३२	२९९१४	३४०४३०३	७७१४३
६	नफ्यातील संख्या	१७६	८३३	४०९१	६७६२	१२२६७	१३१७०
७	नफा (लाख)	२	१३	१९७	८९५	१०७५८	१६१६
८	तोटातील संख्या	१३३	६९१	२०२३	३११४	९६३४	१३१३५

९	तोटा (लाख)	०	७	२६	२७०	६४२	१११९

(स्त्रोत :– महाराष्ट्रातील सहकारी चळवळ एक दृष्ठीक्षेप – २००७)

तक्ता क्र. ४.११ मध्ये १९६१ पासून २००७ पर्यंत सहकारी दुध संस्थामध्ये ४३१ पासून ३०९१३ एवढी वाढ झाली सभासद संख्येत १७७०० वरुन २११८३४३ एवढी वाढ दरम्यानच्या कालावधीत झालेली दिसून येते. भागभांडवल कर्जे, स्वनिधी, खेळते भांडवल दुध संकलन किमंत, दुध व दुध पदार्थ विक्री किमंत यांच्या वाढ झालेली दिसते.

नफ्यातील संस्था १९६१ मध्ये १७६ होत्या तर २००७ मध्ये १३७१० एवढया होत्या. तोटयातील सहकारी संस्था १९६१ मध्ये १३३ होत्या तर २००७ मध्ये त्या १३१३७ एवढया होत्या. २००७ यावर्षाचा विचार केला तर १३७१० संस्था तक्त्यात तर काहीशा संस्थेच्या प्रमाणात १३१३७ संस्था तोटयात आहेत. या तक्त्यावरुन एक बाब लक्षात येते की, सरासरी ७० टक्के सहकारी दुध संस्था संस्था तोटयात असल्याने बंद आहे. १९६१ मध्ये २ लाख एवढा नफा झाला होता तर २००७ मध्ये १६१६ लाख रुपये एवढा नफा झाला अगदी १९६१ मध्ये शून्य लाख तोटा असणाऱ्या संख्येत २००७ साली १११९ लाख रुपये तोटा लहन करावा लागला. २००७ या वर्शत एकूण १६१६ लाख रुपये नफा झाला तर १११९ लाख रुपये तोट झाला यावरुन एक बाब लक्षात येते की, राजकीय स्वार्स्था पोटी राजकारण्यानी ७० टक्क्यापर्यंत फड भ्रष्टाचाराच्या माध्यमातून लुटला गेल्याचे आढळते. तक्ता क्र. ४.१२ मध्ये महाराष्ट्र राज्यातील दुध संघाची माहिती दिलेली आहे.

तक्ता क्र.४.१२

महाराष्ट्रातील दुध संघ

अ.क्र.	**तपशील**	**१९६१**	**१९७१**	**१९८१**	**१९९१**	**२००१**	**२००७**
१	संस्था	१९	४६	९०	७१	६७	९७
२	सभासद संख्या	२०	९६	१६१	२४३	४६८३७	७१९१७
३	दुध संकलन किमंत	७	७८४	८७४१	२०१७७	१२८७७८	१७३३९७
४	खेळते भांडवल	१०	३४७	२१०३	२२६६३	१०२८७१४	७७४७१
७	वक्री किमंत	८	९०४	८८३१	३७१४३	१३१११०	७१९३७
६	नफयातील संख्या	६	२३	७१	३६	४२	७१
७	नफा (लाख)	०	१२	२९	१४८	१३०१९	१२७०

८	तोटातील संख्या	९	२०	३०	२२	२२	४७
९	तोटा (लाख)	०	८	७२	२७८	७६४२	१२९७

(स्त्रोत :- महाराष्ट्रतील सहकारी चळवळ एक दृष्टीक्षेप - २००७)

वरील तक्त्यात जिल्हा निहाय सहकारीदुध संघाचा विस्तार याचे विवेचन केलेले आहे. १९६१ पासून २००७ पर्यंत सहकारी दुध संघामध्ये १९ पासून ९७ पर्यंत झालेली दिसून येते. सभासदाच्या संख्येमध्ये १९६१ पासून २००७ पर्यंत २००० पासून ते ७११९१७०० पर्यंत वाढझालेली दिसून आले भागभांडल, कर्जे, स्वनिधी, खेळते भांडव दुध संकन किंमत, दुध विक्री किमंत यांच्यात वाढ झालेली आढळते. २००७ मध्ये १३०१९ लख रुपये नफा आहे तर ७६४२ लाख तोटा आहे. नफ्यातील संस्थाच्या आकडेवारीत २००७ मध्ये ७१ संघ आहेत तर तोटयात ४७ संघ आहेत.

तक्ता क्र. ४.१३

महाराष्ट्रातील सहकारी व खाजगी दुध पदार्थचे उत्पादन

अ.क्र	विभाग	खाजगी					सहकारी					
		बटर		तुप		पेढा	बटर		तुप		पेढा	
		२०१०	२०१४	२०१०	२०१४	२०१०	२०१०	२०१४	२०१०	२०१४	२०१०	२०१४
१	नशिक	१२.९	१४९.९	१९८.४	१०७	६३.४	०.८१	१९७.९	८० ६	२९२	१७८	७९१
२	पुणे	८.२	२३१३	१३७१	–	३१७६	४९९७	९१७	१७६	०	१९६८	७०२
३	औरंगाबाद	–	९८.८६	–	६४	–	९०	–	०	३	०	०
४	अमरावती	–	–	–	०.७७	–	–	–	०	०	०	०
७	नागपुर	–	२९७.२	–	–	–	३६७	–	०	०	०	०
	एकूण	**८१४**	**२८६.७६**	**१७६९**	**१६६**	**२८६७**	**७७३६**	**१११७**	**२३६**	**२९७**	**१३६६**	**१२९४**

(स्त्रोत :- दुग्ध सहकारी विभाग महाराष्ट्र सरकार २०१४-१५)

महाराष्ट्र सहकारी दुध उत्पादनसंघ पूर्ण भारतात दध उत्पादनात अग्रेसर आहे. त्याच बरोबर महाराष्ट्रात इतर काही खाजगी दुध उत्पादक दुधापासून उत्पादन घटक/पादार्थ बानवितात. त्यामध्ये प्रामुख्याने पेढा, दुध, बटर, तुप आदि पदार्थाचा समावेश होततो. तक्ता क्र. ४.१३ मध्ये महाराष्ट्र राज्यातील खजगी आणि सहकारी दुध संघातील दुध पदार्थाचा २०१० ते २०१४ पर्यंतचा आढावा घेता आहे. वरील तक्त्यात दुधापसून बनविलेल्या पदार्थाचा विकासावर भर दिलेला आहे. खाजगी दुध पदार्थाचा विकास सहाकारी दुध उत्पादन डेअरी पेक्षा चांगला दिसून येत आहे. नाशिक विभागात २०१० मध्ये १२.९ मे.ट. खाजगी दुध संघातून उत्पादित केल होते तर ८१ मे.ट. उत्पादन बटरचे सहकारी संघातून होते. २०१४ मध्ये यामध्ये वाढ होऊन ते १४९.९ मे.ट. आणि ७७९ मे.ट. बटरचे उत्पादन अनुक्रमे खाजगी आणि सहकारी दुध संघातून केले आहे.

पुणे विभागात २०१० मध्ये ८०२ मे.ट. बटरचे उत्पादन खाजगी संघाचे होते, तर ९१७ मे.ट. बटरचे उत्पादन खाजगी संघाचे होते. २०१४ मध्ये तेच २३७३ मे.ट. आणि ३८७ मे.ट. बटरचे उत्पादन अनुक्रमे खाजगी व सहकारी संस्थाकडून केले. सोलापूर जिल्हा दुध संघ पुणे विभागात सभावेश केलेला आहे. त्यामुळे खाजगी राजकीय दबाव बोकाळला असे या तक्त्यावरुन आढळून येते. यासर्व उत्पादनाच्या बाबतीतत सहकारी दुध संघाच्या पदार्थच्या बाबतीत कमी अधिक प्रमाणात घट होताना दिसून येते १९९१ च्या नवीन आर्थिक धोरणातील शिफारसी नुसार खाजगीकरणाला वाव मिळाला असला तरी सुध्दा त्याला खतपाणी घालण्याचे काम प्रामुख्याने सहकारीक्षेत्राच्या माध्यमातून झाले असे म्हणावे लागेल.

४.४ सोलापूर जिल्ह्यातील दुग्ध सहकारी चळवळीची सद्यस्थिती :-

सोलापूर जिल्हा हा महाराष्ट्र व कर्नाटक या राज्याना जोडणारा दुवा आहे. प्राचीनकाळी पश्चिम किनाऱ्याकडील चौलकडे जाणारा मार्ग सोलापूर जिल्हायातून जात हाता. ब्रिटिश काळात मुंबईशी व्यापारीमार्गानी जोडलेला होता. सध्याचा सोलापूर जिल्हा हा पूर्वी अहमदनगर, पुणे व सातारा या जिल्हयाचा भाग होता. सन

१८३८ मध्ये हा अहमदनगर जिल्हयाचा उपजिल्हा व तो १८६४ मध्ये करण्यात आला. १८६९ मध्ये सोलापूर, बार्शी, मोहोळ, माढा, करमाळा व सातारा जिल्हयातील पंढरपूर व सांगोला हे उपविभाग जोडून सोलापूर जिल्हा तयार झाला पुढे १८७५ मध्ये राज्य पुर्नचनेनंतर सोलापूर जिल्हा मुंबई प्रांतात समाविष्ट करण्यात आला व १९६० पासून महाराष्ट्र राज्यातील एक जिल्हा बनला आहे. पशुगणना २००७ प्रमाणे जिल्हाात एकूण २१८३१६९ पशुधन होते. त्यापैकी ३१.४७ टक्के गाई व बैल, १८.७६ टक्के म्हशी व रेडे, ४८.६६ टक्के शेळया व मेंढया आणि ८.२१ टक्के इतर पशुधन होते. दर चौ. किमी. मागे पशुधनांची घनता १४७ होती. २०००-०१ मध्ये जिल्हायात ११२६०११ हेक्टर निव्वळ कसलेले क्षेत्र होते. ते विचारात घेता दर १०० हेक्टर करलेल्या निव्वळ ढेण्यास पशुधनाचे प्रमाण १९४ इतके पडते. जिल्हयाची २०११ ची लोकसंख्या विचारात घेता ६८ हजार लोकसंख्ये मागे दुभत्या गाई म्हशी यांची संख्या १२४ इतकी येते. दुभत्या जनावरांचे प्रमाण सर्वातजास्त माळशिरस तालुक्यात होते. त्यानंतर सागोला व पंढरपूर यांचा क्रम लागतो

सोलापूर जिल्हा दुध उत्पादन सहकारी संघ, अकलुज (ता. माळशिरस) यांना सलग्न जिल्हयात होते. २०१२-१३ या वर्शात वरी संस्थानी १६५१.२८ लाख लिटर दुध संकलनात वाढ झाली आहे जिल्हयात २२ शितकरण केंद्र आहेत. त्यांची क्षमता ८५० हजार लिटर आहे. सोलापूर जिल्हयातील दुग्ध सहकारी संघाचा विकास कमी प्रमाणात झाला आहे. या संख्येच्या तुलनेत खाजगी दूध संघाचे प्रमाण जास्त आहे. उत्पादनाची आणि पदार्थाची वाढ आपल्या देशाला फायदेशीर असली तरी लोकसंख्येच्या वाढिच्या दरापेक्षा कमी आहे. तक्ता क्र. ४.१४ मध्ये सोलापूर जिल्हयातील सहकारी दुध संघाचा विकासाचा आढावा आहे तो मोठया प्रमाणात आहे. तर सभासद संख्या पूर्ण जिल्हयात १९००३७ एवढी आहे. प्रतिदिनी दुधाची सरासरी ५३०.०१५ २०१२-१३ मध्ये आहे. एकूण सोलापूर जिल्हयाती शितगृहाची क्षमता ८५०००० लिटर एवढी आहे. परंतु दुध सकलन हे १६५१२८.४ हजार लिटर आहे.

तक्ता क्र. ४.१४

सोलापूर जिल्हयातील दुग्ध विकास सहकारी संस्थांचा तपशिल दर्शवणारा तक्ता

अ. क्र	तालुका	संख्या		सभासद		संकलीन दुध		प्रतिदिन उपलब्धता		शीतगृहे		शीतगृहची क्षमता	
		२००९	२०१३	२००९	२०१३	२००९	२०१३	२००९	२०१३	२००९	२०१३	२००९	२०१३
१	करमाळा	४६७	४७५	२३८१७	२४२२५	१९७८३	८६७३	५४	२३.७६	१	२	३०	६०
२	माढा	५४८	६४०	२७९४८	३२६४०	१७७०३	८७४८	४९	२२.८७	१	२	१००	१००
३	बार्शी	३२३	३३१	१६४७३	१६८८१	७७०२	३१७६	२१	८.७०	१	३	३०	१३०
४	उ.सोलापूर	७२	७६	३६७२	३८७६	२२२६	२७९३	६	७.६५	२	३	१२०	१२०
५	मोहोळ	२५८	२६२	१३१५८	१३३६२	८६५०	९५३३	२४	२६.१२	१	१	२०	३०
६	पंढरपूर	४०१	४४०	२०४५१	२४४४०	२१९००	१६५१८	६०	४५.२३	१	२	५०	५०
७	माळशिरस	३७५	३७५	१९१२५	१९१२५	६९०९५	५३५२५	१८९	१४६.६४	१	४	२००	२००
८	सांगोला	४९०	५५५	२४९९०	२८३०५	२५५५०	३१८३८	७०	८७.२३	१	२	५०	१००
९	मंगळवेढा	३१३	३६८	१५९६३	१८७६८	१४६००	२७५८६	४०	७५.५८	१	२	३०	३०
१०	द. सोलापूर	९४	९८	४७९४	४९९८	१५६९	२२११	५	६०.५९	०	१	०	३०
११	अक्कलकोट	६३	६७	३२३१	३४१७	८४०	९३६	२	२५.६५	०	०	०	०
	एकूण	३४०४	३६८७	१७३६०४	१९००३७	१८९६१८	१६५१२८	५२०	५३०.०६	१०	२२	६३०	**८५०**

(स्त्रोतः जिल्हा दुध व्यवसाय विकास अधिकारी.)

तक्ता क्र. ४.१४ मध्ये सोलापूर जिल्हयातील सहकारी दुध संघाचा विकासाचा आढावा घेतला आहे. माढा तालुक्यात सर्वात जास्त सहकारी दुध संस्थाची संख्या आहे. २००९ मध्ये ७४० होती तर २०१३ मध्ये ६४० झाली. सभासदांची संख्या २७९४८ वरुन ३२६४० पर्यंत वाढलो एकूण सोलापूर जिल्हयातील दुध संख्याची संख्या ३४०४ वरुन ३६८७ पर्यंत वाढली सभासद संख्या १७३६०४ वरुन १९००३७ पर्यंत २००९ पासून २०१३ पर्यंत वाढली दुध संकलनात घट झालेली दिसून येते. १८९६१८००० लिटर दुध संकनावरुन १६७१२८००० लिटर दुध संकन २००९ पासून २०१३ पर्यंत घटले सालापूर जिल्हयात असणाऱ्या राजकीय परिस्थीती आणि भ्रष्टाचारामुळे सभासदानी आपले दुध खाजगी दुध संघाला ढेण्यात सुरुवात केली.

प्रतिदिनी दुध उपलब्धतेच्या संदर्भात काही प्रमाणात वाढझालेली दिसून येते परंतु लोकसंख्येच्या संदर्भात कमी प्रमाणात आहे. २००९ मध्ये ५२००० लिटर दध उपलब्ध होती तर २०१३ मध्ये २२ शितगृह सोलापूर जिल्हयात आहेत. उपलब्ध शितगृहात दुध साठवणूक क्षमता दुध उपब्धतेच्या पेक्षा खूपच कमी प्रमाणात आहे. २००९ मध्ये दुध साठवूनक क्षमता ८३०००० लिटर १० शितगृहात होती तर २०१३ मध्ये ८३०००० लिटर क्षमता २२ शितगृहात होती. असे चित्र असले तरी राजकीय अडीअडचणीमुळे सोलापुर जिल्हा दुधाच्या बाबीत मागासलेला दिसून येतो. सोलापूर जिल्हात प्रामुख्याने दुध उत्पादनात दुध भुकटी पांढरे लोणी, तुप, लस्सी, मसाला दूध, गायीचे टिकावू दुध दत्यादी दुधापासून पदार्थ तायार केले जातात त्याचा विकास हा सोलापूर मधील दुष्काळी भागात सुधारणेसाठी महत्त्वाचा आहे. तक्ता क्र. ४.१५ मध्ये प्रमुख दुग्ध पदार्थाचा आढावा घेतला आहे.

तक्ता क्र. .१५

सोलापूर जिल्हयातील सहकारी दुग्ध संस्थामधी उत्पादने

अ.क्र.	उत्पादन	प्रमाण	२००९	२०१०	२०१३
१	दुध भुकटी	मे.टन	उ.ना	०	५१.६७
२	पांढरे लोणी	मे.टन	उ.ना	–	–
३	तुप	मे.टन	उ.ना	६७.९७	२२७.५१

(स्त्रोत :– जिल्हा दूग्ध विकास अधिकरी महाराष्ट्र शासन)

तक्ता क्र. ४.१५ मध्ये दुध भुकटी आणि तूप यांचे उत्पादन सोलापूर जिल्हयात मोठया प्रमाणात होत आहे. परंतु या उत्पादना मध्ये भेसळ, भ्रष्टाचार आणि काळाबाजार या गोष्टी उद्भवताना राजकारणामुळे अलीकडच्या कालावधीत आढळून येत आहेत.

४.५ आकडेवारीचे विश्लेषणः–

सोलापूर जिल्हा प्रामुख्याने ११ तालुक्यात व ३ प्रांतात विभागाला आहे. त्यामध्ये माढा, बार्शी, पंढरपुर, सांगोला, मंगळावेढा, माळशिरस, करमाळा, उत्तर सोलापूर, मोहोळ, अक्कलकोट आणि द. सोलापूरचा समावेश होतो राजकारणामुळे सोलापर जिल्हयातील दुध सहकारी संघाची पिछेहाट झाली आहे यासाठी सोलापूर जिल्हयातील माढा, वार्शी, आणि पंढरपर हे तालुके अभ्यासासाठी निवडलेले आहेत. हे तीन तालुके सोलापूर जिल्हयाचे प्रांत विभागाचे प्रतिनिधित्व करतात, प्रत्येक तालुक्यातून प्रतिनिधित्व करुन सहकारी संघातील सभासद पुर्ण अभ्यासासाठी निवडलेले आहेत. यातून एकूण ९० सभासदांचा अभ्यासावरून राजकारणामुळे सोलापूर जिल्हयाची स्थिती मांडण्याचा प्रयत्न प्रस्तुत प्रकरणामधून केला गेला आहे. सभासंदाचा आणि या विभागातील दुध संघाचे प्रतिनिधी याचा अनुभवाने आकडेवारीचे विष्लेशण करण्याचा प्रयत्न केला आहे. तक्ता क्र. ४.१६ मध्ये सोलापूर जिल्हयातील अभ्यासाठी निवडलेल्या दुध संस्था याचा परामर्श घेतला आहे.

तक्ता क्र. ४.१६

दुध संघाची नावे दर्शवणारा तक्ता

अ.क्र.	नव	वारंवारिता	टक्केवारी
१	पंढरपूर दुधसंघ	३०	३३.३
२	माढा दुधसंघ	३०	३३.३
३	बार्शी दुधसंघ	३०	३३.३
एकूण		९०	१००

(स्त्रोत :- प्राथमिक साधनसामग्री)


वरील तक्त्यामध्ये सोलापूर जिल्हयातील प्रांत विभागावर निवडलेल्या सद्यस्थितीची आकडेवारी दिलेली आहे. पंढरपूर, माढा आणि बार्शी असे ३ प्रांत विभाग सोलापूर जिल्हयाचे प्रतिनिधित्व करतात त्यातील दुध संघाचे सभासद प्रत्येक तालुक्यातून ३० सभासदाची निवड केली आहे.सोलापूर जिल्हयातील सहकारी दुध संघाचे क्षेत्र स्थानिक पातळीवर राज्य पातळीवर आणि राष्ट्रीय पातळीवर अस्तित्वात आहे. तक्ता क्र. ४.१७ मध्ये सोलापूर जिल्हयाती सहकारी दुध संघाचे क्षेत्राचे विवेचन केले आहे.

तक्ता क्र. ४.१७

सहकारी दुध संघाचे क्षेत्र

अ.क्र.	तपशील	वारंवारिता	टक्केवारी
१	स्थानिक	२७	२७.८
२	राज्य	३२	३५.६
३	राष्ट्रीय	३३	३६.७
	एकूण	**९०**	**१००.०**

(स्त्रोत :- प्राथमिक साधन सामग्री)



तक्ता क्र. ४.१७ मध्ये एकूण ९० दुध उत्पादक सभासदाच्या मधील २७.८ टक्के सभासद स्थानिक पातळीवरुन दुधाची विक्री करतात. ३५.६ टक्के सभासद उपलब्ध दधाचे क्षेत्र राज्य पातळीवर आहे. त्यामुळे मिळणारी दुधाचे खरेदी किमंत आणि विक्री किमंत यामध्ये फरक पडता व त्यातून भ्रष्टाचाराला वाव मिळताना दिसून येतो.


सहाकारी दुग्ध संस्था उभारणीसाठी सर्व लोकांनी त्यांच्या फायदयासाठी एकत्र येऊन काम केले आहे. त्याच बरोबर दुध उत्पादन आणि संस्थाची उभारणी सरकारच्या मदतीने केली. तक्ता क्र. ४.१८ मध्ये सहकारी दुध उत्पादन संघामध्ये सरकारचा वाटा किती आहे याचे विवेचन केले आहे.

तक्ता क्र ४.१८

सरकारचा वाटा (शासनाचा)

अ.क्र.	तपशील	वारंवारिता	टक्केवारी
१	०१ ते १० टक्के	१३	१४.४
२	१० ते २० टक्के	३	३.३
३	२० ते ३० टक्के	७	७.६
४	३० ते ४० टक्के	३१	३४.४
५	४० टक्के पेक्षा जास्त	३८	४२.२
एकुण		**९०**	**१००.००**

(स्त्रोत :- प्राथमिक साधनसामग्री)




तक्ता क्र. ४.१८ मध्ये सरकारचा किंवा शासनाचा सहकारी दुध संघामधील भाग भांडवलाचा वाटा दिलेला आहे. १० टक्के पर्यंत शासनाचा वाटा आहे. ५.६ टक्के संस्थामध्ये १० ते २० टक्के शासनाचा वाटा आहे. ५.६ टक्के संस्थामध्ये २० ते ३० टक्के शासनाचा वाटा आहे. ३४.४ टक्के संस्थामध्ये शासनाचा भांडवलाचा हिस्सा आहे. आणि ४२.२ टक्के संस्थामध्ये ३० ते ४० टक्के सहकारी संस्थामध्ये शासनाचा भांडवलाचा हिस्सा आहे. आणि ४२.२ टक्के सहकारी दुध संस्था मध्ये ४० टक्के पेक्षा जास्त वाटा सरकारच्या भाडवलामध्ये आहे ही आकडेवरी जर शासनाच्या तिजोरितून येते त्यामुळे त्याची माहिती सर्व सभासंदांरना नसते परिणामी त्यामुळे भ्रष्टाचारास वाव मिळतो आणि संचालक मंडळ स्वार्थी प्रेरणेने काम पाहते ते सभासदांना योग्य मार्गदर्शन होत नाही. सभासंदांचा वाटा सुधा महत्त्वाचा असतो त्यामुळे आपल्या या संघाचा विस्तार चांगल्या प्रमाणात होतो. संचालकाची निवड लोकशाही पध्दतीने होणे आवश्यक आहे त्यामध्ये प्रामुख्याने मतदानाद्धारे निवडूणूक होत असते. तक्ता क्र ४.१९ मध्ये संचालक निवडणुक प्रक्रियेवशियी माहिती दिलेली आहे.

तक्ता क्र. ४.१९

सचालक निवडणूक प्रक्रिया

अ.क्र.	प्रक्रिया	वारंवारिता	टक्केवारी
१	एकमताने	७८	६४.४
२	राजकीय हस्तक्षेपाने	१७	१८.९
३	मतदानाने	१४	१५.६
४	इतर पध्दतीने	१	१.१
	एकूण	**९०**	**१००.०**

(स्त्रोत :- प्राथमिक साधनसामग्री)



सहकारी क्षेत्रातील कोणतीही निकडणूक एकत्रीत मतदानाने घेतली जाते परंतु सहकारी दुध संघाील संचालकानी निवडणूक एकत्रपणे राजकीय दबावाने मतदानाने घेतली जाते. ६४.४ सहकारी दुध संस्थामध्ये एकत्रपणे संचाकाची निवड केली जाते. १८.९ टक्के सहकारी दुध संस्था मध्ये राजकीय हस्तक्षेपामुळे संचालकाची निवडणूक केली जाते. प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष निवडनूक प्रक्रियेत राजकीय दबाव असतो. फक्त १५.६ टक्के सहकारी दुध संस्थामध्ये मतदानाने संचाकाची निवड होते. या तक्त्यावरुन सोलापूर जिल्हतील राजकारणाचा मुददा व्यूहरचनेवर आलेला दिसतो


सध्याच्या सहकार क्षेत्रातील कोणत्याही निवडूणूकीत राजकारणाचा मुदद्दा खुपच गाजत आहे. या सर्व बाबीमुळे सहकारीक्षेत्राचे खाजगीकरण होताना अलीकडील कालावधीत दिसून येत आहे. सहकारी क्षेत्रातील दुध उत्पादनचा खर्च व नफा या दोन्ही बाबीचा विचार करुन बाजारभावाने दुधाची किमंत ठरवली जाते. सीमंत खर्च आणि सीमांत प्राप्ती याला अनुसरुन दुधाची किमंत ठरविणे आवष्यक आहे. दुधाची किमंत संचालक मंडळ किंवा बाजारभाव (मागणी आणि पुरवठा) आणि संस्था ठरविते. तक्ता क्र. ४.२० मध्ये सोलापूर जिल्हयात दुधाच्या किमंतीचे विष्लेशण केले आहे.

तक्ता. क्र. ४.२०

सहकारी दुध संघाचे किमंत धोरण दर्शवणारा तक्ता

अ.क्र.	किमंत धोरण	वारंवारिता	टक्केवारी
१	संचालक मंडळ	७८	६४.४
२	बाजार भाव	१८	२०.००
३	डेअरी	१४	१५.६
	एकूण	**९०**	**१००.००**

स्त्रोत :- प्रथमिक साधनसामग्री



तक्ता क्र. ४.२० मध्ये ६४.४ टक्के सहकारी दुध संस्था मध्ये संचालक मंडळ दुधाची खरेदी किमंत ठरवितात. सोलापूर जिल्हयातील २० टक्के सहकारी दुध संस्था मध्यबाजारभावाप्रमाणे दुध खरेदीची किमंत म्हणजे मागणी व पुरवठयातून ठरविली


जाते. तर १५.६ टक्के संस्था स्वतः डेअरीच्या माध्येमाने किमंत ठरविले जाते. त्यामुळे या संस्थावर राजकीय प्रभाव असाह्याचे स्पष्ट आढळून येते. त्यामुळे सोलापूर जिल्हयात खाजगीकरण दुध उत्पादनक्षेत्रात वाढत आाहे. उपलब्ध दुधविक्रीसाठी राज्य पातळीवर, राष्ट्रीय पातळीवर आाणि स्थानिक म्हणजेच तालुकापातळीवर पाठविले जाते त्यामुळे त्यापासून नफा व तोटयाचे प्रमाण कळते. तक्ता क्र. ४.२१ मध्ये दुध विक्रीचे ठिकाण याचे विवेचन केले आहे.

तक्ता क्र. ४.२१

दुध विक्रीचे ठिकाण दर्शवणारा तक्ता

अ.क्र.	दुध विक्री	वारंवारिता	टक्केवारी
१	तालुका पातळी	४६	५१.१
२	जिल्हा पातळी	३२	३५.६
३	राज्य पातळी	१२	१३.३
	एकूण	**९०**	**१००.००**

(स्त्रोतः- प्राथमिक साधनसामग्री)



तक्ता क्र. ४.२१ मध्ये ५१.१ टक्के दुध संघ दुधाची विक्री तालुका पातळीवर म्हणजेच स्थानिक ठिकाणी विक्री करतात. ३५.६ टक्के दुध संख्या जिल्हयाच्या ठिकाणी विक्री करतात तर १३.३ टक्के संख्या या राज्यपातळीवर दुध विक्री करतात. या


सर्वेक्षणावरुन एक बाब लक्षात घेतली तर दुधासाठी बाजारपेठेची उपब्धता कमी प्रमाणात मिळते त्यामुळे सभासदांचे नुकसान होते. सभासदानी सहकारी संख्याच्या विकासासाठी काम करणे अपेक्षित आहे. परंतु बरेचसे सभासद दुध उत्पादन घेत नाहीत त्यामुळे त्याचा फरका त्या संस्थाना बसतो. तक्ता क्र. ४.२२ मध्ये दुध उत्पादन घेणाऱ्या सभासदांची आकडेवारी दिलेली आहे.

तक्ता क्र. ४.२२

दुध उत्पादक सभासद

अ.क्र.	**उत्पादन**	**वारंवारीता**	**टक्केवारी**
१	उत्पादन घेतात	८४	९३.३
२	उत्पादन नाही	६	६.७
	एकुण	**९०**	**१००.००**

(स्त्रोत :– प्राथमिक साधन सामग्री)



क्ता क्र. ४.२२ मध्ये दुध उत्पादनमध्ये ९३.३ टक्के सभासद हे दुध उत्पादन घेतात तर ६.७ टक्के दुध उत्पादन सभासद घेत नाहीत. यावरुन एक बाब स्पष्ट होते की जर सभासद उत्पादन घेत असतील तर त्याचा तोटा सहकारी संस्थांना होतो.

४.७.१ सहकारी संस्थेतील दुध उत्पादनेः-

तक्ता क्र. ४.२३
सहाकारी दुध संघातील दुध पदार्थाची उत्पादने दर्शवणारा तक्ता

अ.क्र.	तूप	वारंवारीता	टक्केवारी
१	होय	८१	९०
२	नाही	९	१०
	एकूण	९०	१००
		पेढा	
३	होय	७८	८६.७
४	नाही	१२	१३.३
	एकूण	९०	१००.००
		पनीर	
५	होय	७६	८४.४
६	नाही	१४	१५.६
	एकूण	९०	१००.००
		बासुंदी	
७	होय	८२	९१.१
८	नाही	८	८.९
	एकूण	९०	१००.००
लस्सी			
९	होय	८२	९१.१
१०	नाही	८	८.९
	एकूण	९०	१००.००
		श्रीखंड	
११	होय	७९	८७.८
१२	नाही	११	१२.२
	एकूण	९०	१००.००

(स्त्रोत :- प्राथमिक साधनसामग्री)

सोलापूर जिल्हयातील सहकारी दुध संघात प्रामुख्याने दुध पावडर, तुप, पेढा, बासुंदी, पनीर किंवा बटर, लस्सी आणि श्रीखंड अशी वेगवेगळी उत्पादने घेतली जातात. या उत्पादनातून प्रामुख्याने यासंस्थांचा नफा प्राप्त केला जातो. त्या पैकी जी उत्पादने पारंपारीक घेती जातात. त्यातून नफयाचे प्रमाण कमी हात जाते सहकारी क्षेत्रातील उत्पादन आधुनिक पध्दतीने न घेतल्यामुळे उत्पादन कमी होते, पूर्ण क्षमतेने दुधाचा वापर होत नाही यंत्र सामग्रीचा मोकाट वापर होतो त्यामुळे त्यांचे


जास्त प्रमाणात नुकसान होते. अलीकडील कालवधीत यंत्र सामग्रीची खरेदी, दुध पदार्थाची खरेदी विक्री किमतीत गाळा या माधमाने व्यवहार होतात आणि दुध संघाचे नुकसान होते.

तक्ता क्र.४.२३ सोलापूर जिल्हयातील अभ्यास क्षेत्रातील सहाकरी दुध संस्थातील उत्पदनाचा आढावा घेतला आहे. या संस्थामध्ये घेतले जाणारे दुध पदार्थ हे पारंपारिक असल्याने नुकसान होते. तुप उत्पादन ९० टक्के सहकारी दुध संस्थात घेतले जाते. १० टक्के संस्था तुप उत्पादन केल जाते. त्याच बरोबर ९१.१ टक्के, ८४.४ टक्के ९१.१ टक्के आणि ८७.८ टक्के सहकारी दुध संस्थामध्ये अनुक्रमे बासुंदी, पनीर, लस्सी आणि श्रीखंड याचे उत्पादन घेतले जाते. या सर्व उत्पादनच्या विक्रीमध्ये आणि दुध खरेदी किमंती मध्ये बरचसा फरक आहे. त्यामुळे हा फरक राजकारण्याच्या हातात जातो त्याचा फरक सहकारी दुध संघाला होतो. उत्पादित झालेल्या पदार्थांना सहकारी बाजर पेठा उपलब्ध असणे आवष्यक आहे. त्यामूळे या पदार्थाना जास्त किमंत मिळू शकते परंतू खाजगी बाजरपेठेत या पदार्थाना कमी किमंत मिळते.

तक्ता क्र. ४.२४
बाजाराची उपलब्धता दर्शविणारा तक्ता

अ.क्र.	बाजारपेठ	वारंवारिता	टक्केवारी
१	सहकारी	७६	६२.२
२	खाजगी	३४	३७.८
	एकूण	९०	१००.००

(स्त्रोत :- प्राथमिक साधनसामग्री)




तक्ता क्र. ४.२४ मध्ये बाजाराची उपलब्धता आहे सहकारी आणि खाजगी यावरुन सहकाराची स्थिती लक्षात येते. ६२.२ टक्के बाजारपेठेते सहकारी सस्थांच्या उत्पादनाची विक्री जाते तर ३७.८ टक्के खाजगी क्षेत्रातील बाजारपेठेत विकले जाते. या वाक्यावरुन आपल्या देशात सहकारी दुध संस्थांची पिछेहाट होताना दिसत आहे. हे बदल गेल्या काही वर्शापासून चालणाऱ्या राजकीय घडामोडीवरुन झालेली आढळते. राज्यातील सेवा क्षेत्राच्या सरासरी वृध्दी दराचा विचार करता तो सन २००४-०५ ते २०१३-१४ दरम्यान १५.८४ टक्के इतके तर सहकारी क्षेत्राचा वृध्दीदर केवळ १.७ टक्के एवढया दरम्यानच्या कालावधीत झाला. महाराष्ट्राच्या आर्थिक विकासामध्ये कृषी आणि उदयोग क्षेत्राच्या तुलनेत सर्वच क्षेत्रात प्रामुख्याने दुध क्षेत्राने महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे.

बऱ्याचदा उद्योगाचे आकारमान बाजारपेठाच्या विस्तारावर अवलंबून असते. व्यापक बाजारपेठा उपलब्ध झाल्या तर उद्योगाची उत्पादनक्षमता वाढण्यास मदत होते. सोलापूर जिल्हयात सहकारी बाजारपेठाच्या तुलनेत खाजगीचे प्रमाण अधिक आसाह्याामुळे राजकारणाला वाव मिळताना दिसतो. शहरी लोकांचा कल हा निसर्गाकडे असतो, नैसर्गिक वातावरण, शहरी लोकांना उपलब्ध होऊ शकतो तसा सहकारी किंवा खाजगी दुध संघामध्ये शीतगृहाची गरज असते. तर शीत गृहाची उपब्धता कमी असते तर दुधा सारख्या नाशवंत पदाथांच्या बाबतीत तोटा सहन करावा लागतो. तक्ता क्र. ४.२५ मध्ये सोलापूर जिल्हयातील सहकारी दुध संघामधील शीतगृहाची संख्या दिली आहे.

तक्ता क्र. ४.२५
शीतगृहाची संख्या दर्शवणारा तक्ता

अ.क्र.	तालुका	शीत गृहाची संख्या	
		२००९	२०१४
१	करमाळा	१	२
२	माढा	१	२
३	बार्शी	१	३
४	उ. सोलोपूर	२	३
५	मोहोळ	१	१
६	पंढरपूर	१	२
७	माळशिरस	१	४
८	सांगोला	१	२
९	मंगळवेढा	१	२
१०	द. सोलापूर	0	१
११	अक्कलकोट	0	0
	एकूण	**१०**	**२२**

(स्त्रोत :- जिल्हा दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी महाराष्ट्र सरकार २०१४)



सोलापूर जिल्हयात सहकारी आणि खाजगी दुध संघातून दुध उत्पादन हे शीतगृहातील क्षमतेपेक्षा जास्त आहे परिणामी दुधाची विक्री ही राजकारणी लोकांकडून अथवा संचालक मंडळीकडून मिळलेल्या किमतीला विकले जातात त्यामूळे जास्त नुकसान होते.

४.५.२ सोलापूर जिल्हयातील दुध संघातील निवडणूक :–


भारत हा जागातील इतर कोणत्याही राष्ट्रापेक्षा सर्वात मोठा लोकशाही असणारा देश आहे. लोकांनी लोकांच्यासाठी चालवलेले राज्य म्हणजे लोकशाही ही उंची अलीकडे काही काळात मागे पडताना दिसत आहे. सहकारी क्षेत्रातील होणारी निवडणूक ही राजकीय दबाव, लोकशाही बहुमत आणि संचालक मंडळाची मनमानी या पध्दतीने होताना आढळून आले आहे. तक्ता क्र. ४.२६ मध्ये सहकारी दुध संघामध्ये होणारी निवडूणूकीचे धोरण दाखविले आहे.

तक्ता क्र. ४.२६

सहकारी संस्थच्या निवडणूक विषयल वास्तविकता दर्शवणारा तक्ता

अ.क्र.	पध्दती	वारंवारिता	टक्केवारी
१	संचालकाचा दबाव	७५	८३.३
२	बहुमताने	१३	१४.४
३	राजकीय दबाव	२	२.२
	एकूण	**९०**	**१००.००**

(स्त्रोतः– प्राथमिक साधनसामग्री)




संचालक मंडळाचा दबाव आणि राजकीय दबाव यामुळे सोलापूर जिल्हयातील सहकारी क्षेत्रावर राजकीय परिणाम होताना दिसून येतो. ८३.३ टक्के सहकारी दध संघामध्ये संचालकाच्या दडपनावर आधारित चेअरमनची निवड होते. तो चेअरमन एखादया राजकीय पक्षाचा घटक असल्याने तो तसा स्पर्श त्याचा प्रयत्न करतो. २.२ टक्के संस्थेत राजकीय दडपणाने निवडणूक पार पाडली जाते. तर केवळ १४.४ टक्के संस्थात किंवा संघात लोकशाही पध्दतीने निवडणूक प्रकिया पार पाडली जाते. एकंदरीत सोलापूर जिल्हा दुध संघावर राजकीय पक्षाचा दबाव असल्याचे स्पष्ट होते. दुध संघात चांगल्या प्रतीच्या दुधासाठी चांगल्या प्रतिच्या जनावरांची आवष्यकता आहे. त्यासाठी सहकारी संघाशी संबधीत अध्यक्ष आणि संचाकांची सहकाराच्या माध्यमाची मदत केली जाते. तक्ता क्र. ४.२७ मध्ये गाई व म्हशी खरेदी करण्यासाठी मदत केली जाते याचा परामर्श घेता आहे.

तक्ता क्र. ४.२७

गाई व म्हशीच्या खरेदीसाठी संघाकडून मदत दर्शवणारा तक्ता

अ.क्र.	तपशील	वारंवारिता	टक्केवारी
१	मदत केली जाते	७७	६१.१
२	मदत केली जात नाही	३७	३८.९
	एकुण	**९०**	**१००.००**

(स्त्रोतः– प्राथमिक साधनसामग्री)



तक्ता क्र. ४.२७ मध्ये ६१.१ टक्के सहकारी दुध संघाकडून गाई आणि म्हशी चांगल्याप्रतीच्या खरेदी करण्यासाठी मदत केली जाते तर ३८.९ टक्के सहकारी दुध संघाकडून मदत केली जात नाही ज्या घटकावर आधरित दुध संघ आहेत त्यालाच मदत कमी प्रमाणात होत आहे. सभासदांकडे सातत्याने असणारी दुष्काळी परिस्थिती जनावरासांठी लागणारा चारा पाणी या बाबी पूर्ण कारण्यासाठी मदत कमी प्रमाणात केला जाते. तक्ता क्र. ४.२८ मध्ये स्वतः सहकारी दुध संघाच्या अध्यक्षानी केलेल्या मदतीचा आढावा घेतला आहे.


तक्ता क्र. ४.२८

चेअरमन कडून मदत दर्शवणारा तक्ता

अ.क्र.	तपशील	वारंवारिता	टक्केवारी
१	शेतकऱ्यांना	५१	५६.७

२	सभासदांना	१४	१५.६
३	नाविन्यता	१४	१५.६
४	विकास	११	१२.२
	एकूण	**९०**	**१००.००**

(स्त्रोतः– प्राथमिक साधनसामग्री)



तक्ता क्र. ४.२८ मध्ये क्र. ५६.७ टक्के संस्था या प्रामख्याने सरासरी शेतकऱ्यांना आर्थिक मदत त्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी मदत करतात. १५.६ टक्के सहकारी संस्था प्रामुख्याने सभासदांना मदत करातात. १५.६ टक्के सहकारी दुध संघ हे दुध उत्पादन क्षेत्रात नविण्यता आणण्यासाठी मदत करतात तर कवळ १२.२ टक्के संख्या या एकूण सर्वांगीण विकासाठी मदत करतात .

तक्ता क्र. ४.२९

राजकीय परिस्थीती दर्शवणारा तक्ता

अ.क्र.	**अध्यक्षांचा पक्ष**	**वारंवारिता**	**टक्केवारी**
१	भाजप	२	२.२
२	काँग्रेस	८१	९०

३	राष्ट्रवादी कांग्रेस	६	६.६
४	शेकाप	१	१.१
	एकूण	९०	१००.०
अध्यक्षाचा कालावधी			
५	३ ते ६ वश	५	५.६
६	६ ते ९ वर्श	५	५.६
७	९ पेक्षा जास्त	८०	८८.६
	एकूण	९०	१००.००
अध्यक्षाचे इतर पद			
८	होय	७९	८७.८
९	नाही	११	१२.२
	एकूण	९०	१००.०

(स्त्रोतः– प्राथमिक साधन सामग्री)


तक्ता क्र. ४.२९ मध्ये सोलापूर जिल्हयातील सहकारी दुध संघातील राजकीय स्थिती दर्शविलेली आहे फक्त २.२ टक्के सहकारी दुध संघावरती भाजप पक्षाचा अध्यक्ष होता. ९० टक्के सहकारी दुध डेअरी वर कांग्रेसचे या राजकीय पक्षाचा चेउरमन आहे. ६.६ टक्के दुध संघावर राष्ट्रवादी कांग्रेस पक्षाची सत्ता आहे तर फक्त १.१ टक्के दुध डेअरीवर शेतकरी कामगार पक्षाची सत्ता आहे. तर फक्त १.१ टक्के दुध डेअरीवर शेतकरी कामगार पक्षाची सत्ता आहे. थेाडक्यात राष्ट्रवादी कांग्रेस आणि कांग्रेस या दोन राजकीय पक्षाचा सोलापूर जिल्हयाच्या राजकारणावर प्रभाव प्रामुख्याने दिसून येतो. एक पक्षाचा आणि एका अध्यक्षाचा कालावधी साधारणपणे ९ वर्शपेक्षा जास्तत आहे. ३ ते ६ वर्ष अध्यक्षपदावर कालावधी ५.६ टक्के दुध संघाचा होता. ५.६ टक्के दुध डेअरी एका अध्यक्षाला ६ ते ९ वर्षे कालावधी मिळाला. तर ९ पेक्ष जास्त वर्ष सत्तेवर असणाऱ्या दुध संघ ८८.९ टक्के आहे. एकूण सोलापूर जिल्हयातील सहकारी दुध

संघातील सत्ता विशिष्ट एका राजकीय पक्षाच्या हातात गेली तर त्याचा अधिक प्रभाव सहकार क्षेत्रावर पडतो हे दिसते. अस्तीत्वात असणाऱ्या अध्यक्षांच्या या सध्याच्या पदा बरोबरच इर पदावर ८७.९ टक्के संस्थात अध्यक्षांची संख्या आहे. तर १२.२ टक्के संघातील अध्यक्ष इतर कोण्त्याही पदावर काम करीत नाहीत. इतर पदामध्ये प्रामख्याने स्थानिक स्वराज्य संस्था, बिगर सरकारी संस्था, बचत गट यांचा समावेश होतो.

तक्ता क्र. ४.३०
राजकीय पक्ष/गट दर्शवणारा तक्ता

अ.क्र.	**पक्ष**	**वरंवारिता**	**टक्केवारी**
१	भाजपा	१	१.१
२	काँग्रेस	४	४.७
३	राष्ट्रवादी काँग्रेस	८४	९३.३
४	शेकाप	१	१.१
	एकूण	**९०**	**१००.०**

(स्त्रोतः– प्राथमिक साधन सामग्री)



तक्ता क्र. ४.३० १.१ टक्के सहकारी ढुध डेअरीमध्ये भाजपा राजकीय पक्षाचे सरकार आहे. ९३.३ टक्के दध डेअरीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पदाची सत्ता आहे. ४.७ टक्के ढुध

डेअरी मध्ये काँग्रेस या राजकीय पक्षाची सत्ता आहे तर १.१ टक्के शेकाप म्हणजेच शेतकरी कामगार पक्षाची सत्ता दुध डेअरी वर आहे. सोलापूर जिल्हा हा गेला वीस ते तीस वर्ष प्रामख्याने काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोन बडया राजकीय पक्षाच्या ताब्यात असलेला जिल्हा म्हणून ओळखला जातो. अगदी त्याच प्रमाणे सहकारीक्षेत्र सुध्दा याच्या प्रभावखाली आहे हे वरील तावत्यातून दिसून येते.

४.५.३ सहकारी दुध संघातील राजकीय प्रभावः–

सत्तेत असणाऱ्या राजकीय पक्षामुळे सभीसदांचा फायदा होतोकी नकसान होते हे पाहणे खूप महत्त्वाचे आहे तक्ता क्र. ४.३१ मध्ये सभासंदाचा फायदा, इतर दुध संख्या खाजगी दुध संघ आणि सहकारी तक्त्याचा विकास या बाबीवर विशेश भर दिलेला आहे.

तक्ता क्र. ४.३१

दुध संघातील राजकीय प्रभाव दर्शवणारा तक्ता

अ.क्र.	तपशील	वारंवारिता	टक्केवारी
१	फायदा	१	१.१
२	तोटा	८९	९८.९
	एकूण	**९०**	**१००.००**
इतर डेअरी			
३	होय	७१	७६.७
४	नाही	३९	४३.३
	एकूण	**९०**	**१००.००**
खाजगी डेअरीची वाढ			
५	एक	३८	४२.२
६	होय	२५	२७.८
७	काही प्रमाणात	२७	३०.०

अ.क्र.	तपशील	वारंवारिता	टक्केवारी
	एकूण	**९०**	**१००.००**
सहकारी तक्त्याची घट			
८	होय	७३	७८.८
९	काही प्रमाणात	१४	१५.६
१०	नाही	२३	२५.६
	एकूण	**९०**	**१००.००**

(स्त्रोतः– प्राथमिक साधन सामग्री)

तक्ता क्र. ४.३१ फक्त १.१ टक्के अगदी नाही म्हटले तरी चालेल एवढया सभसंदांना दुध संघावर असणाऱ्या राजकीय पक्षानी घेतलेल्या निर्णयामुळे फायदा झाला आहे तर सर्वात जास्त म्हणजे ९८.८ टक्के सभासदांना राजकीय निर्णयामुळे तोटा सहन करावा लागला परिणामी सोलापूर जिल्हयाचा सहकारी दुध संघाच्या राजकारणाचा विकासात अडथळा निर्माण झाला आहे. असे म्हणावे लागेल. ५६.७ टक्के सभासदांच्या म्हणण्यानुसार सोलापूर जिल्हयात खाजगी दुध संख्या वाढत आहे तर ४३.३ टक्के इतर दुधसंघ नाहीत. ४२.२ टक्के खाजगी डेअरीत नफयाची वाढ आहे तर २७.८ टक्के खाजगी दुध डेअरीत नफयात वाढ ही काही प्रमाणात होत आहे. यावरुन एक बाब लक्षात येते की, सोलापूर जिल्हयात सहकारी दुध संघपेक्षा खाजगी दुध संघाचे वर्चस्व वाढत आहे. यामुळे सहकारी तत्व जे लोकांनी लोकांच्यासाठी आहे ते कुठेतरी पाठीमागे पडत आहे. सोलापूर जिल्हयात ७८.८ टक्के दुध संस्थामध्ये सहकाराचे तक्ता घटत चालले आहे तर १७.६ टक्के संस्थात सहकाराचे तत्व काहीप्रमाणात घटत आहे आणि २७.६ टक्के संस्था हे तत्त्व घटत नाही.

सोलापूर जिल्हा सातत्याने दुष्काळाच्या पट्टायात येत असल्यामुळे सहकाराची चांगली अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. त्याशिवाय ग्रामीण भागाचा विकास होणार

नाही. भ्रष्टाचार कमी करणे व दूध उत्पादन वाढावावे लागेल. अगदी तीच परिस्थीती सोलापुर जिल्हयाच्या सहकारी दुध संघाच्या बाबतीत आहे. निवडणुकीच्या दरम्यान खासदार आमदार, जिल्हा परिशद सदस्य, पंचायत समिती सदस्य हे सत्ता मिळविण्यासाठी प्रयत्नशील असतात. त्या सर्वाचा परिणाम सहकारी क्षेत्रावर झालेला आहे.

४.६ समारोपः

सोलापूर जिल्हयातील सहकारी संस्थांनी केलेली वाटचाल महत्त्वपूर्ण आहे. सहकारी दूध डेअरी किंवा संस्था यांची प्रगती राजकारणामुळे कमी होताना दिसत आहे. प्रस्तूत प्रकरणामध्ये सोलापूर जिल्हयातील सहकारी दूध संस्था पेक्षा खाजगी दूध संकलन वाढत असल्याचे स्पष्ट दिसून आले आहे. भारत देश जनावरांच्या संख्येत आणि दूध उत्पादनात अग्रेसर असणारा देश आहे. तरी सुध्दा यावर प्रभुत्व काही मुठभर लोकांचे असल्याने सहकार क्षेत्र कोलमडले आहे. या प्रकरणामध्ये जागतिक पातळीवरील दूध उत्पादन आणि भारत, महाराष्ट्र व सोलापूर जिल्हयाचा आढावा घेतला आहे.

प्रकरण पाचवे

सोलापूर जिल्हयातील सहकारी बँका आणि राजकारण

प्रकरण पाचवे

सोलापूर जिल्हयातील सहकारी बँका आणि राजकारण

५ .१ प्रस्ताविक

५ .२ भारतातील सहकारी बँका

५ .३ महाराष्ट्रातील सहकारी बँका

५ .४ सोलापूर जिल्ह्याातील सहकारी बँका

५.४.१ सोलापूर जिल्हयातील मध्यवर्ती बँकेचे राजकारण

५.४.२ राजकीय दडपणामुळे आर्थिक नुकसान

५ .५ आकडेवारीचे विश्लेषण

५ .६ समारोप

प्रकरण पाचवे

सोलापूर जिल्हयातील सहकारी बँका आणि राजकारण

५ .१ प्रस्ताविकः

भारतातील सहकारी चळवळीचा उगम बिँटीशांच्या राजवटीमध्ये झाला. शेतकरी आणि तत्सम गरीबँ वर्गाला सावकारी पाशातून मुक्त करण्यासाठी सहकारी चळवळीचा उगम या शतकाच्या सुरूवातीस झाला. भारतात बिटीश सरकारचे पुढाकारातून सहकारी संस्थांची स्थापना झाली. ब्रिटीशांना ग्रामीण पतपुरवठा संस्थांची आवश्यकता भासली. ती कायदा आणि सुव्यवस्थेच्या प्रश्नामुळे सावकारी पाष अतिशय जाचक झाल्यामूळे १९ व्या शतकाच्या अखेरीस मुंबई प्रांतामधील पुणे व अहमदनगर जिल्हयात याचा अतिरेक होऊन तेथील स्थानिक ढांडग्यांना बंडाचे स्वरूप प्राप्त झाले ४७ खेडयात व अहमदनगर जिल्हयातील २२ खेडयात ही लाट पसरली आणि तेथील सावकार व जमीनदार यांच्यावर हल्ले होवू लागले. मोठया प्रमाणावर दंगे जाळपोळ व लुटालूट होवू लागली त्याला आळा घालण्यासाठी शेतकऱ्यांची सावकारी पाशातून मुक्तता करण्यासाठी सहकारी संस्था स्थापनेची कल्पना पुढे आली अशा पध्दतीच्या संस्था जर्मनीत असल्यामूळे मद्रास प्रांताचे सनदी अधिकारी सर फडरीक निकोल्सन यांना जर्मनीत पाठवण्यात आले तेथून परत आल्यावर 'रायफसन शोधाम अशी शिफारस त्यांनी कली त्यातूनच अशा सहकारी संस्था सुरू करण्यासाठी १९०४ साली सरकारने सहकारी कायदा[९५] पास केला व त्यानंतर शेती क्षेत्रात शेतकी पतपेढया स्थापन होण्यास सुरूवात झाली. अशा प्रकारची पहिली सोसायटी १९०५ साली धारवाड जिल्हयात गदग या तालुक्यात कनगीनहल येथे स्थापना झाली. यानंतर सहकारी खाते प्रत्येक प्रांतात स्थापन झाले या खात्याचा प्रमुख म्हणून रजिस्टर ऑफ को-ऑपरेटिव्ह हे पद नव्याने स्थापन केले. त्यांच्या मदतीसाठी प्रत्येक जिल्हयात सहकारी अधिकारी नेमण्यात आले या कायद्यानुसार ग्रामीण भागात सहकारी शेतकी पतपुरवठा संस्था

[95] Datta & Sundaram, *Indian Economy*, Chand Publications, New Delhi, 2011

स्थापन झाल्या हळुहळू या संस्थांची संख्या वाढत गेली. मुंबँईतील सहकारी पतपुरवठा संस्था या केंद्रीय बँकेशी संलग्न झाल्या. प्रातीय बँक व ग्रामीण पतपुरवठा संस्था यातील दुवा म्हणून काही जिल्हा स्तरीय बँकाही काम करू लागल्या. १९१२ साली सहकारी कायद्यात बदल करून पतपुरवठा संस्थांचा बरोबर अर्थक्षेत्रातही सहकारी संस्था स्थापण्याची तरतूद झाली. त्यानुसार इतर प्रकारच्या सहकारी संस्था स्थापन होवू लागल्या. पहिल्या व दुसऱ्या महायुध्दाच्या महागाईच्या व टंचाईच्या काळात आवष्यक वस्तुचा पुरवठा करण्यासाठी सहकारी तत्वावर ग्राहक संस्था सुरू झाल्या. पगारदारांनी आपल्या बचत व पतपुरवठा संस्था स्थापन केल्या.

भारतातील सहकारी चळवळीस नुकतीच ११० वर्षे पूर्ण होवून गेली. या वर्षाच्या वाटचालीत सहकारी क्षेत्राने अनेक स्थित्यंतरे पाहिली आहेत. आज खाजगी क्षेत्र व सार्वजनिक क्षेत्राच्या बरोबरीने सहकार क्षेत्र समर्थपणे उभे आहे. अनेक व्यवसायमध्ये सहकारी क्षेत्राने आपले अस्तीत्व सिध्द केले आहे. या समर्थ वाटचालीत जिल्हा मध्यवर्ती बँकांचा महत्वाचा वाटा आहे. हे नाकारून चालणार नाही. एकूण ग्रामीण भागाच्या विकासाच्या जिल्हा बँकानी केले कार्य मोलाचे आहे.

आज जिल्हा बँकामाफंत अनेक प्रकारच्या योजना राबविल्या जातात. त्रिस्तरीय पतपुरवठा यंत्रणेतील द्वितीय स्तर म्हणून कार्य करताना सर्व घटकामध्ये समन्वय साधण्याची मोठी जबाबदारी जिल्हा बँकावर आहे. त्यामूळे आर्थिक समतोल साधत सर्व घटकांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्य करताना अनेक अडचणी व आव्हाने जिल्हा बँका पुढे उभी राहत असतात. 'सन १९९१ पासून आर्थिक उदारीकरणांच्या धोरणांचा अंगीकार केल्यामूळे सर्व क्षेत्रात प्रचंड स्पर्धा निर्माण झाली. त्यामुळे जिल्हा बँकांना व्यवसाय वाढीसाठी खाजगी बँका परदेशी बँका नागरी बँका पतसंस्था व्यापारी व राष्ट्रीकृत बँकाबरोबर तीव्र स्पर्धेला तोंड द्यावे लागत आहेम[१६]. जिल्हा बँकाचा अर्थ पुरवठा प्रामुख्याने शेती व शेतीपूरक उद्योगाशी निगडीत असल्याने दुष्काळ अतिवृष्टी वादळ गारपीठ अशा नैसर्गिक आपत्तींचा जिल्हा बँकांच्या अर्थकारणावर विपरीत

[१६] भोसले आणि महाजन, सहकार, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००६, पृ.क्र. ७ व ८.

परिणाम होतो. व साधारणतः ३ ते ४ वर्षांच्या कालावधीत अशा समस्याना एकदातरी तोंड द्यावे लागते. यामुळे वसुलीवर परिणाम होत असून कर्ज परत करणाऱ्यांची संख्या कमी होत आहे. त्यातून बँकेची नफा घटत चालला आहे. एन.पी.ए वाढत आहे. महाराष्ट्रातील अनेक जिल्हा बँका तोटयात गेल्या असून त्यांचा संचित तोटा दिवसेंदिवस वाढत आहे. नरसिंह समितीच्या शिफारशी जिल्हा बँकांना देखील लागू झाल्या असून एन.पी.ए कर्जापोटी मोठी तरतूदी बँकांना कराव्या लागत आहेत व बँकाचा सक्षमतेच्या दृष्टीने ते आवश्यक आहे. परंतु अत्यल्प वसुली ही बाब गंभीर आहे.

नाबार्डच्या सूचना व मार्गदर्शनानुसार जिल्हा बँका कार्य करत असतात. नाबार्डने दिलेल्या सूचनानुसार सर्व जिल्हा बँकानी भांडवल वाढीसाठी प्रयत्न करावयाचे आहेत कारण जितके जास्त भांडवल तेवढी जोखीम सहन करण्याची बँकाची ताकद वाढते. तसेच भांडवल वाढीमूळे बाहेरून उभारावयाचे निधी (बॉरोइंग पॉवर) वाढल्याने जास्त उभे करता येतात व व्यवसायवृध्दीसाठी हे पूरक ठरते.

जितके जास्त निधी तितका कर्ज व्यवहार व गुंतवणूक वाढवून व्यवसायात भर घालता येते व ग्रामीण भागाचा विकास साधता येतो. बाहय निधीमध्ये ठेवी व बाहेरील कर्जे याचा समावेश होतो तर अंतर्गत निधीमध्ये वसूल भागभांडवल, ठेवी व गंगाजळी व इतर निधी यांचा समावेश होतो. अंतर्गत निधी जेवढे जास्त तेवढी सक्षमता जास्त म्हणून बँकानी अंतर्गत निधी वाढविणेवर भर दिला पाहिजे. नाबार्ड व सहकार खात्याच्या सुचनानुसार जिल्हा बँकांना किमान भांडवल पर्याप्तता निकष लागू झाले आहेत व लेखापरीक्षणात त्यासाठी गुण देखील ठेवण्यात आले आहेत म्हणून तोटा कमी करून अथवा तोटा होवू न देता नफाक्षमता वाढवणे व भांडवल वाढवणेसाठी जिल्हा बँकानी प्रयत्न करणे आवश्यक आहे.

'जिल्हा बँकांना ठेवी मिळविण्यासाठी तीव्र स्पर्धा करावी लागत आहे. जिल्हा बँका या मध्यवर्ती पतपुरवठा यंत्रणा संस्थांच्या ठेवी या साहजिकच जास्त आहेत तथापि संस्थांच्या ठेवी या एकदम काढून घेतल्या जावू शकतात म्हणून बँकानी व्यक्तीगत

ठेवी व कमी व्याजदराच्या ठेवी वाढविणेचा प्रयत्न केला पाहिजेत[१७]. परवडत नसताना ठेवीवर जादा व्याज देणे हे बँकेच्या उत्पान्नास मारक ठरत असल्याने ठेवीवरील व्याजदर हे असू वाजवी असावेत. केवळ ठेवी जास्त असणे म्हणजे उत्तम बँक असे नसून ठेवींचा पर्याप्त वापर कर्जे देण्यासाठी केला पाहिजे अन्यथा मिळालेल्या व्याजापेक्षा द्यावे लागणारे व्याज जास्त यामुळे उत्पन्नात घट होवून तोटा संभवतो. एकूण ठेवींपकी रोख व तरलतेची गुंतवणूक केंद्र सरकारचे रोखे, मान्यताप्राप्त ट्रस्टी सिक्युरिटीज व राज्य बँकेच्या ठेवींमध्ये करावी लागते. सध्या गुंतवणुकीवरील व्याज अगदी कमी झाल्याने ठेवीवरील व्याज व व्यवस्थापन खर्चाची भरपाईदेखील होत नसल्याने जिल्हा बँकापुढे अडचणी उभ्या राहिल्या आहेत. त्यामुळे सदर उत्पन्नातील घट साहजिकच कर्जावर मिळणाऱ्या उत्पन्नातून भरून काढणे क्रमप्राप्त ठरते. तथापि कर्जपुरवठा करण्यातही अनेक अडचणी उभ्या राहतात. मंदीकडून तेजीकडे अशा संक्रमण अवस्थेमध्ये अर्थव्यवस्था असल्याने कर्जमागणी मध्ये पुरेशी वाढ होत नाही. चांगल्या प्रकारचा कर्जदार मिळणे, वसुली परिणामकारक होणे, एन.पी.ए. च प्रमाण कमी होणे हे अत्यंत आवश्यक आहे. तथापी, पुरेशा कर्ज मागणी अभावी बँकाचे अतिरिक्त निधीत वाढ होत आहे. परिणामी व्याजाचे उत्पन्न कमी झाल्याने खर्चाची तोंडमिळवणी करणे जिल्हा बँकाना जिकरीचे झाले आहे.

'कर्ज पुरवठा नाबार्डचे धोरणाप्रमाणे करावा लागतो कारण जोखीम व्यवस्थापनाचा विचार करून नाबार्डने कर्जपुरवठयावर बंधने घातली आहेत. व सुरक्षीततेच्या दृष्टीने ती आवष्यक आहेत. नाबार्डने कर्जपुरवठयासाठी एक्सपोजर नॉर्म्स प्रसारीत केले असून त्यानुसार कर्जपुरवठयावर बंधने घातली आहेत. सहकारी क्षेत्रातील घटकांना कर्जपुरवठा करावयाचा झाल्यास बँकेच्या कॅपिटल फडांच्या ७० टक्के इतक्या कर्ज एका संस्थेला देता येते परंतु बिगर सहकारी संस्थेला कॅपिटल फडाच्या २५ टक्के इतकी रक्कम कर्जाऊ देता येतेम[१८]. तसेच संपूर्ण क्षेत्राचा विचार

[१७] भोसले आणि महाजन, सहकार, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००६, पृ.क्र. ७३.
[१८] भोसले आणि महाजन, सहकार, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००६, पृ.क्र. ४६.

करता एकाच प्रकारच्या उत्पादन प्रक्रिया करणाऱ्या सर्व सहकारी संस्थांना मिळून अंतर्गत विनीयोगक्षम निधीच्या ४० टक्के रक्कम व बिगर सहकारी संस्थांना मिळून अंतर्गत विनीयोगक्षम निधीच्या २५टक्के इतकी रक्कम एकत्रीतपणे कर्जाउ देता येते उदा. सर्व सहकारी साखर कारखान्यांना मिळून द्यावयाचे एकूण कर्ज अंतर्गत विनीयोगक्षम निधीच्या ४० टक्के पेक्षा जास्त देता येत नाही. काही वेळेला एखादी उत्पादन क्षमता सक्षम असते. व त्यांची कर्जमागणी एक्स्पोजर मर्यादित असू शकत नाही. अशा वेळी बँकेची निधी असून देखील कर्जपूरवठा करता येत नाही. किंवा सहभाग तत्वावर इतर बँकेस सहभागी करून घ्यावे लागते. म्हणून जिल्हा बँकेची एक्स्पोजर मर्यादा वाढवण्यासाठी कॅपिटल फडात वाढ होणे आवष्यक आहे. यासाठी तोटा कमी करणे चांगला कर्जव्यवहार करणे, वसुली वाढविणे, एन.पी.ए. कमी करणे व भांडवल वृध्दी करणे हा उत्तम मार्ग होय.

नुसत्या पारंपारिक शेती व कर्जवाढीवर मर्यादा असल्याने शेती व्यतीरिक्त कर्जपुरवठा देखील बँकानी करावयास पाहिजे. पारंपारिक शेतीचे क्षेत्र वाढणे शक्य नसल्याने व प्रति हेक्टरी उत्पादन क्षमता जास्तीत जास्त किती वाढेल याावर देखील मर्यादा असल्याने शेती पूरक व रिटेल स्वरूपाचा कर्ज पुरवठा जिल्हा बँकानी करावयास पाहिजे. यासाठी नाबार्डने जिल्हा बँकाना सोने तारण कर्ज व्यापारी व व्यवसायीकांना कॅश क्रेडीट वैयक्तीक कर्ज तात्पुरता अधिकर्श लहान वाहतूकदार यांना कर्जपुरवठा करण्यास मान्यता दिली आहे. शहरी भागात इतर बँकेकडून असलेली स्पर्धा व रिटेल बँकींगमध्ये पूर्वीपासूनच असलेले त्यांचे स्थान विचारात घेता सदर व्यवसाय शहरी भागात वाढविण्यासाठी प्रचंड स्पर्धेला तोंड द्यावे लागे त्या मानाने ग्रामीण भागात लहान व्यवसायिकांना रिटेल बँकीग सुविधा चांगल्या प्रकारे पुरविता येणे. शक्य होईल त्यामुळे ग्रामीण भागात वाढेल लोकांचे उत्पन्न व राहणीमान वाढेल अर्थव्यवस्था बळकट होईल. रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील अर्थात यासाठी कर्मचारी उद्योजक प्रशिक्षण असे कार्यक्रम हाती घ्यावे लागतील म्हणजे शिस्तबध्द विकास साधता येईल.

ग्रामीण भागातील विकासासाठी नाबार्डने अनेक चांगल्या योजना आखल्या आहेत. ज्यानुसार शेतीपूरक व इतर उद्योगधंद्यासाठी नॉनफॉर्म सेक्टर योजनेअंतर्गत अनेक उद्योगांचा समावेश करण्यात आला आहे. तसेच यासाठी नाबार्ड कडून फर कर्जाची सुविधा देखील उपलब्ध करून देण्यात आली आहे. सदर कर्जपुरवठा हा जिल्हा बंकाना थेट न मिळता राज्य बँकेच्या माफंत उपलब्ध केला जातो. सदर कर्जपुरवठा जर नाबाँर्ड ने जिल्हा बँकाना दिला तर कमी व्याजदरात उद्योजकांना कर्जपुरवठा करता येईल. तसे पाहिले तर खरी अडचण निधीची कमतरता ही नसून मिळालेल्या कर्जाचा विनियोग ज्या कारणसाठी कर्ज घेतले आहे. त्याच कारणासाठी जाणीव निर्माण करणे ही आहे. यासाठी शेतकरी व सभासदांचे प्रशिक्षण प्रबोधन होणे गरजेचे आहे. कर्जदारांचे प्रशिक्षण या बाबोवर जिल्हा बँकामध्ये तितक्या गंभीरपणे विचार झालेला नाही परंतु यापुढील काळामध्ये ग्रामीण भागात आर्थिक भौगोलिक व सामाजिक जाणीव विकसीत करण्याची प्रकर्शाने गरज निर्माण झाली आहे. पायाभूत सुविधांचा विकास पाणी व उर्जेचा वापर वैद्यकीय सुविधा नवनवीन तंत्रज्ञान, वनीकरण, निवारा, पणनव्यवस्था याबाबत सखोल विचार पुष्कळ झाला आहे. परंतु प्रत्यक्षात कार्यवाही ग्रामीण भागातील जनतेनेच पुढे येवून करण्याची गरज आहे.

ग्रामीण भागाच्या विकासाकरिता नाबार्डने सहकार विकास निधी व ग्रामीण पायाभूत सुविधा विकास निधी निर्माण केला आहे. जिल्हा बँकामाफंत पुष्कळ सुविधा उपलब्ध करून देण्याचा नाबार्डचा मानस आहे. नाबार्ड ही नियंत्रणात्मक यंत्रणा म्हणून काम करीत असल्याने जिल्हा बँकावर अंकुश ठेवण्याचे व तसेच त्यांना मार्गदर्शन करण्याचे काम नाबार्ड कडून केले जाते. 'पूर्वीच्या क्रेडीट ऑथेरायझेशनचे जागी क्रेडीट मॉनिटरींग अॅरेंजमेंट स्किम नाबार्डने जिल्हा बँकांना लागू केली असून विविध रिटर्नसद्धारे त्यावर नियंत्रण ठेवले जाते. त्यासाठी नाबार्डमाफंत दर दोन वर्शांनी जिल्हा बँकेची तपासणी केली जाते. तसेच इतर वैधानिक पत्रके नाबार्डला नित्य नियमाने पाठवावे लागत असल्याने देखरेख करणे सोयीस्कर होते जिल्हा बँकाना नाबार्डने विकास प्रक्रियेचा भाग म्हणून सन १९९५ पासून विकासात्मक कृती सुधार

कार्यक्रम लागू केला आहेम[११]. त्यांतर्गत सामंजस्य करार देखील केले आहेत. त्यानुसार जिल्हा बँकाना विविध आर्थिक बाबींची उद्दिष्टे देण्यात येतात व कृती बिढूबाबत कार्यवाही करावी लागते. या सर्व बाबोंचा आढावा दर तिमाहीस होणाऱ्या देखरेख व आढावा समिती सभेत घेतला जातो. सदर समितीमध्ये जिल्हा बँक, नाबार्ड, राज्य शासन राज्य बँक रिझर्व्ह बँकेचा यांचे प्रतिनीधीचा समावेश असल्याने उच्च नियंत्रण व मार्गदर्शन सुकर होते. प्राथमिक शेती संस्थांनासुध्दा सदर सामंजस्य करार सन २००५-०६ पासून करण्यात लागू करण्यात आला असून सूत्रबध्द नियोजन कालबध्द कार्यवाही प्राथमिक शेती संस्थांना करावी लागणार असल्याने त्याचे कार्य गुणात्मक सुधार निश्चितच होणार आहे.

तथापि सर्व जिल्हा बँकानी आपली अंतर्गत नियंत्रण यंत्रणा सक्षम करणे आवश्यक आहे. त्यासाठी तडफदार उच्चशिक्षीत कर्मचाऱ्यांचा विशेष टास्क फोर्स तयार करून जोखीम व्यवस्थापनाच्या दृष्टीने नियोजन, विश्लेषन व कार्यवाही करण्याची गरज आहे. तसेच उत्तम नियोजन वसुली सक्षमीकरण वैविध्यपूर्ण कर्जपुरवठा लाभदायक गुंतवणूक व्यवस्थापन मनुष्यबळ विकास इत्यादींवर जिल्हा बँकेने भर देणे हे पुढील काळाच्या दृष्टीने आवश्यक आहे. २१ व्या शतकाने जगासाठी व प्रामुख्याने भारतासाठी फार मोठी सामाजिक व आर्थिक आव्हाने उभी केली आहेत. जगातील निरनिराळया देशातील उत्पादनाची आपापसातील आयात निर्यात यात वाढ होत आहे प्रगत तंत्रज्ञान जगातील सर्व देशात पोहोचत आह. बहुराष्ट्रीय उद्योग वाढत आहेत. बाजारपेठेचे जागतिकीकरण आज युरोपातील देशांनी जगातील सामाईक बाजार व एकच चलन व्यवस्था स्वीकारून उद्योग विस्तारासाठी पोषक वातावरण तयार केले आहे. जग लहान होत आहे त्यामुळे कोणताही देश नवनवीन तंत्रज्ञानाच्या वापरापासून अलिप्त राहू शकत नाही. प्रगत देश वस्तू आणि सेवा सुविधा यांच्या निर्माणात नवनवीन तंत्रज्ञान आनत आहेत. या तंत्रज्ञानाच्या प्रगतीपासून कोणत्याही राष्ट्राला अलिप्त राहणे शक्य होणार नाही.

[११] गुप्ता एस. के, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम सहकारी संस्था व नियम अहवाल रिपोर्ट.

आपल्या देशात १९९१ साली अंमलात आलेल्या नवीन खुल्या आर्थिक धोरणाप्रमाणे परकीय भांडवलाची गुंतवणूक करण्यासाठी आणि प्रगत तंत्रज्ञान आणण्यासाठी प्रोत्साहन देण्यात आले आहे. भारतीय भांडवलाला परकीय भांडवलशाही मुक्त चढाओढ करण्यासाठी भाग पाडले जात आहेत. अशा या चढाओढीमळे बँकींग व्यवस्थेमुळे अनेक प्रश्न उभे राहिले आहेत. विषशतः जिल्हा मध्यवर्ती बँकांपुढे मोठया प्रमाणावर स्पर्धा निर्माण झाली आहे. वाढत्या लोकसंख्येपुढे बेरोजगारीचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन मोठी जबाबदारी बँकांवर पडली आहे. भारतात मोठया प्रमाणात जनता ग्रामीण भागात वास्तव्य करुन असल्याने ग्रामीण भागातच रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या पाहिजेत.

उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरणामुळे रोजगारासाठी शहरांकडे मोठया प्रमाणात ग्रामीण भागातून श्रमिक जावू लागल्याने असंतुलन निर्माण होत आहे. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांवरी याचा ताण निर्माण होत आहे. सहकारो चळवळीच्या माध्यमतून निर्माण होत आहे. सहकारी चळवळीच्या माध्यमातून गुणात्मक सुधार करण्यास खूप वाव असल्याचे दिसून येते. बेरोजगारांकरीता स्वयंरोजगार व रोजगार उपलब्ध करुन देणाऱ्या संस्थांची मोठी गरज निर्माण झाली आहे. यातून चांगला मार्ग काढावयाचा झाल्यास महात्मा गांधींनी प्रतिपादन केल्याप्रमाणे देशातील ग्रामीण भाग व खेडी स्वयंपूर्ण झाली पाहिजेत व खेडयांमध्येच रोजगाराच्या नवनवीन संधी निर्माण झाल्या पाहिजेत. यासाठी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचे विस्तृत जाळे ग्रामीण भागात असल्याने जिल्हा बँका ग्रामीण विकासामध्ये सक्षम भूमिका बजावू शकतात. वरील सर्व बाबोंचा जिल्हा बँकांनी वरती मोठी विकासात्मक जबाबदारी आहे. यासाठी जिल्हा बँकांनी खरोखरच आपल्या यंत्रणा सक्षम केल्यास व एका विचाराने व समान ध्येयाने कार्य केल्यास सहकारी क्षेत्र समर्थपणे येणाऱ्या समस्या वरती मात करु शकेल.

सन १९९४ नंतर वेगाने स्थापन झालेल्या सर्वच नवीन नागरी सहकारी बँकाना आज मोठया प्रमाणावर संकटांना तोंड द्यावे लागत आहे. सन १९९४ च्या मराठे समितीच्या अहवालानंतर रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने मुक्त धोरण स्वीकारून कमीत

कमी अटी व शर्तींच्या अधीन राहून भारतभर अनेक सहकारी संस्थांना बँकिंग व्यवसाय करण्यासाठी परवाने लायसन्स दिले गेले. यामुळे बंकिग क्षेत्राात स्पर्धा वाढत गेली. या स्पर्धेत आपले स्थान टिकवण्यासाठी सर्वच नागरी सहकारी बँकानी स्पर्धेला तोंड देत असताना रिझर्व्ह बँकेने मात्र नागरी बँकाबाबत अत्यंत कडक धोरण स्वीकारत आहे.

मुक्त आर्थिक धोरणामुळे खाजगी व व्यापारी बँका मोठया प्रमाणावर सुरू झाल्या आहेत. यकाच्या स्पर्धा नागरी सहकारी बँकाना शहरी भागात तरी निश्चितपणे जाणू लागल्या आहेत. खाजगी व विदेशी बँकांनी फक्त शहरी भागाकडे लक्ष केंद्रीत केले आहे. या स्पर्धेत ठामपणे उभे राहण्यासाठी आवश्यक असणारी मानसिकता नागरी सहकारी बँकात निर्माण हाणे आवश्यक झाली आहे. स्पर्धेत टिकवण्यासाठी नागरी सहकारी बँकांना ढिसाळ कारभार करून चालणार नसून प्रशासकीय खर्चावरहो नियंत्रण ठेवावेच लागणार आहे. भविष्यात केवळ नफा कमविण्याकरिता भारतात आलेल्या व्यापारी व अंतरराष्ट्रीय बँकासमोर सहकारी बँकाचे एक आव्हान उभे करावे लागणार आहे यासाठी सहकारी क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकत्यांनी एकत्र येउन संघटीत होणे आवष्यक आहे.

खाजगी व व्यापारी बँकासारखी अत्याधुनिक तंत्रज्ञान बऱ्याच नागरी सहकारी बँकानी स्वीकारले असले तरी या तंत्रज्ञानाचा वापर दैनंदिन कामकाजात करण्यासाठी कार्यक्षम कर्मचारी वर्ग सहकारी बँकाना नियुक्त करावे लागणार आहेत. ग्राहकांना अत्याधुनिक सेवा देण्यासाठी शिपाई पासून ते अधिकाऱ्यांपर्यत प्रशिक्षण द्यावे लागणार असून प्रशिक्षणाचा खर्च सर्वच नागरी सहकारी बँकाना सोसावा लागणार आहे.

बँक व्यवस्थापनाबाबत संचालकांना नीटसे आकलन होत नसल्यामुळे प्रत्येक मिटींगचा 'अजेंडाम येतो त्यावरच चर्चा होते. हा अजेंडाही मोठा गंमतशीर असतो. गेल्या अनेक वर्षापासून पारंपारिक रूढीनुसार जे विषय लिहीले जात होते त्याचप्रमाणे आजही तशाच प्रकार विषयावर चर्चा होते. आर.बो.आय. च्या अनेक नवीन धोरणाचा किंवा नियमांचा उल्लेख त्यात येत नाही. त्यामुळेही अनेक अडचणी निर्माण होतात. बँकेत अनेक वर्ष काम केले असल्यामुळे तेथील कर्मचाऱ्यांची काम करण्याची पध्दत

ठरून गेलेली असते. त्यामध्ये फारसा बदल करण्याचे धारिष्टय कोणी दाखवत नाही मात्र यापुढे संचालकांना अभ्यास एम.आय.एस. (मॅनेजमेंट इन्फॉर्मेशन सिस्टीम) या कार्यप्रणालीचा अवलंब करावा लागणार आहे. यामध्ये बँकिग संबधातील सर्व बाबोचा उल्लेख अनिवार्य राहणार आहे. उदा. एस.एल.आर., सी.आर.आर. रिटर्न, आय.सी.सी. हप्ता व इतर पूर्तता आर.बी.आय.ला वेळोवेळी झालेल्या आहेत काय याची खातरजमा संचालकांना यापुढे प्रत्येक महिन्याला करावी लागणार आहे.

'बँकेची थकबाकी जितकी कमीत कमी त्या बँकेची स्थिती सदृढ अशी मानली जाते. कर्ज मंजूर करतांना शास्त्रशुध्द पध्दतीने छाननी करून कर्ज वितरणानंतर योग्य नियंत्रण ठेवले गेले तर थकबाकीमध्ये वाढ होत नाही. हे सर्वानांच माहित आहे पण एका बँकेतील कर्ज बुडवे दुसऱ्या बँकेला काही वेळा अंधारात ठेवून कर्ज मिळविण्यात यशस्वी होतात आणि दुसऱ्या बँकेतील कर्ज खाते व्यवस्थित चालवितात म्हणजे एकाच वेळी तो कर्जदार एका बँकेत 'थकबाकीदारम आणि दुसऱ्या बँकेत 'सन्माननीय खातेदारम म्हणून समाजात वावरत असतो. ज्या दुसऱ्या बँकेकडुन अशा कर्ज बुडव्यांनी नवीन कर्ज घेतलेले असते ती बँक तो दुसऱ्या बँकेत थकबाँकोदार असूनही कानाडोळा करतो. कारण त्या बँकेतील खाते व्यवस्थित चाललेले असते. त्यामुळे थकबाकीदारांना आळा घालण्यासाठी नागरी सहकारी बँकानी एकमेकांमध्ये समन्वय ठेवणे आवश्यक आहे[१००].

थकबाकीत वाढ होऊ नये म्हणून कर्ज नियमांचे काटेकोरपणे पालन करावे लागणार आहे. ठेवी जमविताना खूप ठेवी जमा करून चालणार नाही तर आवश्यक तेवढयाच ठेवी या पुढे जमा कराव्या लागतील. त्याचप्रमाणे गव्हर्नमेंट सिक्युरिटीज मधिल गुंतवणूकीमुळे नफा क्षमतेवर परिणाम होणार आहे. तसेच एक सहकारी बँक दुसऱ्या सहकारी बँकेत पैसे ठेऊ शकणार नाही. त्यामुळे 'निधी व्यवस्थापन अत्यंत कार्यक्षम करावे लागेल. बँकेचा शाखाविस्तार करून चालणार नाही तर तेथे कोणत्याच बँकेच्या शाखा नाही तेथे नवीन शाखा सुरू करण्याबाबत धोरण निश्चित करावे लागेल.

[१००] कोपर्डेकर, *शरदचंद्र सहकार परिचय*, हिमालय पब्लिकेशन हाऊस, गिरगांव, मुंबई, पृ.क्र. ४.

बँकेच्या निकोप वाढीसाठी एकामेकातील हेवेदावे सोडून व्यवसायीक दृष्टीकोनातून निर्णय घ्यावे लागतील. कदाचित यातून काही मित्रमंडळी कार्यकर्ते दुखावले जाण्याची शक्यता नाकारता येत नाही मात्र यातूनही मार्ग काढावा लागेल संचालकाच्या विविध उपसमित्या करून दर तीन महिन्याचे 'ॲक्शन प्लॅन बनविल्यास व बिझनेस डेव्हलपमेंट प्लॅन यासारख्या योजना राबविल्यास बँकेची निकोप वाढ होण्यास मदत होईल मात्र यासाठी प्रत्येक संचालकावर एक एक विभाग सोपवून त्यांना कार्यरत करावे लागणार आहे.

आज सी.आर.आर. एन.पी.ए. यामूळे महाराष्ट्रातील सुमारे ४५ बँका अशक्त झाल्या आहेतच याचा एकंदर परिणाम समान्य जनतेवर माठा होईल. यासाठी संचालक मंडळाने बँका चलवितांना व्यावसायिक दृष्टीकोण ठेवला पाहिजे. कर्ज वितरण सक्षमतेच्या निकशावर केले व बँकेच्या अंतर्गत व्यवहारात पारदर्शकता आणली तर उर्वरीत सुमारे ५५० बँका या अधिक सुदृढ होतील व ठेवीरार आणि सभासदांचा विश्वास संपादन करतील हे तितकेच खरे आहे.

'आज भारतात २,१०४ नागरी सहकारी बँका आहेत. त्यांच्या १,१०,००० कोटी रुपयांच्या ठेवी आहेत. ७०,००० कोटी रुपयांचे कर्ज आहेत, ४,००० कोटीचे स्वनिधी आहेत. महाराष्ट्रात त्यातील ६५८ बँका असून ६५,००० कोटींच्या ठेवी आहेत. ३८,००० कोटीचे कर्जे, १,५०० कोटींचे स्वनिधी ओहतम[१०१]. भारताच्या शेतीपुरवठयाचा मुख्य भार महाराष्ट्रातील बँका वाहत आहेत. नागरी सहकारी बँकांकडे व्यापारी बँकांच्या एकूण ठेवीच्या ११ टक्के ठेवी आहेत. त्यांचा ठेवीवाढीचा वेग व्यापारी व राष्ट्रीयीकृत बँकांपेक्षाा अधिक आहे आणि कर्जवसुलीचे प्रमाण व्यापारी बँकांपेक्षा कितीतरी पटीने श्रेष्ठ आहे. व्यवस्थापनाचा दर्जा, ग्राहक सेवेचा दर्जा व्यापारी बँकांच्या तोडीचा आहे. रिझर्व्ह बँकेने ३-४ वर्षांपूर्वी नागरी सहकारी बँकांच्या संचालकांसाठी मार्गदर्शन सूचना प्रस्तृत केल्या होत्या. नागरी सहकारी बँकांची संख्यात्मक वाढीबरोबर गुणात्मक वाढ

[७] ढंडवते का.'खुल्या अर्थव्यावस्थेतील नागरी सहकारी पतवंस्थापुढील आव्हाने', स्मृतोग्रंथ, महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित, पुणे २००५.

होण्यसाठी व वाढलेली जबाबदारी लक्षात घेता या सूचीमध्ये सुधारणा करुन संचालकांना सुस्पष्ट मार्गदर्शन तत्वे सुचविली पाहिजेत, जेणेकरुन त्यांचा व्यवहार पारदर्शक होऊ शकेल. केवळ कायद्याच्या कक्षेत नागरी बँकांना शिस्त लावून चालत नाही, त्यांना उद्याची दृष्टी मिळविण्यासाठी मार्गदर्शन दिले गेले पाहिजे.

सहकारी बँकांचा शंभर वर्षांच्या इतिहासात बरीच संकटे आली पण अजूनही ही चळवळ जिवंत आहे, आणि जागतिकीकरण, खजगीकरण, मुक्त अर्थव्यवस्था, मुक्त आयात निर्यात धोरण सहकारी बँकानी स्विकारले आहे. त्यामुळे ही चळवळ जिवंत, सशक्त ठेवणे आणि रिझर्व बँकेने जे आर्थिक निकष पाळावयास सांगितले आहेत ते पाळणे आवश्यक आहे. हे आर्थिक निकश कठीण आहेत हे सर्वानाच मान्य आहेत, परंतु ते आपल्याला टाळता येणार नाहीत, हे मात्र तितकेच खरे. शेवटी हे रिझर्व बँकेचे आर्थिक निकष, विकासासाठीच्या अर्हता हा शिस्तीचा एक अविभाज्य भाग समजून स्पर्धेमध्ये टिकून राहण्यासाठी ते पाळणे अनिवार्य आहे. त्याला नागरी बँकानी सामोरे गेल्याशिवाय दुसरा पर्याय उरला नाही. जीवघेणी स्पर्धा, कमी होत चाललेल्या व्याजदरातील दुरावा, वाढता प्रशासकीय खर्च, ताळेबद स्वच्छ व पारदर्शक करण ईत्यादीसाठी नव्याने जाहीर करावी लागणारी माहिती, वाढत चालचेली तूट आणि त्यासाठी करावी लागणारी जादा तरतूद. भांडवल पुर्ततेसाठी करण्यात येत असेलेली कसरत या प्रकारच्या अडचणींचा सामना नागरी सहकारी बँकांना करावा लागत आहे.

सन १९९४ नंतर मराठे समितीच्या[१०२] अहवालानंतर भारतीय रिझर्व्ह बँकेने मुक्त धोरण स्वीकारुन कमीत कमी अटी व शर्तींना अधिन राहून देशभर अनेक सहकारी संस्थांना बँकिंग व्यवसायाचे परवाने दिले गेले. ठेवी वरील व कर्जावरील व्याजदराला नागरी सहकारी बँकांना स्वातंत्र्य दिल्यामुळे नियंत्रण मुक्त वातावरणात बँकिंग व्यवसायात आमुलाग्र बदलांना सामोरे जावे लागत आहे. ज्यावेळी नागरी सहकारी बँका ठेवी जमा करतात त्याच वेळी ठरलेल्या व्याजदराने व्याज देण्याची जबाबदारी बँकांवर पडते व ते व्याज देण्यासाठी त्याहून जास्त उत्पन्न मिळविणे हे

[१०२] सहकारी महाराष्ट्र, *सहकार सप्ताह विषेशांक,* महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित पुणे,२००४

नागरी सहकारी बँकांना अनावश्यकच आहे, म्हणूनच अशा ठेवींचा विनीयोग करण्याकरीता दोन पर्याय प्रामुख्यान उपलब्ध असतात, ते म्हणजे रक्कम कर्जाऊ देऊन त्यावर व्याज मिळवणे किंवा विविध गुंतवणुक योजनेमध्ये रक्कम गुंतवून त्यावर उत्पन्न मिळविणे श्रेय होते, पण अलिकडील परिस्थितीचा विचार करता गुंतवणूकीवर मिळणाऱ्या उत्पन्नला खुपच मर्यादा आलेल्या आहेत व त्यापासून मिळणारे उत्पन्न अत्यल्प होऊ लागले आहे. शिवाय कर्जवाटप कारताना त्यानुसार येणाऱ्या धोक्यांचा विचार करावा लागतेा. म्हणून फक्त ठेवी वाढविणे हा उद्देश न ठेवता आवष्यकतेनुरुप ठेवी गोळा करणे या गोष्टीला नागरी सहकारी बँकांना प्राधान्य द्यावे लागत आहे. म्हणजेच Asset Liability Management & Maturity Patern या दोन्ही गोष्टींचा विचार करुनच ठेवींवरी व्याजदर नागरी सहकारी बँकांना ठेवावे लागणार आहे. त्यामुळे काही वेळेला जास्त व्याजदर तर जवळच्या व्यक्तीला कमी व्याजदर अशी सुध्दा परिस्थितो निर्माण आहे. अलीकडील स्थित्यांतरांचा विचार केल्यास आर्थिक क्षेत्र हे दिवसें दिवस महत्वाचे व गुंतागुतींचे होत चालले आहे. बदलत्या काळानुरुप आपल्यालाही योग्य ते बदल करणे क्रमप्राप्त आहे.

कर्जयोजना ठरवितांना आपले कार्यक्षत्र आपल्या शाखांच्या बाजूबाजूची परिस्थिती व तथील रहिवाश्यांच्या व पर्यायाने ग्राहकांच्या गरजा लक्षात घेऊनच विविध योजनांची आखणी करणे नागरी सहकारी बँकांना अनिवार्य झाली आहे. ठेवी व कर्जे यावरील व्याजदरात ४ ते ५ टक्क्याची तफावत असणे गरजेचे आहे. तरच व्यवस्थापकीय व इतर खर्च जाऊन सहकारी बँका थोडातरी नफा कमवू शकतील असे वाटते. मात्र कर्ज प्रकारणे आल्यानंतर फक्त योजनांचाच विचार न करता आलेल्या प्रकरणाचा सखोल अभ्यास करणे, त्यातील विविध पैलू विचारात घेऊन होणाऱ्या संभाव्य परिणामांचा विचार करुन आलेल्या प्रकरणाचा सखोल अभ्यास करणे, त्यातील विविध पैलू विचारात घेऊन होणाऱ्या संभाव्य परिणामांचा विचार करुन मगच सहकारी बँकांनी कर्ज प्रकरणे विचारार्थ घ्यावे, असे वाटते.

GATS - General Agreement on Trade and Services हा करार जानेवारी २००५ पासून अंमलात आला आहे. त्यामुळे बँकांचे जागतिकीकरण होणार आहे. दि ३१/०३/२००३ अखेर भारतहत खाजगी, राष्ट्रीयीकृत, व्यापारी, शहरी अशा सर्व बँका मिळून १.४० अब्ज डॉलर इतकी मालमत्ता आहे[१०३]. त्याच्या ५ पट जास्त मालमत्ता असलेल्या ५ बँका एकटया जपानमध्ये आहेत. अशा अनेक बँका जागतिकीकरणामुळे भारतात येण्याची शक्यता आहे. अशा बँकांसमोर आपल्यालाही उभे रहावे लागणार आहे, त्यासाठी आपली बँक पूर्णपणे सक्षम झाली पाहिजे तरच भविष्य उज्ज्वल आहे. पर्यायाने लेखापरिक्षण व तपासणी अत्यावश्यक आहे.

बँकिंग अर्थव्यवस्थेत मोठया प्रमाणवर परिवर्तन झाल्यामुळे नवनवीन जोखमी निर्माण होत आहेत. या परिस्थितीचा विचार करुन त्यातून मार्ग काढण्यासाठी आणि देशातील बँकांना स्थैर्य प्राप्त करुन देण्यासाठी नरसिंहम कमिटीची स्थापना केली. या समितीने देशातील बँकिंग क्षेत्राचा अभ्यास केला व काही महत्वपूर्ण शिफारशी केल्या आहेत. त्यातील एक महत्वाची शिफारस म्हणजे बँकांनी ठेवावयाचे भांडवलाचे पर्याप्त प्रमाण होय. सुरुवातीला ही शिफारस देशातील सर्व व्यापारी बँकांना टप्प्याटप्प्याने लागू केली. मे १९९९ मध्ये रिझर्व्ह बँकेने के. माधवराव यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या हाय पॉवर कमिटीने सहकारी बँकांना देखील ही जोखीम लागू करावी, अशी शिफारस केली व भारतीय रिझर्व्ह बँकेने ही शिफारस स्विकारली असून टप्प्याटप्प्याने सहकारी बँकांनाही लागू केले आहे.

बँकिंग व्यवसाय करीत असतांना ज्या वेगवेगळया जोखीम पत्करव्या लागतात, त्याचा अभ्यास करुन ज्या जोखीम आहेत त्यांच्या काही प्रमाणात बँकेचे स्वतःचे स्वनिधी असणे गरजेचे आहे, यातूनच भांडवलाचे पर्याप्त प्रमाण ही संकल्पना अस्तित्वात आली, यास कॅपिटल टू रिस्क ॲसेट रेशो (सीआरएआर) असे संबोधण्यात आले. बँकाने भांडवलाचे पर्याप्त प्रमाण योग्य प्रमाणात राखण्यासाठी रिझर्व्ह बँकेने सहकारी बँकानी मिळविलेल्या नफ्याच्या किमान २५ टक्के रक्कम राखीव निधीसाठी

[१०३] क्षिरसागर व हवालदार, सहकारी चळवळीवरील अहवाल, २००५.

वर्ग करावी व त्यांच्या परवानगी शिवाय २० टक्के पेक्षा जास्त लाभांश देवू नये. त्याच प्रमाणे वैयक्तिक शेअर्स धारण मर्यादेचे प्रमाण वाढविण्यासाठी राज्यातील सहकारी कायद्यामध्ये आवश्यक ते बदल करण्याचे कळविले आहे. परंतू सहकारी बँकांना हे प्रमाण राखण्यासाठी अनक अडचणी येत आहेत. दिवसेंदिवस व्याजातील दुरावा हा कमी होत चाललेला आहे, त्यामुळे बँकेच्या नफ्यावर परिणाम होतू लागला आहे. जागतिक मंदी, देशातील आर्थिक परिस्थिती, बँका-बँकातील स्पर्धा, खुले आर्थिक धोरण, वाढत चाललेली उत्पन्न क्षमता नसलेली रक्कम, वाढता प्रशासकीय खर्च यामुळे बँकेच्या नफ्यामध्ये मोठी घट येत आहे. सहकारी बँकाचे कार्य, विशिष्ट उध्दिष्ट डोळयासमोर ठेवून चालत असते. सहकारी कायद्यातील अडचणीमुळे अन्य व्यापारी बँकेप्रामणे भागभांडवल बाजारात उभे करता येता नाही.

Capital Adequacy Norms नजीकच्या भविष्यकाळात सहकारी बँकांना लागू होणार आहेत. त्या दृष्टीने भागभांडवलात वाढ होण्याची नितांत गरज आहे. हे करण्यासाठी प्रत्येक शेअरची किमान रक्कम वाढविता येईल का तसेच Nominal Membgers ची रक्कम वाढवून त्याचा भागभांडवलावर अपेक्षित परिणाम होऊ शकेल का किंवा Linking Shares व इतर उपायांनी भागभांडवल वाढविता येईल का याचा विचार करावा लागेला. तसेच Risk Management संकल्पनाही अंमलात आणावी लागेल. यात अर्थतच Credit Risk शिवाय. Investment Risk, Liquidity Risk याचाही अभ्यास करुन अंमलबजावणी करणे गजरेचे आहे.[१०४].

बँक प्रशासन चालवितांना सभासद, ग्राहक, कर्मचारी व शासकीयच यंत्रणा या सर्वाचा समन्वय साधने आवश्यक असते गेल्या ५ वर्षापसून रिझर्व्ह बँकेच्या अनेक चांगल्या वाईट नियमांचा फटका अनेक छोटया मोठया बँकांना बसलेला आहे. यातून मार्ग काढण्याचा किंवा या परिस्थितीशी जुळतून घेण्याची प्रयत्न सर्वच बँका करीत आहेत. 'या सर्व बँक संचालकांचा आपण अभ्यास केल्यास असे लक्षात येते की, बँक संचालक हे शहरातील नामांकित डॉक्टर्स, इंजिनिअर्स, बिल्डर्स, उद्योगपती, ॲडव्होकेट

[१०४] क्षिरसागर व हवालदार, सहकारी चळवळीवरील अहवाल, २००५.

व्यापारी, आर्किटेक्ट, चार्टर्ड अकौऊटंट आहेत या अफवांमळे त्यांची प्रतिष्ठा पणाला लागली आहे. अशा अफवांमुळे बँकेचा आर्थिक समतोल बिघडून उत्कृष्ट चालणाऱ्या बँका सुध्दा अडचणीत येऊ शकतात[१०५]. एक ठेवीदार जेव्हा बँकेत १०० रुपये ठेवतो तेव्हा त्यातील २७ रुपये शासकीय नियमानुसार गुंतवणूक करावे लागतात. ३ रुपये बँकेला लिक्विडीटी म्हणून रोख ठेवावे लागतात. तर ७० रुपये कर्जरुपाने वाटता येतात यातील कर्जाची मुदत १ वर्ष ते १५ वर्ष असते. शासनाकडील गुंतवणूकही किमान १ वर्षासाठी असते. अशा परिस्थितीत ठेवीदार अचानकपणे पैसे मागायला आला तर जो पर्यंत शक्य आहे तो पर्यंतच बँक पसे देऊ शकते. त्यानंतर मात्र बँक अकारण अडचणीत येऊ शकते. अर्थातच संचालकांच्याही काहो चुका निश्चितच आहेत. त्या नाकारणेही योग्य होणार नाही. काही चुकीचे कर्ज दिलेही असतील त्याची वसुली होणे ही आवश्यक आहे. पद्मश्री विखे पाटील, शरद पवार अशा अनेक मातब्बरानी ही चळवळ समृध्द करण्याचा ध्यास घेतला. या सहकार दिंडीतील वारकऱ्यांनी सहकाराची गांगोत्रीही सामान्य घटकांपर्यंत पोहचविण्यसाठी, सर्वांच्या सहकार्यातून आणि परस्परांच्या विश्वासातून सहकारी संस्था मोठया प्रमाणावर निर्माण केल्या.

सन १९९४ नंतर वेगाने स्थापन झालेल्या सर्वच नवीन नागरी सहकारी बँकांना आज मोठया प्रमाणाावर संकटांना तोंड द्यावा लागत आहे. सन १९९४ च्या मराठे समितीच्या अहवालानंतर रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने मुक्त धोरण स्वीकारुन कमीत कमी अटी व शर्तींच्या अधीन राहून भारतभर अनेक सहकारी संस्थांना बँकिंग व्यवसाय करण्यासाठी परवाने (लायसन्स) दिले गेले. यामुळे बँकिंग क्षेत्रात स्पर्धा वाढत गेली. या स्पर्धेत आपले स्थान टिकविण्यासाठी सर्वच नागरी सहकारी बँकांनी स्पर्धेला तोंड देत असतांना रिझर्व्ह बँकेने मात्र नागरी बँकाबाबत अत्यंत कडक धोरण स्वीकारत आहे.

''मुक्त आर्थिक धोरणामुळे खाजगी व व्यापरी बँका मोठया प्रमाणावर सुरु झाल्या आहेत. या बँकांच्या स्पर्धा नागरी सहकारी बंकांना शहरी भागात तरी

[१०५] कित्ता, पृ.क्र. १८.

निष्चितपणे जाणू लागल्या आहेत. खाजगी व विदेशी बँकांनी फक्त शहरी भागाकडे लक्ष केंद्रीत केले आहे. या स्पर्धेत ठामपणे उभे राहण्यासाठी आवश्यक असणारी मानसिकता नागरी सहकारी बँकात निर्माण होणे आवष्य झाली आहे. स्पर्धेत टिकण्यासाठी नागरी सहकारी बँकाना ढिसाळ कारभार करुन चालणार नसून प्रशासकीय खर्चावरही नियंत्रण ठेवावेच लागणार आहे. अशा परिस्थितीत दुहेरी नियंत्रण ठेवावेच लागणार आहे. अशा परिस्थितीत दुहरी नियंत्रणाच्या कात्रीत सापडलेल्या व सर्वसामान्य नागरिकांच्या अडी-अडचणी जाणून त्यांना अर्थसहाय्य करणाऱ्या 'सहकारी बँकाम मात्र केवळ ग्राहकांच्या मनातील विश्वासार्हतेच्या बळावर वाटचाल करावी लागणार आहे. भविष्यात केवळ नफा कमविण्याकरिता भारतात आलेल्या व्यापारी व आतराष्ट्रीय बँकांसमोर सहकारी बँकांचे एक आव्हान उभे करावे लागणार आहे यासाठी सहकारी क्षेत्रात काम करणाऱ्या कार्यकत्यांनी एकत्र येऊन संघटित होणे आवश्यक आहे[१०६].

खाजगी व व्यापारी बँकासारखी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर दैनंदिन कामकाजात करण्यासाठी कार्यक्षम कर्मचारी वर्ग सहकारी बँकांना नियुक्त करावे लागणार आहेत. ग्राहकांना अत्याधुनिक सेवा देण्यासाठी शिपाई पासून ते अधिकाऱ्यांपर्यत प्रशिक्षण द्यावे लागणार असून प्रशिक्षणाचा खर्च सर्वच नागरी सहकारी बँकांना सोसावा लागणार आहे.

बँक व्यवस्थापनात नेमके कोणते बदल केले पाहिजेत? याचे संचालकांना नीटसे आकलन होत नसल्यामुळे प्रत्येक मिटींगचा 'अजेंडाम येतो त्यावरच चर्चा होते. हा अजेंडाही मोठा गंमतशीर असतो. गेल्या अनेक वर्षापासून पारंपारिक रुढीनुसार जे विषय जिहीले जात होते त्याचप्रमाणे आजही तशाच प्रकारे विषयावर चर्चा होते. आर.बो.आय. च्या अनेक नवीन धोरणाचा किंवा नियमांचा उल्लेख त्यात येत नाही. त्यामुळेही अनेक अडचणी निर्माण होतात. बँकेत अनेक वर्ष काम केले असल्यामुळे तेथील कर्मचाऱ्यांची काम करण्याची पध्दत ठरुन गेलेली असते.

[१०६] कित्ता, पृ.क्र. २३.

५.२ भारतातील सहकारी बँकाः

आजच्या जागतिकीकरणाच्या युगात औद्योगिक प्रगतीमुळे विविध क्षेत्रातील व्यापाराला चालना मिळाली. त्याचबरोबर वाढत्या उत्पादन क्षेत्राबरोबर त्या क्षेत्रातील उत्पादक विक्रेत्याकडून ग्राहकाच्या मूलभूत अधिकाराचे हनन होऊ लागले. त्यामुळे सहकाराच्या विशयक अनेक कायदे अस्तीत्वात आले. महाराष्ट्र राज्याचा किंवा संपूर्ण देशाचा विकास पाहिला तर सहकारी चळवळीमुळे झाल्याचे दिसुन येते. अशी वास्तवादी स्थिती वाईट असली तरी महाराष्ट्रात शेतकरी सामान्यासाठी काम करण्यासाठी सहकारी बँका, पतसंस्थेचे विशाल जाळे आजही यशरचनेप्रमाणे कार्यरत आहे दूध उत्पन्न साखर संघ ग्राहक भांडारे आजही यशस्वी कार्यरत आहे.

शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती होय सहकारी चळवळी चालना देण्यासाठी कारणीभूत ठरली. सहकार चळवळ ही गरीब शेतकऱ्यांना सावकारांच्या मगर मिठीतून सोडविण्यासाठी सुरू झाली.शेतकऱ्याना शेती व्यवसायासाठी लागणाऱ्या कर्जाची गरज भागविण्यासाठी खाजगी सावकाराला पर्याय म्हणून भारतात सहकारी सोसायटया स्थापन करण्याची कल्पना जन्मास आली. १८९२ मध्ये सर फडरिक निकोल्सन यांनी युरोपात जावून तेथील सहकारी पतसंस्थाचा अभ्यास केला व त्या धर्तीवर भारतातही ग्रामीण भागात शेतीला कर्ज पुरवठा करण्याची सहकारी संस्था स्थापन करण्याची शिफारस केली. या शिफारशीनुसार भारतात पहिा सहकारी कायदा १९०४ मध्ये अस्तित्वात आला आणि सहकारी संस्था स्थापन करण्याचा विधीवत सुरूवात झाली. शेतकऱ्यांना सावकारांच्या कर्जाच्या जाचातून मुक्त करण्याच्या दिशेने उचलले हे करण्याचा विधीवत सुरवात झाली. शेतकऱ्यांना सावकारांच्या कर्जाच्या जाचातून मुक्त करण्याच्या दिशेने उचलेल पहिले पाऊल होते. अशा रितीनी आजच्या सहकार चळवळीचा जन्म झाला. 'पुढे १९१२ मध्ये १९०४ च्या सहकारी कायद्यात सुधारणा करून नवीन कायदा संमत करण्यात आाला. सहकार चळवळ कृषी वित्तपुरवठयापुरती


मर्यादित न ठेवता कृषी संलग्न इतर व्यवसातही विकसीत करणे हा त्या मागील उद्देश होता[१०७].

सहकार चळवळ ही केवळ कर्जपुरवठा करणारी व्यवस्था नाही,तर सामाजिक न्यायावर आधारलेली व शोशण मुक्त समाज निर्मितीचे उद्दिष्ट असलेली जीवन प्रणाली आहे. आज ती केवळ पतपुरवठयाची चळवळ न राहता तिने ग्रामीण अर्थवस्थेची सर्व अंगे व्यापली आहेत. भारतातील सहकार चळवळ ग्रामीण भागातील शेतकरी आणि ढुबल शेतकरी घटकांच्या कल्याणासाठी वरदान ठरली. आज देशात सहकारी तत्वांवर सहकारी साखर कारखाने सुतगिरण्या, फळप्रक्रिया संस्था, ढूध संस्था खरेढी विक्री संघ वाहतूक संस्था अशा विविध संस्थांची स्थापना होवून ग्रामीण भागाच्या आर्थिक कायापालट झाल्याने भारतीय अर्थव्यवस्था मजबूत करण्यामध्ये सहकार चळवळीची भूमिका महत्वपूर्ण मानली जाते. एका विशिष्ट भौगोलिक क्षेत्रातील प्राथमिक सहकारी संस्था या एका मध्यवर्ती संस्थेत संयुक्तपणे संघटीत झालेल्या असतात. अशा मध्यवर्ती संस्थेस जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक म्हटले जाते. 'सन १९१४ पासून जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या स्थापनेस गती मिळाली. आपल्या सहकारी बँकिंग रचनेत जिल्हा सहकारी बँकेचे विशेष स्थान आहे. आपापल्या क्षेत्रातील पतव्यवस्थापनाची व विकासाची समतोल राखणारी ती केंद्रे आहेत यापुढील काळात या बँकाकडे राजकीय सत्ताकेंद्र म्हणून न पाहता निव्वळ व्यवसायिक अंगाने सर्वाचे, ठेवीदारांचे कर्जदार, व्यक्ती व संस्थेचे हार्दिक स्वागत करणाऱ्या संस्था झाल्यातरच वाढत्या स्पर्धेत त्यांचा टिकाव लागेल[१०८].

[107] Mishra and Puri, *Indian Economy*, Himalaya publication Delhi, (2013)
[108] Mishra and Puri, *Indian Economy*, Himalaya publication Delhi, p.p. 227, (2013)

भारतातील सहकारी बँक प्रणालीची रचनाः–

सध्या भारतात सहकारी पतपुरवठा संस्थाची रचना पुढीलप्रमाणे दिसून येते.



जिल्हा सहकारी बँकेच्या संचालक मंडळाची रचना अशा प्रकारे करण्यात आली आहे की जिल्हयात सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांना तिच्यात स्थान मिळेल काळाच्या ओघात यात संचालक मंडळात आर्थिक व सामाजिक दृष्टया मागासलेल्या महिला व सेवा यांचे प्रतिनीधी यासाठी राखीव जागा निर्माण करण्यात आल्या मात्र संचालक मंडळावर शेती पूरवठा संस्थेच्या प्रतिनीधींना अधिक जागा देण्यात आल्या. परिणामतः बँकेचे कर्ज धोरण हे शेती व शेती पूरक व्यवसाय व शेती मालावर प्रक्रिया करणारे सहकारी उद्योग यांना अधिक पूरक राहिले आहेत.

राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँका नाबार्ड, राज्य सहकारी बँक व राज्य सहकार, सहकार खाते यांच्या नियंत्रणाखाली या बँकेचे कामकाज चालते. कर्जधोरण ठरविण्यात यांचा वाटा महत्वाचा नाबार्ड या बँकांना पिककर्जासाठी सवलतीच्या दराने

वित्त पुरवठा करते. याशिवाय मोठया प्रकल्पांना भांडवली कर्जपूरवठा करता यावा म्हणून सवलतीच्या व्याज दराने मध्यम मुदती कर्जही नाबार्ड कडून उपलब्ध आहे. कर्ज मंजूरीचा अधिकार संचालक मंडळाच्या सोईसाठी उपसमित्या नेमल्या जातात. गेल्या काही वर्षात बहूतांशी जिल्हा बँकांनी आपला शाखाविस्तार वाढविला आहे.

महाराष्ट्रातील सहकार चळवळ देशात आघाडीवर आहे. ग्रामीण भागाच्या आर्थिक परिवर्तनात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी महत्वाची भूमिका बजावली आहे. म्हणून या बँकांचा अधिक विकास होण्यासाठी व स्पर्धात्मकता टिकवण्यासाठी बँकांनी व्यावसायिक दृष्टकोन समोर ठेवून कार्य करणे अपेक्षीत आहे. ''शेती पतपूरवठा कर्जाचे वितरण गावपातळीवरील सोसायटी मार्फत चालते मध्यम मूदत कर्जही या संस्थांमार्फत वाटली जातात. अन्य प्रकारची कर्जे त्या त्या संस्थांना मंजुर करून वाटली जातात. कर्जमंजुरी व वितरण संचालकाचा मोठा प्रभाव असतो. ग्रामीण भागातील लोकांचा या बँका मूलाधार आहेत[109]. गावपातळीवरील स्थापन होणाऱ्या सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांना या जिल्हा बँकांचा आधार वाटतो. ज्या जिल्हयात बँका सबळ आहेत त्या जिल्हयात कृषी औद्योगिक व्यवसायाची उभारणी अधिक भक्कम पायावर झाली व त्याद्धारे ग्रामीण भागात कायापालट झाला. व त्या त्या जिल्हयातील सहकारी नेतृत्वाचा गाव पातळीवरील सहकारी संस्था संचालक अथवा अध्यक्ष म्हणून काम करणाऱ्यांपैकी अनेकांनी आपल्या नेतृत्वगुणाच्या मदतीने राज्यात व केद्रात प्रमुख पद मिळविण्यापर्यंत प्रगती केली आहे. ही बाब सहकारी चळवळीच्या दृष्टीनेही भूषणावह आहे.

विविध सेवा व्यवहार व विस्तार करून गाहक संतोश वाढता राखूनच त्यांना भांडवल, निधी व ठेवी वाढवून त्यांनी अधिकाधिक स्वावलंबो व्यवसाय हवे. त्यामुळे त्यांना वाढीव दुरावा मिळून लाभ मिळवता येईल. नाबार्डच्या सवलतींच्या कर्जाचा उपयोग विविध व्यवहारांनी विस्तृत व्यावसायिक साधून करावयास हवा. त्यामुळे संभाव्य हानी व तोटयापासून संरक्षण करता येईल. मुख्य म्हणजे आपले कर्जव्यवहार

[109] Mishra and Puri, *Indian Economy*, Himalaya publication Delhi, p.p. 228, (2013)

एकांगी केवळ पीककर्ज आणि कुटिर उदयोगातील सहकारी संस्थांनाही जिल्हा सहकारी बँकानी सबळ करावयास हवे. या क्षेत्रात त्यांना स्पर्धेची भीती कमी आहे. ठेवी व कर्जव्यवहार वाढविता येईल. मार्केटिंग व ग्राहक भांडारे यांच्याशी त्यांचे व्यवहार वाढवयास भरपूर वाव आहे. त्यामुळे ठेवी व उत्पन्न वाढेल जिल्हा सहकारी बँकांनी ठेवीदारांना कर्जदार व्यक्ती व सहकारी संस्थांना विविध सेवा पुरविणाऱ्या पाहिजेत. शाखा विस्तार केला पाहिजे. ग्राहक संस्थांना तांत्रिक मार्गदर्शन पूरविण्याची व्यवस्था करावयास हवी. तरच त्याचे व्यवहार आणि उत्पन्नही वाढेल. व्यवहार कार्यक्षम करता येतील यासाठी जिल्हा बँकांनी राजकीय हस्तक्षेपणापासून दुर राहीले पाहिजे.

सहकारी चळवळी या पाठीचा कणा असलेल्या जिल्हा बँक अधिक बळकट झाल्या पाहिजेत. त्यासाठी त्यांच्या नेतृत्वाने व्यावसायिक निकषांची कास धरली पाहिजे बँकांमध्ये आधुनिक व्यवस्थापन, संगणकाचा व बँकिंग व्यावसायातील नवीन तंत्रज्ञानाचा वापर केला पाहिजे व त्यासाठी तज्ञ व प्रशिक्षित अधिकारी व सेवक वर्ग निपयुक्त केला पाहिजे.

तक्ता क्र. ५.१

बँकाचा विकास दर्शवणारा तक्ता

तपशील	**मार्च १९८१**	**मार्च २०११ (रु. कोटीत)**
संस्था संख्या	९५२	१५५७५
सभासद (हाजारात)	३१६	१५,०००
ठेवी (रु कोटीत)	६	२१११२
कर्ज वाटप (रु कोटीत)	१०	१६४३४
थकित कर्ज (रु कोटीत)	०.१	१८३२

(स्त्रात : सांबरे अ. नचिकेत प्रकाशन, पृष्ठ क्र.९)

तक्ता क्र ५.१ मध्ये भारत देशातील नागरी आणि ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्थांची आकडेवारी दिलेली आहे. १९८१ मध्ये संस्थांची संख्या फक्त ९५२ होती.

तर २०११ मध्ये वाढ झालेली दिसून येते तर थकित कर्ज १ कोटीवरुन १८३२ कोटीपर्यंत वाढले.

तक्ता क्र ५.२

सहकारी बँकांची संख्या दर्शवणारा तक्ता (आकडे रु. कोटीत)

	भारत	**महाराष्ट्र**	**प्रमाण**
न. बँका	१६४५	५१७	३३ टक्के
भाग भांडवल	६२६७	२७००	४३ टक्के
स्वनिधी	३६२६०	१२२००	४६ टक्के
ठेवी	२१२०३१	१३८१२४	६५ टक्के
कर्जे	१३६३४१	९०२६०	६ टक्के

(स्त्रोत : सांबरे अ. नचिकेत प्रकाशन, पृष्ठ क्र.१०)


तक्ता क्र ५.२ मध्ये नागरी सहकारी बँकाची संख्या भारतामध्ये १६४५ तर महाराष्ट्रात ५१७ एवढी आहे. नागरी सहाकरी बँकामधील भारतामधील स्वनिधी ३६२६० कोटी एवढा आहे तर महाराष्ट्रातील १२२०० कोटी आहे. भारतामधील नागरी सहकारी बंकामधील ठेवी रु २१२०३१ कोटी आहे तर महाराष्ट्रातील ठेवी १३८१२४ कोटी आहे. नगरी सहकारी बँकामधील कर्जे १३६३४१ कोटी आहे तर महाराष्ट्रामधील ९०२६० कोटी आहे.

तक्ता क्र. ५.३

सहकारी बँकेचा वर्गीकरण दर्शवणारा तक्ता

अ.क्र.	वर्गीकरण	२००७	२००८	२००९	२०१०	२०११
१	ग्रेड १	१२९	२००	२५५	२७४	३०१
२	ग्रेड २	२५४	१९०	१३९	१२८	१०५
३	ग्रेड ३	११४	९९	१०१	८७	७८
४	ग्रेड ४	११९	११४	८२	६४	५५

(स्त्रोत :- सांबरे अ. नचिकेत प्रकाशन पृष्ठ ११)



तक्ता क्र. ५.३ मध्ये सहाकरी बँकाचे वर्गीकरण केलेले आहे. वर्गीकरण २००७ ते २०११ पर्यंत नागरी सहकारी बँकेचे विस्तारीकरण कसे झाले याचा विचार विनिमय

केला आहे. ग्रेड ४ किंवा चतुर्थ श्रेणीतीत सहकारी बँकाची संख्या तुलनेत वाढताना दिसत आहे.

तक्ता क्र. ७.४

भारतातील प्राथमिक सहकारी संस्था दर्शवणारा तक्ता

अ.क्र.	तपशील	वर्ष		
		२००१	२००४	२०११
१	संस्था (हजार)	९८.२	१०८	९३
२	सभासद संख्या (मिलीयन)	१०२	१२७	१२१
३	कर्जदारांची संख्या(मिलीयन)	७७.७	४७	७२
४	खेळते भांडवल (बिलीयन)	४४	७६	७७
७	कर्ज (बिलीयन)	२९७	४०२	७४०
६	थकबाँकी (बिलीयन)	११०६	१६०७	१८७८
७	सहकारी वाटा (बिलीयन)		६	

(स्त्रात :- वैदयनाथन समिती अहवाल)

तक्ता क्र ७.४ मध्ये प्राथामिक सहकारी बँकाचा विकास दर्शविलेला आहे. भारतातील सहकारी पतसंस्थाच्या शाखा २००१ मध्ये ९८२०० एवढया होत्या तर २००४ मध्ये १०८०० पर्यांत वाढत्या तर २०११ मध्ये त्या पुन्हा ९३००० पर्यांत कमी झाल्या हे प्रमाण राजकाणामळे घटल्याचे आढळून येते, सभासद संख्या सुध्दा कमी होताना दिसत आहे. २००१ मध्ये १०२ मिलीयन २००४ मध्ये १२७ मिलीयन आणि २०११ मध्ये १२१ मिलीयन सभासद संख्या सहकारी बँकाची होती. कर्जाच्या रकमेची आणि भांडवलाचे प्रमाण वाढत आहे. परंतु त्याच बरोबर एकूण थकबोकाच प्रमाण प्रचंड प्रमाणात वाढत आहे.

भारतातील अर्थव्यवस्थेत कृषो क्षेत्राची प्रगती अनेक घटंकावर अवलंबून आहे. या अनेक घटकांपैकी कृषी क्षेत्राला केला जाणारा कर्जपुरवठा हा एक महत्त्वाचा घटक आहे. कृषी क्षेत्राला केला जाणारा कर्जपुरवठा हा अनेक मार्गात केला जातो या

कर्जपुरवठयाचे दोन मुख्य घटक आहेत. एक संस्थात्मक आणि असंस्थात्मक मार्ग फार पुर्वीपासून ग्रामीण भागात अवजारे, जमीनदार, महाजन अशा पारंपारिक घटकाद्धारे शेतीला कर्जपुरवठा केला जात आहे. संस्थात्मक मार्गात केल्या जाणाऱ्या कृषी कर्जपुरठयाचे प्रामुख्याने व्यापारी बँका, सहकारी बँका व विभागीय ग्रामीण बँकांचा समावेश होतो. गावपातळीवर काम करणाऱ्या प्राथमिक कृषी पतसंस्थाची संख्या सुमारे एक लाखावर म्हणजेच प्रचंड आहे. यांच्या जोडील ३६८ जिल्हा मध्यमर्ती सहकारी बँका त्याच्या १२८७८ शाखासोबँत कार्यरत आहेत. तसेच राज्यपातळीवर ३० राज्य सहकारी बँका त्यांच्या ९७३ शांखा बरोबरच अल्प आणि मध्यम काळासाठी शेतीला कर्जपुरवठा करण्याचे कार्य करीत आहेत. शेतीक्षेत्राला दीर्घकालीन कर्जपुरवठा करण्याचे काम १९ राज्य सहकारी कृषी व ग्रामीण विकास बँक त्यांच्या ७८८ शाखसोबत करीत आहेत. कृषी क्षेत्राला कर्जपूरवठा १९९१ ते २०१० २११ २० वर्षच्या काळाचा विचार केल्यास शेतीला करण्यात आलेला कर्जपुरवठा कशाप्रकारे वाढत गेला व कृषी क्षेत्राचा कर्जपुरवठा वीस वर्षाच्या कालावधीत ११९९९ कोटी रुपयावरुन ३६६९२९ कोटी रुपयांपर्यंत वाढ झाली असून ती ३० पटींपेक्षा अधिक आहे. याच काळात व्यापारी बँकांकडून करण्यात आलेला कर्जपुरवठा चार हजार, आठशे सहा कोटी रुपयांपसून दोन लाख, चौऱ्याहत्तर हजार, नऊशे त्रेसष्ठ कोटी रुपयापर्यंत वाढला. ही झालेली वाढ पंच्चावन पटीपेक्षा जास्त आहे. याचाय अर्थ व्यापारी बँकांचा वाटा या काळात ४३ टक्क्यांवरुन ७५ टक्क्यापर्यंत वाढला.

'विभागीय ग्रामीण बँका (आरआरबोएस) नी १९९१-१९९२ मध्ये फक्त पाचशे शहान्नव कोटी रुपये चा कृषी क्षेत्राला कर्जपुरवठा या बँकांच्या कर्जपुरठयाचे प्रमाण केवळ ५ टक्के वरुन ९ टक्के पर्यंतच वाढलेम[११०]. सहकारी क्षेत्राकडून कृषोक्षेत्राला करण्यात आलेला कर्जपुरवठा १९९१-१९९२ ते २००९-२०१० या काळात ५,७९७ कोटी रुपये पासून ५७,५०० कोटी रुपये पर्यत म्हणजेच जवळपास १० पटीने वाढला. परंतु या क्षेत्राला करण्यात आलेल्या एकूण कर्जपुरवठयामध्ये असणारा सहाकरी क्षेत्राचा

[११०] स्त्रोतः- वैदयनाथन समिती अहवाल.


वाटा झपाटयाने ५२ टक्के वरुन १६ टक्के इतका कमी झाला आहे. गेल्या काही वर्षापासून सरकार कृषी क्षेत्राला वाढत्या प्रमाणावर कर्जपुरवठा करण्यासाठी प्रयत्नशील आहे. यासाठी सार्वजनिक क्षेत्रातील बँकांची मदत घेतली जात आहे. हे काम अधिक प्रमाणात यशस्वी होण्यासाठी सहकारी बंकांनी देखील जोमाने प्रयत्न करण्याची आवष्यकता आहे. बदलत्या आर्थिक पर्यावरणानुसार सहकारी बँकांनी सुध्दा आपल्या कार्यपध्दतीमध्ये बदल करण्याची गरज आहे. बँक व्यवसायाची मुलभूत तत्त्वे आणि व्यावसायिक दृष्टीकोण स्वीकारल्यास लहान आणि मध्यम शेतकऱ्यांना या बँका आपली सेवा देऊ शकतील. एकूण कृषी कर्जपुरठयामध्ये सहकारी बँकांचा वाटा कमी दिसत असला तरी खातेदाराची संख्या व्यापारी बँकाइतकीच आहे असे खालील तत्का क्रमांक ५.६ वरुन स्पष्ट होते

तक्ता क्र ५.६
शेतकरी खातेदारांची संख्या दर्शवणारा तक्ता

वर्ष	**२००६-०७**		**२००९-१०**	
बँका	**खातेदार**	**प्रमाण % मध्ये**	**खातेदार**	**प्रमाण % मध्ये**
व्यापारी बँका	१७२	४०	२०५.३०	४३
सहकारी बंका	१८९	४६	२०३.९२	४२
आ.आर.बो.एस.	६२	१४	७६.०८	१५
एकूण	**४२३**	**१००**	**४८२.३०**	**१००**

(स्त्रोतः- वैदयनाथन समिती

अहवाल)



तक्ता क्रमांक ७.६ मधील आकडेवारी वरुन असे स्पष्ट दिसते की, २००६-०७ मध्ये सहकारी बँकांकडील शेतकरी खातेदारांचे प्रमाण ४६ टक्के होते हे प्रमाण व्यापारी बँकांपेक्षा ४० टक्के जास्त होते. असे असले तरी व्यापारी बँकानी कषी क्षेत्राला केलेला कर्जपुरवठा १,६६,४८७ काटी रुपये याच वर्षामध्ये सहकारी बँकानी केलेला कर्जपुरवठा ४२,४८० कोटी रुपये होता. अर्थात व्यापारी बँकाकडून झालेल्या कर्जपुरवठयापेक्षा खूपच जास्त होता. म्हणजेच सहकारी बँका छोटया व मध्यम शेतकऱ्यांना पत प्राप्त करुन देण्याचे काम या बँका करत आहेत.

७.३ महाराष्ट्रातील सहकारी बँका :-

महाराष्ट्रात सहकारी चळवळीने सहकार क्षेत्रात भरीव कार्य केलेले आहे. १०७ वर्षांपासून शेतकऱ्यांना आधार आणि विश्वास देण्याचे कार्य सहकारी चळवळीने केलेले आहे. त्यामुळेच आज या जागतिकीकरणाच्या स्पर्धात्मक युगातही शेतकऱ्यांची पहिली पसंती सहकारी बँक हीच आहे.

तक्ता क्र. ७.७

भारतातील जिल्हा सहकारी बँकांची आकडेवारी दर्शवणारा तक्ता (२००७)

अ.क्र.	विवरण	आकडे (रुपये लाखात)
१	बँकांची संख्या	३७१
२	शाखांची संख्या	१२,९२८
३	स्व निधी	१५,५०,५१२
४	ठेवी	१२,०८,१३६
५	देय कर्ज	२७,९४,०६०
६	कार्यरत भांडवल	१४,६०,३६३
७	कर्ज वाटप	७३,७०,३८१
८	कर्ज येणे	६४,९४,३३७
९	कर्ज वसूली	४३,५५,७५५
१०	कर्ज थकीत	२१,३८,५८२
११	थकीत कर्जाचे प्रमाण	३३%

जागतिकीकरणांच्या बढलाचे सर्वच घटकांवर बरे वाईट परिणाम झाालेले दिसून येतात. सहकारी व्यवस्थेवरही याचा प्रभाव पडलेला आहे. त्या सोबतच सहकारी बँकांचे काही प्रश्न व समस्या निर्माण झालेल्या आहेत. जिल्हा बँकांची काही आकडेवारी पुढील प्रमाणे.

तक्ता क्र ५.८

महाराष्ट्रातील जिल्हा सहकारी बंकांची आर्थिक स्थिती दर्शवणारा तक्ता (२००९)

अ.क्र.	तपशील	आकडे (रुपये लाखात)
१	बँका	३१
२	शाखा	३,६८७
३	भाग भांडवल	१,३६,२०९
४	स्वनिधी	७,१८,९१८
५	ठेवी	३८,०६,२०८
६	देय कर्ज	२,९०,२४२
७	खेळते भांडवल	५१,४०,२५०
८	थकबाकी	७,३२,७५६
९	नफ्यातील बँका	१८
१०	नफा	१५,२१६
११	तोट्यातील बँका	१३
१२	तोटा	१,४९,१८६
१३	थकबाकीचे प्रमाण	३२ टक्के

सहकारी बँका व इतर बँका यांच्या कार्यपध्दतीत फरक करता येत नसला तरी जिल्हा सहकारी बँकेच्या काही ठळक बाबो इतर बँकापेक्षा वेगळया आहेत. सहकारी बँकांचा ग्राहक वर्ग पूर्णतः ग्रामीण आणि शेतकरी आहे. तो अशिक्षित आहे. त्याची आर्थिक स्थिती पूर्णतः शेतीच्या उत्पन्नावर विसंबून आहे आणि शेती निसर्गावर अवलंबून असल्याने शेतकऱ्याच्या उत्पन्नात निश्चितता नसते. त्याचा परिणाम हा कर्ज वसुलीवर होतो. जिल्हा बँकेची थकबाकी ही फार मोठी समस्या आहे. महाराष्ट्रात

या बँकांचे थकबाकीचे प्रमाण ३२ टक्के आहे. सन २००१ साली थकबाकीचे प्रमाण केवळ १४ टक्के होते. आता हे पमाण दुपटी पेक्षाही अधिक वाढलेले आहे.

जिल्हा सहकारी बँकांचा वाढता तोटा ही सुध्दा मोठी समस्या आहे. सन २००१ मध्ये महाराष्ट्रातील ८ जिल्हा बँका तोटयात होत्या. आज ही संख्या १३ वर पोहचली आहे. तर तोटा १३०.९७ काटी रुपयांवरुन १,४९१.८६ कोटी रुपयांपर्यत पोहचला आहे. बँकांमधील मुक्त स्पर्धा, व्यवस्थापन आणि प्रशासनामधील समन्वय असे अनेक प्रश्न आणि समस्या जिल्हा सहकारी बँकासमोर आहेत. या संदर्भात पुढील काही सूचना विचारात घेता येतील.

जिल्हा सहकारी बँकांचे स्वतंत्र अस्तीत्व आहे. त्यांची एक वेगळी ओळख आहे. या बँका ग्रामीणांच्या व शेतकऱ्यांचा विश्वास आणि श्रध्दा आहे. त्यांना सहकारी बँका जवळची आहे. बदलत्या आणि गतीमान अर्थव्यवस्थेतील या स्पर्धेत सहकारी बँका टिकून राहणे आवश्यक आहे. त्यासाठी जिल्हा सहकारी बँकांनी त्यांच्या पुढील समस्या व आव्हानांना सामोरे जाऊन आपल्या कार्यपध्दतीत व व्यवस्थापनात कालसंगत बँदल करणे आवष्यक आहे. सहकारी बँकांनी या बदलाची नोंद घेतली तरच स्पर्धेत टिकाव लागेल.

महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेतील घोटाळयांची चर्चा गेल्या काही महिन्यांपासून सुरु आहे. या बँकेत १०८६ केाटी रुपयंचा गैरव्यवहार झाल्याचा आरोप आहे. या गैरव्यवहारस बँकेचे संचालक मंडळ जबाबदार असून कायद्याची पायमल्ली करुन कर्जवाटप करण्यासह इतरही अनेक आरोप आहेत. याखेरीज साखर कारखाने विक्रीमध्ये झालेला तोटा, परदेश दौरे आदी अनेक तक्रारी केल्या गेल्या अहेत. यातून झाालेल्या आर्थिक नुकसानीपकरणी २०१३ च्या जानेवारी महिन्यामध्ये सहकारी संस्था नियमातील कलम ८३ अन्वये चौकशीचे आदेश देण्यात आहे. ही चौकशीची प्रक्रिया पूर्ण होऊन आता संबँधित संचालकांवर जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. यामध्ये प्रामुख्याने राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांचा समावेश आहे. मागील काळात हा पक्ष सतेत असल्यामुळे हे घोटाळा प्रकरण दाबले गेल्याची चर्चा होती. मुळात महाराष्ट्र

राज्य सहकारी बँक ही राज्यातील सहकारी कर्जपुरवठा यंत्रणेतील शिखर बँक आहे. १९११ मध्ये स्थापना झाल्यानंतर या बँकेचे कार्यक्षेत्र मुंबई पुरते होते. १९५६ च्या राज्यपुनर्रचने नंतर विदर्भ सहकारी बँक त्यामध्ये विलीन करण्यात आली आणि पुढे या बँकेचे कार्यक्षेत्र संपूर्ण राज्यभर विस्तारले. रिझर्व्ह बँक, नाबार्ड आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका यांच्यामधील दुवा म्हणून काम करणे असे या बँकेचे मुख्य कार्य आहे. या बँकेमार्फत दिल्या जाणाऱ्या कर्जाला बॅरेचदा राज्य सरकारची थकहमी असते. भूविकास बँकेसह अन्य बँकांनाही राज्य सहकारी बँकेने कर्ज दिले आहे. तथापि मध्यंतरीच भूविकास बँक बुडाली आहे. त्याचबरोबर पाटबँधारेसह अन्य कर्जानाही राज्य सहकारने थकहमी दिली हेाती. तसेच सहकारी साखर कारखाने आणि सूतगिरण्या, कृषी पुरक प्रकल्प यांनाही या बँकेने थकहमी दिली होती. या संस्थांनी कर्जाची परतफड केली नाही. बऱ्याच संस्था थकबाँकीत गेल्या, दिवाळखोरीत निघाल्या. राज्य सरकारही थकबाकीची हमीची रक्कम देऊ शकलं नाही. त्याचा परिणाम राज्य सहकारी बँकचे कर्ज थकत गेले. यासंदर्भात कॅगनेही राज्य सहाकारी बँकेच्या करभारावर तोशेरे ओढले होते. कॅगच्या आहवालात नोंदवण्यात आलेल्या निरीक्षणानुसर, या बँकेने चुकीच्या पध्दतीने कर्जवाटप केले. तसेच त्याच्या वसुलीसाठी पुरेशी काळजी घेतील नाही. जोशी नय्यर असोसिएटसने दिलेल्या लेखापरीक्षण अहवालातही राज्य सहकारी बँकेला ड वर्ग दिला होता. याचाच अर्थ ही बँक काठावर पास झाली होती. आघाडी सरकारच्या काळात या बँकेवर राष्ट्रवादी कँाग्रेसचे वर्चस्व असल्याने त्यांना शह देण्यासाठी तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी अशा बँकांवर प्रशासक मंडळ नेमले आहे. यामुळे या बँकेतील गैरकारभारांच्या आरोपांना अधिक पुष्टी मिळाली. त्यावेळी या बँकेतील भ्रष्टाचाराची चर्चा अधिक जोर धरु लागली. आता चौकशी समितीने संचालकांना जबाबदार धरण्याचा निर्णय घेतल्यामुळे या प्रकरणाशी संबधित संचालक मंडळी चागलीच अडचणीत आली आहेत.

''मुळात सहकार आणि भ्रष्टचार यांचे नाते फारसे जवळचे आहे. राजकीय हस्तक्षेप करुन आणि राजकीय ताकद, प्रभाव वापरुन सहकार आपल्याला हवा तसा वळवायचा ही प्रथा आपल्याला हवा तसा वळवायचा ही प्रथा आपल्याकडे फार जुनी आहे. मागील काळात असलेल काँग्रेस-राष्ट्रवादीने सहकाराच्या माध्यमातून महाराष्ट्रात विशेशः पश्चिम महाराष्ट्रात आपली राजकीय ताकद निर्माण केली. यासाठी सहकारी साखर कारखाने, बँका, दूध संघ यांचा मनाजोगा वापर केला. आज हे दोन्हीही पक्ष सत्तेत नाहीत, पण या पक्षाच्या सहकारातील ताकद आजहो कायम आहे. ही ताकद कमी केल्याखेरीज भाजप-शिवसेनेला पश्चिम महाराष्ट्रामध्ये चांगले बॅस्तान बँसवता येणार नाही. त्यामुळे राज्य सहकारी बँकेसह इतर सहकारी संस्थांच्या घोटाळयांची चौकशी करणे, भ्रष्टाचार उघडकीस आणणे, त्यातील संबधितांवर फौजदारी कारवाई करणे ही या सरकारची राजकीय गरज आहे. आजच्या परिस्थितीमध्ये ती अपरिहार्यताही बनलेली आहेत[१११]. ती सुधारायची असेल, तर भ्रष्टाचाऱ्यांना शासन करण्याशिवाय गत्यंतर नाही. त्यामुळे एकीकडे अर्थव्यवस्थेची गरज आणि दुसरीकडे राजकीय गरज अशा दोन्ही गोष्टी त्यामध्ये एकत्र आलेलया आहेत आणि या दोन्हीही दृष्टिकोनातून याकडे पाहिले पाहिजे. या दोन्ही गरजांमधूनच या सरकारने सहकारी बँका, साखर कारखाने, दूध संघ याकडे आपली वक्रदृष्टी वळवलेली आहे. असे म्हणता येईल.

दुसरा एक मुद्दा या ठिकाणी लक्षात घ्यायला हवा, तो म्हणजे फसवणूक करणे हा गुन्हा आहे आणि गुन्हेगारांना शिक्षा ही झालीच पाहिजे, पण फसवणूक केल्यामुळे ज्यांचे नुकसान झाले आहे त्यांना झाले आहे त्यांना त्याची भरपाई दिली पाहिजे, असा काही नियम नाही. त्यामुळे या सहकारी बँकांमधील गैरव्यवहारांमुळे सर्वसामान्यांचे जे नुकसान झाले असेल ते भरुन काढण्यासाठी व्यक्तिगतरीत्या वसुलीचे खटले दाखल करावे लागतात. एकीकडे सहकारी बँकांमधील राजकीय दबावामुळे वाढलेला भ्रष्टाचार दिसत असतानाच सार्वजनिक बँकांमध्ये एनपीए वाढत चालला आहे. त्याबाँबँतही याच

[१११] कातगो या., सहकारीतील स्वाहाकार, पुढारी वर्तमान पत्र, बहार पुरवणी, २० सप्टेंबर २०१५.

निकशावर आणि याच राजकीय इच्छाशक्तीने कारवाई होणे आवष्यक आहे. त्यांच्यावरही फौजदारी स्वरुपाचे गुन्हे दाखल झाले पाहिजेत.

राज्य बँक घोटाळाप्रकारणी फौजदारी गुन्हे दाखल झाले, तर त्याचे नक्कीच स्वागत आहे. पण आर्थिक फसवणुकीसंदर्भात आपल्याकडे असलेला कायदा हा आधिक भक्कम करण्याची गरज आहे. आज हा कायदा काहीसा कमकुवत आहे. उदाहरणार्थ, एखाद्याने घरफोडी करुन पाचशे-हजारांची चोरी केली, तरी त्याला दोन ते तीन वर्षाची शिक्षा होऊ शकते, पण त्याचवेळी प्रचंड मोठा आर्थिक घोटाळा केला, तर त्या आरोपींना सहा महिने- वर्षाची शिक्षा होताना दिसते. याचे कारण हा आज व्हाईट कॉलर गुन्हेगारी वाढलेली आहे. राजकीङ्ग लोकांना जरब बसण्यासाठी आपल्याला कायदेही बदलावे लागतील, अन्यथा कोटयावधींचे घोटाळे करुनही वर्षभराची शिक्षा भोगून आरोपी मोकाट फिराताना दिसतात. त्यातून न्याय झाला, असे म्हणता येणार नाही. त्यामुळे हे कायद अधिक कठोर आणि कडक करावे लागतील

''राज्य सहकारी बँक आणि एकूणच सहकारी क्षेत्रातील घेटाळयांसंदर्भात सरकारची भूमिकाही महत्त्वाची ठरते. केवळ राजकीय आकसापोटी अथवा विरोधकांना नियंत्रणात ठेवण्यासाठी ही कारवाई होता कामा नये तसे झाले, तर केवळ अशाप्रकारच्या बातम्या समोर येत रहतील आणि त्यावर चर्चा होत राहील, प्रत्यक्ष दोशींना शिक्षा होणारच नाही. मागील काळात असे घडल्याची अनेक उदाहरणे आपल्याकडे नेहमीच चर्चिली जातात. मायावती, मुलायमसिंह, लालूप्रसाद यांच्या सीबोआय चौकशीचे जसे झाले तसे चा प्रकारणाचे होता कामा नये. कोणतेही सरकार सीबॉआय चौकशीच्या भीतीच्या जोरावर मुलायमसिंह, जयललिता यांना आपल्या बारोबर नेऊ इच्छितात किंवा त्यांना पाहिजे तसे वागायला लावतात. मुलायमसिंह हे याचे उत्तम उदाहरण आहे. एकीकडे मोदींना विरोध करायचा आणि दुसरीकडे भाजपला अनुकूल ठरेल, अशी भूमिका घ्यायची, असा त्यांचा पवित्रा असतो. हा योगायोग म्हणता येत नाही. तसा प्रकार सहकार क्षेत्रातील घोटाळयांच्या चौकशीबाबत होता कामा नये, असे वाटते, अन्यथा चौकशांच्या बातम्या ऐकून धन्यता मानण्याखेरीज

जनतेला काहीच मिळणार नाही त्यामूळे खरी राजकीय इच्छा शक्ती दाखवून ही प्रकरणे तडीस नेली पाहिजेत. हे एक सरकारपुढे आव्हानच आहे[११२].

हे करत असतानाच सहकार जगला पाहिजे हेही विसरता कामा नये. आज जागतिकीकरणाच्या रेटयामुळे सहकारापुढे आव्हान उभे राहिले आहे. सहकार बुडवणे ही आधुनिक भांडवलशाहीची गरज आहे. कारण, आधुनिक भांडवलशाहीला स्पर्धक नको असतात. सहकार हा त्यांना फार मोठा स्पर्धक वाटत असतो. त्यामुळे ही भांडवलशही व्यवस्था एकीकडे सहकाराला आपल्या ताटाखाली घेण्याचा प्रयत्न करत असते. सहकार म्हणजे एकमेकांना सहाय्या करुन पुढे जायचे असते. तिथे नफा हा गाभा नसतो, तर एकमेकांना मदत करणे हे मूळ तत्त्व असते. नफखेर भांडवलदारीला ते मान्य नसते. त्यांच्या दृष्टीने केवळ नफा हाच महत्वाचा असतो. तो तुम्ही कसा मिळवता हे दुय्यम महत्वाचे असते. त्यामुळे सहकार कमजोर करणे, सहकार बदनाम करणे हा त्यांचा कायमच प्रयत्न राहिलेला आह. सहकारातील या अपप्रकारांमुळे आणि अपप्रवृत्तींमुळे या आधुनिक भांडवलशाहीला मदतच होत असते. सहकारातील गैरकारभार चव्हाटयावर येऊ लागले की, खसगी बँकांतील भ्रष्टाचाराबाबत कुणी बौलत नाही. आजवर अनेक खासगी बँकांतील भ्रष्टाचाराबाबत कुणी बोलत नाही आजवर अनेक खसगी बँका बुडालेल्या आहेत, पण तेव्हा खसगीकरणाला दोश दिला जात नाही, पण सहकारातील गैरव्यवहार समोर आले की, संपूर्ण सहकार बदनाम केला जातो. म्हणूनच आपण या प्रकरणांबाबत चर्चा करतानाही गल्लत करता कामा नये. आपल्या सामाजिक अर्थव्यवस्थेचा विचार करता सहकार हा आवष्यकच आहे. फक्त त्यामध्ये भ्रष्टाचार होता कामा नये. त्यामुळे भ्रष्टाचारमुक्त सहकार कसा निर्माण करता येईील, यासाठी आपली पावले पडली पहिजेत. त्यासाठी अशा भ्रष्टाचाऱ्यांना कठोर शासन होणे गरजेचे आहे.

महाराष्ट्रातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांची कामगिरी हा विषय नेहमीच चर्चेत राहिला आहे. राज्यातील सावकार पध्दती संपुष्टात यावी. शेतकऱ्यांना कर्जाच्या

[११२] कातगो या., सहकारीतील स्वाहाकार, पुढारी वर्तमान पत्र, बहार पुरवणी, २० सप्टेंबर २०१५.

दुष्ट चक्रातून बाहेर काढावे. त्यांना रास्त दरात वित्तपुरवठयाचा पर्यायाची स्त्रोत उपलब्ध करुन कशी विकासाला चालना मिळावी, या मूलभूत उध्देशाने प्रत्येक जिल्हयात मध्येवर्ती सहकारी बँक स्थापन करण्यात आली आहे. भारतात सहकारी बँक स्थापन करण्यात आली आहे. भारतात सहकारी पतपुरवरठयाची त्रिस्तरीय योजना अस्तित्वात आहे. त्यात जिल्हा मध्यवर्ती बँका या राज्य सहकारी बँक (अपेक्स बँक) आणि ग्रामीण पातळीवरील सहकारी सोसायटया यांच्यातील दुवा म्हणून कार्य करतात. जाचक समजल्या जाणाऱ्या सावकारी प्रथेच्या अंताला जिल्हा सहकारी बँक सेवेची उपलब्धता बरीचशी कारणीभूत ठरली. अवास्तव पध्दतीचे व्याज, कर्जवसुलीची दडपशाही व अन्य गैरव्यवहार टाळून शेतकऱ्यांना सुलभ पध्दतीने कर्ज मिळू लागले. सामान्य शेतकऱ्यांना पतवान बनविण्यासाठी जिल्हा सहकारी बँकांचा कारभार करतान शेतकरी व बँकेच्या हिताला प्राधान्य दिल्याने गेल्या साठ वर्षात बँकांनी प्रगतीची अनेक शिखरे प्रादाक्रांत केली आहेत.

अलीकडे मात्र राज्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांचे क्षेत्र खूपच धूसर झाले असल्याचे दिसून येते. वैद्यनाथन समितीने यावर पुरसा प्रकाश टाकला आहे. राज्यातील दहा जिल्हा मध्येवर्ती सहकारी बँका 'बँकिंग रेग्यूलेशन ॲक्टम[११३] चे पुरेपूर पालन न केल्यामुळे बंधनात अडकल्या आहेत. काही मोजक्या बँका वगळता अन्य जिल्हा बँका आर्थिक अडचणीत आहेत. शेतकऱ्यांच्या ठेवींवर चालणाऱ्या या बँका गैरव्यवस्थापनामुळे संकटात सापडल्या असून ही चिंतेची बाब आहे. काही बँकांची स्थिती अत्यवस्थ रुग्णांसरखी झाली आहे. बऱ्याच बँका दिवाळखोरीच्या उंबँरठयावर आहेत. कर्जवाटप, वासुली, नोकरी भरती यात नियम डावलून कामे झाल्याने बँका डबघाईला आल्या आहेत. अशा आजारी बँका ठेवी परत करु शकत नसल्याने ठेवीदारही संकटात सापडले आहेत. जनतेच्या ठेवी सुरक्षीत राहाव्यात यासाठी रिझर्व्ह बँकेने काही नियम घालून दिले आहेत.

[११३] गुप्ता एस. के, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम सहकारी संस्था व नियम अहवाल रिपोर्ट.

बँकिंग रेग्युलेशन ॲक्टच्या कलम ११ (१)[११४] नुसार बँकेचे नक्त मूल्य एक लाखापेक्षा अधिक नसावे. याचा अर्थ तोटा केवळ स्वभांडवलापर्यंत असावा. त्यापेक्षा अधिक झाल्यास बँक या कलमाचे पालन करीत नाही, असे मानून तिचे अस्तित्व संपुष्टात येते. बँकेने स्थिती सुधारण्याचा प्रस्ताव दिली जाते. त्यानंतरही स्थिती सुधारली नाही, तर पुन्हा तीन वर्षांच्या परवानगीसाठी प्रस्ताव द्यावा लागतो. कोल्हापूर, जालना, नांदेड, परभणी, उस्मानाबाद, धुळे, जळगांव, नागपूर, वर्धा, बुलढाणा या जिल्हा बँकांना उपरोक्त कलम ११(१) नुसार भांडवल पर्याप्तता निकषाची पूर्तता करता आली नाही. त्यांचे स्वभांडवलच संपुष्टात आल्याने त्यांच्याकडे असलेल्या बँकिंग परवान्याची मुदत संपली होती. म्हणून त्यांनी बँकिंग परवाना मिळविण्यासाठी राज्य सरकारकडे तातडीने १,३०० कोटी रुपयांचे अनुदान उपलब्ध करुन द्यावेत, अशी याचना सहकारी खात्याकडे केली आहे. अर्थात राज्य सरकारने आतापर्यंत अशाा पध्दतीने कोणत्याही बँकेला अनुदान दिलेले नाही. सरकारने हे अनुदान भाग भांडवल म्हणून दिले, तर या बँकांना ते १०-१५ वर्शंत परत करावे लागेल. यातील काही बँका आर्थिक गैरव्यवहारामुळे तर काही बँका क्षमतेपेक्षा जादा कर्ज वाटप आणि न झालेली कर्जवसुली या व अशा आणखी कही कारणामुळे अडचणीत आल्या आहेत.

कोकणातील रायगड जिल्हा मध्येवर्ती सहकारी बँक सुस्थितीत असून पष्चिम महाराष्ट्रातील बँका मराठवाडा व विदर्भातील बँकांपेक्षा काहीशा आघाडीवर आहेत. मराठवाडयात बोड आणि लातून या दोनच बँकांना रिझर्व्ह बँकेने परवाने दिले आहेत. नांदेडमध्ये गैरकारभाराने दिवाळखोरीत निघालेली नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँक महत्प्रयासाने सावरते आहे. ३२७ कोटी उणेपर्यंत गेलेले मूल्य आता भरुन निघाले असून ते ४.७५ कोटींनी अधिक झाले आहे. या परिस्थितीत कलम ११ (१) नुसार घातलेले निर्बंध काढावेत यासाठी बँकेचे प्रयत्न सुरु आहेत. जिल्हाधिकाऱ्यांची प्रशासक म्हणून नियुक्ती केल्यानंतर थकबाँकी वसुलीवर भर देण्यात आला. जालना

[११४] गुप्ता एस. के, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम सहकारी संस्था व नियम अहवाल रिपोर्ट.

बँकेवर रिझर्व्ह बँकेचे नियंत्रण आहे. गैरव्यवस्थापन आणि कर्जवाटप, वसुली, नोकरभरती यात नियमबाहय कामे झाल्याने बँक डबघईला निघाली कर्ज माफोची सुमारे ८० कोटीची मदत मिळाल्याने बँकेचे व्यवहार काहीसे सुरु आहेत. औरंगाबाद बँक थकबाकी वाढल्याने निर्बंधात अडकली आहे. मात्र कठोर वसुली, काटकसर, व्यवस्थापनातील बदलामुळे ही बँक कलम ११ (१) च्या बंधनातून बाहेर पडली.

विदर्भातील अमरावती जिल्हा बँक आर्थिक अडचणीत होती. केंद्र व राज्य शासनकडून शेतकऱ्यांनी ३४ कोटी रुपयांची कर्जमाफो मिळाल्यामूळे थकबाकी कमी करण्यास मदत झाली. बँक कलम ११(१) अंतर्गत बंधनातून बाँहेर पडली. बँलढाणा व यवतमाळ या जिल्हा बँका अद्याप कलम ११(१) च्या बंधनात असल्याचे समजते. शंभर वर्ष पूर्ण करणारी अकोला बँक ही राज्यातील एकमेव बँक आहे. एकंदरीत सढोश कर्ज व्यवहार आणि वाढती थकबाकी हे घटक जिल्हा सहकारी बँकांच्या आर्थिक ढुखण्यास कारणीभूत आहेत. बँकांकडून कर्ज घेऊन ते परतफड करण्याची टाळाटाळ केली जाते. कर्ज देण्यातही हितसंबध निर्माण झाले. वसुलीसाठी शिथिलता आली. माठी कर्जे वसूल करण्याच्या बाबतीत बँका अपयशी ठरल्या. त्या राजकीय दबावाला बळी पडू लागल्या. परिणामी राज्यभर अब्जवधी रुपयांचे दावे न्यायालयात अडकले आहेत. सहकारी बँकातफं कर्जवाटप करताना कागदपत्रे व्यवस्थित पाहिले जात नाहीत. तारण मालमात्ता अनेक वेळा अस्तित्त्वावच नसतात. अशा विविध कारणांमुळे कर्जवसुली थकते आणि बँकांचे आर्थिक ढुखणे वाढत जाते. गेल्या काही वर्शातील जिल्हा मध्येवर्ती सहकार बँकांच्या कारभाराचे मूल्यामापन केल्यास त्यात सहकार कमी, मात्र राजकारण जास्त असेच चित्र दिसते. सहकारी बँकांच्या बळकटीसाठी बरीच वर्षे सकारात्मक पाऊल उचलण्याकडे ढुर्लक्ष झाले होते. उलट गोंधळाची स्थिती होती. राज्यातील सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांनी कोणत्या ना कोणत्या माध्यमातून आता सहकारात प्रवेश मिळवला आहे. सहकाराची बरीच सूत्रे त्यांच्या हाती आहेत. ही स्थिती त्यांना सहकाराचे राजकारण करण्यास उपयुक्त ठरली आहे.

या स्थितीचा सखोल अभ्यास करुन वैद्यानाथन समितीने सविस्तर अहवाल राज्य शासनाला सादर केला. असून त्यातील बऱ्याच शिफारशी कृतीत आणल्या आहेत. सहकारी बँकांची वाढती थकबाँकी, शेतकऱ्यांचा कर्जबाजारीपणा आणि त्यातून उद्भवलेल्या त्यांच्या आत्महत्येच्या घटना हा राज्य व केंद्र सरकारच्या दृष्टने अत्यंत काळजोचा विषय ठरला. एकीकडे आजारी वस्थेतील असलेल्या जिल्हा सहाकरी बँका आणि दुसरीकडे विपन्नावस्थेत सापडलेले बहुसंख्या शेतकरी यातून गंभीर प्रश्न उभा राहिला आहे. यावर उपाय म्हणून केंद्र सरकाने काही निकष लावून शेतकऱ्यांना कर्जमुक्त केले आहे. महाराष्ट्र सरकारनेही आपल्या अधिकार क्षेत्रात कर्जमाफोचे धोरण अवलंबले आहे. या कर्जमाफो धोरणामुळे काही जिल्हा सहकारी बँका सावरल्या आहेत. मराठवाडा, विदर्भ आणि खानदेशातील जिल्हा सहकारी बँकांना या कर्ज माफोने तारले असून त्यांची थकबाँकी कमी करण्यास मदत झाली आहे आणि बँका (काहींचा अपवाद वगळता) कलम ११(१) च्या बंधनातून बाहेर पडल्या आहेत. काही जिल्हा सहकारी बँकांनी 'वन टाइम सेटलमेंटम चे धोरण प्रत्यक्षात आणून थकबाकी कमी करण्याचा प्रयत्न केला आहे. केंद्र व राज्या सरकारच्या कर्जमाफो धोरणामुळे शेतकरी कर्ज घेण्यास पुन्हा पात्र ठरले असून सहकारी बँकांनीही शेतकरी वर्गाला कर्जवाटपाचे नवे उद्धिष्ट निश्चित करुन सरकारी धोरणानुसार व्याजाचे दर चार टक्क्यापर्यंत खली आणले आहेत. पण ही स्थिती बँकाना पुन्हा थकाबाकीच्या दुष्टचक्रात अडकावणारी ठरेल, अशी भीती व्यक्त केली जात आहे. कारण उपरोक्त उपयांमुळे जिल्हा सहकारी बँकांना दिलासा मिळाला असला तरी आजही या बँकांची शेकडो कोटी रुपयांची थकबाकी वसूल झालेली नाही. त्यामुळे 'एनपीएम च्या जाळयातून त्यांची लवकर सुटका होण्याची शक्याता नाही. शिवाय कधी अपुरा पाऊस तर कधी अवकाळी पाऊस यामुळे पिकांची हानी होऊन शेतकरी संकटात येतात. ते बँकांचे कर्ज फडण्यास असमर्थ ठरतात.

५.४ सोलापूर जिल्हयातील सहकारी बँका :-

जिल्हयामधील सहकारी चळवळीचे तसेच पतसंस्थाचे नेतृत्व त्या जिल्हयातील मध्यवर्ती बँक करीत आसते सहकारी संस्था आधिनियमानुसार जिल्हयातील प्रवर्तनाच्या अवस्थेतील संस्थाच्या कायद्यानुसार नोंदणीची गरज म्हणून जिल्हामध्यवर्ती सहकारी बँकेमध्ये नवोदित स्थापन होणाऱ्या सहकारी सस्थाना मुख्य प्रवर्तकाच्या नावे खाते उघडावे लागत. जिल्हयातील सर्व नोंदवलेल्या संस्थाना त्याच्यांकडील निधीचा गुतंवणूक सहकारी बँकेमध्ये करावी लागते. जिल्हा मध्येवर्ती बँका ही जिल्हयातील सहकारी संस्थाच्या प्रवर्तनाचे कार्य करते तसेच सहकारी संस्थाच्या पालकत्वाची भूमिका बजावते जिल्हयातील सर्व सहकारी बँका, पतसंस्था, इ सहकारी संस्थाची खाती त्या त्या जिल्हयातील मध्यवर्ती बँकेत आसतात. जिल्हयातील सहकारी संस्थाची जपणूक करणे त्यानां उावष्यकता पडेल तेव्हा त्यांना परत करणे ठेवीवर कर्जे ढेणे सहकारी संस्थांना अहपढराने, अल्प, मध्यम व ढीर्घ मूढतीची कर्जे पुरवणे इत्याढी जबाबढाऱ्या मध्यावर्ती बँकेला विणवाव्या लागतात. ग्रामीण विकासाचे प्रमुख केंद्र म्हणून शासनाच्या धोरणानूसार जिल्हा परिशढेचे आर्थिक व्यवहार व ठेवही मध्यवर्ती बँकेलाच संभाळावी लागते तसेच जिल्हयातील नगरपालिका, पंचायत समित्या, ग्रामपंचायती यांचा आर्थिक व्यवहारही या बँकेमाफ़त चालतो त्यामूळे जिल्हा मध्यवर्ती बँकेला जिल्हयातील निधीच्या समतोलाचे केंद्र असे म्हटले होते.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका ही सहकारी संस्थाच्या त्रिस्तरीय यंत्रणेमधील ढ्वितीय स्तरावरील यंत्रणा आहे. खेडेगाव पातळीवर वितपूरवठयाचे कार्य करणाऱ्या वित्तीय संस्थाचे एकत्रीकरण करुन त्याची एक सहकारी संस्था तयार करण्यात येते. ही संस्था तयार करण्यासाठी खेडयातील प्रथामिक सहकारी शेती पतपुरवठा संस्थाना या संस्थेचे सढस्यत्व ढेण्यात येते. या सहकारी संस्थेला जिल्हा मध्येवर्ती बँक म्हणतात ही संस्था प्राथमिक सहकारी संस्थाचे फडरेशनच असते अशा प्रकारची पहिली बँका भारतात इ.स. १९९६० मध्ये उत्तर प्रदेशात एक प्राथमिक सहकारी सोसायटी म्हणून स्थापन करण्यात आली.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही उत्तर व दक्षिण विभागामध्ये जास्त प्रमाणात आर्थिकदृष्टया सशक्त वाटते जिथे अनुत्पादन पिक कर्जाचे प्रमाण कमी आढळते व वसुलीचे प्रामाण अधिक आढळते. तर दुसऱ्या बाजूचा मध्य पूर्व व पश्चिम भागात या बँकाचा आर्थिक विकास हा कमी प्रमाणात झालेला आपणास जाणवतो. जरी विविध विभागामध्ये हे अर्थिक विकासाचे प्रमाण कमी – अधिक असले तरीही मागील काही वर्षा मध्ये विकासातील समतोल हा काही अंशी झाालेला आहे. तसेच येत्या वर्षामध्ये हा असमतोल निर्माण करण्यात या बँकेला निश्चितच यश येईल.

जिल्हा मध्यवर्ती बँका या ग्रामीण विकासाचे केंद्र म्हणून कार्यरत आहे. या बँका या जिल्हायातील निधीच्या समतोलाचे केंद्र म्हणून कार्यरत आहत. तरी देखील या बँकोंच्या कार्यपध्दती मध्ये दोश आढळून येतात. जसे की समन्वयाचा अभाव राजकीय हस्तक्षेप अकुशल, अपुरा कर्मचारी वर्ग, नियोजनाचा अभाव आधिक व्याजदर निधीची कमतरता, कर्जमंजूरीस विलंब ठेव पातळी कमी आधिक प्रशासकीय खर्च, राखीव निधीचा वापर, भांडवलाचा अपुरा पुरवठा सदोश धोरण.

सोलापुर जिल्हयात ११ तालुके आहेत त्या तालुक्याचा विचार परामर्श सहकारी संस्था वाढताना दिसून येतो तक्ता क्रमांक ७.९ मध्ये संस्थाची संख्या दिलेली आहे. तक्ता क्रमांक ७.९ मध्ये सोलापूर जिल्हयातील सहकारी पतसंस्थचा विकास दर्शविलेला आहे. प्रामूख्याने माढा तालुका सहकारी पतसंस्थाच्या बाबतीत पुढे दिसन आहे. १७४ प्राथमिक सहकारी पतसंस्था या माढा तालुक्यात आहेत एकूण पतसंस्था ११९७ एवढया आहेत.

तक्ता क्र. ७.९

सोलापुर जिल्हातील प्राथमिक कृषीसहकारी पतसंस्थाची स्थिती दर्शवणारा तक्ता

(२०११-१२)

अ.क्र	तालुका	सभासद	संस्था	भांडवल	कर्जे
१	करमाळा	७८९०३	११३	२२२७७७	१००७७७१

२	माढा	६३०२५	१७४	३५९९४९	१२४६४३२
३	बाँर्शी	५३३६८	१३५	१६०३८४	१०५७६०३
४	उ. सोलापूर	२२५७०	५०	५८०९८	२३९०८०
५	मोहोळ	४९५८६	१२०	१८१३१४	३४८९५०
६	पंढरपूर	६७१८८	१३३	३६९१७०	७१३४५५
७	माळशिरस	६९८५८	१३८	३२९१०१	८१३४७८
८	संगोला	५३२४०	८१	१३६८८२	३७९८९५
९	मंगळवेढा	४४२४४	८०	१०९६७३	४१३७२९
१०	दक्षिण सोलापूर	३६४०६	८२	१३९०५३	७८५१३५
११	अक्कलकोट	४५१३२	८९	१४५७२५	९३४९२६
	एकूण	**५६३५२०**	**११९५**	**२२११९२६**	**७९४०४३४**

(स्त्रोत :- सोलापूर जिल्हा सामाजीक व आर्थिक समालोपण २०१३ - १४)

त्यांच्या एकूण भांडवला पेक्षा सहाकरी पतसेस्थानी घेतलेल्या कर्जाची संख्या ही जास्त असल्याचे दिसून येते एकूण खेळते भांडवल २२११९२६ हजार एवढे आहे तर संस्थाची कर्जे ७९४०४३४ हजार इतकी दिसून येतात. सर्वात कमी सहकारी पत संस्थाचा विकास मंगळवेढा, सांगोलना आणि दक्षिण सोलापूर तालुक्यात कमी प्रमाणत झाला आहे. एकूण सभासदांच्या संख्येत ५६३५२० हजार २०११-१२ अखेरपर्यांत वाढझाली. वैदयनाथन समितीने आपल्या अहवालात २१३४३ प्राथमिक सेवा सहकारी संस्थापैकी फक्त १३३६९ संस्थाच म्हटले आहे. तोटयातील संख्या ११०२२० असून तोटा ४३३.१३ काटी आहे. तर नफयातील संख्या ११०२२० असून त्यांचा नफा ३६७.२२ कोटी आहे. या संस्था त्यांच्या व्यवहारामुळे तोटयांत गेल्या असे मला मुळीच वाटत नाही शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या कर्जावर व्याजदराची केली जाणारी चुकीची आकारणी दंडव्याजाचा निष्कारण भुर्दंड, कर्जाचे नवे-जुने करणे,

फरकर्ज पध्दती, कर्जाचो पुनर्रचना, बँकाना मिळालेले पॅकेज सेवा सहकारी संस्थाकडे वर्ग नकरणे, सचिवांकडून बँकाची सेवा घेण पण सचिवाचा मोबदला न देता पगाराचा भुर्दंड सेवा सहकारी संस्थेवर टाकणे, शेतकऱ्यांकडून कर्जापोटी मोठया प्रमाणात केलेली भाग भांडवलाची कपात बँकानी स्वतःकडेच राखून ठेवणे किंवा याबाबत शासनाचे सुस्पष्ट धेरण नसणे आदि बाबो सेवा सहकारी संस्था तोटयात जाण्यास कारणीभूत ठरल्या आहेत.

५.४.१ सोलापूर जिल्हयातील मध्यवर्ती बँकेचे राजकारण :

संपूर्ण सोलापूर जिल्हयात कार्यरत असणाऱ्या सोलापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या जवळपास शखा आहेत. अनेक ठिकाणी बँक स्वतःच्या जागेत स्वतःच्या मालकीच्या इमारतीत सुरु आहे. डीसीसी बँक आणि सर्व सामान्य शेतकरी यांच्यातला 'दुवा असणाऱ्या विविध कार्यकारी सरकारी सेवा सोसायटया आहेत. अल्पमुदतीची, मध्यम व दीर्घ मुदतीची कर्जे शेतकऱ्यांना डीसीसी बँक सोसायटयांमफंत वाटते व वसुली करते. नाबार्ड, रिझर्व्ह बँक, राज्य सहाकारी बँकेचे काममाजत चालते. जवळपास ३५००० हजार कोटींचा ठेवी व २५००० हजार कोटींचे कर्जवाटप दहा वर्शापूर्वी बँकेची असणारी आर्थिक परिस्थिती व चालू आर्थिक परिस्थिती व एकूणच कारभाराबद्दल बोलायचे म्हटले तर याची माहीती फक्त संचालक मंडळ, वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी, बरेचसे कनिष्ठ अधिकारी आणि मोजकेच सभासद यांनाच माहिती असण्याची शक्यता आहे. बँकेच्या शेतकरी सभासदांना फक्त वाषिंक सर्वसाधारण सभेच्या अहवालामधूनच बंकेच्या स्थितीची कल्पना मिळते.

''बँकेचे सुरुवातीपासूनचे संचालक व चेअरमन तसेच सहकार क्षेत्रात जबरदस्त क्रांती घडवून शेतकऱ्यांच्या जीवनाचा कायापालट करणारे खरे सहाकर महर्षी कै.गणपतराव साठे, कै.शंकरराव मोहिते-पाटील, कै.नामदेवराव जगताप यांच्या कुशल नेतृत्वाच्या मूशीतून, तावून सुळाखून निघालेली बँक प्रगतीच्या शिखरावर पोहोचलेली असताना त्याच बँकेबाबत बोलताना लोकांनी तिचा उल्लेख 'भ्रष्टाचारीची गटारगंगाम असा करावा यापेक्षा दुर्दैव कोणते हजारो कोटींच्या ठेवी विश्वासाने बँकेत ठेवणाऱ्या

सर्वसामान्य माणसाच्या भरवषाचा हा अपमान नव्हे काय? सोलापूर जिल्हा मध्येवर्ती सहकारी बँकेचे सर्वात ज्येष्ठ, वयोवृध्द व अनुभवी असणारे संचालक, ज्यांनी व्हाईस चेअरमनप म्हणून बँकेची धुरा यशस्वीपणे सांभाळली ते माजी आमदार भाई एस.एम.पाटील यांनी मागील महिन्यात गेल्या आठवडयात एक राजकीय गौप्यस्फोट केला. त्यांनी बँकेच्या वस्तस्थितीबद्दल चिंता व्यक्त करुन जिल्हा बँक संचालकांनीच गोत्यात आणण्याचा आरोप केला. आदरणीय भाई एस. एम. पाटील तात्या यांची मुलाखत घेताना त्यांनी केलेले विधान अंतर्मूख करणार आहे[११५].

जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या सत्ताधाऱ्यांनी आपापल्या काळात केलेले नियमबाहय कर्जवाटप, थकलेली कर्जे आणि दुष्काळी परिस्थिती आढी अनेक कारणंमुळे बँकेचा आलेख सतत हेलखावे खात राहीला. संचालकांनीच आपापल्या संस्थांनांना शेकडो कोटींची कर्जे घेऊन सभासदांना वाऱ्यावर सोडले. कर्जरोखे करताना होते असलेली आर्थिक उलाढाल, जिल्हा बँकेच्या शाखेतोल शिपाई पासून शाखाधिकारी, बँक इन्स्पेक्टर यांची अरेरावी व उध्दट भाषा, ग्राहकांना मिळणारी अपमानास्पद वागणूक, आर्थिक उलाढालीतील अनियमितता या सर्वांचा परिणाम होऊन जिल्हा बँकेकडे असलेल्या लोकांचा कल कमी कमी होत गेला. जिल्हा बँकेतील गैरकारभाराबाबत राजकीय दृष्टीकोनातून किंवा सामाजीक जाणीवेतून का असेना वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रारी गेल्यानेच हे सर्व प्रकार उघडकीस आले आहेत. आणि विशेष म्हणजे निवडणुकीच्या वेळी आणि महत्वाच्या सभेवेळी निर्णय घेणारे श्रेष्ठी याबाबत गप्प का आहेत याचा उलगडा होत नही श्रेष्ठींचे मौन नक्कीच बचकाळयात टाकणारे आहे. बँकेच्या कारभारातली अनियमितात व भ्रष्टाचार सिध्द झाल्यास सभासदांची होणारी परवड कोण थांबवणार? आणि संचालक मंडळावरच जर कारवाई झाली तर! हजारोंच्या संख्येने असणारे कर्मचारी, त्यांच्या भवितव्याचे काय? ठेवीदारांनी ठेवी काढून घेतल्या तर काय होईल? यापूर्वीही सहकारी बँकावर प्रशासन

[११५] वाघमारे सं., डीसीसी बँकेची वीणा टकण्याचा मार्गावर, टेंभूर्णी, संचार, १० ऑगस्ट २०१५.

नेमले होते. जिल्हा बँकेबाबत हीच परिस्थिती पुन्हा निर्माण झाली तर बँकेची अधोगतीला वेळ लागणार नाही.

५.५ आकडेवारीचे विश्लेषण :-


सोलापूर जिल्हा ८१ % ग्रामीण दुष्काळी पाटयात येत असल्यामुळे सहकारी चळवळीचे ङ्गोगदान खूप महत्त्वाचे आहे. परंतु सोलापूर जिल्हयातील सहकारी संस्थांच्या संचालक मंडळांनी संकुचीत विचारसरणीमूळे सहकाराच्या तत्वावर मर्यादा आल्याचे लक्षात येते. प्रामुख्याने सहाकारी बँकांकडून सभासदांच्या आर्थिक व व्यवसायीक गरजा भागविण्या बरोबरच सभासदांना स्वावलंबो प्रगतीशील परस्पर सहकारी बनवून त्यांचे वैयक्तीक व सामाजीक जीवन संपन्न बनविणे अपेक्षीत आहे. या पार्श्वभूमीवर तक्ता क्र. ५.१० मध्ये सोलापूर जिल्हायातील बँकेच्या सभासदांच्या शिक्षणाचा परामर्श घेण्याचा प्रयत्न केला आहे.

तक्ता क्र. ५.१०
सभासदांच शिक्षण दर्शवणारा तक्ता

तपशील	वारंवारिता	टक्केवारी
निरक्षर	३१	३४.४
माध्यमिक	४९	५४.४
पदवी	८	८.९

पदवीत्तोर	२	२.२
एकूण	**९०**	**१००**

(स्त्रोतः- प्राथमिक साधन सामग्री)



तक्ता क्र. ५.१० मध्ये निरक्षर आणि मध्यमिक शिक्षण पूर्ण झालेले सभासद सोलापूर जिल्हयाच्या सहकारी बँकेत आहेत. ३४.४ टक्क सभासद हे निरक्षर आहेत तर ५४.४ टक्के सहकारी बँकेतील सभासद माध्यमीक शिक्षण पूर्ण केलेले आहे. ८.९ टक्के सभासद हे पदवी शिक्षण पूर्ण झालेले आहेत. तर अगदी कमी प्रमाणात म्हणजे २.२ टक्के सभासद पदवीत्तोर शिक्षण झालेले आहेत. कमी प्रमाणातील शिक्षणमुळे सहकारी बँकाच्या संचालकाने केलेल्या कामाची प्रचिती कमी प्रमाणात येते. त्यामुळे या काराणाने या बँका भाग राहिल्याचे लक्षात येते सोलापूर जिल्हातील सहकारी बँकातील सभासद हे सभासदत्त्व केव्हापासून घेतलेले आहे हा मुद्दा महत्त्वाचा आहे.


तक्ता क्र. ५.११

सहकारी बँकातील सभासदत्त्व

तपशील	वारंवारिता	टक्केवारी

सुरवातीपासून	६६	७३.३
अलीकडे	२४	२६.७
एकूण	**९०**	**१००**

(स्त्रोतः- प्राथमिक साधन सामग्री)



तक्ता क्र. ५.११ मध्ये सोलापूर जिल्हयातील सहकारी बँकाचे सभासदत्त्व कधीपासून आहेत त्याची आकडेवारी दिलेली आहे. ७३.३ टक्के सभासंदाचे सभासदत्तव हे पूर्वीपासून म्हणजे संस्थेच्या सुरवातीपासून आहे तर २६.७ टक्के सभासदत्त्व अलीकडेल काळात स्वीकारलेले आहे.


सभासंदांना आणि ठेविदारांना कर्ज वेळेवर उपलब्ध होत नाही तर वेळेवर कर्ज उपलब्ध झाले तर त्याच्या थकबाकीचा प्रश्न पुढे येतो याच्या माध्यमाने सहकारी पतसंस्थामध्ये राजकारण मोठया प्रमाणावर वाढताना दिसून येत आहे. सहकारी बँकाच्या ताळेबंदात होणारी घट हा कळीचा मुद्दा दिसतो. सदरच्या आकडेवारी वरुन असे आढळते की, सन २००९-१० च्या तुलनेत २०१०-११ चा नफा कमी आहे. तर सहकारी पतसंस्था मधून आवश्यक कर्ज उपलब्ध होत नाही यांचा परामर्श तक्ता क्र.५.१२ मध्ये घेतला आहे.

तक्ता क्र.५.१२

कर्जाची वेळवर उपलब्धता दर्शवणारा तक्ता

तपशील	वारंवारिता	टक्केवारी
उपलब्धता	५५	६१.१
नाही	३५	३८.९
एकूण	**९०**	**१००.००**

(स्त्रोतः– प्राथमिक साधन सामग्री)




६१.१ टक्के सहकारी बँकातून कर्जाची उपलब्धता वेळेवर होते तर ३८.९ टक्के लोकांना कर्जाची उपलब्धता वेळेवर होत नाही कर्ज मिळविण्यासाठी आवश्यक बाबोची पूर्तता करुनही जर सभासदांना कर्जाची उपलब्धता होत नसते तर सहकारी तत्त्वाचे पालन केले जात नाही. अशा पतसंस्था सतत बंद पडताना दिसत आहेत. अर्थात अशा सहकारी पतसंस्था राजकीय लोकांच्या हस्तक्षेपामुळे बद पाडताना दिसतात. हे तक्ता क्र ५.१३ मध्ये सविस्तरपणे दिलेले आहे.

तक्ता क्र. ५.१३

राजकीय हस्तक्षेप दर्शवणारा तक्ता

तपशील	वारंवारिता	टक्केवारी
राजकीय हस्तक्षेप	६७	७४.४
नही	२३	२५.६
एकुण	**९०**	**१००.००**

(स्त्रोतः– प्राथमिक साधन सामग्री)



तक्ता क्र. ७.१३ मध्ये सोलापूर जिल्हयातील ७४.४ टक्के सहकारी बँकाच्या कारभारामध्ये राजकीय लोकांचा हस्तक्षेप असतो. तर केवळ २५.६ टक्के सहकारी बँकाच्या कारभारामध्ये राजकीय लोकांचा हस्तक्षेप नसतो. या तक्ता वरून असे स्पष्ट होते की, सोलापूर जिल्हयातील राजकीय स्थितीमुळे सहकार क्षेत्राचा स्वाहाकार झाला आहे. देशाची अर्थव्यवस्था सुधारण्याचे कार्य हे फक्त केंद्र सरकार किंवा रिझर्व्ह बँक करु शकणार नाही तर देशतील जनतेने विचलीत न होता सरकारच्या प्रयत्नांना मार्ग काढणे आवष्यक आहे. सोलापूर जिल्हयातील सहकारी पत संस्थाच्या मतदानाच्या दरम्यान धोरणाची अंमलबजावणी कोणती असते यावर पूर्ण राजकारण महत्त्वाचे आहे.


तक्ता क्र. ५.१४

राजकीय पक्ष आणि त्यांची धोरणे दर्शवणारा तक्ता

अ.क्र.	तपशील	वारंवारिता	टक्केवारी
१	दबाव	५९	६५.६
२	लोकशाही	३१	३४.४
	एकूण	९०	१००.०
	राजकीय पक्ष		
३	काँग्रेस	३२	३५.६
४	राष्ट्रवादी काँग्रेस	५०	५५.६
५	भाजप	८	८.९
६	शेकाप	०	०
	एकूण	९०	१००.०
	राजकीय दबाव		
७	दबाव	८०	८८.९
८	नाही	१०	११.१
	एकूण	९०	१००.०

(स्त्रोतः- प्राथमिक साधन सामग्री)

राजकीय पक्ष	राजकीय दबाव



तक्ता क्र. ७.१४ मध्ये सोलापूर जिल्हयातील राजकीय स्थितीचा आढावा घेतला आहे. मतदाना मध्ये राजकीय दबाव ६७.६ टक्के सहकारी संस्थात असतो तर ३४.४ टक्के सहकारी बँकेत लोकशही पध्दतीने निवडणूका पार पाडतात. सोलापूर जिल्हयात प्रामुख्याने काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची सत्ता सातत्याने गेल्या तीस वर्षात असल्याचे आढळत तुलनेने भाजप व शिवसेना या राजकीय पक्षाची सत्ता कमी प्रमाणात झालेली आहे. ३७.६ टक्के सहकारी पतसंस्थांवर कँाग्रस पक्षाची सत्ता आहे, ५५.६ टक्के सहकारी पतसंस्थावर राष्ट्रवादी कँाग्रेस पक्षाची सत्ता आहे तर फक्त ८.९ टक्के सहकारी पतसंस्था वर भाजप प्रणीत पक्षाची सत्ता आहे मतदानाच्या प्रक्रियेत पुन्हा सत्ता मिळविण्यासाठी ८८.९ टक्के सहकारी पतसंस्थातील सभासदांनवर दबाब नसतो या तक्ता वरुन मतदानासाठी दबाव सातत्याने त्याच पक्षाची सत्ता आणि दबाव या गोष्टीमुळे सोलापूर जिल्हयातील सहकारी बँकाची राजकीय स्थिती दिसून येते.

७.४.२ राजकीय दडपणामुळे आर्थिक नुकसान:


कर्जासाठी असणाऱ्या सहकारी बँकामध्ये राजकराणामुळे सभासदांना आर्थीक नुकसान सहन करावे लागते कर्ज मंजूरीसाठी वशिलेबाजी करावी लागते तक्ता क्र. ७.१५ मध्ये राजकीय दडपणामुळे आर्थिक नुकासान सहन केलेली आकडेवारी दिलेली आहे.

तक्ता क्र. ७.१५

राजकीय दडपणामुळे आर्थिक नुकसान दर्शवणारा तक्ता

तपशील	वारंवारिता	टक्केवारी
१०००० ते ३००००	७	७.८
३१००० ते ६००००	८	८.९
६१००० ते ९००००	२	२.२
९०००० पेक्षा जास्त	५	५.६
नाही	६८	७५.६
एकूण	**९०**	**१००.०**

(स्त्रोतः– प्राथमिक साधन सामग्री)



